
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७३ | पाने १२+८+४ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अक्कलकोटमधील रस्त्यांसाठी ११४ कोटी

## नगरोत्थान प्रकल्पातून निधी

## शहरातील चार मुख्य रस्ते होणार सुपर फास्ट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहरातील रस्ते बळकटीकरण आणि बांधणीसाठी नगरोत्थान महाभियानांतर्गत ११४ कोटी रुपयांचा रस्ते विकास प्रकल्पास निधी मंजूर झाला आहे. यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सतत पाठपुरावा आणि विशेष प्रयत्न केले. अनेक प्रयत्नानंतर हा निधी मिळणार असून यामुळे शहरातील मुख्य मार्गासह काही खराब रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.



नगरोत्थान महाभियानांतर्गत अक्कलकोट नगरपरिषदेने ११४ कोटी इतक्या किंमतीचा रस्ते विकास प्रकल्प सादर केला होता. हा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयांकडून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला होता तो विषय आता मार्गी लागला आहे. कल्याणशेट्टी यांनी याबाबत अधिक माहिती देतांना सांगितले की वाढती स्वामी भक्तांची संख्या आणि वाढत्या शहराचा विस्तार याचा विचार करून रस्ते अधिक चांगले आणि बळकट असणे गरजेचे आहे याचा विचार करून सदर रस्त्यांच्या निधीसाठी पाठपुरावा करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यातून प्रशासकीय मंजुरी मिळविली आहे. निविदा प्रक्रियेनंतर सदर रस्त्यांचे काम सुरु होणार आहे. हे सर्व रस्ते पूर्ण झाल्यानंतर शहराचे सौंदर्य आणि दळणवळण सुविधा आणखी वाढण्यास मदत होणार आहे.मंजूर रस्त्यात सोलापूर रोड नाका ते हसापूर रस्ता मार्गे हन्नूर नाका या रस्त्यासाठी १७ कोटी रुपये, एमएसईबी चौक ते मंगरुळे बायपास चौक ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ चौक या रस्त्याच्या सुधारणेसाठी ४७ कोटी २४ लाख रुपये तसेच मंगरुळे बायपास चौक ते कारंजा चौक या महत्वाच्या रस्त्यांसाठी २४ कोटी १५ लाख रुपये, श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर गेट ते मुरलीधर मंदिर ३ कोटी ७२ लाख असे चार प्रमुख रस्त्यांच्या सुधारणेचा समावेश आहे. इतर सर्व कर व शुल्क मिळून ११४ कोटी एवढ्या रक्कमेसाठी मान्यता मिळालेली आहे. अक्कलकोट शहराच्या विकास आराखड्यातील उर्वरित विकास कामे येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा सुरु आहे.

### पुन्हा होणार रस्ते चकाचक

अक्कलकोट शहरासाठी तत्कालीन महायुती शासनाने रस्ते प्रकल्प मंजूर केला होते. त्यातून शहरातील बहुतांश नवीन रस्ते केले होते. मात्र यातील काही रस्ते खराब झाले होते. आता त्यामुळे नवीन प्रकल्पाच्या मंजुरीमुळे शहरात पुन्हा रस्ते चकाचक होणार आहेत.



चार प्रमुख रस्त्यांच्या बळकटीकरणाची अत्यंत आवश्यकता होती. ती आता सुमारे ११४ कोटी रुपयांच्या मंजुरीने संपूर्णतः म ार्गी लागले आहे. महिनाभरात निविदा प्रक्रियेच्या पूर्ततेने प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे. या कामांसाठी मुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे सहकार्य मिळाले आहे.

**-आ. सचिन कल्याणशेट्टी,**
**जिल्हाध्यक्ष, भाजपा, पूर्व विभाग**

## संक्षिप्त वृत्त

### पिलीव येथील अष्टविनायक गणेश मित्रमंडळाच्या अध्यक्षपदी तुषार जाधव

**पिलीव, दि. १ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अष्टविनायक गणेश मित्र मंडळाच्या अध्यक्षपदी तुषार जाधव यांची सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी अक्षय माने, तन्मय काळे, सचिवपदी ओंकार मोरे, सहसचिवपदी सौरभ काळे, खजिनदारपदी अमोल गांधी, सहखजिनदारपदी श्रीनिवास महामुनी यांच्या निवडी २०२४ मध्ये होणाऱ्या गणेशोत्सवासाठी करण्यात आल्या आहेत. यावर्षी मिरवणुक प्रमुख म्हणून अतिश जेऊरकर, कैलास फाळके, आकाश बोडरे, अमोल लोखंडे यांच्या तर ढोल ताश्या प्रमुख अजित करडे, सुहास चव्हाण, प्रमोद माने व्यवस्थापक म्हणून जुबेर पठाण यांच्या निवडी करण्यात आल्या. संस्थापक अध्यक्ष अविनाश जेऊरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या निवडी करण्यात आल्या. यावेळी प्रकाश जाधव, ॲड. वैभव मेथवडे, राजाभाऊ काळे, श्याम उपाध्ये, गणेश सूर्यवंशी, दीपक केसकर, आदित्य गबाले उपस्थित होते.





### बार्शी येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्ताने भारतीय कम्युनिस्ट पक्ष जिल्हा कौन्सील यांच्यावतीने कॉ. आनंद धोत्रे यांच्या हस्ते पुष्पर अर्पण करण्यात आला. त्यासोबतच लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कॉ. अमर शेख यांच्या पुतळ्यांनाही अभिवादन करण्यात आले. यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांनी अण्णा भाऊंच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या. यावेळी कम्युनिस्ट पक्ष जिल्हा सचिव कॉ. प्रवीण मास्तुद , कॉ. भारत भोसले, कॉ. भारत चव्हाण, सरवदे उपस्थित होत्या.



### बार्शी येथील शाह कन्या प्रशालेत बी.एड. प्रशिक्षणार्थींना निरोप

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

प्रशालेतील आंतरवासीता उपक्रमाचा अनुभव भविष्यात उत्तम शिक्षक बनण्यासाठी उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीने विद्यार्थिनींनी तयारी करावी, असे मार्गदर्शन मुख्याध्यापिका शुभदा जोशी यांनी केले. ८ ते ३१ जुलै या कालावधीत शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी येथील बी. एड. प्रशिक्षणार्थींचे सराव पाठ सत्र शाह कन्या प्रशालेत पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक ज्योत्स्ना म्हेत्रे यांनी केले. श्रद्धा पवार व चव्हाण या विद्यार्थिनींनी मनोगतामधून प्रशिक्षणार्थ्यांनी राबवलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. प्रशिक्षणार्थी दीक्षा कांबळे व वैशाली कांबळे यांनी प्रशालेत मिळालेल्या अध्यापन अनुभवाचे वर्णन केले. शालेय संपर्क शिक्षक संदेश घाडगे यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. पी. ए. पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रशिक्षणार्थिनी प्रशालेस इलेक्ट्रॉनिक वजनकाटा भेट दिला. सूत्रसंचालन फातिमा महेदवी यांनी केले तर आभार गौरी निकम यांनी मानले.



### दुधनी जिल्हा परिषद मराठी केंद्रशाळेच्या क्रीडा सप्ताहाची स्नेहभोजनाने सांगता

**मैंदर्गी, दि. १ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी जि. प. प्रा. मराठी केंद्र शाळेत क्रीडा सप्ताहाची सांगता स्नेहभोजनाने करण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त राज्यात २२जुलै ते २८ जुलै या कालावधीत शिक्षण सप्ताह राबविला गेला. त्या अनुषंगाने समुदाय सहभाग दिवस म्हणून नियोजन करून शाळेत समुदाय सहभागाच्या निमित्ताने विद्यांजली समाजांच्या सहभागातून दानशूर व्यक्तींकडून स्नेहभोजन देण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरखनाथ दोडमनी, सैदप्पा झळकी, गिरमल अमाणे, मिहिदमियाँ जिडगे, मुख्याध्यापक श्रीशैल मलगण, पोमू राठोड, संजीव बेण्णेसूर, रविकुमार कोरचगाव, शोभा म्हेत्रे, अंजली गुंजोटे उपस्थित होते.

# छत्रपती शिवरायांमुळे देशात राष्ट्रप्रेमाचे स्फुल्लिंग



## सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे

## छत्रपती शिवाजी महाराजांवरील आठ पुस्तकांचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि. १ ऑगस्ट -**

'छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेताच मनात राष्ट्रप्रेमाचे स्फुल्लिंग जागृत होते. गुलामगिरी कशी झुगारून द्यावी याचा आदर्श शिवाजी महाराज होते. त्यांचे जीवन केवळ भारतीयांसाठी नव्हे तर परदेशातीलही गुलाम गिरीविरूद्धच्या लढ्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे', असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांनी व्यक्त केले.

नवी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराजांवरील विविध आठ पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि सरकार्यवाह होसबाळे यांच्या हस्ते केदार फाळके लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज', गजानन मेहंदळे लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज न होते तो', आणि पांडुरंग बलकवडे, सुधीर थोरात, मोहन शेटे लिखित 'स्वराज्य संरक्षण का संघर्ष' व 'अठरहवी सताब्दी का हिंदवी साम्राज्य' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. हिंदी अनुवादीत या मुळ मराठी पुस्तकांचे प्रकाशन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ आणि श्री भारती प्रकाशनतर्फे करण्यात आले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराजांचा जेव्हा उल्लेख होतो, तेंव्हा प्रत्येक भारतीयांत राष्ट्रप्रेमाचे स्फुल्लिंग जागृत होते. छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण राष्ट्राची प्रेरणा आहेत. आपल्या जीवनकाळात अनेक उदात्त विचार त्यांनी राष्ट्राला दिले. शिवाजी महाराज केवळ मराठ्यांचा गौरव नाही, तर संपूर्ण राष्ट्राचा गौरव आहेत. देशासाठी जगावे, देशासाठी मरावे, असा चिरंजीवी विचार त्यांनी दिला,' अशी भावना होसबाळे यांनी व्यक्त केली.

### भारताचे भाग्यविधाते

छत्रपती शिवाजी महाराज हे भारताचे भाग्यविधाते होते, अशी भावना माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज भारतातील सर्वोत्कृष्ट राजे होते. पारतंत्र्य आणि आक्रमणांच्या कालखंडात त्यांनी स्वराज्य निर्माण केले. त्यामुळेच भारतीय संस्कृती सुरक्षित राहिली. शिवचरित्र शक्य तेवढे आत्मसात करणे आणि त्याचा प्रसार करणे आपले कर्तव्य आहे.' असेही ते म्हणाले.

# महादेव कोगनुरे यांचा दक्षिण विधानसभेसाठी उमेदवारी मागणी अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १ ऑगस्ट-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने इच्छुक उमेदवारांकडून अर्ज म ागविण्यास सुरुवात केली आहे. दक्षिणसाठी इच्छुक म्हणून महादेव कोगनुरे यांचा अर्ज शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

काँग्रेसकडून दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघावर महादेव कोगनुरे यांनी दावा केल्याने उत्सुकता वाढली आहे. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाकडे लागून राहिले आहे. गेल्या आठवड्यात कोगनुरे यांच्या कार्यकर्त्यांनी श्री सिद्धारामेश्वर व रुपाभवानी मातेची पूजा करुन कोगनुरे यांना उम ेदवारी मिळावी म्हणून प्रार्थना केली होती. यावेळी तिरुपती परकिपंडला, हरीश पाटील, रमेश हसापुरे, प्रभाकर दिंडोरे, गुरुलिंग अचलेर, मल्लिनाथ धरसांगे, बसवराज बगले, राधाकृष्ण पाटील, अशोक देसाई, मल्लेशी मंदोली, बसणा बाके, रविकांत पाटील, रविकांत चंदोडे, सुनील पारे, काशिम शेख, सरपंच धर्मण्णा गावडे, सरपंच अमसिद्धा देशमुख, सोमनिंग देशमुख, सुरेश शर्मा, कल्लप्पा हांगर्गी, मल्लिनाथ धारसंगे, बसम्मा पाटील, सुनीता चव्हाण, मनोहर माचरला, शिवशरण मुलगे, सिद्धाराम बगले, चंद्रकांत देशट्टी, रेवणू कोणदे, किरण सुर्वे आदी उपस्थित होते.



# बार्शीत परसबाग विषमुक्त भाजीपाला लागवड स्पर्धा

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

लायन्स क्लब बार्शी रॉयल व तिरुपती ॲग्रो एजन्सीज, बार्शीच्या संयुक्त विद्यमाने नारी शक्तीला आपले कलागुणांना वाव देण्याची सुवर्णसंधी, आपल्या कर्मभूमीत राहून म्हणजेच आपल्या घरातूनच सहभाग घेत 'परस बाग विषमुक्त भाजीपाला लागवड स्पर्धा' याचे खास आयोजन करण्यात आले आहे. यात सहभाग घेण्याची तारीख १ ते १५ ऑगस्ट आहे.

या स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी बियाणे मोफत दिले जाणार आहे. भाजीपाला लागवड घराच्या गच्चीत, कुंडीत किंवा परसबागेत असावी. बियाणे घेण्यासाठी नाव नोंदणी तिरुपती ॲग्रो एजन्सीज, गाळा नं. २८, मार्केट यार्ड शॉपिंग सेंटर, तुळजापूर रोड, बार्शी येथे करावी. मर्यादित सहभाग असणार आहे. (बार्शी शहर फक्त) तसेच परसबागेचे परीक्षण १५ सप्टेंबरपर्यंत होईल. पहिल्या तीन स्पर्धकांना पैठणी, कांजीवरम व बेंगलोर साडी असे बक्षीस दिले जाईल. प्रत्येक सहभागी व्यक्तीस सर्टिफिकेट दिले जाईल, असे लायन्स क्लब बार्शी रॉयलचे अध्यक्षा वर्षा गुंदेचा-खांडवीकर, प्रोजेक्ट चेअरमन मंगेश बागुल, सेक्रेटरी अमृता गुंडेवार व ट्रेझरर राजली कांकरिया यांनी सांगितले.

# माढ्यात अभिजीत पाटलांचे जेसीबीच्या सहाय्याने फुले उधळून जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १ ऑगस्ट-**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढा शहराला भेट दिली यावेळी त्यांच्या समर्थकांकडून माढा शहरामध्ये अभिजीत पाटील यांचे आगमन होताच जेसीबीच्या साहाय्याने व हलगी फटाक्याची आतिशबाजी करून जंगी स्वागत करण्यात आले.

१ ऑगस्ट रोजी अभिजीत पाटील यांचा वाढदिवस होता. त्यानिमित्ताने कार्यकर्त्यांच्या भेटीगाठीसाठी ते माढा शहरांमध्ये आले होते. माढा शहरात आगमन होताच कार्यकर्त्यांकडून मोठ्या उत्साहात स्वागत करून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्यांनी ग्रामदैवत माढेश्वरी देवीचे शेकडो कार्यकर्त्यांसह दर्शन घेतले. माढा तालुक्यात ८० हून जास्त गावात अभिजीत पाटलांच्या वाढदिवसाचे बॅनर मोठ्या प्रमाणात लावण्यात आले असून त्या बॅनरवर भावी आमदार असा उल्लेख करण्यात आला आहे. पत्रकारांनी त्यांना शरद पवार की देवेंद्र फडणवीस असा प्रश्न विचारला असता त्यांनी याचे उत्तर न देता येत्या विधानसभेची निवडणूक मी लढवणार आणि नक्की आमदार होणार आणि तो फक्त जनतेचा आमदार असणार असा आत्मविश्वास व्यक्त केला. त्यांच्या त्या वक्तव्यावर कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष करत आमदार अभिजीत पाटील अशा घोषणा दिल्या. यावेळी औदुंबर देशमुख, आबासाहेब साठे, ऋषिकेश तांबिले, जितू जमदाडे, नितीन सरडे, अजिंक्य चव्हाण, ज्ञानेश्वर बडगे, सुहास मोरे, महेश नागटिळक, अनिकेत परबत, मुकेश मोरे, सूरज मोरे, अच्युत उमाटे, नागनाथ मुकणे, परमेश्वर आतकरे, नवनाथ पवार यांच्यासह माढा शहरा व ग्रामीण भागातील अभिजीत पाटील समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# चिखलठाणच्या महेशकुमार सरडे यांचे जलसंपदा विभागाच्या परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

चिखलठाण तालुका करमाळा येथील महेशकुमार मच्छिंद्र सरडे याची जलसंपदा विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत कालवा निरीक्षकपदी निवड करण्यात आली आहे.

सरडे यांनी प्रतिकूल परिस्थितीतून संघर्षमय वाटचाल करत हे यश संपादन केले आहे. चिखलठाण (ता. करमाळा) येथील रहिवासी असून प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिखलठाण, माध्यमिक शिक्षण रयत संस्थेच्या शिक्षण रामबाई बाबुलाल सुराणा विद्यालय चिखलठाण येथे झाले. पुणे येथील शेतकी महाविद्यालयातून त्यांनी कृषी विषयात पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल भारतीय जनता पक्षाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल व मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी अभिनंदन केले. तसेच चिखलठाण परिसरातील विविध क्षेत्रातील मंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. गावातील मित्रमंडळींनी फटाके वाजवून निवडीचा आनंद व्यक्त केला गेला.



# दक्षिणकाशी असणाऱ्या पंढरपूरचा गतीने विकास व्हावा

## क्षेत्रीय रेल्वे परामर्शदात्री समितीच्या बैठकीत प्रणव परिचारकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

दक्षिणकाशी असणाऱ्या पंढरपूर रेल्वे स्थानकाचा अमृत योजनेतून होत असणारा विकास हा जलद गतीने पूर्ण व्हावा. पंढरपूर पासून देहूरोड स्टेशनपर्यंत इंटरसिटी तर पंढरपूर दादर रेल्वे गाडी दररोज सुरू करावी. दक्षिणकाशी असणाऱ्या पंढरपूरचा रेल्वेचे अनुषंगाने विकास करावा, अशा आग्रही मागण्या क्षेत्रीय रेल्वे परामर्शदात्री समितीच्या बैठकीत केल्या असल्याची माहिती प्रणव परिचारक यांनी दिली.

मध्य रेल्वेच्या क्षेत्रीय रेल्वे परामर्शदात्री समितीची बैठक मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकीस समितीचे संचालक प्रणव परिचारक उपस्थित होते. यावेळी मध्य रेल महाप्रबंधक, रामकरण यादव, उपमाहाप्रबंधक अभय मिश्रा, वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय रेल्वे तीर्थक्षेत्रांना जोडण्याचा कार्यक्रम हाती घेतला. या अनुषंगाने दक्षिण काशी असणाऱ्या पंढरपूरच्या रेल्वे स्थानकाच्या विकासासोबत रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढवण्याबाबत परिचारक यांनी मुद्दे मांडले. या बैठकीत पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या अमृत योजनेतून होत असणाऱ्या विकासाचे आणि नूतनीकरणाचे काम संथगतीने सुरू आहे. पंढरपूर रेल्वे स्थानकावर लिफ्ट, पुस्तकालय, औषधालय यासह नवीन दोन प्लॅटफॉर्म निर्माण करून पाच प्लॅटफॉर्मचे पंढरपूर रेल्वे स्थानक तयार करावे. संपूर्ण रेल्वे स्थानकासह रेल्वे हद्दीच्या परिसरात सीसीटीव्ही बसवावे, पंढरपूर-दादर एक्सप्रेसला पंढरपुरातून चांगला प्रतिसाद आहे. हीच एक्सप्रेस दररोज पंढरपुरातून दादरसाठी सुरू करावी, पंढरपूर ते देहूरोड स्टेशन मार्गावर दररोज इंटरसिटी सुरू करावी. जेणेकरून पंढरपूरपासून देहू, आळंदीला जोडणारा मार्ग रेल्वेने तयार होईल. तसेच दौंड-इंदोर ही एक्सप्रेस रेल्वे गाडी कुर्डूवाडीपर्यंत वाढवावी. जेणेकरून सोलापूर जिल्ह्यासह उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरिकांना व्यापाऱ्यांना इंदौरकडे जाणारा मार्ग सहज आणि सुलभ उपलब्ध होईल. पंढरपूर कोल्हापूर, पंढरपूर, नागपूर, अशा रेल्वे गाड्यांबाबतही चर्चा झाली. तसेच पंढरपूर ते कुर्डूवाडी या मार्गावर देखील लोकल गाडीच्या तत्त्वावर दिवसभरात गाड्या सुरू कराव्यात. जेणेकरून पंढरपुरी तीर्थक्षेत्री येणारा भाविक कुर्डूवाडी जंक्शनच्या माध्यमातून पंढरपुरापर्यंत सहज येऊ शकेल.



### रेल्वे प्रशासन सकारात्मक

क्षेत्रीय रेल्वे परामर्शदात्री समितीच्या बैठकीत प्रणव परिचारक यांनी रेल्वे प्रश्नाबाबत केलेल्या मागण्यांबाबत रेल्वे प्रशासनाचे सकारात्मकता दर्शवली आहे. यामध्ये पंढरपूर रेल्वे स्थानकाच्या कामाबाबत तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना या बैठकीमध्ये देण्यात आल्या. तसेच रेल्वे गाड्या संदर्भातील मागण्यांबाबत देखील सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन रेल्वे प्रशासन यांच्याकडून प्रणव परिचारक यांना देण्यात आले आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
४० वा वर्धापन दिन
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३८ वे अंक २७३ |
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्त्वाचे...

### आव्हान देण्यासाठी मनगटात ताकद असावी लागते; उद्धव ठाकरे यांना टोला

**मुंबई :** आव्हानाची भाषा करण्यासाठी मनगटात ताकद असावी लागते घरात बसून नाऱ्यांना ते शक्य नाही असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावला



ठाकरे गटाच्या बुधवारी झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे देवेंद्र फडणवीस ,भाजपा व पंतप्रधान मोदी यांच्यावर कडाडून हल्ला चढविला होता. राजकारणात एकतर मी राहिन किंवा फडणवीस राहतील ,असा इशाराही दिला. त्यामुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

### श्रीकृष्ण जन्मभूमी प्रकरणी मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळली

**प्रयागराज :** मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह वाद प्रकरणी मुस्लिम पक्षाची याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली. हिंदू पक्षाने दाखल केलेल्या १८ याचिकांवर एकत्रित सुनावणी होणार असल्याचे न्यायालयाने सांगितले. न्या. मयंक कुमार जैन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. शाही ईदगाहचा अडीच एकर परिसर मशीद नसल्याचा दावा करणाऱ्या याचिका हिंदू पक्षाच्या वतीने दाखल करण्यात आल्या होत्या. ते भगवान श्रीकृष्णाचे गर्भगृह आहे. त्याच वेळी मुस्लिम बाजूने असा युक्तिवाद केला होता की, मशिदीसाठी जागा १९६८ मध्ये झालेल्या करारानुसार देण्यात आली होती. हिंदू बाजूच्या याचिका सुनावणीच्या योग्य नाहीत. मात्र, हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर मुस्लिम पक्षाचा हा युक्तिवाद ग्राह्य धरला नाही. आता हिंदू पक्षाच्या १८ याचिकांवर एकत्रित सुनावणी होणार आहे. बहुतांश याचिकांचे स्वरूप सारखेच आहे.

### पूजा खेडकरच्या अटकेचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली :** फसवणूक तसेच ओबीसी व दिव्यांग कोट्यातील फायदे मिळवण्याचा आरोप असलेली वादग्रस्त माजी आयएएस प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला आहे. अटकपूर्व जामिनासाठी तिने दाखल केलेली याचिका येथील न्यायालयाने गुरुवारी फेटाळली. यूपीएससीच्या आतून कुणी पूजा खेडकरला मदत केली का, याचा तपास दिल्ली पोलिसांनी केलाच पाहिजे, असे अतिरिक्त सत्र न्यायाधीश देवेंद्रकुमार जंगाला यांनी तिचा अटकपूर्व जामीन फेटाळताना सांगितले. न्यायाधीशांनी या प्रकरणाच्या तपासाची व्याप्ती वाढवताना, पात्र नसताना इतर कुणी ओबीसी आणि दिव्यांगांच्या कोट्याचा गैरफायदा घेतला का, याचा तपास करावा, असा निर्देश दिला. यूपीएससीने बुधवारी पूजा खेडकरची उमेदवारी रद्द केली तसेच भविष्यातील परीक्षाही देता येणार नसल्याचे स्पष्ट केले होते.

७२ वर्षांनंतर महाराष्ट्राला वैयक्तिक ऑलिम्पिक पदक

# नेमबाज स्वप्निलला ऐतिहासिक कांस्यपदक



ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझीशन नेमबाजीत कांस्यपदक पटकावणारा महाराष्ट्राचा स्वप्निल कुसळे

◆ **पॅरिस, १ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स स्पर्धेत अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या कोल्हापूर येथील स्वप्निल कुसळेने भारताला तिसरे कांस्यपदक जिंकून दिले. स्वप्निल ऑलिम्पिकच्या ५० मीटर रायफल थ्री पोझीशन्स नेमबाजीत पदक जिंकणारा पहिलाच नेमबाज ठरला. खाशाबा जाधवनंतर ७२ वर्षांनी स्वप्निलने महाराष्ट्राला वैयक्तिक ऑलिम्पिक पदकाचा मान मिळवून दिला.

चॅटॉरॉक्स येथील नेमबाजी केंद्रात झालेल्या अंतिम फेरीत स्वप्निल ६० शॉटनंतर सहाव्या स्थानावर होता; त्यानंतर त्याने आपल्या लक्ष्यावर लक्ष केंद्रित केले व जोरदार मुसंडी मारली.

स्वप्निल कुसळेने ८ नेमबाजांच्या अंतिम फेरीत एकूण ४५१.४ गुण नोंदवले. एका टप्प्यावर सहाव्या स्थानावर राहिल्यानंतर स्वप्निलने तिसरे स्थान पटकावले.

स्वप्निल कुसळेच्या या कांस्यपदकासह आता पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताची एकूण तीन पदके झाली आहेत. ही सर्व कांस्यपदके आहे. यापूर्वी मनू भाकरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्यपदक मिळविले व त्यानंतर तिने सरबज्योत सिंगच्या साथीने मिश्र सांघिक १० मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्यपदक जिंकले. (वृत्तसंस्था)

### स्वप्निलला मिळणार पदोन्नती

स्वप्निल हा मध्य रेल्वेत तिकीट कलेक्टर म्हणून कार्यरत आहे. ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकल्यामुळे मध्य रेल्वेलाही खूप आनंद झाला असून, स्वप्निलला रेल्वे अधिकारी म्हणून पदोन्नती देण्याची घोषणा मध्य रेल्वेने केली.

# ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये मुसळधार बरसणार

### हवामान विभागाने वर्तविला अंदाज

◆ **नवी दिल्ली, १ ऑगस्ट**

ऑगस्टच्या अखेरीस ला-निनाची अनुकूल स्थिती निर्माण होणार आहे. या सकारात्मक बदलामुळे ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने गुरुवारी वर्तवला.

देशातील ५२ टक्के शेती पावसावरच अवलंबून असल्याने हा पाऊस कृषिक्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. देशभरातील पिण्याचे पाणी आणि वीजनिर्मितीसाठी आवश्यक असलेले जलाशय भरून काढण्यासाठीही पाऊस महत्त्वाचा आहे.

४२२.८ मिमी दीर्घकालीन सरासरीच्या तुलनेत १०६ टक्के जास्त पाऊस ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये देशभरात पडणार आहे, असे हवामान विभागाने सांगितले. देशात १ जूनपासून ४४५.८ मिमी सामान्य सरासरीच्या तुलनेत आतापर्यंत ५५३.८ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. हा सरासरीपेक्षा दोन टक्क्यांनी जास्त आहे.

देशातील बहुतांश भागांत सरासरी ते सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा अंदाज आहे. ईशान्य, लगतचा पूर्व भारत, लडाख, सौराष्ट्र, कच्छ, मध्य भारतातील काही भाग तसेच भारतीय द्वीपकल्पात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची अपेक्षा आहे, असे हवामान विभागाचे प्रमुख मृत्युंजय मोहपात्रा यांनी आभासी पत्रपरिषदेत सांगितले.

ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पश्चिम हिमालयात पावसाची तूट राहील. देशातील बहुतांश भागांत कमाल तापमान सामान्यपेक्षा जास्त राहील. गंगेचे खोरे, मध्य भारत आणि आग्नेय किनाऱ्यावरील काही भागांत कमाल तापमान सामान्य ते सामान्यपेक्षा कमी राहील, असे मोहपात्रा यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



### एकचतुर्थांश भारतात पावसाची तूट

आसाममध्ये आलेल्या पुरामुळे तसेच केरळातील भूस्खलनामुळे जगाचे लक्ष भारताकडे वेधले गेले आहे. मात्र, मान्सूनचा अर्धा मोसम झाला असला, तरी ३६ हवामान उपविभागांपैकी २५ मध्ये अद्याप पावसाची तूट आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली.

# जितेंद्र आव्हाड यांच्या वाहनावर स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांचा हल्ला

### ठाण्यात आव्हाड समर्थकांचा रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१ ऑगस्ट-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या वाहनांवर स्वराज्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केल्याची घटना गुरुवारी दुपारी घडली . ठाणे येथील घरी परतत असताना पोलीसांच्या समोरच तीन कार्यकर्त्यांनी आव्हाड यांच्या गाडीवर हल्ला केला. दरम्यान या हल्ल्याच्या निषेधार्थ आव्हाड समर्थकांनी त्यांच्या निवासस्थानासमोर रास्ता रोको केले. हल्ले पोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी करून राज्य सरकारचा तीव्र निषेध केला. या घटनेनंतर त्यांच्या निवासस्थानासमोर पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.



काही दिवसांपूर्वी कोल्हापूरच्या विशाळगडावर झालेल्या दंगलीनंतर जितेंद्र आव्हाड यांनी माजी खासदार संभाजीराजे यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या शरीरात छत्रपती शाहू महाराजांचे रक्त वाहत आहे का? हे तपासावे लागेल, असे विधान आव्हाड यांनी केले होते. या विधानाचा राग डोक्यात धरून स्वराज्य संघटनेकडून आज आव्हाड यांच्या वाहनावर हल्ला करण्यात आला.

या हल्ल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया देताना आव्हाड म्हणाले, तीन जणांनी आज माझ्या गाडीवर हल्ला केला. माझ्याकडे चार पोलीस होते, पण मी त्या तरुणांवर कोणताही हल्ला करण्यास सांगितले नाही. मी आशा भ्याड हल्ल्यांना घाबरणार नाही. मी विशाळगडाबाबत बोललो कारण छत्रपती शाहू महाराजांनी समतेचा जो वारसा दिला आहे, तो संभाजीराजेंनी पुढे न्यायला पाहीजे होता. पण त्यांनी केवळ बोलघेवडेपणा केला. माझ्या गाडीवर हल्ला करून मी शांत बसेन असे तुम्हाला वाटत असेल पण तसे होणार नाही मी आणखी त्वेषाने तुमच्याविरोधात बोलणार आहे. आतापर्यंत तुम्हाला आदरार्थी बोलत होतो, पण आता मी बोलण्यासाठी मोकळा आहे.

### संभाजीराजेंवर काय टीका केली होती?

विशाळगडावरील अतिक्रमण हटविण्यासाठी माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. त्यांच्याकडून विशाळगड येथे आंदोलनही करण्यात आले. मात्र या आंदोलनाच्या निमित्ताने विशाळगडावर काही समाजकंटकांनी तोडफोड केली. यानंतर संभाजीराजेंवर टीका करत असताना जितेंद्र आव्हाड म्हणाले, संभाजीराजेंना आता छत्रपती म्हणणे सोडून द्या. कारण त्यांना वंशपंरपरागत जो अधिकार मिळाला होता, तो पुढे घेऊन जाण्याची त्यांची जबाबदारी होती. शाहू महाराज आणि संभाजीराजेंच्या रक्तात काय आहे? हे तपासण्याची गरज आहे.असे ते म्हणाले होते.



### जरांगेंना अश्रू अनावर; मराठा समाजाला केले भावनिक आवाहन

**आतंरवाली सराटी-**

मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त अंतरवाली सराटीमध्ये मराठा समाजाला संबोधित करत असताना मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी बोलताना जरांगे म्हणाले, मी तुमच्यासाठी खंबीर आहे. माझी समाजाकडे काहीही अपेक्षा नाही. तुमची पोरे मोठे करण्यासाठी मी जीव हातावर घेतला आहे. मी शेवटच्या घटकापर्यंत मराठा समाजाला कधीही सोडणार नाही, असे म्हणत मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाले होते. राज्यात मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा प्रश्न चांगलांच तापलेला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी केलेली आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी अनेकदा उपोषणही केले. मात्र, त्यांच्या या मागणीला ओबीसी समाजाने विरोध केला. तसेच याबाबत सर्वपक्षीय बैठकही बोलावण्यात आली होती.

# राज्यांना अनु. जाती, जमातीत वर्गवारी करून आरक्षणाचा अधिकार

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

**नवी दिल्ली, १ ऑगस्ट**

दुर्लक्षित जातींच्या उत्थानासाठी राखीव वर्गांना आरक्षण मंजूर करण्याकरिता अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये उपवर्गीकरण करून आरक्षणाचा कोटा ठरविण्याचा अधिकार सर्व राज्यांना देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. २००४ मधील आपल्या एका निकालात सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना एससी आणि एनटी प्रवर्गात वर्गवारी करण्याचा अधिकार देता येणार नाही, असे स्पष्ट केले होते. हा निकाल आज सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सात सदस्यीय घटनापीठाने सहा विरुद्ध एक अशा बहुमताने बदलविलो. या निर्णयामुळे या प्रवर्गांमधील जास्तीत जास्त मागास जातींना आरक्षणाचा लाभ मिळू शकणार आहे.

या सात सदस्यीय घटनापीठात न्या. भूषण गवई, न्या. विक्रम सेठ, न्या. बेला एम. त्रिवेदी, न्या. पंकज मिठाळ, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. सतीश चंद्र मिश्रा यांचा समावेश आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी स्वत:करिता आणि न्या. मिश्रा यांच्यासाठी निकाल लिहिला. यात केवळ न्या. त्रिवेदी यांनी विपरित निकाल दिला.


Precision PRINTS
सोलापूर तरुण भारत
वृत्तवेध CHANNEL
वर्धापन दिन सोहळा ४० वा
सस्नेह निमंत्रण...
सन्माननीय अतिथी,
सप्रेम नमस्कार,
गेली ४० वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे.
वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे.
'वृत्तवेध चॅनल' मराठवाडा, सोलापूर जिल्ह्यात अग्रेसर आहे.
तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथे ही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, वृत्तवेध चॅनल, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा
॥ वर्धापन दिन ॥
कार्यक्रम आयोजित केला आहे.
आपण उपस्थित राहून ऋणानुबंध दृढ करावेत.
✻ आपले स्नेहांकित ✻
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड
श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) | श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) | श्री. प्रशांत वसंतराव माने (निवासी संपादक)
संचालक मंडळ व तरुण भारत, वृत्तवेध चॅनल व प्रिसिजन प्रिंटस् परिवार
✻ स्थळ ✻
दि. ८ ऑगस्ट २०२४, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल,
तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.


मिटकरी यांच्यावर हल्ला करायला लावणाऱ्या

# राज ठाकरे यांना मुख्य आरोपी करा : उमेश पाटील

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. १ ऑगस्ट -**

हत्यारे घेऊन मनसे कार्यकर्त्यांनी आमदार अमोल मिटकरी यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता .मात्र त्यांना ते शक्य झाले नाही म्हणून त्यांची गाडी फोडली. या प्रकाराला प्रोत्साहन देणारे आणि आमदार अमोल मिटकरी यांच्यावर हल्ला करायला लावणार्या राज ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना मुख्य आरोपी करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केली.

हल्ल्यातील आरोपी जय मालोकर या तरुणाचा हृदयविकाराने मृत्यू झाला. त्यालाही राज ठाकरे जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. राज ठाकरे यांनी महाराष्ट्रात 'राडा संस्कृती' निर्माण केली आहे त्यामुळे तरुणपिढी बेरोजगारीकडे जास्त झुकली आहे. या सर्व प्रकाराला आणि तरुणांची बेरोजगार फौज तयार करण्याला राज ठाकरे जबाबदार आहेत, असेही पाटील म्हणाले. मनसेच्या कार्यकर्त्यांना अक्कल येत नाही ,उलट आमदार मिटकरी यांना कुत्र्यासारखं मारण्याची भाषा करत आहेत.

# उद्धव ठाकरे व संजय राऊत यांना दोन हजार रुपये दंड



**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१ ऑगस्ट:**

मुंबईतील विशेष न्यायालयाने माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व खासदार संजय राऊत यांना दंड केला आहे. मानहानीच्या खटल्यातील विलंब माफ करण्यासाठी एक हजार रुपये अतिरिक्त दंड ठोठावताना एकत्रित दोन हजार रुपये दोन आठवड्यांत जमा करण्याचे आदेश मुंबई सत्र विशेष न्यायालयाने बुधवारी दिले. न्यायालयाने एक हजार रुपयांचा अतिरिक्त दंडही ठोठावला आहे.

शिंदे गटाचे नेते व माजी खासदार राहुल शेवाळे यांच्याशी संबंधित खटल्यांच्या सुनावणीच्या विशेष न्यायालयाने जूनमध्ये दोन्ही नेत्यांची याचिका स्वीकारली होती. त्यात त्यांनी दंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध पुनर्विचार याचिका दाखल करण्यास झालेल्या विलंबाबद्दल माफी मागितली होती. दंडाधिकारी न्यायालयाने शेवाळे यांची बदनामी प्रकरणात दोषमुक्तीची याचिका फेटाळली होती. मानहानीच्या दाव्यातून आरोपमुक्त करण्यासाठी या दोघांनी न्यायालयात अर्ज केला होता. या निर्णयाला आव्हान देण्यासाठी विलंब झाल्याने दोन्ही नेत्यांनी विशेष न्यायालयात अर्ज केला होता.न्यायालयाने २ हजार रुपयांचा दंड ठोठावला होता.

## अग्रलेख...

# आवाज आणि आयुधे!

लोकशाही देशाचा सर्वोच्च कायदा म्हणून ज्याचे वर्णन केले ते संविधान, म्हणजेच देशाची राज्यघटना गेल्या काही महिन्यांपासून राजकारणाच्या केंद्रस्थानी येऊन आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळामुळे चर्चेचा विषय बनली आहे. या संविधानाच्या आधारावरच लोकशाही व्यवस्था उभी राहिली आहे. संविधानाने घालून दिलेल्या नियमांच्या चौकटीतच संसदेचे कामकाज चालले पाहिजे, असे संकेत आहेत. विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष ही संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके आहेत, असे म्हटले जाते. म्हणजे लोकशाहीची ही सर्वोच्च व्यवस्था संसदीय संकेतांचे संपूर्ण पालन करून चालविली गेली पाहिजे याकरिता सत्ताधाऱ्यांप्रमाणेच विरोधकांनीही जबाबदार भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा असते. देशाच्या १८ व्या लोकसभेत विरोधकांचे संख्याबळ लक्षणीयरीत्या वाढल्यामुळे ही जबाबदारी वाढली आहे. १७ व्या लोकसभेच्या कार्यकाळातील विरोधकांचा आवाज कमी संख्याबळामुळे क्षीण होता आणि सत्ताधारी भाजपाकडे प्रचंड बहुमत होते. त्यामुळे विरोधकांच्या बाकावरील नेत्यांचा प्रभाव लक्षणीय नव्हता, हे वास्तव नाकारता येत नाही. १८ व्या लोकसभेत इंडिया आघाडी नावाच्या संघटित शक्तीची साथ घेऊन काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधकांची एक भक्कम फळी उभी राहिल्याने साहजिकच देशाचे लक्ष आता सत्ताधाऱ्यांप्रमाणेच विरोधकांच्या भूमिकेकडे आणि त्यांच्या कार्यक्षमतेकडे केंद्रित झाले आहे. विरोधी पक्षांचा आवाज म्हणून लोकसभेत राहुल गांधी यांना जबाबदार भूमिका पार पाडावी लागेल, ही देशाच्या जनतेची भावना आहे. त्यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून संसदेतील त्यांच्या प्रत्येक वक्तव्याकडे, कृतीकडे आणि कार्यशैलीकडे देशाचे लक्ष लागले आहे. संसदीय कार्यप्रणालीची प्रतिष्ठा जपण्याकरिता संसदेच्या कामकाजाचे जे काही संकेत आहेत, नियम आहेत आणि लोकप्रतिनिधी किंवा विरोधी पक्षनेता म्हणून ज्या काही जबाबदाऱ्या आहेत, त्या सर्वांचे प्रामाणिक पालन करणे, ही राहुल गांधींची कसोटी ठरणार आहे. संख्याबळ वाढल्यामुळे लोकसभेतील विरोधी बाजूच्या आवाजाला धार चढली आहे. संसदीय कार्यप्रणालीचे पुरेपूर पालन करून सभागृहात देशासमोरील प्रश्न आणि जनतेच्या समस्यांवर आवाज उठविणे, ही विरोधी पक्षाची सर्वमान्य भूमिका असते. प्रसंगी आक्रमक होऊन विरोधी पक्षाचा आवाज धारदार व्हावा, यातही काहीच गैर नाही. पण केवळ संख्याबळाच्या जोरावर आवाजाची धार वाढविताना संसदीय आयुधांची धार बोथट होईल असे वर्तन, वक्तव्य किंवा कोणतीही कृती होऊ नये, अशीही देशाच्या जनतेची अपेक्षा आहे. १८ व्या लोकसभेच्या पहिल्या सत्रातील पहिल्या अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत विरोधी पक्षनेते पदावरून बोलताना राहुल गांधी यांनी जी काही शैली दाखविली, ती पाहता, संकेतांचे आणि विरोधी पक्षनेते पदाच्या जबाबदारीचे भान त्यांना देण्याकरिता विरोधकांतीलच कोणी बुजुर्गांनी पुढाकार घेण्याची गरज दिसू लागली आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यानच्या राहुल गांधींच्या भाषणाला विरोधकांच्या बाकावरून तडाखेबंद प्रतिसाद मिळाला; अनेकदा विरोधी बाजूंची बाके जोरदार बडविली गेली आणि त्यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. राहुल गांधींना भान राखावे लागेल, असा किंचित सूर त्यांच्या त्या भाषणानंतर देशात उमटू लागला होता; अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याचे भान राखले जाईल, अशीही अपेक्षा होती. दोन दिवसांपूर्वी अर्थसंकल्पावरील सभागृहातील चर्चेतील राहुल गांधी यांच्या भाषणातून या अपेक्षेचे प्रतिबिंब दिसते का, हे पाहणे आवश्यक झाले आहे. अर्थसंकल्पावरील भाषणातून त्यांनी संभ्रम माजविण्याचा प्रयत्न केला, असा आक्षेप सत्ताधाऱ्यांनी घेतला होता. पुढे चर्चेच्या उत्तरावरील अर्थमंत्र्यांच्या भाषणातून ते पुरेसे स्पष्ट झाले. सभागृहाबाहेरील मेळावे, सभांमध्ये बोलताना काही संदर्भांच्या सत्यतेचे भान राखणे सक्तीचे नसते. त्यामुळे अशा ठिकाणी केलेल्या वक्तव्यांची जबाबदारी त्या वक्त्यावर असते. प्रसंगी त्याचे खुलासे करावे लागतात, अनेकदा त्याबाबतच्या आक्षेपांकडे साफ दुर्लक्षही करता येते. काही वेळा न्यायालयापर्यंत जाऊन माफी-दिलगिरीदेखील व्यक्त करता येते, पण संसदेसारख्या प्रतिष्ठित आणि सर्वोच्च सदनात बोलताना संकेत, संदर्भ आणि सभ्यता या सर्वांचे जबाबदारीने पालन करणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य असल्याने राहुल गांधी यांचा कौटुंबिक राजकीय वारसा कितीही मोठा असला, तरी ते यास अपवाद ठरू शकत नाहीत.

गेल्या जून महिन्यात, १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात काँग्रेसचे नेते आणि रायबरेली मतदारसंघाचे खासदार म्हणून लोकसभेत दाखल झालेले राहुल गांधी यांच्या विरोधी पक्षनेतेपदास अध्यक्षांनी मान्यता दिली आणि त्यांना सन्मानपूर्वक या आसनावर बसविण्यात आले. १ जुलै रोजी सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारप्रदर्शक ठरावावरील चर्चेत विरोधी पक्षनेता या नात्याने पहिले भाषण करताना राहुल गांधींना वारंवार सभागृहाच्या कार्यसंकेताचे पालन करण्याच्या सूचना अध्यक्ष देत होते. सभागृहाच्या नियमानुसार कोणताही फलक, चित्र किंवा चिन्ह सभागृहात प्रदर्शित करता येत नाही, कोणाच्याही भावनांना धक्का लागणार नाही याची दक्षता घ्या, असे बजावत होते आणि 'मजा नही आ रहा है' म्हणत राहुल गांधी चित्र प्रदर्शित करण्याचा वारंवार प्रयत्न करत होते. राहुल गांधींच्या भाषणातील काही भाग कामकाजाच्या नोंदीतून वगळण्यात आला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाची प्रतिष्ठा जपली पाहिजे, हे लक्षात घेऊन अभिभाषणावरील चर्चेच्या मुद्द्यांशी सुसंगत बोला, असेही अध्यक्षांनी अनेकदा बजावले. हुतात्मा अग्निवीरांच्या कुटुंबीयांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक साहाय्याविषयी सभागृहात असत्य माहिती दिल्याचा आक्षेप संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी घेतला आणि सभागृह ही असत्य वक्तव्य करण्याची जागा नाही, असे ठणकावून बजावत राहुल गांधींच्या आरोपाची शहानिशा व्हायला हवी, अशी मागणी गृहमंत्री अमित शाह यांनी केली. मोदी हे सभागृहाचे नेते आहेत आणि वयाने ज्येष्ठ आहेत. वयाने ज्येष्ठ असलेल्या व्यक्तीचा सन्मान करावा, असे माझ्या संस्कृतीने मला शिकविले आहे, अशा सौम्य शब्दांत अध्यक्षांना राहुल गांधींच्या एका वक्तव्यावर संस्कृतीची जाणीवही करून द्यावी लागली. विरोधी पक्षनेता या नात्याने राहुल गांधी यांनी सभागृहात केलेल्या राजकीय भाषणातील तडाखेबंदपणातही, पदाच्या जबाबदारीचा संसदीय कार्यप्रणालीच्या प्रतिष्ठेच्या जाणिवांचा आणि गांभीर्याचा अभाव अधोरेखित झाला.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात २९ जुलै रोजी राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत विरोधी पक्षनेते पदावरून केलेल्या भाषणातही याच अभावाचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. जातिनिहाय जनगणना, कृषिमालाला किमान हमीभाव आदींबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यांवर सत्ताधाऱ्यांकडून घेतले गेलेले आक्षेप आणि संसदीय कार्यप्रणालीची प्रतिष्ठा जपण्याबाबत अध्यक्षांनी वारंवार राहुल गांधींना केलेले आवाहन पाहता, पुन्हा एकदा या पदाच्या आणि सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न ऐरणीवर येणार असे दिसत आहे. सभागृहाच्या नियम आणि मर्यादांचे पालन करणे हे विरोधी पक्षनेत्याचे कर्तव्य आहे, याची वारंवार आठवण करून देतानाच, सभागृहाच्या मंचावरून असत्य कथन करणे योग्य नाही, याची जाणीवही राहुल गांधी यांना करून देण्याची वेळ अध्यक्षांवर आली. सभागृहाच्या व्यवस्थेवर शंका घेणे हे अप्रत्यक्षपणे अध्यक्षांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उमटविण्यासारखेच असते, हेदेखील अध्यक्षांना राहुल गांधी यांच्या निदर्शनास आणून द्यावे लागले. विरोधी पक्षनेता बोलत असताना विरोधकांच्या बाकांवरूनच त्यामध्ये अडथळे येत असल्याची बाब अध्यक्षांनीच अधोरेखित केली. सत्ताधारी सदस्य आणि विरोधी सदस्यांमध्ये नियमांच्या चौकटीत खडाजंगी होणे हे सभागृहात नवे नाही. अशा खडाजंगीतही सदनाच्या सभ्यतेचे, कार्यशैलीचे आणि प्रतिष्ठेचे पालन व्हावे, ही लोकशाहीची अपेक्षा असते. राहुल गांधी यांनी आपल्या पदाच्या कारकीर्दीचा प्रारंभ ज्या शैलीतून केला, ते पाहता या अपेक्षेचे काय होणार हा प्रश्न ठळक झाला आहे.

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत

महाभारतात 'यक्षप्रश्न' आहेत. भारत देशातही गत १८०० वर्षांपासून एक यक्षप्रश्न आहे. तो आहे हिंदू-मुस्लिम या दोन जमातींच्या संबंधांचा! या प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडातील इतिहासाची पाने या यक्षप्रश्नाशी संबंधित असलेल्या घटनांनीच रक्ताळलेली आहेत. कोणत्याही संघर्षाचा इतिहास हा रक्तानेच लिहिला जात असतो. आजतागायत या प्रश्नाचे समाधान, उकल नीटपणे झालेली नाही, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. आजच्या वर्तमान परिस्थितीत तर ती अधिक जटिल, गुंतागुंतीची, बहुआयामी, हिंदू समाजाच्या अस्तित्वालाच आव्हान करणारी आणि अधिकाधिक कडवी, जिहादी आणि आक्रमक होते आहे. त्याचे पडसाद, अनुभूती आणि व्हायरल होणाऱ्या विविध दृक्श्राव्य चित्रीकरणातून आपण घेतोच आहोत. भारताच्या सार्वभौमत्वाला ठोकरून आणि आव्हान देऊन संसदेत शपथ ग्रहण करताना 'जय फिलिस्तान'ची घोषणा करणाऱ्या, 'माझ्या मानेवर सुरी जरी ठेवली तरी मी 'भारत माता की जय' म्हणणार नाही' अशी उद्दाम व भारताविषयीचा जहरी फुत्कार करणाऱ्या ओवैसीपासून तर हिंदू समाजाच्या मातृशक्तीच्या, धर्मशक्तीच्या, चारित्र्याच्या श्रेष्ठ परंपरेला आव्हान देऊन त्याच्या छाताडावर बसून २१ युवतींचे सामूहिक धर्मांतरण घडविण्याचे मनसुबे रचणाऱ्या तारिक अन्वरपर्यंत सर्व बाजूंनी हिंदू समाजाची लांडगेतोड होताना आपण अनुभवत आहोत. नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीतील मुस्लिमांच्या मतांच्या ध्रुवीकरणामुळे तर तुष्टीकरण हाच एकमेव राजकारणाचा आधार असलेल्या सर्व राजकीय पक्षांना 'हिरवी पालवी' फुटली आहे. विझत चाललेल्या महत्त्वाकांक्षांना नवीन धुमारे फुटताहेत. त्याने चेकाळून जाऊन हिंदूंवर वाटेल तसे आरोप-प्रत्यारोप करणारी बेताल बडबड संसदेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी करीत आहेत. त्यात त्यांचा काही दोष नाही. पूर्वजांचेच संस्कार कमी-अधिक प्रमाणात अभिसरित होत असतात. त्यांचे पणजोबा, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू, ज्यांनी तीन वेळा हे सर्वोच्च पद भूषविले. त्यांच्या कारकीर्दीत भारताच्या विकासाची 'गती' आणि त्यांनी केलेल्या 'हिमालयीन ब्लंडर्स'मुळे निर्माण झालेल्या विविध समस्यांमुळे भारताची भौगोलिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात झालेली 'अवनती' याचा विचारवंतांनी तुलनात्मक अभ्यास करून, त्याचे चिंतन करून त्यांचे मूल्यांकन करावे. त्यांची स्वतःविषयीची भूमिका त्यांनी लपविली नव्हती. ते स्पष्टपणे म्हणायचे, 'आय ॲम ॲक्सिडेंटली बॉर्न ॲज अ हिंदू-' त्यांच्या या मूलभूत प्रेरणेमुळे त्यांना कधीही मनापासून हिंदू संस्कृती, धर्म, परंपरा, समाज याविषयी प्रेम वाटत नसे. त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे या मूल्यांसाठी त्याग करणारे, जीवन अर्पण करणारे, अपार कष्ट करणारे, देशासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवणारे जे कोणी महापुरुष होते ते त्यांना 'वाट चुकलेले देशभक्त' वाटायचे. त्यांचा ते अधिक्षेप करायचे. मग त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या पणतू असलेल्या राहुल गांधींनी जर हिंदू समाजाची हिंसाचारी, दहशतवादी म्हणून निर्भत्सना केली तर त्यांना कसा बरे दोष देता येईल; नाही का? कोणत्याही घराण्याचे संस्कार शेवटी पुढच्या पिढीतच अभिसरित होत असतात ना! मग आता सत्ता आणि अधिकार मिळाल्यानंतर 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या न्यायाने अंतरंगातील हिंदू द्वेष, त्यानिमित्ताने रा. स्व. संघाचा द्वेष, सत्तारूढ पक्षाचा द्वेष आणि त्या संबंधातील साचलेली गरळ बाहेर पडेल नाही तर काय? तसला हा प्रकार चालू आहे असे समजावे, असे शिक्कामोर्तब करून, स्वतःच्या मनाचे समाधान करून 'मला काय त्याचे?'चा हिंदू समाजाच्या हाडीमांसी खिळलेल्या उदासीनतेने या आजच्या देशातील दिवसेंदिवस भविष्यकालीन भीषण यादवीकडे होणाऱ्या वाटचालीकडे दुर्लक्ष करणे हे योग्य ठरले काय? याचा विचार कुणी करणे गरजचे आहे? तर, याचे साधे, सरळ, सोपे उत्तर हेच आहे की, अनादिकाळापासून पुत्र रूपाने राहणाऱ्या हिंदू समाजालाच याचा मुळातून विचार करावा लागणार आहे. कारण, सहस्रावधी वर्षांपासून या देशाचा परिचय, नाव जगाच्या नकाशात 'हिंदुस्थान' हेच राहिले आहे. मुसलमानांचा ध्येयवाद, उद्दिष्ट त्याचे 'इस्लामीस्तान' म्हणजे 'दारूल इस्लाम' करण्याचा आहे. त्या दृष्टीने इंग्रजांच्या नव्हे, तर औरंगजेबाच्या मोगल राजवटीपासून त्यांचे अथक, अखंड प्रयत्न चालू आहेत. त्या प्रयत्नांचा मागोवा घेण्यानेच या प्रश्नाचे मूलभूत सत्य आपल्या लक्षात येऊ शकेल.

**मुस्लिमांचा ध्येयवाद** : संपूर्ण जगाचे 'दारूल इस्लाम'मध्ये रूपांतर करणे हा मुस्लिमांचा ध्येयवाद आहे. त्यानुरूप त्याला प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याचे अखंड प्रयत्न चालू असतात. या योजनेचा एक भाग म्हणून अन्य समाजातील लोकांचे धर्मांतर घडविणे, दीन-दरिद्री लोकांच्या परिस्थितीचा फायदा घेणे, जोरजबरदस्तीने अन्य धर्मीयांच्या स्त्रियांना बलात्कारित करणे, पळवून नेणे, एकापेक्षा अनेक विवाह करण्याची मुभा त्यांना असल्याने त्याचा लोकसंख्यावृद्धी या एकाच उद्दिष्ट्यपूर्तीसाठी वापर करणे; त्यातून आपल्या धर्माची टक्केवारी वाढवून लोकसंख्येचे असंतुलन निर्माण करणे, त्या 'व्होट बँकेचा' नीट राजकारणाच्या दृष्टीने कुशलतेने वापर करून देशातील राजकारणावर प्रभाव टाकणे त्यासाठी त्या त्या देशातील मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून स्वतःचे अस्तित्व जाणीवपूर्वक पृथक म्हणजे स्वतंत्र ठेवणे, जसे अनादिकाळापासून भारताचा राष्ट्रीय प्रवाह हिंदुत्वाचा आहे तर तो न मानता भारतात हिंदू आणि मुस्लिम असे दोन स्वतंत्र राष्ट्रे आहेत, अशी आग्रही मांडणी करून द्विराष्ट्र सिद्धांताची निर्मिती करणे. हिंदू समाजाच्या दुर्दैवाने फाळणीच्या रूपाने त्यांच्या या ध्येयवादाला, सत्तेसाठी आसुसलेल्या, हपापलेल्या, इंग्रजांच्या 'तोडा-फोडा आणि झोडा' या कुटिलतेला बळी पडलेल्या त्यावेळच्या आमच्या 'महान नेत्यांनी' घवघवीत यश प्रदान केले. पाकिस्तानकडून अखंडपणे होणारा आतंकवाद्यांचा त्रास आणि बांगलादेशातून अवैध होणारी घुसखोरांची संख्या, त्यामुळे बॉर्डर क्षेत्रात, आसाम प्रांतात बिघडलेले लोकसंख्येचे संतुलन, यामुळे अखंडपणे त्या जखमा रक्ताळलेल्या ठेवण्याचा असुरी आनंद मुसलमान राज्यकर्ते घेत असतात. नागराजन या तरुणाला अनेक गुंड भरदिवसा शेकडो लोकांच्या उपस्थितीत लोखंडी रॉडने ठोकत असताना केवळ बघ्याची भूमिका घेणारा असा हा 'सेक्युलरवादी' सर्वधर्मसमभाव जोपासणारा आपला हिंदू समाज! असंघटित, प्रतिकारशून्य, शक्तिहीन आणि 'शत्रुमित्र विवेकशून्य असणारा. मोपल्यांच्या बंडाच्या वेळी सहस्रावधी हिंदूंचा 'कत्ले आम' करणाऱ्या, सहस्रावधी हिंदू स्त्रियांवर बलात्कार करून त्यांचे धर्मांतर करणाऱ्या व त्यांना केवळ भोगदासीचे जीवन देणाऱ्या मोपल्यांचे कौतुक महात्मा गांधींनी केल्याचा इतिहास आपण जाणतोच. त्याच काळात त्यांनी 'हिंदूंना मरा पण प्रतिकार करू नका,' असा सल्लाही दिला होताच ना? कालपुरुष जीवाच्या आकांताने तळमळून सांगतो आहे की, ''हिंदूंनो, रात्र वैऱ्याची आहे जागे राहा.'' या सर्व गोष्टींचा वर वर विचार करू नका. ही इतिहासाची पुनरावृत्ती होत आहे. द्वापारयुगात महर्षी वेद व्यासांनी महाभारत लिहिले. ते द्रष्टा होते. म्हणून 'व्यासोच्छिष्ट जगत सर्वम्' असे त्यांनी लिहिलेल्या महाकाव्याबद्दल म्हटले जाते. त्याचा अर्थ चांगल्या आणि वाईट वृत्तींचा संघर्ष ज्याला भगवद्गीतेने 'दैवी असुरी संपदा' म्हटले आहे, युगानुयुगे अखंडपणे चालत असतो. परिस्थितिजन्य त्याचे स्वरूप, साधने, पात्र बदलत असतात. त्याचे मूळ स्वरूप लक्षात घेतले तरच योग्य दिशाबोध आणि मार्ग सापडतो. द्वापार युगातील महाभारताची पुनरावृत्ती विद्यमान 'भारतात' घडते आहे. त्यासाठी 'महाभारत ते भारत' या वाटचालीचा मागोवा आणि चिंतन करण्याची गरज आहे.

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# लाडकी बहीण; सावत्र मतदार!

राज्यातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू केली. अगदी घरच्या लाडक्या बहिणींना जसा त्रास होऊ नये म्हणून वेळोवेळी भाऊ काळजी घेतो तशी काळजी घेत त्यातील अटी व शर्थी बाजूला करण्यात आल्या. ही योजना तशी आपल्या शेजारच्या मध्यप्रदेशात प्रचंड यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात लागू करण्यात आली. 'चांगले ते घेत जावे' या उक्तीने या योजनेचे स्वागतही व्हायलाच हवे. मात्र, विरोधकांना ही योजना पचनी पडणे शक्य नव्हते. त्यांनी लाडका भाऊ काढण्याची मागणी केली आणि राजकीय धुरंधर असलेल्या फडणवीसांच्या या सरकारने लाडका भाऊ योजना काढून विरोधकांची तोंडं चूप केली.

विरोधक चूप होतीलही. पण, समाजमाध्यमांवर या योजनेची तेवढीच खिल्लीही उडवली जात आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही योजना आल्याने 'समजदार को इशारा काफी है' असे मतदारांचे झाले आहे. काही देशांमध्ये वैद्यकीय आणि शिक्षण या दोन्ही सेवा सरकार राबवते. त्या उलट भारतात या दोन्ही सेवांवर केंद्र आणि राज्य सरकारचे निर्बंध नसल्याने पैशांची 'व्हाईट कॉलर' लुटमार सुरू आहे. या देशात मोदी यांच्या नेतृत्वातील १० वर्षे, अटलबिहारी वाजपेयी, असे अधलेमधले सरकार सोडले तर जास्तीत जास्त काळ काँग्रेस किंवा काँग्रेसच्या विचारांचे सरकार राहिलेले आहे. याच सरकारने मतांचे राजकारण करण्यासाठी 'मोफत योजना' सुरू केल्या. त्या योजना पुढे सुरू ठेवण्याची जबाबदारी पुढच्या सरकारची असते. त्या फुकट्या योजना बंद केल्या की ते सरकार गरिबांच्या कसे विरोधी आहे, हे समजावून सांगण्यासाठी अनेक तज्ज्ञ याच समाजात आहेत. त्यामुळे फुकट्या योजनांची या देशात कमतरता नाही. बरं, बरेचदा असे म्हटले जाते की, सरकार राजकारणासाठी म्हणा वा मतांवर डोळा ठेवून या योजनांची अंमलबजावणी करते. तर मग कोरोनानंतर देशात दारिद्र्यरेषेखालील लोकांना प्रतिव्यक्ती ५ किलो गहू, ३ किलो तांदूळ, १ किलो साखर तर केसरी कार्ड असलेल्यांना ४ किलो तांदूळ आणि १ किलो गहू मोफत दिला जातो. ही योजना केंद्र सरकारच्या वतीने राबविली जाते. याशिवाय घरकूल योजनाही राबविली जात आहे. कुडाच्या, पडक्या घरात राहणाऱ्यांना सिमेंटच्या घरात राहण्याचे भाग्य लाभते आहे. तरीही चालू अधिवेशनात आमच्या वर्धेच्या खासदारांनी घरकुलाच्या तेवढ्या दीड लाखात घरचे शौचालयही होत नसल्याचा आरोप केला. अशाच अनेक सरकार विरोधी चर्चा होत गेल्याने भाजपा सरकारला लोकसभा निवडणुकीत जागांचा धक्का बसला. केंद्रातील भाजपा सरकारने अनेक योजना गरिबांसाठी राबवल्या तरीही या योजनांचा लाभ घेणाऱ्यांनी लाभ देणारे सरकार येण्यासाठी बोटाला शाई लावून घेण्याची कृतज्ञता दाखवली काय? या प्रश्नाचे उत्तर शंभर टक्के नकारार्थीच राहील. मतदान हा प्रत्येकाचा हक्क आहे हे जेवढे सत्य आहे त्यासोबत आपल्याला ज्याने भरभरून दिले त्याला त्या बदलीत काही तरी देणे ही आपली संस्कृती आहे. परंतु, यावेळी मतदान करताना कृतज्ञतेपेक्षा कृतघ्नांची संख्या जात झाल्याचे दिसून आले. त्याला अनेक कंगोरेही आहेत. पण, सरसकट दिल्या जात असताना मध्यमवर्गीयांचा म्हणजे २५ ते ४० हजार वेतन कमावणाऱ्यांचा विचार कोणतेही सरकार करताना दिसत नाही. मोफत देत असताना कररूपाने ते आमच्याच खिशातून काढल्या जात असल्याची सामान्य लोकांची भावना आहे. त्यामुळे राज्यात लाडकी बहीण म्हणा वा लाडका भाऊ या योजनेचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीत होऊ शकेल का, याचा विचारही केला जावा. मध्यप्रदेशात कोणी शरद पवार, उद्धव ठाकरे वा संजय राऊत नव्हते. त्यामुळे तिथले राजकारण वेगळे आहे. महाराष्ट्रात तर कट-काटशहाचे राजकारण सुरू आहे. आजच नाही का बाळासाहेबांच्या वारसदारांनी एक तर मी राहील किंवा देवेंद्र फडणवीस राहील, अशी थेट धमकीच दिली. दोन दिवसांपूर्वी राहुल गांधींना संसदेत अभिमन्यू आठवला. त्याआधी संविधान आठवले होते. लोकसभा निवडणुकीत वर्धा जिल्ह्यात महाविकास आघाडीचा एक छुपा गट आतून 'प्रबोधन' मोहीम राबवत होता. इतर मतदार संघातही वेगवेगळ्या नावाने झाले असेल. याची कल्पना कोणालाच नव्हती. लोकसभेचे निकाल जेव्हा लागले तेव्हा सर्व गोष्टी डोळ्यापुढे आल्या. मतदारांना सरकारी योजना कितीही मोफत दिल्या तरी ते आपले होत नाहीत, हे सरकार लक्षात कधी घेईल आणि त्यांना मोफत देत असताना मध्यमवर्गीयांनी खिशाला कात्री काय म्हणून लावून घ्यावी. तुम्ही लाडकी बहीण आणा की मोफत घरं द्या, मतदार वेळप्रसंगी सावत्र होतात हे लोकसभा निवडणुकीच्या निकालाहून समजून घ्यायला राजकारण्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला रास्त भाव, पेट्रोल, डिझेल व गॅसचे भाव कमी होणे हेच विजयाचे सूत्र असेल याची खबरदारी घ्यायला हवी; नाही तर मतदार सावत्रच असतात.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# फडणवीस संपत नसतात, तू संपशील...

साऱ्याच राजकीय पक्षांना विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणूक लागेल. तसे झाले तर पुढच्या महिन्यात आचारसंहिता लागू शकते. त्या आधी हातची कामे उरकायची सत्ताधाऱ्यांना घाई असणार. त्या हिशोबाने प्रत्येकाने मोर्चेबंदी सुरू केली आहे. डाव-प्रतिडाव आखले जात आहेत. आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. यावेळचे चित्र मोठे विचित्र आहे. लोकसभा निवडणुकीत महायुती विरुद्ध महाआघाडी असा थेट सामना झाला. विधानसभा निवडणुकीत विविध राजकीय पक्ष आणि त्यांच्या उमेदवारांची बहुरंगी जत्रा रिंगणात उतरलेली दिसेल. भाजपा, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे प्रत्येकी दोन गट, वंचित आघाडी, अकोल्याचे तुपकर, अमरावतीचे बच्चू कडू यांच्या आघाड्या, एमआयएम याशिवाय शेकड्याने बंडखोर तुम्हाला मैदानात दिसतील. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हेही पाडायचे की लढायचे, याचा निर्णय लवकरच जाहीर करतील. एकूणच खूप सारे उमेदवार आखाड्यात उतरलेले असतील. त्यामुळे कोणाला मत द्यायचे, हा मतदारांपुढे मोठा प्रश्न राहणार आहे. महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सुप्रीमो राज ठाकरे हेही यावेळी मैदानात उतरले आहेत. त्याची झलक अकोल्यात दिसली. या निवडणुकीत तुम्हाला खूप राडे पाहायला मिळतील. कारण राजकारण आता विचारधारेचे राहिलेले नाही. शक्तिप्रदर्शनाचे माध्यम बनले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर विधानसभा निवडणूक होत आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपाला तडाखा बसला; '४१ पार' करता आले नाही. महाविकास आघाडीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्या तर १० पैकी ८ जागा जिंकून शरद पवारांनी सर्वाधिक स्ट्राईक रेट गाठला. मुस्लिम मतांच्या जोरावर ठाकरे सेनेने मुंबईतल्या चार जागा काढल्या. यावेळी मुस्लिम व्होट बँक त्यांना साथ देईलच अशातला भाग नाही. त्यामुळे की काय, उद्धव ठाकरे अस्वस्थ आहेत. पण त्यांनी अंगात आणावे असे काहीही घडलेले नाही. महायुतीला फक्त १७ जागा मिळाल्या. मात्र मतांच्या बाबतीत फक्त दोन लाख मतांचा फरक आहे. वंचित आघाडी लोकसभेत चालली नाही. मात्र विधानसभेत धूम करू शकते. मुंबई-पुण्याच्या मराठी पट्ट्यात मनसेची ३ ते ६ टक्के मते मोठ्यामोठ्यांची बंडी उलार करू शकते. राजू शेट्टी, एमआयएम आणि सपा यांचीही स्वतःची प्रभाव क्षेत्रे आहेत. शिवाय मराठा फॅक्टर म्हणजे जरांगे आहेच. यावेळेस महाविकास आघाडी एकत्र लढेल काय? शक्यता कमी वाटते. कारण प्रत्येकाला सीएम व्हायचे आहे. मुंबईमध्ये नुकत्याच झालेल्या शाखाप्रमुखांच्या मेळाव्यातील उद्धव ठाकरे यांचे भाषण अतिशय आक्रमक होते. उद्धव



यांच्या भाषणात टोमणेबाजी, शिवीगाळ यांची भरमार असते. हे भाषणही वेगळे नव्हते. मात्र या भाषणात त्यांनी सभ्यतेच्या साऱ्या मर्यादा ओलांडल्या. 'एक तर तू राहशील, नाहीतर मी राहीन,' अशा भाषेत उद्धव ठाकरेंनी भाजपाचे राज्यातील सर्वोच्च नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आव्हान दिले. 'मला आणि आदित्यला तुरुंगात डांबण्यासाठी फडणवीसांनी डाव खेळले,' असा गंभीर आरोप त्यांनी शरद पवार गटाचे नेते आणि तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांचा आधार घेत केल्याने एकच खळबळ माजली. 'फडणवीसांनी मला कागद दिले होते. त्यावर सह्या करायला सांगितले होते. मी त्यावर सह्या केल्या असत्या तर ठाकरे पितापुत्र जेलमध्ये असते,' असा दावा करताना देशमुखांनी पेनड्राईव्हही दाखवला. 'अनिलबाबू हे शरद पवार आणि उद्धवबद्दल काय बोलतात त्याचा मसाला आपल्याकडेही आहे. योग्य वेळी तो बाहेर काढू,' अशा भाषेत फडणवीसांनी ठणकावले. दोघांकडेही पेनड्राईव्ह आहे. मात्र दोघेही दाखवायला तयार नाहीत. लोकसभेत लोकांनी हात दिला म्हणून महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे, पण लोकसभेची निवडणूक आणि विधानसभेची निवडणूक वेगळी असते, तिथले प्रश्न वेगळे असतात. संविधान बदलवण्यासाठी भाजपाला जागा हव्या आहेत, असा नॅरेटिव्ह विरोधकांनी चालवला. लोक त्या प्रचाराला भुलले. पण आता विधानसभा निवडणूक आहे. इथे स्थानिक प्रश्न असतात. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी हवेत उडू नये; आणि एक सांगू का? ठाकरेंनी फडणवीस यांना संपवण्याची भाषा करणे म्हणजे कावळ्याने गरुडाला आव्हान देण्यासारखे आहे. फडणवीस हे एकटे नाहीत. फडणवीस ही व्यक्ती नाही, संस्था आहे, शक्ती आहे. त्यांच्या पाठीशी नरेंद्र मोदी आहेत, अमित शाह आहेत, संपूर्ण भाजपा पक्ष आहे. फडणवीसांना संपवणे तर दूर; त्यांच्या केसापर्यंतही ते पोहोचू शकत नाहीत. स्वतःचे ४० आमदार सांभाळू शकले नाहीत ठाकरे आणि लंब्याचवड्या गप्पा मारतात. महाआघाडीचे सरकार २५ वर्षे टिकेल, असे संजय राऊत म्हणाले होते. २५ महिनेही टिकले नाही. उद्धव यांना अलिकडे पंतप्रधानपदाची स्वप्न पडत आहेत. त्यांनी शरद पवारांना अजून ओळखलेच नाही, असे म्हटले पाहिजे. लिहून ठेवा. उद्धव यांचा सर्वात मोठा शत्रू शरद पवार असतील. ठाकरेंना मुख्यमंत्री करण्यासाठी शरद पवार या वयात घाम गाळत नाहीत. त्यांना आपल्या मुलीला मुख्यमंत्रिपदी बसलेले पाहायचे आहे. काँग्रेसला घेऊन ते वेगळे जुगाड जमवू शकतात. तिकडे काँग्रेसचे नाना पटोले यांनाही मुख्यमंत्री व्हायचे आहे. दोन उपमुख्यमंत्री करू शकतात. मात्र, मुख्यमंत्री एकच असतो. इथे तर तिघे तिघे टपून आहेत. तिकडे मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण हवे आहे आणि त्यासाठी त्यांनाही सत्ता हवी आहे. पण आता ओबीसी विरुद्ध मराठा असा संघर्ष होणार आहे. सगळेच मराठे हे जरांगे यांचे समर्थक नाहीत हे आता हळूहळू उघड होऊ लागले आहे. जरांगे यांची पूर्वीसारखी परिस्थिती राहिलेली नाही. प्रसाद लाड, आशिष शेलार, दरेकर हे मराठा नेते तर उघडपणे मैदानात उतरले आहेत. मतांचे ध्रुवीकरण झाले तर तिकडे ओबीसी व्होट बँकही एकगठ्ठा मतदान करू शकते, हा धोका आता मराठ्यांच्याही लक्षात येऊ लागला आहे. त्यामुळे जरांगे किती जागा निवडून आणू शकतील यावर मराठा समाजातच खल सुरू झाला आहे. या वादात विरोधी पक्ष स्वतःचे हात भाजून घेऊ इच्छित नाहीत. उद्धव ठाकरेंनी दिल्लीत मोदींकडे बोट दाखवले आहे. उशिरा का होईना, शरद पवारांनी या वादात उडी घेतली आहे. मराठा मतदारांची संख्या २८ टक्के आहे. तिला सोबत ठेवण्याच्या नादात जरांगेंनी फडणवीस आणि भाजपाला लक्ष्य करणे सुरूच ठेवले तर ही चाल बूमरँग होऊ शकते. ओबीसींचेही ध्रुवीकरण होऊन भाजपाला लाभ होऊ शकतो.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### हा केवळ थिल्लरपणाच!

आई होणे ही कोणत्याही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात मोठी गोष्ट असते. आपण आई होणार हे कळल्यावर त्या स्त्रीला आसमान ठेंगणे होते. परंतु भारतीय माता आता पाश्चात्यांनाही वरचढ ठरलेल्या आहेत. वर्धा येथे 'टेस्ट ट्यूब बेबी' म्हणजे कृत्रिम गर्भधारणेद्वारे गर्भवती झालेल्या महिलांसाठी 'अभिनव फॅशन शो'मध्ये एकूण २३ गर्भवती महिला सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेच्या पहिल्या फेरीमध्ये गर्भवती मातांनी 'रॅम्प वॉक' म्हणजे मंचावरून विशिष्ट हावभाव करत चालत जाणे हा प्रकार केला तर दुसऱ्या फेरीमध्ये स्त्रीत्व आणि मातृत्व यांच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. विजेत्या ठरलेल्या मातांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. भारतामध्ये गर्भवती स्त्रीकडे समाज आदराने बघतो आणि तिची काळजी पण घेतो. गर्भवती महिलेला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, ती सुरक्षित राहावी यासाठी आवर्जून लक्ष दिले जाते. मात्र, गर्भवती महिलांसाठी अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे हा केवळ दिखाऊपणा किंवा थिल्लरपणा आहे. गर्भवती मातांनी अशा स्पर्धांमध्ये भाग घेण्यापेक्षा या काळात धर्मग्रंथांचे वाचन करणे, नामजप करणे, मंदिरात जाऊन देवी-देवतांचे दर्शन घेणे असे काही केल्यास जन्माला येणारे बाळ हे सात्त्विक होऊ शकते.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

### धोकादायक कोचिंग सेंटर्स

मुसळधार पाऊस पडल्यामुळे राजधानी दिल्ली येथे पूरस्थिती निर्माण झाली. जुने राजेंद्रनगर भागामध्ये ठिकठिकाणी पाणी साठले होते. हा परिसर मुख्यत्वे केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेच्या कोचिंग सेंटर्ससाठी प्रसिद्ध आहे. या भागातील या एका कोचिंग सेंटरच्या तळघरात २७ जुलै रोजी पाणी साठल्यामुळे अनेक विद्यार्थी अडकून पडले. या साठलेल्या पाण्यामध्ये तीन विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. राज्यसभेचे सभापती असणारे उपराष्ट्रपती जयदीप धनकड यांनी यावर राज्यसभेमध्ये टीका केली. हे कोचिंग सेंटर्स विद्यार्थ्यांकडून अतोनात फी घेतात. पण त्यांना आवश्यक त्या सोयी पुरवू शकत नाहीत. कोचिंग सेंटर्स जाहिरातींसाठी कोट्यवधी रुपये खर्च करताना दिसतात. ज्या प्रमाणात विद्यार्थ्यांकडून फी घेतली जाते त्या प्रमाणात त्यांना सुविधा पुरवणे हे कोचिंग सेंटर्सचे कर्तव्य आहे. कोचिंग सेंटर्सच्या या बेजबाबदार प्रवृत्तीमुळे काहीतरी ध्येय मनाशी ठरवलेले हे तीन विद्यार्थी हकनाक जिवाला मुकले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यापेक्षा या कोचिंग सेंटर्सला विद्यार्थ्यांच्या जिवाची किंमत शून्य आहे, असेच यावरून लक्षात येते. कोचिंग सेंटर्स म्हणजे विद्यार्थ्यांकडून पैसे उकळण्याचा एक मोठा धंदाच झाला आहे.

**भीमराव साळुंखे**/९४२३८६५९५०

### पार्किंग समस्या

रामदासपेठ, धंतोली-काँग्रेसनगर येथील पार्किंगची समस्या दूर होणे कठीण आहे. कमर्शियल जागा, दवाखाने यांचे प्लान संमत करताना पार्किंगला किती जागा सोडली किंवा किती जागा लागेल, याचा विचारच केला गेला नाही, असे वाटते. काही लोकांनी आपली घरे ही व्यावसायिक प्रतिष्ठाने, बँका यांना भाडेतत्त्वावर दिली आहेत. त्यांच्याकडे पार्किंगची जागा आहे की नाही, याची खातरजमा न करता त्यांना देण्यात आली का? त्यांच्या स्टाफला त्यांचीच वाहने पार्क करायला जागा नाही तर त्यांच्याकडे येणारे-जाणारे कुठे गाड्या पार्क करतील. तसेच जुने घर तोडून तिथे मोठमोठ्या इमारती, फ्लॅट स्कीम तयार झाल्या. त्या ठिकाणी येणारे व्हिजिटर्सना रस्त्यावर गाड्या लावाव्या लागतात. कारण व्हिजिटर्सना आत गाड्या लावता येणार नसल्याचे बोर्ड लावले आहेत किंवा चौकीदार आत गाडी लावू देत नाही. असे का? सर्व अपार्टमेंट-फ्लॅट स्कीमवाल्यांना त्यांच्याकडे येणाऱ्यांच्या गाड्या आत लावायला सांगा किंवा तशी सोय करायला सांगा अथवा त्यांच्यावर कारवाई करायला सांगा. कोर्टाने आदेश दिला की थातूरमातूर कारवाई होते. काही दिवस गेले की पुन्हा जैसे थे... रामदासपेठ येथील अर्नेजा हॉस्पिटल, हॉटेल सेंटर पॉईंट, तुली इम्पेरियल भागातील दवाखान्यांवर विशेष प्रेम दिसते; त्यांच्यावर कधीच कारवाई केली जात नाही. ज्या ठिकाणी बेसमेंटमध्ये पार्किंगची व्यवस्था आहे तेथे गोडाऊन बनवून ठेवले आहेत. कुठल्याही व्यावसायिक प्रतिष्ठानांना परवानगी देण्याआधी त्यांच्याकडे स्टाफ किती आहे, दिवसभरात येणारे-जाणारे किती असतील याचा विचार करून परवानगी द्यायला हवी. ज्यांनी आपल्या राहत्या घरात व्यावसायिकांना जागा भाडेतत्त्वावर दिल्या, त्यांना एनओसी कुठल्या तत्त्वावर दिली. रेसिडेंशियल भागात व्यावसायिक परमिशन कुठल्या आधारावर दिली, याची शहानिशा होणे जरूरी आहे. पार्किंगची सोय आहे की नाही, याची पाहणी जरूरी आहे; तसे नसल्यास त्यांच्यावर सतत कारवाई होणे जरूरी आहे. गोरक्षणच्या समोर पार्किंगसाठी जागा बनविण्यात आली. तेथे संपूर्ण जागेवर बॅट-टेबल विक्रेते बसले आहेत तसेच झाशी राणी चौक ते अलंकार चौक येथील फूटपाथवरील अतिक्रमण जे आहे त्यांच्यावरसुद्धा थातूरमातूर कारवाई होऊन दोन दिवसांनी पुन्हा जैसे थे. कोर्टाचे आदेश असतानासुद्धा हे होते. 'कंटेम्प्ट ऑफ कोर्ट'ची कारवाई करा नागपूर महानगर पालिका किंवा संबंधित संस्थांवर, अशी विनंती आहे.

**आशिष नाईक**/९८२३१७८७६७

# पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघे निर्दोष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

विवाहिता सना माजिद खान (वय २५, रा. सोलापूर) हिला माहेराहून पाच लाख रुपये व्यापारासाठी आणण्याची मागणी करुन त्याकरिता तिला नवी मुंबई व सोलापूर येथे शिवीगाळ व धमक्या देत मारहाण करुन तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याप्रकरणी आरोपी पती माजिद अ. रऊफ खान (वय ३२), सासरे अब्दुल रऊफ खान (वय ६१), सासू हुसेनबानू अ. रऊफ खान (वय - ५९ वर्षे) आणि दीर इमाम अ. रऊफ खान (वय ३४, सर्व रा. नवी मुंबई) या चौघांची मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रमसिंह भंडारी यांनी निर्दोष मुक्तता केली.

यात हकीगत अशी की, दि. २३ सप्टेंबर २०१२ रोजी लग्न झाल्यानंतर पती माजिद खान याने पत्नी सना खान हिला नवी मुंबई येथे नांदण्यास नेले.




परंतु काही दिवसांत वरील चार आरोपींनी फिर्यादी सना खान हिला व्यापारासाठी माहेराहून पाच लाख रूपये आणण्याची मागणी केली. ती रक्कम न आणल्याने तिचा शारिरीक व मानसिक छळ करून तिला माहेरी पाठवून दिले. त्याानंतर विवाहितेचा चुलत भाऊ अझर पठाण याचे घरी तडजोड करुन आरोपींनी सना खान हिला नांदण्यासाठी नवी मुंबई येथे नेले.

परंतु पुन्हा तिला आरोपींनी पैशांच्या कारणावरुन शिवीगाळ व धमक्या देत मारहाण करून हाकलून दिले. त्यानंतरही सना खान माहेरी सोलापूर येथे असतानाही तिला आरोपी माजिद खान याने ५ जानेवारी २०१४, ६ एप्रिल २०१४ आणि १३ एप्रिल २०१४ रोजी सोलापूर येथे येऊन वेळोवेळी मारहाण केली व धमकी दिली वगैरे आशयाची फिर्याद विवाहिता सना खान हिने सदर बझार पोलीस ठाण्यात दि. २३ एप्रिल २०१४ रोजी आरोपींविरुद्ध दिली होती. गुन्ह्याचा तपास महिला सहाय्यक पोलीस निरिक्षक सीमा सुर्वे यांनी केला. सदर प्रकरणात सहा साक्षीदार तपासण्यात आले. परंतु आरोपींचे वकील अंदोरे यांनी साक्षीदारांच्या जबाबातील विसंगती न्यायालयाच्या निदर्शनास आणून केवळ मुलाचा ताबा मिळवण्याकरिता आरोपींना खोट्या गुन्ह्यात गुंतविले असल्याचा युक्तिवाद केला. तो युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधिशांनी सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात सरकारतर्फे ॲड. अमर डोके यांनी तर सर्व आरोपींतर्फे ॲड. अरविंद अंदोरे, ॲड. आल्हाद अंदोरे व ॲड. अथर्व अंदोरे यांनी काम पाहिले.

# टर्मिन विकणारे दोघे ताब्यात

## करमाळा पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

शरीरयष्टी सुधारण्यासाठी टर्मिनसारख्या औषधींचा वापर केला जात असल्याबाबत करमाळा पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १३ बॉक्स औषधे मिळून आली आहे. या कारवाईमुळे करमाळ्यात टर्मिन व इतर घातक औषधी विकणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

सजित चंदुमल सिंधी (रा. फुलसुंदर चौक, करमाळा) आणि विजय विलास क्षिरसागर (वय २२, रा. मंगळवार पेठ, करमाळा) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत.

करमाळा पोलिस ठाण्याचे निरीक्षक विनोद घुगे हे स्वतः एक मल्ल असल्याने त्यांनी या गंभीर विषयाची दखल घेत शरीरयष्टी सुधारण्यासाठी टर्मिनसारख्या औषधांचा वापर करणाऱ्यांची माहिती घेतली व ही औषधे पुरविणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना पोलिस कर्मचाऱ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून विजय क्षिरसागर यास ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्यावेळी सजित सिंधी याचे नाव समोर आले. त्यावरून पोलिसांनी ३० जुलै रोजी रात्री देवीचा माळ येथे रस्त्यावर पेट्रोल पंपाशेजारून सिंधी यास ताब्यात घेतले.

या दोघांकडून मेफेन टर्मिन सल्फाईड इंजेक्शनचे १३ बॉक्स जप्त करण्यात आले आहेत. हे औषध परिशिष्ठ एच प्रवर्गात मोडत असल्यानो ते फक्त डॉक्टराच्या प्रिस्क्रिप्शनद्वारेच विक्री करणे बंधनकारक आहे. ही औषधे डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय, औषधांचा मुळ गुणधर्म माहिती नसताना अवैध मार्गाने प्राप्त करून अशा औषधाचे वापरामुळे स्वास्थास जिवितास हानी होण्याची शक्यता आहे.

त्यातील द्राव्याचे दुष्परिणाम होऊन इंजेक्शन घेणारे व्यक्तीच्या जिवितास धोका किंवा आरोग्यास गंभीर दुखापत होऊ शकते, हे माहिती असताना हे इंजेक्शन अवैधरीत्या मिळवून त्याचा गैरवापर करण्याच्या उद्देशाने अनाधिकृतपणे विक्रि करण्यासाठी कब्जात बाळगले व विक्रि केली. म्हणून करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक विनायक माहुरकर पुढील तपास करीत आहेत.

# माळशिरसमधील हॉटेल व्यावसायिकाला खासगी सावकारांकडून दमदाटी

**सोलापूर, दि.१ ऑगस्ट-**

माळशिरस येथील किशोर कांतीलाल देशमाने यांनी वैयक्तिक अडचणीसाठी खासगी सावकारांचे व्याजासह पैसे परत करुनही पुन्हा वसुलीसाठी तगादा लावत असल्याची तक्रार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे केली आहे. देशमाने यांनी अडचण भागविण्यासाठी कोरे चेक आणि स्टॅम्प पेपर देऊन खासगी सावकारांकडून पैसे घेतले. त्या पैशाचे व्याज आणि मुद्दल भरुनही पैशासाठी सावकार दमदाटी व चेक बाऊन्सचा गुन्हा दाखलची धमकी देत आहे. त्याला धोक्यापासून वाचविण्याबरोबरच सावकाराच्या ताब्यात असलेले कोरे चेक, स्टॅम्प पेपर धाडी टाकून मिळवून देण्याची मागणी दिलेल्या अर्जात त्यांनी केली आहे.

# बेकायदेशीर डिझेल व्यवहार; तिघांना अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

सोलापूर-पूणे-सोलापूर महामार्गावरून हैद्राबाद येथे जाणाऱ्या टँकरमधून पेट्रोलजन्य पदार्थ बेकायदेशीरपणे व्यवहार वाहतूक भेसळ व विक्री केल्याप्रकरणी टँकर चालक सचिन संजय केंद्रे, टँकर मालक बालाजी ज्ञानोबा सानप (दोघे रा. मुंबई) व थंगापल्ली व्यंकाटाचार्य रामाचारी (रा. हैद्राबाद) यांचा अटकपूर्व जामीन बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश चव्हाण यांनी मंजूर केला.

११ जून २४ रोजी टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अजित सर्जेराव मोरे यांना एका टँकरमधून पेट्रोलजन्य पदार्थ अनाधिकृतपणे पुणे येथून लातूर कडे जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्याप्रमाणे पोलिस सापळा लावून थांबले होते, त्यांनी टँकरला हात दाखवून थांबवले असता त्यामधून दोन इसम खाली उतरले त्यांना नाव, पत्ता विचारले असता त्याांनी त्यांच नाव सचिन संजय केंद्रे चालक व बालाजी ज्ञानोबा सानप वाहनमालक असे सांगितले. त्यावेळी त्यांनी त्यांच्या जवळील कागदपत्रे दाखवली. त्यांच्याकडे टँकरमधील पेट्रोल जन्य पदार्थाबद्दल विचारणा केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अगर टँकरमधील मालाबाबत काही सांगितले नाही. सदर माल कोठून आणला आहे याची खात्री करण्यासाठी टँकर हा पोलीस ठाण्यात आणून त्यांच्या मालाचे बिला संदर्भात त्याांनी कागदपत्रे हजर केली नाहीत, सदर माल हा कोठेतरी अनाधिकृत पणे विक्री करण्याकरीता वाहतूक करीत असलेबाबत खात्री झाल्याने सदर माल सिल करून त्याबाबत सचिन संजय केंद्रे, बालाजी ज्ञानोबा सानप व थंगापल्ली रामाचार्य व प्रविण यांच्या विरुद्ध टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला.

सदर प्रकरणात अटक होईल ह्या भितीपोटी सचिन संजय केंद्रे, बालाजी ज्ञानोबा सानप व थंगापल्ली रामाचार्य यांनी न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. यावेळी युक्तिवाद करताना आरोपींच्या वकिलांनी टँकरमधील पदार्थ हा सौदी अरेबिया येथून कायदेशीररित्या आयात केल्याचे व तो हैद्राबाद येथील व्यापाऱ्यास विक्रीकरीता घेऊन जात असल्याने आरोपींनी बेकायदेशीर कृत्य केलेले नसल्याचे न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले. सदरचा युक्तिवाद ग्राह्य मानून तिन्ही आरोपींना अटकपूर्व जामीनावर मुक्त करण्याचे आदेश न्यायमूर्तींनी पोलिसांना दिले.

यात सरकार पक्षातर्फे अॅंड. दिनेश देशमुख यांनी तर आरोपीतर्फे अॅंड. संतोष न्हावकर, अॅंड. राहुल रूपनर, अॅंड. रणजित तांबारे यांनी काम पाहिले.

## Motilal Oswal Home Finance Limited

MOTILAL OSWAL HOME LOANS

Regd. Office: Motilal Oswal Tower, Rahimtullah Sayani Road, Opp. Parel ST Depot, Prabhadevi, Mumbai - 400 025, CS : 8291889898
**Website**: www.motilaloswalhf.com, **Email:** hfquery@motilaloswal.com

### ताबा सूचना (जंगम मालमत्ता/आयईएससाठी)

**(सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ (१) अंतर्गत)**

तर अधोस्वाक्षरी केलेले मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, (औपचारिकपणे अस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून ओळखले जाते), आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांनी येथे नमूद केलेल्या डिमांड नोटिस जारी केल्या आहेत ज्यात खालील कर्जदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याचे आवाहन केले आहे. सदर सूचना प्राप्त झाल्याची तारीख.

खालील कर्जदारांनी रक्कम परतफेड केली नाही, याद्वारे खालील कर्जदारांना नोटीस देण्यात आली आहे आणि सर्वसाधारणपणे खाली स्वाक्षरी केलेल्या जनतेने कलम १३ च्या पोटकलम (४) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तांचा ताबा घेतला आहे. सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचले गेलेले अधिनियम येथे नमूद केलेल्या तारखेला:

| अ. क्र. | कर्ज करार क्रमांक / कर्जदार/सह कर्जदार/जमीनदाराचे नाव | मागणीची तारीख लक्ष द्या आणि थकबाकी | ताब्यात घेतल्याची तारीख | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| १ | LXSOL00419-200073845 महेश कमलाकर होमकर आणि प्रिया वासुदेव मुळे | 20-04-2021 साठी रु. 563513/- | 30-07-2024 | भूखंड क्रमांक - 2, गट क्रमांक - 8/1b/1, Cst क्रमांक - 638/B/2, शिवसृष्टी नगर, योगीनाथ सोसायटी, सोलापूर, महाराष्ट्र - 413006 |

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड वर नमूद केलेल्या रकमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी शुल्क आकारले जाईल. कर्जदाराचे लक्ष आहे. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींसाठी आमंत्रित केले आहे.

**ठिकाण : महाराष्ट्र**
**तारीख : ०२.०८.२०२४**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**(मोतीलाल ओसवाल होम फायनान्स लिमिटेड)**

भाषांतरामध्ये त्रुटी आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.

## ग्रामपंचायत उपळाई (बु.), ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत उपळाई (बु.), ता.माढा, जि.सोलापूर यांचेकडून खालील कामे करणेसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | झाडबुके गल्ली, इंधनबोअर पाईप केबल मोटर टाकी घेणे | १४९,८९३/- | १,०००/- | ५००/- | १ वर्ष | सु.भे.अ |
| २ | सटवाई मंदिर इंधन बोअर पाईप टाकी मोटर लाईन घेणे | १४९,८९३/- | १,०००/- | ५००/- | १ वर्ष | सु.भे.अ |
| ३ | अंजनगाव रस्ता ते रमेश इथाप वस्ती मुरमीकरण करणे व अंजनगाव रस्ता, नळी मुरुम रोलिंग करणे | १९,९९८/- | १,०००/- | ५००/- | १ वर्ष | सु.भे.अ |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी ०३/०८/२०२४ सकाळी १०.०० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०५/०८/२०२४ पर्यंत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय उपळाई (बु.)
३ निविदा उघडण्याचा दिनांक १२/०८/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर / नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत उपळाई (बु.)**
**ता. माढा, जि. सोलापूर**

(शिक्का)

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत उपळाई (बु.)**
**ता. माढा, जि. सोलापूर**

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक आबासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर
**भूमी व मालमत्ता कार्यालय**
ई-मेल- landestatesmc@gmail.com

### जाहिर प्रसिध्दीकरण मसुदा

सोलापूर महानगरपालिकेच्या मार्फत शहरात उभारण्यात आलेल्या व्यापारी संकुलातील गाळे भूमी व मालमत्ता विभागाकडून भाडेपट्टा कराराने वितरित करण्यात आलेले असून गाळेधारकांची भाडेपट्टा कराराची विहित मुदत संपल्याने करार संपुष्टात आलेला आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.०७/११/२०२३ नुसार गाळे वितरण व मुदतवाढ देणे तसेच इतर अनुषंगिक कार्यवाही अवलंबविणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

शहरातील सर्व गाळेधारकांना आवाहन करण्यात येते की, वर नमूद शासन निर्णया प्रमाणे ज्या व्यक्तींना अथवा संस्थेंना मनपा तर्फे गाळा वितरित करण्यात आलेला आहे. परंतु त्यांची मुदत संपुष्टात आलेली आहे. अशा सर्व मूळ गाळेधारकांना कळविण्यात येते की, जाहिरप्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत सोलापूर महानगरपालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाकडे लेखी अर्ज सादर करावेत.

**सही/-**
**(आशिष लोकरे)**
**उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी**
**भूमी व मालमत्ता कार्यालय**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पुणे प्रदेश पुणे

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे स्टेशन रा.प.बसस्थानक, पुणे-४११००१,
फोन नं. ०२०-२६१२१६२०, E-mail - deelectcpune@gmail.com

### विद्युत विभाग - जाहिर निविदा सुचना क्र.२१/२०२४-२०२५

रा.प. सोलापूर विभागातील पंढरपूर येथील चंद्रभागानगर बसस्थानकावरील विद्युत घटावर चालणाऱ्या बसेसच्या चार्जिंग स्टेशनच्या विद्युतीकरणाचे काम करणे. (RMU चे प्रस्थापिकरण) कामाचे ब १ - निविदा www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०१/०८/२०२४ पासुन उपलब्ध होईल. त्यानुसार निविदेच्या अटी व शर्तींचे पालन करणाऱ्या उमेदवाराकडुन निविदा मागविण्यात येत आहेत.

**विभागीय अभियंता (विद्युत)**
रा.प.पुणे प्रदेश

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकांना या जाहीर सावधानतेच्या नोटीसीने कळविण्यात येतो की,

मिळकतीचे वर्णनः डि व सब डि.सोलापूर महानगरपालिका सोलापूर हद्दवाढीतील मजरेवाडी येथील सर्व्हे नं.११३/१ब (जुना सर्व्हे नं.३३०/१ब) यांसी प्लॉट नं.६० यासी क्षेत्र २०४ चौ.मी. यांसी याची चतुःसिमा पूर्वेस-प्लॉट नं.५९, पश्चिमेस प्लॉट नं.६३, दक्षिणेस-रस्ता, उत्तरेस-उर्वरीत सर्व्हे नं.११३/१ब चे क्षेत्र येणेप्रमाणे चतुः सिमेतील घरजागा, येणेप्रमाणे वर्णन केलेल्या प्लॉट घर जागा बांधकामासहीत असून सदरची प्लॉट बांधकाम घरजागा आमचे अशिल श्री. रमेश सिद्रमप्पा हसापुरे व सौ. सविता रमेश हसापुरे यांचे खरेदी मालकी व कब्जे वहिवाटीची घरजागा आहे. सदर जागेमध्ये आमचे अशिलांनीं बंगला बांधलेला आहे.

सबब असे असताना आमचे अशिलांनी सन २०१० मध्ये कॅनरा बँकेकडून १० लाख रुपये कर्ज घेतलेले आहे व सदर कर्जापोटी आजपर्यंत ७ लाख ५० हजार रुपये बँकेकडे भरणा केलेली आहे व उर्वरीत बँकेची रक्कमही आमचे अशिल भरण्यास तयार आहेत, परंतु सदर कॅनरा बँकेने मनमानी पध्दतीने सदर घेतलेल्या कर्जावर ज्यादा व्याजदराने आकारणी करुन रक्कम १० लाख देणे असताना १८ लाख ४५ हजार रुपयेची मागणी केली. त्याविरुध्द आमचे अशिलांनी पुणे येथील डी. आर. डी कोर्टात केस दाखल केलेली आहे व तसेच सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात कॅनरा बँकविरुध्द कर्जाचे हिशोबापोटी दिवाणी दावा दाखल करणार आहे.

सबब असे असताना बँकेने चुकीच्या पध्दतीने कलम १३ (४) Surfaesi कायद्याखाली सदर आमचे अशिलाची वरील नमुद बांधकाम घर जागा मिळकत लिलावाद्वारे विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. परंतु आमचे अशिलाकडून बँकेने जागेचा कब्जा घेतलेला नाही. आजही सदर घरजागेचा कब्जा आमचे अशिलाच्या ताब्यात आहे व आमचे अशिल सध्या घरातच राहतात. त्यामुळे कॅनरा बँक हे सदर जागेचा कब्जा घेतल्याचे खोटेपणाने दर्शवून घरजागेचा लिलाव प्रक्रिया करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे आमचे अशिल बँकेविरुध्द दिवाण कोर्टात दावा ही दाखल करीत आहेत. तरी सदर वरील नमुद प्लॉट बांधकाम घरजागेबाबत कोणीही व तसेच कोणत्याही संस्थेने कॅनरा बँकेच्या लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ नये व लिलाव घेऊ नये. घेतल्यास त्याविरुध्द आमचे अशिल कायदेशीर कारवाई तर करतीलच व तसेच जागेचा ताबाही देणार नाही. त्यामुळे कोणाचीही बँकेकडून फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर सावधानतेची नोटीस दिली.

ही सावधानतेची जाहीर दिली तारीख : ०१/०८/२०२४

**सही/-**
**ॲड. चंद्रकांत आ. नाईकवाडे**
**बी.एस.एल., एलएल.एम.,**
**प्लॉट नं.४३ अनुपम पार्क,**
**सैफुल विजापूर रोड, सोलापूर**
**मो.नं.९८८१४५४५६१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर समन्स/नोटीस

**क्र. ज्येष्ठ नागरिक/पोटगी/एसआर/४/२०२४**

**कुर्डुवाडी येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांचे कोर्टात**

**भास्कर विठ्ठल नागटिळक, वगैरे** ----- **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**सचिन भास्कर नागटिळक, वगैरे** ----- **सामनेवाला**

प्रति,
सामनेवाला नं. १ सचिन भास्कर नागटिळक,
रा. साईप्रसाद पार्क, विठ्ठल संकुल, फ्लॅट नं. ३०१,
मांजरी (बु.), ता. हवेली, जि. पुणे

**ज्याअर्थी,** अर्जदार नं. १ भास्कर विठ्ठल नागटिळक आणि अर्जदार नं. २ सुलभा ऊर्फ सुलन भास्कर नागटिळक दोघे रा. देवगांव (मा), ता. बार्शी, जि. सोलापूर यांनी तुमचे विरुद्ध आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिक देखभाल आणि कल्याण कायदा २००७ मधील कलम ४,५,२३ अन्वये या न्यायालयात हुकूम मिळणेकरीता सदरील केस दाखल केलेली आहे. सदर केसकामी तुम्ही आजपावेतो हजर झालेले नाहीत. सदर अर्जाची सुनावणी पुढील नेमणूक तारीख २६/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. उपविभागीय अधिकारी कार्यालय, माढा विभाग कुर्डुवाडी येथे निश्चित करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, सामनेवाला नं. १ यांना जाहीर समन्सने/नोटीसने कळविण्यात येते की, सदरची नोटीस प्रसिद्ध झालेनंतर तात्काळ सदर केसकामी नेमलेली पुढील तारीख २६/०८/२०२४ रोजी स्वतः अगर तुमचे विधिज्ञमार्फत हजर राहावे व कैफीयत, म्हणणे, पुरावा द्यावा, बाजू मांडावी. मुदतीत सदर सामनेवाला नंण १ यांनी याकामी हजर न राहिल्यास त्याचे अपरोक्ष या केसचे तुमचे गैरहजेरीत एकतर्फा काम चालवून सुनावणी होवून निर्णय पारीत केला जाईल व त्याबाबत तुमची त्यानंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे प्रसिद्धीकरण मे. न्यायालयाचे सही शिक्क्यानिशी दिले. ता. ३०/७/२०२४

(गोल शिक्का)

सही/-
**उपविभागीय अधिकारी,**
माढा विभाग कुर्डुवाडी करीता,
ता. माढा, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २१७/२०२४**

**१) शहाजी शिवाजी जगदाळे,**
रा. चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे चारे, ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जून १९७८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जून १९७८ रोजी मौजे चारे, ता.बार्शी येथील येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. १७६/२०२४**

**१) ज्ञानेश्वर जालिंदर काळे,**
रा. पानगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा रामेश्वर, रा. पानगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी येथील डॉ. बारबोले हॉस्पिटल, बार्शी, ता. बार्शी या ठिकाणी दिनांक १२ मे २०२० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा यांचा दिनांक १२ मे २०२० रोजी मौजे बार्शी येथील डॉ. बारबोले हॉस्पिटल, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. १२३/२०२४**

**१) फर्जना इलाही शेख,**
रा. आदर्शनगर, भाऊ पाटील रोड, बोपोडी, पुणे सिटी
आ. मु. मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील योगेश गौरीशंकर साखरे) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. आदर्शनगर, भाऊ पाटील रोड, बोपोडी, पुणे सिटी आ.मु. मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे मुंगशी (वा), ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०५ मे १९८९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदानर यांचा दिनांक ०५ मे १९८९ रोजी मौजे मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५ मे २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २२१/२०२४**

**१) जमील खलील सय्यद,**
रा. ४३७/४, सोनाई पार्क, खराडी, पुणे
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. ४३७/४, सोनाई पार्क, खराडी, पुणे यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १६ नोव्हेंबर १९८२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १६ नोव्हेंबर १९८२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. १३०/२०२४**

**१) इलाही जवरुद्दीन शेख,**
रा. मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील योगेश गौरीशंकर साखरे) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,**
मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे मुंगशी (वा), ता. बार्शी येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जून १९६६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदानर यांचा दिनांक ०१ जून १९६६ रोजी मौजे मुंगशी (वा), ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १५ मे २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## महाराष्ट्र शासन

### अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे.

**एम.टी.एन.एल. वागळे इस्टेट यांचे कार्यालयीन आवार, रोड नं. १६, टोयोटो शोरुम समोर, ठाणे (प.) ४००६०४**
**E.mail ID : atc.thane-mh@gov.in**
**दूरध्वनी क्र. ०२२-२५८२३५२८, २५८००६३७, २५८३३८२२**

### ई-निवीदा सूचना क्र. 11/2024

अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे अंतर्गत येत असलेल्या सोलापूर प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा सवतगव्हाण, ता. माळशिरस, जि. सोलापूर या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात भाजीपाला पुरवठा करणेबाबत.

अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे हे त्यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळतील विद्यार्थ्यांना भाजीपाला पुरवठा करणेसाठी नामवंत आणि अनुभवी उत्पादक / वितरक यांच्याकडून खुल्या स्पर्धात्मक ई-निविदा मागवित आहे.

निविदा कागदपत्रांबाबत व ई-निविदेत भाग घेऊ इच्छुक निविदाकारांनी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी. निविदा फक्त ऑनलाईन स्वीकारल्या जातील. ऑनलाईन निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक ०२/०८/२०२४ ते ०८/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.

**सही/-**
**दीपक कुमार मीना (भा.प्र.से.)**
**अपर आयुक्त,**
**आदिवासी विकास ठाणे,**

**आरओसी-२०२४-२५/कृ.५/१५०१**




सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

सोलापूर : शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महत्त्वाचे

### हरयाणा सरकारकडून सरबज्योतला नोकरी अन् २.५ कोटी रुपये



**नवी दिल्ली** : नेमबाज सरबज्योत सिंग व मनू भाकर या जोडीने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल मिश्र क्रीडाप्रकारात कांस्य पदक पटकावले. पदक जिंकल्याबद्दल हरयाणा सरकारने सरबज्योत सिंगला सरकारी नोकरी व २.५० कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. सरबज्योत सिंग पहिल्यांदाच ऑलिम्पिकमध्ये सहभागी झाला आणि त्याने पदकाची कमाई करून भारतीयांना आनंद दिला. सरबज्योतचा जन्म ३० सप्टेंबर २००१ रोजी अंबाला येथे झाला.त्याने अवघ्या १३व्या वर्षी नेमबाजीला सुरुवात केली. त्याने उन्हाळी शिबिरात काही मुलांना एअर गन शूट करताना पाहिले होते. त्यातून प्रेरणा घेत त्याने हा खेळ खेळण्याचा निर्णय घेतला. यानंतर त्याचा शूटिंगमधील प्रवास सुरू झाला. सरबज्योतने २०२३ मध्ये पंजाब विद्यापीठातून कला शाखेत पदवी मिळवली. कांस्य पदक जिंकणाऱ्या सरबज्योतला हरयाणा सरकार २.५ कोटी रूपयांचे बक्षीस देणार आहे. याशिवाय त्याला सरकारी नोकरी सुद्धा दिली जाईल, अशी माहिती हरयाणाचे क्रीडा राज्यमंत्री संजय सिंग यांनी दिली. त्यांनी सरबज्योतच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

### विजयी सेलिब्रेशन पडले महागात!

**पॅरिस** :पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. अनेक वेळा पदक खेळाडू सेलिब्रेशन करताना खूप उत्साही दिसतात. मोल्दोव्हाचा ज्युडोपटू आदिल ओस्मानोव्ह यानेही असेच काहीसे केले, पण त्याचे सेलिब्रेशन फार काळ टिकू शकले नाही. या सेलिब्रेशनदरम्यान ओस्मानोव्हचा खांदाच निखळला.मोल्दोव्हाच्या ओस्मानोव्ह याने कांस्यपदक जिंकले. पुरुषांच्या ७३ किलो गटात त्याने इटलीच्या मॅन्युएल लोम्बार्डोचा पराभव केला. या विजयानंतर त्याने आनंदाने उडी मारली. पण त्याने आपले पाय मॅटवर टेकले तसा तो मोठ्याने ओरडला आणि गुडघे टेकून बसला. या उडीमध्ये त्याचा डावा खांदा निखळला, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. अखेर दुखापतग्रस्त अवस्थेतच त्याला पोडियमवर उभा राहावे लागले. पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी मला डॉक्टरांनी खांद्यावर शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. या सामन्यादरम्यानही समस्या होती. माझ्यासाठी हे अडचणीचे होते. वॉर्म अप करतानाही मला त्रास जाणवत होता.

### गोल्फपटू दीक्षा डागरच्या कारला अपघात

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ दरम्यान भारतीय महिला गोल्फपटू दीक्षा डागर हिच्या कारला अपघात झाला. या अपघातात दीक्षाला दुखापत झाली नसून तिची आई जखमी झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दीक्षा डागर यांच्या कारचा अपघात ३० जुलै रोजी सायंकाळी पॅरिसमध्ये झाला. तिची आई जखमी झाली असून त्यांच्या पाठीला दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातावेळी कारमध्ये कुटुंबातील चार सदस्य उपस्थित होते. आईच्या पाठीला दुखापत झाली, तर भावाला किरकोळ दुखापत झाली. तर वडील व दीक्षा यांना दुखापत झाली नाही. दीक्षा बरी असून ती पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या सामन्यात भाग घेणार आहे. महिलांची गोल्फ स्पर्धा ७ ते १० ऑगस्ट दरम्यान होणार असून दीक्षाचा सामना ७ ऑगस्ट रोजी होणार आहे. दीक्षाशिवाय अदिती अशोकही भारतातून महिलांच्या गोल्फ स्पर्धेत सहभागी होत आहे.

### अंजूम मुदगिलला १८ वे, सिफ्ट कौरला २१ वे स्थान

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन नेमबाजी प्रकारात अंजूम मुदगिल व सिफ्ट कौर सामराला अनुक्रमे १८ वे आणि २१ वे स्थान मिळाले व त्यांना स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात त्यांना अपयश आले. येथील नॅशनल शुटिंग रेंजवर करताना अंजुम १८व्या स्थानावर राहिली तर सिफ्टला ३१वे स्थान मिळाले. आपल्या दुसऱ्या ऑलिम्पिकमध्ये खेळताना अंजुमने ५८४ गुणांची नोंद केली. तिच्या सर्वोत्कृष्ट प्रयत्नांनंतरही ती अंतिम फेरीपासून दूर राहिली. हॅंगझोऊमध्ये सुवर्णपदक जिंकणारी सिफ्ट कौर सामरा हिने एकूण ५७५ गुणांची नोंद केली.

# शाब्बास स्वप्निल!

# तुझ्यामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पसरले हास्य : मुख्यमंत्री शिंदे

## मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार यांनी साधला पॅरिसमधील स्वप्निलशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद

**मुंबई, १ ऑगस्ट**

शाब्बास स्वप्निल... तुझ्या कांस्यपदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य पसरले आहे. तुझी कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. तू आमचा अभिमान आहेस, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमबाज स्वप्निल कुसळेचे अभिनंदन केले. तसेच या कामगिरीसाठी स्वप्निलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल, असे जाहीर केले.

मुख्यमंत्री शिंदे व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॅरिसमध्ये असलेल्या ऑलिम्पिकवीर स्वप्निलशी तसेच त्याच्या प्रशिक्षक दीपाली देशपांडे, विश्वजीत शिंदे यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संपर्क साधला.

**७२ वर्षांनी महाराष्ट्रात ऑलिम्पिकचे वैयक्तिक पदक**

स्वप्निलचे रौप्य पदक अवघ्या ०.१ गुणांनी हुकले आहे. तरीही त्याने कांस्यपदक पटकावल्यामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. महाराष्ट्राला वैयक्तिक कामगिरीसाठी ७२ वर्षांनी पदक मिळाले आहे. पदक महाराष्ट्रासाठी खास आहे. कारण १९५२ साली खाशाबा जाधव यांनी हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये कुस्तीत ऐतिहासिक कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर महाराष्ट्रासाठी अशी भरारी घेतलीय ती कोल्हापूरच्या स्वप्निल कुसाळेने अन् तीही तब्बल ७२ वर्षांनी. या कामगिरीसाठी स्वप्निलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल. त्याचा व त्याचे प्रशिक्षक, आई-वडील यांचा यथोचित सत्कारही केला जाईल. याशिवाय स्वप्निलला नेमबाजीतील पुढील तयारीसाठी आवश्यक, त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. स्वप्निलने आपल्या कामगिरीने इतिहास घडवला आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, त्याला मार्गदर्शन करणारे, प्रशिक्षक आदींची मेहनत महत्वाची ठरली आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

**स्वप्निलचे महाराष्ट्रात यथोचित सत्कार होणार : अजित पवार**

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून नेमबाज स्वप्निलचे हे यश आनंददायी आहे. स्वप्निलचा महाराष्ट्राला रास्त अभिमान आहे. नेमबाजीतील या क्रीडा प्रकारात पदक पटकावणारा स्वप्निल एकमेव भारतीय खेळाडू ठरला आहे. आपण राज्यातील विविध क्रीडा प्रकारांसाठी खेळाडू, प्रशिक्षक यांच्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहोत. राज्यातील क्रीडा संकुलांच्या सुविधांचाही विस्तार करत आहोत. पॅरिस ऑलिम्पिकहून परतल्यानंतर स्वप्निलचे महाराष्ट्रात स्वागत आणि यथोचित सत्कार केला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**कांस्यपदक विजेत्या स्वप्निलला सतेज पाटलांकडून ५ लाखांचे बक्षीस**

काँग्रेसचे नेते सतेज पाटील व त्यांचा पुतण्या ऋतुराज पाटील यांनी मिळून स्वप्निल कुसळेचे कौतुक करत त्याला ५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. यासंबधीची पोस्ट सतेज पाटील यांनी आपल्या समाजमाध्यम एक्सवर शेअर केली आहे. यावेळी त्यांनी लिहिले, कोल्हापूरकर चमकला! स्वप्निल सुरेश कुसळे याने पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये ५० मीटर एअर रायफल थ्री पोझिशन्स स्पर्धेत कांस्यपदक जिंकून आपल्या शहराचा व देशाचा अभिमान वाढवला आहे.

कोल्हापूरच्या क्रीडा समुदायासाठी व संपूर्ण देशासाठी हा अभिमानाचा क्षण आहे, असे लिहिले आहे. त्याचबरोबर स्वप्निलला ५ लाखांचे बक्षीस जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे, असेही म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### स्वप्निलचे अभिनंदन : फडणवीस

स्वप्निल कुसळे याने ऑलिम्पिकमध्ये मिळवले. कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्यानंतर महाराष्ट्राला पहिले पदक मिळाले आहे. स्वप्निल कुसळे यांचे अभिनंदन करतो. त्याने देशाचा मान वाढवला त्यासाठी अभिनंदन करतो, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### पंतप्रधान मोदींनी फोन करून स्वप्निलचे केले अभिनंदन

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशनममध्ये कांस्यपदक जिंकल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः फोन करून तसेच टि?ट करून स्वप्निल कुसळेचे अभिनंदन केले. कुसळेची अप्रतिम कामगिरी! पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये पुरुषांच्या ५० मी. रायफल थ्री पोझिशनमध्ये कांस्यपदक जिंकल्याबद्दल त्याचे अभिनंदन, असे मोदी म्हणाले.स्वप्निलची कामगिरी विशेष आहे, कारण त्याने उत्तम लवचिकता व कौशल्य दाखवले आहे. तसेच या प्रकारात पदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू आहे. प्रत्येक भारतीय आनंदाने भरलेला आहे, असेही मोदी म्हणाले.

### राज्य सरकारकडून १ कोटी रुपयांचे बक्षीस

ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकणाऱ्या नेमबाज स्वप्निल कुसाळेचा आता राज्य सरकारकडून एक कोटी रुपयांचे बक्षीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले आहे.

### क्रीडा प्रबोधिनीमध्ये नेमबाजीचा चांगला पाया घातला : स्वप्निल

पुण्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्येच सराव करताना नेमबाजीचा चांगला पाया घातला गेला. माझ्या यशात कुटुंबीयांसह, आईच्या मायेने प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षक श्रीमती देशपांडे व शिंदे यांचा मोला वाटा आहे, असे ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता स्वप्निल कुसळे म्हणाला. या संवादात मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री पवार यांनी स्वप्निल कुसळेचे आई-वडील, प्रशिक्षक, मार्गदर्शक सर्वांचे अभिनंदन केले.

### आजीचा आनंद गगनात मावेना

नातवाने ऑलिम्पिक पदक जिंकल्यानंतर स्वप्निलच्या आजीच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. आजीचे डोळे आनंदाश्रुंनी भरले होते. लय चांगले झाले... म्हाया नातवाने करुन दावले, माझा नातू लय मोठ्ठा झाला... आमचा आशीर्वाद त्याच्या पाठीशी हाय... लहानाचा मोठ्ठा झालाय, लहानपणापासून बाहेर गेलाय, लय चांगले झाले, असे स्वप्निलची आजी म्हणाली.

### क्रीडा प्रबोधिनी ते पॅरिसपर्यंतचा प्रवास

**नेमबाज स्वप्निल कुसळे कोल्हापुरातील राधानगरी तालुक्यातील कांबळवाडी गावचा आहे. ६ ऑगस्ट १९९५ मध्ये जन्मलेल्या स्वप्निलने पॅरिसच्या धरतीवर चमक दाखवली. स्वप्निलचा ऑलिम्पिकपर्यंतचा प्रवास खूपच भारी आहे. अभिनव बिंद्राला २००८ च्या ऑलिम्पिकमध्ये खेळताना पाहण्यासाठी स्वप्निलने १२ वीच्या परीक्षेकडे कानाडोळा केला. २००९ मध्ये वयाच्या १४व्या वर्षी त्याच्या वडिलांनी स्वप्निलला महाराष्ट्र सरकारच्या क्रीडा प्रबोधिनी योजनेत दाखल केले. तिथूनच त्याचा क्रीडा क्षेत्रातील प्रवास सुरू झाला. सुरुवातीच्या काळात त्याने नेमबाजीतील आपले कौशल्य विकसित करण्यासाठी पुण्याला जाण्यापूर्वी नाशिकमध्ये प्रशिक्षण घेतले.**

# निखत झरीनचा स्वप्नभंग



चीनच्या खेळाडूविरुद्ध लढताना निखत झरीन

**पॅरिस, १ ऑगस्ट**

भारताची दोन वेळची विश्वविजेती मुष्टियोद्धा निखत झरीन हिच्याकडून पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पदक मिळण्याची मोठी आशा होती, परंतु महिलांच्या ५० किलो वजन गटाच्या अंतिम सोळाच्या लढतीत तिला चीनच्या आशियाड सुवर्णपदक विजेती वु यू हिच्याकडून पराभवाचा सामना करावा लागला. एकतर्फी ठरलेल्या लढतीत वु यू हिने विश्वविजेत्या निखत झरीनवर सरळ ५-० ने मात केली.

या धक्कादायक पराभवाबरोबरच निखतचा स्वप्नभंग झाला व तिचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले.

या स्पर्धेत निखत बिगरमानांकित होती. भारताकडून पदकाची प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या निखतवर प्रचंड दडपण आले होते.

मुष्टियुद्ध स्पर्धा करणारी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) जागतिक स्पर्धा आयोजित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय मुष्टियुद्ध संघटनेला (आयबीए) मान्यता देत नसल्यामुळे निखतला या ऑलिम्पिकसाठी बिगरमानांकित करण्यात आले.

भारताच्या पदकाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या निखतला पहिल्या फेरीतच अव्वल मानांकित फ्लायवेट (५२ किलो) जागतिक विजेत्याने दबावाखाली आणले. निखतने प्रतिआक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु तिच्या प्रयत्नाला यश मिळाले नाही. वु यूचे फूटवर्क उत्तम होते, त्यामुळे तिला वार टाळण्यासाठी आपली भूमिका सतत बदलता आली.

दुसऱ्या फेरीत १-४ ने पिछाडीवर असताना निखतला थोडे यश मिळाले, परंतु यूने निखतच्या चेहऱ्यावर हुक मारण्यात यश मिळविले. निखतने काही शॉट्स मारून फेरी संपवली. तिसऱ्या फेरीत फारसा बदल झाला नाही. निखतने सामन्यातून डोके वर काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला, पण वु यु हिच्या चपळ हालचालींमुळे ती अपयशी ठरली.

निखत ही सर्वात सातत्यपूर्ण भारतीय मुष्टियुद्ध खेळाडूंपैकी एक आहे. तिने गत वर्षी आशियाड क्रीडा स्पर्धेत कांस्यपदकाशिवाय जागतिक स्पर्धा व २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सलग सुवर्णपदके पटकावली आहेत. (वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिरागचेही स्वप्न भंगले



**पॅरिस, १ ऑगस्ट**

सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी या भारताच्या अव्वल पुरुष दुहेरी बॅडमिंटन जोडीचेही ऑलिम्पिकपदक जिंकण्याचे स्वप्न भंग झाले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुष दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत या भारतीय जोडीला मलेशियाच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला.

सुमारे ६४ मिनिटे चाललेल्या लढतीत सात्त्विक-चिरागला चिया आरोन आणि सोह वुई यिक या मलेशियन जोडीकडून २१-१३, १४-२१, १६-२१ असा पराभव सहन करावा लागला.


पहिला गेम जिंकल्यानंतर भारतीय जोडीने दुसरा आणि तिसरा गेम गमावला. चिराग व सात्त्विकने पहिल्या गेममध्ये दमदार कामगिरी केली. या दोघांनीही चांगली कामगिरी करत मलेशियन जोडीवर आघाडी घेतली. १७ मिनिटे चाललेल्या या गेममध्ये चिराग-सात्त्विकने आरोन व यिक या जोडीचा २१-१३ असा पराभव केला व भारताने मलेशियावर दडपण आणले.

मलेशियाने दुसऱ्या गेममध्ये दमदार पुनरागमन केले. दुसऱ्या गेममध्ये मलेशियाने दडपण कमी करत सुरुवातीलाच आघाडी घेतली. मात्र, चिराग-सात्त्विकनेही चांगले फटके खेळून पुनरागमन केले. पहिल्या गेमपेक्षा एक मिनिट जास्त चाललेला हा गेम मलेशियाने जिंकला. (वृत्तसंस्था)

### प्रणॉयला नमवून लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत

पुरुष एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत अंतिम सोळाच्या सामन्यात भारताचा युवा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने आपलाच संघमित्र एच. एस. प्रणॉयवर २-० (२१-१२, २१-६ असा विजय नोंदवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. शुक्रवारी लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत चीन तायपेईच्या चोऊ तिएन चेन याच्याविरुद्ध खेळणार आहे.

# २० कि. मी. चालण्याच्या शर्यतीत भारतीय ॲथ्लिट्सची निराशा



**पॅरिस, १ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ॲथ्लेटिक्स स्पर्धेला गुरुवारपासून सुरुवात झाली. २० कि. मी. जलद चालण्याच्या शर्यतीत भारतीय ॲथ्लिट्सने निराशा केली. महिलांच्या २० कि.मी. चालण्याच्या शर्यतीत राष्ट्रीय विक्रमवीर प्रियांका गोस्वामीने ४१ वे स्थान मिळविले, तर पुरुषांच्या स्पर्धेत विकास सिंग व परमजीत सिंगने अनुक्रमे ३० वे व ३७ वे स्थान मिळविले.

आशियाई रौप्यपदक विजेत्या प्रियांकाने १ तास ३९ मिनिटे व ५५ सेकंद अशी वेळ नोंदविली. तिने आपल्या हंगामातील सर्वोत्तम १:२९:४८ वेळेपेक्षा तब्बल १० मिनिटे जास्त वेळ लावला. २८ वर्षीय प्रियंकाची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ १:२८:४५ आहे. मिशन ऑलिम्पिक सेलने गत डिसेंबरमध्ये उच्च उंच ठिकाणी प्रशिक्षण घेण्यासाठी निधी मंजूर केला होता. ती या वर्षाच्या सुरुवातीपासून ऑस्ट्रेलियात होती.

विद्यमान आशियाड विजेत्या चीनच्या यांग जियायुने १:२५.५४ वेळेसह सुवर्णपदक पटकावले, तर स्पेनच्या मारिया पेरेझ (१:२६:१९) व राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेती ऑस्ट्रेलियाच्या जेमिमा मोंटागने (१:२६:२५) अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदक मिळविले.

पावसामुळे ३० मिनिटे उशिरा सुरू झालेल्या पुरुषांच्या २० कि.मी. जलद चालण्याच्या शर्यतीत विकासने १ तास २२ मिनिटे व ३६ सेकंद, तर परमजीतने १:२३:४८ सेकंद अशी वेळ नोंदविली.

इक्वाडोरचा ब्रायन डॅनियल पिंटाडो (१:१८:१८) याने ही शर्यत जिंकली. ब्राझीलचा कायो बोनफिम (१:१९:०९) आणि विद्यमान जगज्जेता स्पेनचा अल्वारो मार्टिनने (१:१९:११) अनुक्रमे रौप्य व कांस्यपदक जिंकले. टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता इटलीचा मॅसिमो स्टॅनो (१:१९:१२) याने चौथे स्थान मिळविले.

राष्ट्रीय विक्रमवीर अक्षदीप सिंग ६ कि. मी. अंतर पार केल्यानंतर स्पर्धेतून बाहेर झाला. शर्यतीतदरम्यान तो खाली वाकून पोट धरून अस्वस्थ दिसला.

अक्षदीपला युरिनरी ट्रॅक इन्फेक्शनमुळे (यूटीआय) गत दोन दिवसांपासून ताप होता, असे त्याच्या प्रशिक्षकाने वृत्तसंस्थेला सांगितले. यूटीआयमुळे त्याला ३० तारखेपासून ताप येत होता. मात्र, काल तो तापातून बरा झाला, असेही त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# भारत-श्रीलंका वन-डे मालिका आजपासून

**कोलंबो, १ ऑगस्ट**

कर्णधार सूर्यकुमार यादव व नवनियुक्त मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने श्रीलंकाविरुद्धची टी-२० मालिका ३-० ने जिंकल्यानंतर आता रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ श्रीलंकेविरुद्ध शुक्रवारपासून येथील आर. प्रेमदासा आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर तीन सामन्यांची वन-डे मालिका खेळणार आहे.

रोहित शर्मा, विराट कोहली, के.एल. राहुल यांसारख्या वरिष्ठांच्या आगमनामुळे संघाला बळ मिळाले आहे. राहुल व कुलदीप यादव विजयी घोडदौड कायम राखण्याचा प्रयत्न करतील.

श्रीलंका संघाचे नेतृत्व चरित असालंका करणार आहे. अलीकडेच त्याची संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. टी-२० मालिका ३-० ने जिंकल्यानंतर आता वन-डे मालिकेतही भारत विजयाचा प्रबळ दावेदार असेल. आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत भारत पहिल्या क्रमांकावर आहे, तर श्रीलंका सातव्या क्रमांकावर आहे.

**भारत-श्रीलंका पहिला वन-डे सामना**
**स्थळ : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो**
**वेळ : दुपारी २.३० वाजतापासून**
**थेट प्रसारण : सोनी स्पोर्ट्सवर**

पाकिस्तानमध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी रोहितच्या खेळाडूंना केवळ सहा एकदिवसीय सामने खेळायचे आहेत. त्यादृष्टीने भारतीय संघव्यवस्थापन संघाची बांधणी करण्याचा प्रयत्न करतील. (वृत्तसंस्था)

# भारतीय हॉकी संघाने गमावला अखेरचा साखळी सामना

### बेल्जियमकडून २-१ ने पराभव

### पॅरिस ऑलिम्पिक

**पॅरिस, १ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये गुरुवारी पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत भारताने बेल्जियमविरुद्धचा आपला गट साखळी सामना १-२ असा एका गोलच्या फरकाने गमावला आहे.

आधीच उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचलेल्या भारताचा गट साखळी फेरीतील हा पहिला पराभव होता.

सामन्याच्या १८ व्या मिनिटाला अभिषेकने भारताला आघाडी मिळवून दिली होती. मात्र त्यानंतर ाधी बेल्जियमच्या थिब्यू स्टॉकब्रोक्स (३३ वे मिनिट) व जॉन-जॉन डोहमेन (४४ वे मिनिट) प्रत्येकी एक गोल नोंदवून आपल्या संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. बेल्जियम या स्पर्धेत आतापर्यंत अपराजित राहिला. बेल्जियमने यापूर्वीच ब गटातून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

अर्जेंटिनाविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधण्यापूर्वी भारताने न्यूझीलंडचा ३-२ असा पराभव केला होता. आपल्या शेवटच्या सामन्यात हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आयर्लंडचा २-० असा पराभव केला. भारताचा पुढील अंतिम गट साखळी सामना शुक्रवारी ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. (वृत्तसंस्था)



हॉकी सामन्यादरम्यान बेल्जियमच्या थिब्यू स्टॉकब्रोक्सला रोखण्याच्या प्रयत्नात भारताचा अमित रोहिदास (मध्यभागी)

## संक्षिप्त वृत्त



### सारथी क्लब आणि श्री सिध्देश्वर इंजिनियरिंग यांच्यात सामंजस्य करार

**सोलापूर, दि.१ ऑगस्ट -**

सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स क्लब आणि श्री सिद्धेश्वर वुमन्स कॉलेज ऑफ इंजिनियरींग यांच्यात इंग्रजी प्रशिक्षणासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. श्री. सिद्धेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम चव्हाण, सारथीचे संस्थापक प्रा. विठ्ठल वंगा, प्रा. डॉ अविनाश पाटील, प्रा. अश्विनी निंबाणे, प्रा. नागराज खराडे आणि प्रा. नागेश पाथरुट यांनी करारावर सह्या केल्या. हा करार पुढील एक वर्षासाठी असून या अंतर्गत कॅम्पस ड्राइव्हसाठी उपयुक्त इंग्रजी संभाषण कौशल्य, मुलाखतीची तयारी, गटचर्चा, ई-मेल रायटिंग, इंग्रजी व्याकरण, इंग्रजी भाषा विषयक विविध उपक्रम, व्यक्तिमत्व विकास यासारख्या घटकांसाठी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना सारथी मार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. गेल्या २० वर्षांत सारथीच्या इंग्रजी संभाषण आणि इंग्रजी भाषा विषयक उपक्रमांचा आणि प्रशिक्षणाचा असंख्य सोलापूरकरांनी लाभ घेतला आहे. यावेळी विभाग प्रमुख प्रा. एस. एम. गुंगेवाले, प्रा. एस. व्ही. म्हमाणे, प्रा. डी. एस. वाघमोडे, प्रा. व्ही. व्ही. शिरश्याड, प्रा. ए. पी. गजरे, प्रा वाय. आर. कलशेट्टी, डॉ. एस. जे. मडकी, श्रीनिवास पेद्दिंटी, अश्विनी वंगारी, उमा यरजल, अंकिता रच्चा आदी उपस्थित होते.



### हिराचंद नेमचंद महाविद्यालयाच्या सी. ए. फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांचे यश

**सोलापूर, दि.३१ जुलै-**

सी. ए. फाऊंडेशनच्या परीक्षेत हिराचंद नेमचंद (स्वयं-अर्थसहाय्य) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे : मानसी आगलावे (२८६), श्रीहरी कोकरे (२३१), ब्लॉसम बॅस्टिअन (२१९), श्रुती कोकाटे (२०९), श्रेयश वंगा (२०६), विराज चडचन (२००). यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, समन्वयिका सारिका महिंद्रकर यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सत्कार केले. यावेळी सी. ए. विभागाचे सर्व प्राध्यापक वर्ग सी.ए.ललित मगदूम, सी. ए. रुपाली बसूदे, प्राध्यापक राकेश संगतानी, सी.ए. शुभम चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राध्यापिका समीना रंगरेज यांनी केले.



### जी. एम. संस्थेच्या वतीने अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्त जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास जी.एम संस्थेचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण दीप प्रज्वलित करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर व साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे यांचा जयघोष करुण अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी सामाजीक कार्यकर्ते अजित बनसोडे, निवृत्त पोलीस नाईक भाऊसाहेब शिंदे उत्सव अध्यक्ष हर्षवर्धन बाबरे, शशिकांत गायकवाड, आप्पासाहेब बागले, आप्पासाहेब गायकवाड, पंकज ढसाळ, आयाज दिना, पप्पू जाधव, गौरव पात्रे, पप्पू लोंढे, संतोष कदम, रवी कांबळे, अभी क्षीरसागर, डॅनी रामगल, निहाल क्षीरसागर, बाबा कोणे, सनी दणाणे, अभिनंदन गायकवाड आदी उपस्थित होते.



### कामगार शक्ती युनियनच्या वतीने साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

कामगार शक्ती युनियनच्या वतीने कार्यालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कामगार संघटना संघर्ष समितीचे जनरल सेक्रेटरी कामगार नेते चांगदेव सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा कामगार संघटना संघर्ष समितीचे अध्यक्ष सायमन गट्टू,मनपा चतुर्थीश्रेणी पतसंस्थेचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे, मनपा चतुर्थश्रेणी पतसंस्थेचे संचालक सिद्राम वळसनकर, दत्ता कोळी, श्रीपती सरवदे, सुधाकर सोनवणे, सुनिता कांबळे, सुनिता रणदिवे, राही माने आदी उपस्थित होते.

# नागपंचमीनिमित्त लाह्या होताहेत तयार

## मराठवाडा आणि कर्नाटकात वाढली सोलापूरच्या लाह्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ ऑगस्ट -**

नागपंचमी सण दृष्टिक्षेपात आला आहे. नागपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील शुक्रवार पेठ भुई गल्ली या ठिकाणी ज्वारीपासून लाह्या बनवण्याचं कारागीर व्यस्त असल्याचे चित्र आहे. नागपंचमी सणामध्ये या लाह्याला विशेष असे महत्त्व आसते.

हिंदू धर्मामध्ये श्रावण महिन्यातील विविध सण महत्त्वाचे मानले जातात. श्रावण महिन्यापासूनच विविध सणांना खऱ्या अर्थाने सुरुवात होत असते. त्यातील पहिला सण म्हणून नागपंचमी सणाकडे पाहिले जाते. महिलांसाठी नागपंचमी सण एक पर्वणी देणारा सण असतो. या दिवशी नागदेवताला लाह्या आणि दूध अर्पण केले जाते. त्या अनुषंगाने



सोलापूर शहरातील शुक्रवार पेठ भुई गल्ली या ठिकाणी गेल्या दोन महिन्यांपासून ज्वारीपासून लाह्या बनवण्याचे कामकाज सुरू आहे.

दरवर्षी सिद्धे व्यापारी वर्ग या कामात व्यस्त असतात. दररोज एक क्विंटल ज्वारीपासून लाह्या बनवला जात आहे. एक किलो ज्वारीपासून सुमारे सातशे ग्रॅम लाह्या तयार होतो. मार्केट यार्डतून ठोक भावात ज्वारी आणून त्यापासून लाह्या बनवला जात आहे. लाह्या बनवण्याचे कामकाज दोन महिन्यापासून सुरू होते. त्यासाठी पाच कामगार राबवत असतात. भट्टीतील वाळूमध्ये भिजवलेली ज्वारी टाकली जाते ती ज्वारी गरम होऊन त्यापासून लाह्या तयार होतो. भट्टी समोर कारागीर कायम कार्यरत असतो. तयार झालेला लाह्या पाटीमध्ये ओतून होते बनवले जातात. असे रोजचे शंभर क्विंटल लाह्या सोलापूर शहर जिल्हा तसेच मराठवाडा आणि कर्नाटक राज्यात पाठवला जात आहे.

### ठोक १०० रुपये तर किरकोळ १६० रुपये दर

यंदा लाह्यांच्या मागणीत गतवर्षीच्या तुलनेत वाढ झालेली आहे. मराठवाडा तसेच कर्नाटक राज्यामध्ये सोलापूरच्या लाह्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. घाऊक बाजारात १०० रुपये किलो प्रमाणे लाह्या विकला जातो. तर किरकोळ बाजारपेठेत १६० रुपये पर्यंत लाह्या प्रति किलो विक्री केला जात आहे. नागपंचमी सणाच्या अगोदर किरकोळ बाजारात मागणी वाढते त्यामुळे दर देखील वाढतो.

**- बंडू सिद्धे, लाह्यांचे घाऊक व्यापारी**

# यशश्री शिंदेंच्या गुन्हेगारांना फाशी द्या

### शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थानचे पोलिस आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

उरण मधील यशश्री शिंदे यांची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्यात यावी. नराधमांना शिक्षा करण्यासाठी कायद्याची परवा न करता शिवछत्रपतींच्या गनिमी काव्याचा वापर करुन योग्य शिक्षा देण्यात येईल, असे निवेदन शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेच्या वतीने पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांना देण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे, जिल्हाध्यक्ष राहुल बाके, अभिषेक पवार, शिवरत्न माने, विठ्ठल जमादार, स्वप्निल सावळगी आदी उपस्थित होते.

सध्या महाराष्ट्रातील कायदा अणि सुव्यवस्था दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. गुन्हेगारांना कायद्याचा अणि पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही. त्याचाच परिणाम म्हणून यशश्री शिंदे या बहिणीचा चेहरा, शरीर आणि गुप्तांगावर वार करुन हत्या करण्यात आली आहे. आणि तिचा मृतदेह रेल्वे स्थानकाच्या बाहेरील झुडपात फेकुन दिला. ही घटना महाराष्ट्रातील मानवतेला काळीमा फासणारी असुन महाराष्ट्र राज्याची प्रतिमा खराब करणारी आहे. अशाप्रकारचे अमानवी अत्याचार रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत तसेच यशश्री शिंदे यांच्या हत्येचे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवत, त्यांच्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, असे त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद आहे.

# शीतखोली घटकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ जुलै-**

जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती व इतर सर्व प्रवर्गातील शेतक-यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास कार्यक्रम योजनेतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापण घटकांतर्गत शितखोली या घटकासाठी महा-डीबीटी पोर्टल https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

**प्रकल्पाचे तांत्रिक निकष**

कमाल प्रकल्प क्षमता ३० मे. टन प्रतिदिवस प्रति युनिट असणे आवश्यक राहील. शीतखोलीची क्षमता ३० मे. टनापेक्षा कमी असल्यास यथाप्रमाणाआधारे (झ्रीरींर इरीळी) अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि, किमान प्रकल्पक्षमता ५ मे. टन प्रति युनिट असणे आवश्यक राहील. शीतखोलीस सौर / अक्षय ऊर्जा स्त्रोत वापरल्यास १०० टक्के कर रक्कम प्रकल्प खर्चात ग्राह्य धरण्यात येईल.

**अर्थसहाय्याचे स्वरुप :**

सर्वसाधारण क्षेत्रासाठी साठवण क्षमता विचारात घेवून ग्राहय भांडवली प्रकल्प खर्चाच्या ३५ टक्के किंवा कमाल रु. ५.२५ लाख अर्थसहाय्य देय आहे. अर्थसहाय्यासाठी भांडवली खर्चाच्या बाबी ग्राहय धरण्यात येतील. लाभार्थी निवडीचे निकष :- शेतकरी, शेतकरी उत्पादक गट, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट, नोंदणीकृत उत्पादक संघ (ज्यामध्ये कमीतकमी २५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, तसेच वैयक्तिक शेतकरी, भागीदारी संस्था, मालकी संस्था, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता गट (ज्यामध्ये किमान १५ सदस्य असतील), शेतकरी उत्पादक कंपनी, कंपनी, शेतकरी गट यांचेसाठी अर्थसहाय्य हे बँक कर्जाशी निगडीत बँक कर्जाच्या परताव्याच्या स्वरुपात अनुदान देय राहील.

### रघुवीर चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख घोषित

**सोलापूर :** महाराष्ट्राला महान साधू-संतांची थोर परंपरा लाभली आहे. याच परंपरेतील संत समर्थ रामदास स्वामी यांची थोरवी खूप मोठी आहे. सर्वसामान्यांसाठी मनाचे श्लोक आणि दासबोधसारखा महान ग्रंथ लिहिणारे तसेच सुखकर्ता दुःखहर्ता हि दैनंदिन पूजेतील आरती रचणारे समर्थ रामदास स्वामी यांचे चरित्र प्रथमच रुपेरी पडद्यावर पाहायला मिळणार आहे. रघुवीर या आगामी चित्रपटाद्वारे समर्थांचा महिमा जगासमोर येणार आहे. या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख एक नवीन पोस्टर रिलीज करून झाली आहे. २३ ऑगस्ट रोजी रघुवीर सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# रोटरी अन्नपूर्णा योजनाचा आज १७ वर्षपूर्ती कार्यक्रम

### जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड प्रमुख पाहुणे

### लाभार्थ्यांना रोटरीचे सदस्य स्वत:च्या गाडीतून आणणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

गतकाळात आर्थिक सुबत्ता व संपन्नता असलेल्या आणि नंतर विपन्नावस्थेत गेलेल्या तसेच नातीगोतीही केवळ नावापुरतीच ठरलेल्या उपेक्षित, निराधार अशा शंभर वृध्द माता-पित्यांसाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूर ही संस्था 'काठीचा आधार' बनली आहे. या वृध्दांसाठी गेल्या १७ वर्षांपासून रोटरी अन्नपूर्णा योजना कसलाही खंड न पडता अव्याहतपणे सुरु आहे.

यंदा ४ ऑगस्ट रोजी रोटरी अन्नपूर्णा योजनेस १७ वर्षे पूर्ण होत असून त्यानिमित्त शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी सर्व लाभार्थी व देणगीदार यांच्यासाठी ड्रीम पॅलेस , मुरारजी पेठ येथे विशेष भोजनाचा कार्यक्रम आयोजित केल्याचे सचिव ब्रिजकुमार गोयदानी यांनी माहिती दिली. या कार्यक्रमास जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्व लाभार्थ्यांना त्यांच्या घरापासून कार्यक्रम ठिकाणी ने आण करण्याची सोय रोटरी क्लब चे सदस्य त्यांच्या गाडीतून करणार आहेत. तसेच त्यांना सर्वांना ह्यानिमित्त भेटही देण्यात येणार आहेत. रोटरी क्लब




ऑफ सोलापूरने २००७ साली तत्कालीन अध्यक्ष राज मिणियार यांच्या पुढाकारातून व आचार्य किशोरजी व्यास यांच्या प्रेरणेने अन्नपूर्णा योजनेची सुरुवात केली होती. प्रथम वर्षी 'सुगरण'च्या मीनाबेन शहा यांनी 'ना नफा ना तोटा' तत्वावर या अन्नपूर्णा योजनेसाठी स्वयंपाक करुन दिली. त्यानंतर मागील १६ वर्षे चंद्रिका चौहान यांच्या उद्योगवर्धिनी महिला बचत गटाच्या सहाय्याने दररोज शंभर वृद्धांसाठी स्वंयपाक करुन दिला जातो. मागील १७ वर्षात वर्षात या योजनेत एका दिवसाचाही खंड पडला नाही. प्रत्येक वृध्दाकडे घरपोच ताज्या व गरम जेवणाचा डबा अगदीवर वेळेवर पोहोचविला जातो. त्याचे श्रेय सेवाव्रती रिक्षाचालक शरणय्या हिरेमठ यांना दिले जाते. आजपर्यंत सुमारे ६२०५०० डबे, सुमारे १ कोटी ८० लाख पेक्षा अधिक खर्च या योजनेअंतर्गत केले गेले आहे. या योजनेसाठी रोटरी क्लबद्वारा एक विशेष समिती कार्यरत ओहती दैनंदिन व्यवहारकडे अत्यंत काटेकोरपणे लक्ष ठेवत असते. डाक विभागार्ते रोटरी क्लब सोलापूरच्या ७५ वर्षानिमित्ताने प्रसिध्द करण्यात आलेल्या विशेष टपाल पाकिटावर रोटरी अन्नपूर्णा योजनेस विशेष प्राधान्य देण्यात आले होते.



या संदर्भात रोटरी क्लबऑफ सोलापूरचे अध्यक्ष सीए सुनिल माहेश्वरी व या प्रकल्पाचे चेअरमन सुहास लाहोटी यांनी माहिती दिली. दररोजचे रुपये १३ द्या व वर्षाचे एकूण ४७६५ दिल्याने आपण एका वृध्दास दरराजचे अन्नदानाचे पुण्य मिळवा या युक्तिने सुरु केलेली या सेवाभावी योजनेसाठी सध्या प्रतिवर्षी सुमारे १२ लाखांचा खर्च होतो. हा खर्च भागविण्यासाठी एका वृध्दा व्यक्तीकरिता एका वर्षाच्या अन्नदानासाठी ८१०० रुपये इतक्या देणगीची योजना आखण्यात आली आहे. ही देणगी आयकर कलम ८० जी अन्वये वजावटीस पात्र आहे. या द्वारे उभारण्यात आलेल्या निधी 'रोटरी कम्युनिटी वेलफेर ट्रस्ट' च्या माध्यामातून याच योजनेसाठी वापरला जातो. समाजातील दानशूर व्यक्ती व संस्थानी ही योजना पुढे नेण्याठी व तिचा विस्तार करण्यासाठी आार्थिक सहयोग द्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

दररोज सुग्रास भोजन घरपोच देण्यासह लाभार्थी वृध्दांची आरोग्य तपासणी करुन गरजेप्रमाणे औषधे दिली जातात. त्यांना जेवणासाठी भांडे, कपडे तसेच चादरीही उपलब्ध करुन दिल्या आहेत. एवढेच नव्हेतर मानसिक शांती व विरंगुळा मिळवा म्हणून लाभार्थी वृध्दांना पंढरपूर,अक्कलकोट, तुळजापूर या धार्मिक ठिकाणी सहलीवर नेले जाते.एकादशीनिमित्त लाभार्थ्यांना उपवासावाचा मेनू देण्यात आला . यामध्ये भगर, साबुदाणा खिचडी. शेंगा अँटी असे पदार्थ देण्यात आले.या सेवाभावी रोटरी अन्नपूर्णा योजनेची दखल देशासह आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेण्यात आली असून रोटरी इंटरनॅशनलने या प्रकल्पाला सर्वोत्कृष्ट प्रकल्पाचा पुरस्कार दिला आहे. रोटरी अन्नपूर्णा योजनेच्या धर्तीवर इतरही अनेक सामाजिक संस्थांनी सोलापूर जिल्हयासह कराड, लातूर आदी ठिकाणी अशा प्रकारची योजना सुरु क़ेली आहे.

# यशासाठी कृतिशील प्रयत्नांची जोड आवश्यक



### पंकज जयस्वाल यांचे प्रतिपादन

### सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी केवळ स्वप्न न पाहता त्या स्वप्नांना कृतिशील प्रयत्नांची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन करियर मार्गदर्शक पंकज जयस्वाल यांनी केले.

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे बुधवारी विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यानिमित्त आयोजित व्याख्यानात त्यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे उद्घाटन पंकज जयस्वाल आणि सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजन करून झाले. याप्रसंगी व्यासपीठावर बँकेचे संचालक अ‍ॅड. प्रदीपसिंग राजपूत, पुरुषोत्तम उडता, जगदीश भुतडा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी उपस्थित होते.

सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे सोलापूर जनता सहकारी बँकेचे सभासद आणि सेवकांच्या इयत्ता दहावी आणि बारावीतील गुणवंत यांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे आणि संचालक मंडळाच्या हस्ते करण्यात आला. पंकज जयस्वाल म्हणाले, आधुनिक काळामध्ये विद्यार्थ्यांकडे ज्ञान आणि कौशल्य दोन्ही आवश्यक आहे. केवळ डॉक्टर, इंजिनियर बनणे म्हणजेच करिअर नाही. तर जे क्षेत्र निवडाल त्यात सर्वोत्तम उंची गाठणे महत्त्वाचे आहे. इतरांना दोष देणे, कारणे सांगणे किंवा तक्रारी करणे हा एक प्रकारचा विकार आहे. यातून बाहेर पडल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. विद्यार्थ्यांनी आपली आवड पाहून करिअरचे क्षेत्र निवडावे. त्यात त्यांना हजारो संधी उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करावा.

बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय गाठण्यासाठी मेहनत घ्यावी. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात त्यांना शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करून देऊन सोलापूर जनता सहकारी बँक त्यांच्या पाठीशी कायम खंबीरपणे उभी राहील, अशी ग्वाहीदेखील श्री. पेंडसे यांनी याप्रसंगी दिली. विनायक कुरापाटी यांनी परिचय करून दिला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुकुंद कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सुमित श्रोत्री यांनी सूत्रसंचालन केले. सुहास कमलापुरकर यांनी आभार मानले.

# हजारो बहिणींनी मानले देवेंद्र कोठे यांचे आभार

### १९५१ नागरिकांनी घेतला लाभ

### महासेवा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते देवेंद्र कोठे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या महासेवा शिबिराला हजारो नागरिकांनी भेट देऊन विविध योजनांचा लाभ घेतला. हा उपक्रम आयोजित केल्याबद्दल हजारो बहिणींनी देवेंद्र कोठे यांचे आभार मानले.

बुधवारी सात रस्ता परिसरातील उपलप मंगल कार्यालयात महासेवा शिबिर आयोजित करण्यात आले होते. सकाळपासून सायंकाळपर्यंत हजारो नागरिकांनी महासेवा शिबिराला भेट दिली. युवा नेते देवेंद्र कोठे आणि त्यांचे सहकारी दिवसभर महासेवा शिबिरामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांना मार्गदर्शन आणि सहकार्य करत होते. या महासेवा शिबिरामध्ये मतदार नोंदणी आणि मतदान कार्ड दुरुस्ती, आधार नोंदणी आणि दुरुस्ती, आयुष्यमान भारत



कार्ड, ई श्रम कार्ड, रेशन कार्ड नोंदणी आणि दुरुस्ती करण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय प्रक्रिया करण्यात आल्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना संदर्भातील अर्ज भरून घेण्यात आले. दिवसभरामध्ये हजारो नागरिकांनी महासेवा शिबिरात येऊन विविध शासकीय योजनांचा लाभ घेतला.

भारतीय जनता पार्टी सर्व पदाधिकारी सदस्य त्याचबरोबर विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या अथक परिश्रमातून हे शिबिर यशस्वी संपन्न झाले. या शिबिरामध्ये माजी महापौर श्रीकांचना यन्नम,भारतीय जनता पार्टीचे लोकसभा प्रमुख किशोरजी देशपांडे, ज्येष्ठ नेते रामभाऊ तडवळकर सरचिटणीस विशाल गायकवाड, रोहिणी तडवळकर नगरसेविका मीनाक्षी कंपली, मंडल अध्यक्ष संतोष कदम,चिटणीस नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, उद्योग आघाडीचे अध्यक्ष अंबादास बिंगी यांनी या शिबिरास भेट दिली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडल अध्यक्ष संतोष कदम अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष मारेप्पा कंपली, सरचिटणीस अनंत गोडलोलू, प्रभाग १६ मधील सुनील घोरपडे , वासुदेव राक्षे, विजय जाधव, तानाजी काटकर, दत्ता गरड, गणेश कदम, अभय कांती, अनुपम संगमवार, दत्तात्रय देशमुख, परशुराम शेजराव,सन्मित काटकर यांनी भेट दिली विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानचे सदस्य सिद्धेश्वर कमटम,पवन खांडेकर,अश्विन कोडम,शैलेश कडदास,गणेश बत्तुल,अमन दुबास, उदय कनकी, विक्रम कमली,सोमेश येलगेटी,बंटी कटकम,अमोल कोंड्याल, त्रिमूर्ती बल्ला, यांनी परिश्रम घेतले.

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे ४ आणि ५ ऑगस्ट रोजी सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे हे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवार दिनांक ४ ऑगस्ट रोजी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे हे दिनांक ४ ऑगस्ट रविवार रोजी सोलापूर येथे येणार असून सोलापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम आहे.सोमवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्ह्यातील ११विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर सायंकाळी तुळजापूर मार्गे धाराशिव येथे जाणार आहेत.




## जेऊर बसस्थानक पुनर्बांधणी कामाचे भूमिपूजन

### आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांची उपस्थिती; अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १ ऑगस्ट-**

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या माध्यमातून व माजी आ. नारायणआबा पाटील यांच्या प्रयत्नातून जेऊर बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी ३ कोटी ४२ लाख एवढा निधी उपलब्ध झाला आहे. याचे भूमिपूजन करण्यात आले.

या परिसरातील लोकांशी विचारविनिमय करुन बसस्थानकाचे मॉडेल योग्य पद्धतीने बनवण्यासंदर्भात आ. रणजितसिंह यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या. आ. रणजितसिंह यांनी या कामासाठी १९ जून २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकांना पत्र देऊन जेऊर, टेंभुर्णी व करकंब या तीन ठिकाणच्या बसस्थानकांच्या पुनर्बांधणी व आद्ययावतीकरणासाठी प्रत्येकी २ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्यानुसार सर्व प्रशासकीय मंजुरी मिळून जेऊर व टेंभुर्णी बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व नूतनीकरणसाठी निधी उपलब्ध झाला आहे. त्यानुसार जेऊर बसस्थानकाच्या पुनर्बंधनीसाठी ३ कोटी ४२ लाख रुपयांच्या प्रशासकीय मान्यतेस ३१ मे २०२४ रोजी मंजुरी मिळाली आहे. त्याप्रमाणे या कामाचे भूमिपूजन जेऊर बसस्थानक येथे करण्यात आले. या निधीतून जेऊर बसस्थानकास नवीन इमारत, वॉल कम्पाउंड, पेव्हर ब्लॉक, वीज व सांडपाणी व्यवस्था ही कामे केली जाणार आहेत. यावेळी माजी जि. प. सदस्या सविताराजे भोसले, नवनाथ झोळ, प. स. माजी सभापती अतुल पाटील, शेखर गाडे, शहाजीराव देशमुख, अदिनाथचे प्रशासकीय संचालक डॉ. वसंत पुंडे, दीपक देशमुख, देवानंद बागल, माजी जि. प. सदस्य बिभिषण आवटे, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील यांच्यासह परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

> माढ्यातून टेंभुर्णी, करकंब बस्थानकासह करमाळ्यातून जेऊरच्या बसस्थानकासाठी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी आम्हाला विचारणा केली होती, त्यानुसार आम्ही जेऊर बसस्थानक नूतनीकरण अत्यंत गरजेचे आहे. त्यानुसार जेऊर बसस्थानकासाठी निधी उपलब्ध झाला आहे.
>
> **-नारायण पाटील, माजी आमदार, करमाळा**

## स्वातंत्र्य दिन मॅरेथॉनची ऑनलाईन नोंदणी दहा ऑगस्टपर्यंत

### पोलीस आयुक्त एम. राजकुमार व अप्पर जिल्हाअधिकारी मोनिका सिंह ठाकूर व खासदार ओमराजे निंबाळकर धावणार

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

चॅलेंजर रनर फौंडेशनच्या वतीने ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त १७ व १८ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेत विविध क्षेत्रातील मान्यवर धावणार आहेत. पोलीस आयुक्त एम. राजकुमार व अप्पर जिल्हाअधिकारी मोनिका सिंह ठाकूर या २२ किलोमीटर धावणार आहेत. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर देखील २२ किमी साठी सहभाग घेतला आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अतिश शहा आणि चंद्रशेखर गायकवाड यांनी दिली आहे.




चॅलेंजर रनर फौंडेशन आयोजित सपोर्ट बाय बिग फिटनेस जिम यांच्या संयुक्त विद्यमानाने लांब पल्ल्याच्या धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या मॅरेथॉनचे माने देशमुख जय हिंद ग्रुप हे प्रायोजक असून इंद्रधनु आपटे सह प्रायोजक आहेत. ३३ आणि ७७ किलोमीटरची सुरुवात १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता सोनी कॉलेज विजापूर रोड येथून होईल. १८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेपाच वाजता २२ किलोमीटर तसेच दहा किलोमीटर सुरुवात होईल. त्यानंतर चार किलोमीटर फन रनची सुरुवात होईल सहभागी होणाऱ्या खेळाडूंना टी-शर्ट, मेडल, बीब, इ- सर्टिफिकेट आणि ब्रेकफास्ट देण्यात येईल.

अल्ट्रा मॅरॅथॉन आयोजन करण्याचे हे तिसरे वर्ष आहे. १८ ते ३५, ३६ ते ५० व ५१ वर्षे पुढे अशा वयोगटात स्पर्धा होणार आहेत. महाराष्ट्र इतर राज्यातील स्पर्धक सहभागी होणार आहेत. टाईमिंग चिप लावून वेळ मोजले जाईल. आणि जवळपास एक लाख ७२ हजाराचे बक्षीस ठेवली आहेत. स्वातंत्र्य भारताला ७७ वर्ष पूर्ण होणार असून ७७ कीलोमीटर धावून पूर्ण करने असे ह्या स्पर्धेचे विशेष आहे. सोलापुरात अनोखा असा इव्हेंट होत आहे तरी किमान फन रन मध्ये सहभागी होऊन आपणसर्व फिटनेस कडे वळूया आणि देशभक्तीचा जागर करूया, असे आवाहन चॅलेंजर रनर फौंडेशनने केले आहे. सहभागासाठी (९४०५४०६७६३ अथवा ९१७५८२८२०३) या मोबाईलवर संपर्क साधावा.

# निधीमुळे महाराष्ट्राच्या विकासाचा वेग वाढला

## भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये : अर्थसंकल्पातील ७६ हजार कोटींची तरतूद ही महाराष्ट्राला देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**




केवळ राजकीय स्वार्थासाठी फेक नॅरेटिव्ह फैलावून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याच्या एक कलमी कार्यक्रमातूनच केंद्रीय अर्थसंकल्पाविषयी गैरसमज पसरविण्याचा विरोधकांचा डाव असला तरी जनतेने आणि अर्थक्षेत्राने या अर्थसंकल्पाचे भरघोस स्वागत केले आहे. महाराष्ट्राला भरघोस निधी देणाऱ्या या अर्थसंकल्पामुळे महाराष्ट्राच्या विकासाचा संकल्प गतिमान होणार आहे, असा निर्वाळा प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज (दि. १) सोलापुरात आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

दरम्यान, महाराष्ट्राला मिळालेल्या भरघोस निधीचा थांगपत्ताच न लागल्यामुळे विरोधकांनी सुरू केलेल्या गदारोळास अर्थमंत्री निर्मला सीतारमन, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी चोख उत्तर दिले आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी उपाध्ये यांनी अर्थसंकल्प कसा समजून घ्यावा याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले पुस्तक विरोधकांनी नक्की वाचावे; असा खोचक सल्ला उपाध्ये यांनी विरोधकांना दिला. या अर्थसंकल्पात महाराष्ट्राकरिता असलेल्या विविध प्रस्ताव आणि निधी वितरणाबाबत माहिती देताना ते म्हणाले, देशातील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या आणि जगातील अत्यंत महत्वाच्या बंदरांमध्ये एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाढवण बंदराच्या उभारणीकरिता अर्थसंकल्पात करण्यात आलेली ७६ हजार कोटींची तरतूद ही महाराष्ट्राला मोठी देणगी आहे, तर विदर्भ आणि मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पांसाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत ६०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे, महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांना जोडणाऱ्या मुंबई-दिल्ली औद्योगिक कॉरिडॉरसाठी ४९९ कोटी, बंगळुरू-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरसाठी ४६६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

नागपूरची जीवनवाहिनी असलेल्या नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी केंद्र सरकारने ५०० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. मुंबई, पुणे येथील मेट्रो प्रकल्पांकरिता २५८४ कोटींची तरतूद करण्यात आली असून, मुंबई मेट्रो प्रकल्पाकरिता एक हजार ८७ कोटी, नागपूर मेट्रोकरिता ६८३ कोटी तर पुणे मेट्रोकरिता ८१४ कोटी रुपये देण्यात आले आहेत. मुंबईच्या विकासात महत्वाचा ठरलेल्या एमयूटीपी-३ प्रकल्पाकरिता ९०८ कोटींच्या निधीमुळे उपनगरी रेल्वेसेवेचा दर्जा अधिक उंचावेल, तर महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता १५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. रेल्वे विकासाच्या महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी १५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने या अर्थसंकल्पाच्या रूपाने वाटचाल सुरु झाली आहे, असा विश्वासही श्री. उपाध्ये यांनी व्यक्त केला. देशभरात उभारल्या जाणाऱ्या १२ इंडस्ट्रियल पार्क प्रकल्पांमध्ये राज्यातील दिघी येथे उभ्या राहणाऱ्या इंडस्ट्रिअल पार्कचाही समावेश आहे, अशी माहितीही त्यांनी आवर्जून दिली. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सुरात सूर मिसळणे हे इंडीया आघाडीची असहाय्यता असल्याने केंद्रीय अर्थसंकल्पावर टीका करणे त्यांचा भाग आहे, अशी खोचट टिप्पणी करून, विरोधकांनी आता तरी अर्थसंकल्प समजून घेतला असेल तर विकासाच्या मुद्द्यावर राजकारण करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

या पत्रकार परिषदेस माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, सरचिटणीस रोहिणी तडवळकर, विशाल गायकवाड, डॉ. नारायण बनसोडे, शहर उपाध्यक्ष जय साळुंखे, कार्यालय प्रभारी अनिल कंदलगी आदी उपस्थित होते.

## स्वयंम शिक्षा फाउंडेशनतर्फे आज महिला आत्मसन्मान मेळावा

### स्वयंम महिलारत्न सन्मान पुरस्काराचे वितरण

### 'मी उद्योजिका होणारच' यावर तज्ज्ञांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

श्रावण मास शुभारंभ निमित्त स्वयंम शिक्षा फौंडेशन, द्वारकधीश महिला मंडळ व जिजाऊ महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २ ऑगस्ट सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत द्वारकधीश मंदिर सभागृह, मंत्री चंडक जवळ, विजयपूर रोड सोलापूर येथे संस्थापक ॲड. सोमनाथ (सोमेश)वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आत्मसन्मान मेळावा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती समन्वयक काशिनाथ भतगुणकी आणि दत्तात्रय पाठक यांनी माहिती दिली.

युवती व महिला सक्षमीकरणासाठी आयोजित केलेल्या या मेळाव्याचे स्वागताध्यक्ष स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे अध्यक्ष सोमनाथ (सोमेश) वैद्य हे राहणार आहेत. जुळे सोलापूरमधील युवती व महिलांना (इयत्ता ५ वी ते पदवीधर) रोजगाराची संधी देण्यासाठी मुलाखतीतून निवड करण्यात येणार आहे. महिलांनी छोटं उद्योग सुरू सहकार्य करण्यासाठी मी उद्योजिका होणारच यावर तज्ज्ञांशी संवाद कार्यक्रम होणार आहे.

शासनाच्या विविध योजना माहिती आणि आरोग्याबाबत काळजी यावर तज्ञ व डॉक्टर सल्ला, मार्गदर्शन होणार आहे. या मेळाव्यात सामाजिक, शैक्षणिक, शेती, बचत गट, उद्योग, वैद्यकीय, भजनी मंडळ यासह विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचा स्वयं महिला रत्न सन्मान पुरस्काराने सन्मानचिन्ह व भेट वस्तू देऊन गौरव करण्यात येणार आहे. इंचगिरी मठाच्या मठाधिपती पुष्पलता माताजी यांच्या दिव्य सानिध्यात आणि लेखिका प्राचार्य डॉ. श्रुतिश्री वडकबाळकर व डॉ. जयश्री मेहता यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. नसीम पठाण, स्त्रीरोग तज्ञ डॉ. विद्या कोळी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी डॉ. वडकबाळकर, शिक्षणतज्ज्ञ सायली जोशी, स्त्रीरोग तज्ञ डॉ. विद्या कोळी, उद्योजिका सुनंदा व्हटकर, सरपंच ज्योती कुलकर्णी, बचत गट संचालिका अंबिका गुरव, प्रियदर्शिनी उद्योग समूहाच्या वनिता तंबाके, शिलाई महिला मंचच्या कस्तुरी पाटील, निवेदिका पल्लवी पवार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहितीसाठी ७२१९०९९९५५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

> **बचत गटातील महिलांनी बनविलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन**
>
> बचत गटातील महिलांनी बनविलेल्या खाद्य पदार्थ आणि विविध वस्तूंच्या विक्रीसाठी भव्य प्रदर्शन भरविण्यात येत आहे. खास महिलांसाठी श्रीमंत मी-सक्षम मी हा प्रेरणा संवाद संवाद कार्यक्रम होणार आहे.स्टार्ट अप स्पर्धा घेण्यात येत असून यामध्ये उत्कृष्ट उद्योग संकल्पना सादर करणाऱ्यांना बक्षीस मिळणार आहे.

## देवनंदीजी महाराज जयंती;११ ऑगस्टला विविध स्पर्धा

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ व प्रज्ञाश्रमण दि.जैन जनकल्याण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाश्रमण सारस्वताचार्य ३०८ श्रीदेवनंदीजी महाराजाच्या जन्मजयंतीनिमित्त रविवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी ९ पासून विविध स्पर्धेचे आयोजन केले आहे. श्री. नवलबाई फुलचंद कोठारी हायस्कूल शिवगंगा नगर-५ कुमठा नाका येथे ही स्पर्धा आठ गटात होईले. इच्छुकांनी स्पर्धकांची यादी शाळेत जमा करावी, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष सुर्यकांत शहा व सचिव अजितनाथ उपाध्ये यांनी केले आहे. गट क्र.१ बालवाडी गटलहान आणि मोठा रंगभरण, गट क्र.-२ लहान आणि मोठा गटपाठांतर, गट क्र. ३ इयत्ता १लीते २ री पाठांतरस्पर्धा, गटक्र. ४ इयत्ता ३ री ते ४ थी पाठांतरस्पर्धा, गटक्र ५ इयत्ता ५ वीते ६ वी पाठांतर स्पर्धा. गट क्र.६ इयत्ता ७ वी व ८वी कथाकथन स्पर्धा गट क्र -७ इयत्ता ९वी व १० ववक्तृत्व स्पर्धा गट क्र ८ खुलागट वक्तृत्व स्पर्धा असे एकूण आठ गटांत या स्पर्धा घेण्यात येईल. प्रत्येक गटातून एकूण पाच विजेते स्पर्धक निवडून या विजेत्या स्पर्धकांना रोखबक्षीस सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येईल.

## शासकीयस्तरावर इतिहासात प्रथमच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्या नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.१ ऑगस्ट -**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुक्रवार दि. २ ऑगस्ट रोजी मुंबईतील त्यांच्या वर्षा निवासस्थानी इतिहासात प्रथमच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा ६७४ वा संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात येणार असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

भिसे म्हणाले, पालखी सोहळा पत्रकार संघ आणि भागवत धर्म प्रसारक मंडळ महाराष्ट्र राज्य सह महाराष्ट्रातील विविध नामदेव शिंपी समाज संघटनांनी मुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन दिले होते. याची दखल घेत इतिहासात प्रथमच शासकीयस्तरावर संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा साजरा होत आहे. या सोहळ्यास पंजाब प्रांतातील श्री नामदेव दरबार कमिटीचे विश्वस्थ तसेच महाराष्ट्रातील पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना व राज्यातील विविध नामदेव शिंपी समाज संघटनाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. संत नामदेव महाराज हे भागवत धर्माचे आद्य प्रचारक आहेत. संत ज्ञानदेव व नामदेवांनी उत्तर भारत परिक्रमा करुन भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला आहे. संत नामदेवांचे जन्मस्थान श्री क्षेत्र पंढरपूर आहे तर श्री क्षेत्र घुमाण व श्री क्षेत्र पंढरपूर या दोन्ही ठिकाणी त्यांची समाधी आहे. उद्या दुपारी १२ वाजता श्री क्षेत्र पंढरपूर येथे संत नामदेव महाराजांचा संजीवन समाधी सोहळा नामदास वाडा व नामदेव पायरी येथे साजरा होत आहे .










हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● निवासी संपादक : प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Resident Editor Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# 'हमारी सियासी पहचान' पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

## मान्यवरांचा जीवनगौरव पुरस्काराने होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

जिवो और जीने दो या पाक्षिकाच्या वर्धापन दिनानिमित्त शनिवार ३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे 'हमारी सियासी पहचान' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा होणार आहे, अशी माहिती एस. एम. इरफान यांनी पत्रकार परिषदेत दिली. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री अझहर हुसेन, माजी पोलीस उपायुक्त ईसहाक बागवान, इस्लाम जिमखानाचे अध्यक्ष माजी आ. ॲड. युसुफ अबराहनी आदी उपस्थित राहणार आहेत. देश स्वातंत्र्य झाल्यापासून ते आजपर्यंत महाराष्ट्रातील ग्रामपंचायत ते लोकसभेपर्यंत निवडून आलेल्या मुस्लिम सदस्यांची माहिती या पुस्तकात समाविष्ट आहे. यावेळी माजी आ. नरसय्या आडम, डॉ. श्रीमंत कोकाटे, डॉ. करीम सालार, बेगम आबेदा इनामदार, हाजी सय्यद सलीम, हाजी अ. जब्बार, हाजी नसीरअहमद खलिफा आदी मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल. राज्यातील सामाजिक कार्यकर्त्यांना 'फखरे मिल्लत' या पुरस्काराने गौरविण्यात येईल. जिवो मित्र पुरस्कारही प्रदान करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह व नॅपकिन बुके असे या पुरस्काराच्या स्वरूप आहे. या पत्रकार परिषदेस हसीब नदाफ, रफिक खान, सय्यद गुफरान आदी उपस्थित होते.

## क्राईम वृत्त...



### कल्याण नगरात चैन स्नॅचिंग

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट -**

पायी जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील २० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने धूम स्टाईलने जबरदस्तीने चोरून नेले. याबाबत कविता अशोक यमगवळी (वय ३०, रा. कल्याण नगर भाग २, दलवाई यांच्या घराजवळ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कविता यमगवळी या मंगळवारी सकाळी १०च्या सुमारास दलवाई यांच्या घराजवळून पायी चालत जात होत्या. त्यावेळी पाठीमागून एका दुचाकीवरून आलेल्या चोरट्याने यमगवळी यांच्या गळ्यातील मणिमंगळसूत्र जबरदस्तीने चोरून नेले. पोलिस उपनिरीक्षक पोपळभट पुढील तपास करीत आहेत.

### दारू पिऊन येऊन पत्नीला कात्रीने मारहाण

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

विनाकारण घरी दारू पिऊन येऊन हातातील कात्रीने पतीने-पत्नीस मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी पतीविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




ही घटना २७ जुलै रोजी दुपारी सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास कमला नगर येथे घडली.याप्रकरणी इशरत अजीज शेख (वय-२७,रा.कमला नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अजीज हफिज शेख (रा. कमला नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई बनकर हे करीत आहेत.

### कन्ट्रक्शन साईटवरून ४८ हजारांचे साहित्य पळवले

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

दोघे अज्ञात चोरट्यांनी बिगर नंबर प्लेट असलेली दुचाकी घेऊन कंट्रक्शन साईटवर बेकायदेशीर रित्या प्रवेश करून ४८ हजार रुपये किमतीचे तेथील साहित्य चोरून नेल्याची घटना ३१ जुलै रोजी सकाळी १०.५० सुमारास एस.व्ही. स्मार्ट सिटी धनलक्ष्मी नगर येथे घडली.याप्रकरणी ऋषिकेश जितेंद्र नाईक (वय-२४, रा.अशोक नगर, विजापूर रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दोन चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पाटील हे करीत आहे.



### संगमेश्वर कॉलेजसमोर अपघात; चालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

संगमेश्वर कॉलेज समोर दुचाकी आणि छोटा हत्ती वाहनाचा अपघात झाल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २८ जुलै रोजी सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी संगीता छगन बोबडे (वय-५४,रा.मोदीखाना) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी या त्यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीवी.८७२९ यावरून बीएसएनएल ऑफिस जवळून रिमांड होमकडे जात असताना एक छोटा हत्ती वाहन क्रमांक एमएच.१३.डीक्यू.२६७५ यातील वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व हयगयीने चालून मागून येऊन फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक देऊन जखमी करण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इप्पलपल्ली हे करीत आहेत.

# सामाजिक उपक्रमांनी लोकनेते बाबुरावअण्णा पाटील-अनगरकर यांना अभिवादन

## वरिष्ठ शास्त्रज्ञ अशोक नगरकर यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १ ऑगस्ट**

तुम्हाला प्रश्न पडले पाहिजेत.योग्य प्रश्नातून विज्ञानाचे विविध शोध लागतात त्यासाठी प्रश्न विचारा, स्वप्न पहा आणि त्या स्वप्नांच्या पूर्तीसाठी सतत प्रयत्न करत रहा असे आवाहन डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या सोबत काम केलेले डीआरडीओ चे निवृत्त संचालक डॉ. अशोक नगरकर यांनी केले.

अनगर येथे (स्व. ) लोकनेते बाबुराव अण्णा पाटील अनगरकर यांची जयंती विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी डॉ. नगरकर बोलत होते. प्रारंभी लोकनेते बाबुराव अण्णा पाटील, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य चंद्रकांत ढोले अध्यक्षस्थानी होते. यावेळी जयंती निमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व निबंध, हस्ताक्षर,धावणे आदी स्पर्धेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. या प्रसंगी आर्थिक दृष्ट्या मागास व होतकरू विद्यार्थ्यांना लोकनेते शिष्यवृत्ती चे वाटप करण्यात आले. गरीब विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले. वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.आविष्कार या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी माजी आमदार राजन पाटील, लोकनेते साखर कारखान्याचे चेअरमन बाळराजे पाटील व सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### ५५० जणांचे रक्तदान

अनगरच्या शिवाजी चौकात नगरपंचायत कार्यालयात लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी तालुक्यासह जिल्ह्यातून कार्यकर्त्यांनी अण्णांना आदरांजली व्यक्त करण्यासाठी हजेरी लावली. यावेळी अश्विनी ब्लड बँक सोलापूरच्या सहकार्याने भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले होते ५५०कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.

# अभिजित पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## पंढरपूरसह माढा, मंगळवेढा मतदारसंघात विविध उपक्रम

## शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा राजवाडा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिताभ पाटील यांचे ३९ व्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम तसेच पंढरपूर सह माढा, मंगळवेढा मतदारसंघात समाज उपयोगी कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला.

पंढरपूर तालुक्यातील नव्हे तर मंगळवेढा, माढा या भागातील सर्वसामान्य जनतेशी नेहमीच आपलेपणाने वागत असल्याने त्यांची तरुणांमध्ये क्रेझ निर्माण झाली असून भावी आमदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असले तरीही त्यांच्या नेतृत्वावर अनेक जण आकर्षिले जात असल्याचे पाहायला मिळते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य कुस्तीचे मैदान, भव्य रक्तदान शिबिर, पर्यावरण पूरक वृक्षारोपण, महाआरोग्य शिबिर, नेत्र तपासणी शिबिर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.सकाळी विठ्ठलाच्या महापुजेनंतर

श्री संत नामदेव पायरी येथे महाआरती करण्यात आली.त्यानंतर टेंभुर्णी कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा घेऊन अरण येथील श्री संत सावता माळी मंदिराचे दर्शन घेतले.तर माढा येथील माढेश्वरी मंदिराचे दर्शन घेऊन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर औदुंबर अण्णा पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मंगळवेढा येथील संत दामाजी पंत मंदिर, संत चोखामेळा समाधी, पिर साहेब दर्गा येथे दर्शन घेतले.



### दोन-तीन महिन्यात नावापुढे आमदार असेल : अभिजित पाटील

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित पंढरपूर, मंगळवेढा, माढा या तीन तालुक्यात कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करीत 'जनतेच्या मनातील भावी आमदार' असे बॅनर लागले आहेत.याबद्दल विचारले असता ते म्हणाले ,ते कार्यकर्त्यांचे माझ्यावरील प्रेम असून येणाऱ्या दोन तीन महिन्यात आपल्या नावापुढे आमदार लिहिलेले असेल, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत अभिजीत पाटील निवडणूकीच्या मैदानात उतरणार असल्याचे निश्चित झाले आहे.

### विठ्ठलाचा घेतला आशिर्वाद

वाढदिवसाचे औचित्य साधून विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सहकुटुंब जाऊन विठ्ठलाची महापूजा केली. यानंतर संत नामदेव पायचे येथे आयोजित महाअरती कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना पाटील म्हणाले, राज्यातील शेतकरी व विठ्ठल कारखान्याचे सभासद यांना चांगले दिवस येऊ देत. राज्यात भरपूर पाऊस पडून शेतकरी तुजलाम सुफलाम होऊ देत असे साकडे विठ्ठलाच्या चरणी घालून आशिर्वाद घेतला तर पंढरपूर, मंगळवेढा व माढा या तीन तालुक्यातील कार्यकत्यांनी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामुळे या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी आपण जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.गेल्या काही वर्षापासून आपण या तीन तालुक्यातील शेतकरी सभासदांसाठी विविध कामे केले आहेत यामुळे त्यांच्यातून समाधान व्यक्त होत असल्याचे पाटील यांनी सांगितले.

# प्रिसिजनचे संस्थापक स्व. सुभाष रावजी शहा यांचे उद्योग क्षेत्रातील काम उल्लेखनीय : डॉ. प्रधान

## रक्तदान शिबीरात ७० कर्मचाऱ्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

प्रिसिजनचे संस्थापक चेअरमन तथा सोलापुरातील ज्येष्ठ उद्योगपती सुभाष रावजी शहा यांच्या १३ व्या पुण्यतिथी निमित्त आज १ ऑगस्ट २०२४ रोजी प्रिसिजन कंपनीमध्ये रक्तदान शिबिराचे उद्धघाटन गोपाबाई दमाणी



ब्लड सेंटरचे चेअरमन डॉ राजीव प्रधान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ७० कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून तर इतर कर्मचाऱ्यांनी कंपनी मध्ये संपूर्ण उत्पादन प्रक्रिया बंद करून १ मिनिट स्तब्ध राहून संस्थापक चेअरमन यांना अभिवादन केले.

सुभाष रावजी शहा हे सोलापूरच्या सामाजिक व उद्योग क्षेत्रात रमलेले व्यक्तीमत्व, १९६५ साली सुभाष शहा यांनी आपले भाऊ विमलकुमार शहा यांच्या सोबतीने होटगी रोडवरील चेतन फौंड्री सुरू केली होती. 'प्रिसिजन'च्या स्थापनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीतील प्रिसिजनचे दोन्ही युनिट सुभाष शहा यांच्याच मार्गदर्शनाखाली सुरू झाले होते. स्व सुभाष रावजी शहा यांचे उद्योग क्षेत्रातील काम उल्लेखनीय आहे व सोलापूरकरांच्या उन्नतीसाठी त्यांचे योगदान मोठे होते असे डॉ प्रधान यांनी मनोगत व्यक्त केल्या. त्यावेळी कपंनीचे संचालक रवींद्र जोशी, सीईओ श्री अनितपाल सिंह व राजकुमार काशीद (एचआर जनरल मॅनेजर) पारितोष खेर, सुहास पाटील, सिद्धेश्वर चंदनशिवे, डॉ. सुरेश जयदीप व दमाणी ब्लड बँकचे कर्मचारी उपस्थिती होते. स्व सुभाष रावजी शहा हे प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा यांचे ते वडिल होते. प्रिसिजनच्या उभारणीमध्ये आणि नंतरच्या वाटचालीत यतिन शहांना खऱ्या अर्थाने मार्गदर्शन आणि मानसिक पाठबळ मिळाले ते सुभाष शहा यांच्याकडूनच. आज त्यांची १३ वि पुण्यतिथी निमित्त दुपारी ठीक १२ वाजता संपूर्ण उत्पादन प्रक्रिया बंद करून सर्व कर्मचाऱ्यांनी १ मिनिट स्तब्ध राहून संस्थापक चेअरमन यांना अभिवादन केले. कपंनीमधील सर्व फौंड्री व मशीन शॉप मधील कर्मचाऱ्यांनी काम करण्याच्या ठिकाणी उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली. अक्कलकोट रोड मधील दोन्ही युनिट मध्ये स्वर्गीय सुभाष रावजी शहा यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली देण्यात आली.



# जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने काळ्या फिती लावून कामकाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने जुनी पेन्शन, वेतन त्रुटी व राज्यातील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या शासन स्तरावरील प्रलंबित मागणीकडे शासनाचे विशेषता ग्रामविकास विभागाचे हेतूता दुर्लक्ष होत असल्याबद्दल कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी असल्याने आंदोलनाची सुरुवात म्हणून गुरुवारी जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर कर्मचाऱ्यांना काळ्या फिती लावून कामकाज केले.

सर्वात महत्त्वाची मागणी जुनी पेन्शन योजना याकडे तीन महिन्यापूर्वी शासनाने आश्वासन देऊनही अद्याप या योजनेला मूर्त स्वरूप दिलेले नाही त्याचबरोबर वेतन त्रुटी अत्यंत जिव्हाळ्याचा जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची ही मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे त्याचबरोबर लिपिकांची पदोन्नतस्तर कमी करणे, सुधारित कर्मचारी आकृतीबंध, पदोन्नतीने रिक्त पदे भरणे, परिचर, वाहन चालक सेवा भरती नियमात दुरुस्ती करणे, अनुकंपामध्ये टक्केवारी वाढवणे, महाराष्ट्र विकास सेवा श्रेणी नियमात दुरुस्ती करावी, परिचर वाहन चालक यांच्या गणवेश धूलाई भता वाढवून द्यावा अशा साधारण ३० प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्यभर काळ्या फिती लावून जिल्हा परिषद कर्मचारी कामकाज करीत आहेत. या आंदोलनात जिल्हा परिषदेतील व पंचायत समिती स्तरावरील सर्व कर्मचारी यांनी आंदोलनात अग्रभागाने सहभाग नोंदवला. आंदोलनानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांना याविषयी निवेदन देण्यात आले.शासनाने याबाबतीत याची दखल घेतली नाही तर नऊ ऑगस्ट क्रांती दिनादिवशी दुपारी दीड ते दोन या कालावधीमध्ये निदर्शने कार्यक्रम राज्यभर जिल्हा परिषद व पंचायत समितीसमोर आयोजित केले आहे. त्यानंतर ही शासनाने दखल न घेतल्यास याबाबत बेमुदत संपाची हाक दिली जाणार आहे.

या आंदोलनात जिल्हा परिषद कर्मचारी युनियन राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, विभागीय संघटक डॉ. एस. पी. माने, जिल्हाध्यक्ष तजमुल मुतवली, कार्याध्यक्ष बसवराज दिंडोरी, सचिव विलास मसलकर, श्रीशैल देशमुख, महिला कार्याध्यक्ष स्वाती स्वामी आदी प्रमुख कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# काँग्रेसने लढवलेली शक्कल येत आहे कामी!

## उत्तर, मध्य अन् 'दक्षिण'साठी दहा ते वीस हजार फिक्स डिपॉझिट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्यावतीने नव्या पद्धतीने अधिकृत उमेदवारी अर्जाची विक्री सुरू आहे. या अर्जाच्या विक्रीतून काँग्रेस कमिटीला आता चांगला दाम मिळत आहे. अर्ज सादर करण्यासाठी काँग्रेस भवनमध्ये इच्छुकांची भाऊ गर्दी वाढत आहे. शहर उत्तर मध्य आणि दक्षिण या तीनही विधानसभेच्या जागेसाठी अनेकांनी निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याची मोट बांधण्यास सुरुवात केलेली दिसत आहे.

दरम्यान काँग्रेस पक्षाच्या वतीने यंदाच्या वर्षी सोलापूर शहर जिल्ह्यातील ११ विधानसभा जागेसाठी इच्छुकांची यादी मागवली आहे. काँग्रेस पक्षाचा पदाधिकारी आमदारकीची निवडणूक लढवण्यासाठी काँग्रेसकडून इच्छुक आहे. त्यांनी सर्वसाधारण खुला किंवा राखीव मतदारसंघासाठी प्रती अर्ज वीस हजार आणि दहा हजार रुपये शुल्क भरून अर्ज सादर करावयाचा आहे. अर्ज सादर करण्यावेळेसच सदरचे शुल्क काँग्रेस कमिटी आणि संबंधित मतदार संघानुसार शहर अध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष यांच्याकडे सुपूर्द करावयाचा आहे. त्यानुसार '' शहर उत्तर ''शहर मध्य'' आणि'' शहर दक्षिण'' या शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघासाठी अनेक इच्छुकांनी मैदानात उतरण्याचा निश्चय केला आहे.

इच्छुकांची वाढलेली भाऊगर्दी लक्षात घेता प्रत्येक इच्छुक उमेदवारांनी वीस हजार आणि दहा रुपये काँग्रेस कमिटीकडे जमा केल्याने काँग्रेस कमिटीच्या तिजोरीत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे काँग्रेसने लढवलेली शक्कल खरोखरच कामी येत आहे. अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापकपदी मनोज श्रोत्री

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.१ ऑगस्ट -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या व्यवस्थापक पदाचा कार्यभार पंढरपूर तहसिल कार्यालयातील निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांच्याकडे देण्यात आला आहे.



राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्यावतीने नायब तहसिलदार संवर्गातील अधिकार्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यानुसार मनोज श्रोत्री यांच्याकडे श्री मंदिरातील व्यवस्थापकाचा कार्यभार देण्यात आला आहे.

मनोज श्रोत्री हे १९९५ ला महसूल शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. त्यांनी महसूल विभागात विविध पदावर कामकाज केलेले आहे. २०१६ पासून पंढरपूर व मंगळवेढा प्रांत कार्यालय येथे नायब तहसीलदार म्हणून कामकाज पाहिले आहे. तसेच निवासी नायब तहसीलदार म्हणून तहसील कार्यालय पंढरपूर येथे कामकाज पाहिले आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांची माढा तहसिल कार्यालय येथे नायब तहसिलदार येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी निवासी नायब तहसिलदार मनोज श्रोत्री यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गुरुवार दि.१ ऑगस्ट पासून श्रोत्री यांची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक म्हणून नियुक्तीचे आदेश दिले आहेत. श्रोत्री यांनी व्यवस्थापक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८४८

**अगा बाळका लेवविजे लेणें। तयाप्रमाणें तें काय जाणे।**
**तो सोहळा भोगणें। जननीयेसी दृष्टी।।**

दहाव्या अध्यायाच्या प्रारंभी सद्गुरु, श्रोता आणि मराठी भाषेबद्दलचा लडीवाळपणा संपल्यानंतर आता श्रीकृष्ण परमात्मा अर्जुनाला काय सांगत आहेत, याकडे माऊली वळले आहेत. अर्जुन आपल्या बोलण्याकडे लक्ष देत आहे का, हे श्रीकृष्णांनी अजमावून पाहिले. घागरीत थोडेसे पाणी घालावे आणि ते गळले तर कोठे छिद्र आहे ते पाहावे, आणि नाही गळले तर घागर भरावी. त्याप्रमाणे तुझ्या चित्ताला छिद्र नाही, हे लक्षात आल्याने तुझ्या जिज्ञासेची घागर मी भरीत असल्याचे भगवंत म्हणाले. अचानकपणे घरी आलेल्या अनोळखी माणसांवर सर्वस्व सोपवावे, आणि तो प्रामाणीक, विश्वासु आहे याची खात्री पटल्यावर त्याला खजिनदार नेमावे. त्याप्रमाणे तुझा प्रामाणिकपणा, विश्वास पटल्याने मी माझ्या अंत:करणातील ज्ञानाचा खजिना तुला सोपवित आहे.



प्रत्येक वर्षी शेतात पेरावे, आणि पीक जर चांगले येत असेल तर त्या शेताची मशागत करण्यात आनंद वाटतो. यात शेतक-याला कंटाळा येत नाही. वारंवार ताव देऊन उजाळा दिला तर सोन्याचा कस अधिकाधिक वाढतो. म्हणून सोने अधिकाधिक शुध्द करावेसे वाटते. त्याप्रमाणे अर्जुनाच्या बाबतीत घडत असल्याचे भगवंत म्हणाले. मी हे तुला गुहय असले तरी सविस्तर सांगतो आहे, म्हणजे मी तुझ्यावर उपकार करीत नाही. असेही भगवंत म्हणाले. आपण अर्जुनावर उपकार करीत नाही, याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले,

**अगा बाळका लेवविजे लेणें । तयाप्रमाणें तें काय जाणे ।**
**तो सोहळा भोगणें । जननीयेसी दृष्टी ।।.**

अर्थात, लहान बाळाला माती, सोने यातील फरक कळत नसतांनाही, त्या बाळाची आई, त्या बाळाच्या अंगावर सोन्याचे किंवा मोलाचे दागिने घालते. त्या दागिन्याने मुलाला जी शोभा येते, त्या शोभेने ती माताच आनंदी होते. अगदी त्या आईच्या दृष्टीप्रमाणे, मी तुला जो उपदेश करीत आहे, त्या उपदेशाने मी स्वत:च आनंदी होत आहे. मी हा उपदेश माझ्या स्वसंतोषाकरीता करीत आहे. त्यामुळे मी तुझ्यावर उपकार करण्याचा प्रश्नच येत नाही. मी तुझ्या प्रेमात इतका गुंतलो आहे की, ज्यामुळे तुला स्वहिताचा जसा जसा अनुभव येत आहे, तसा तसा माझा आनंद दुपटीने वाढत आहे. श्रीभगवान अर्जुनाच्या प्रेमात पडले आणि सर्व गुहय गोष्टी सांगू लागले. हे गुहय सांगतांना आपण कर्तव्य म्हणून किंवा उपकार म्हणून सांगत नसून स्वत:ला आनंद मिळत आहे म्हणून सांगत असल्याचे स्पष्टीकरण भगवंतांनी करावे हे विशेष आहे. आपण एखादयाला दोन गोष्टी सांगीतल्या तर तो माझ्यामुळेच निर्माण झाला किंवा मी सांगीतले म्हणूनच त्याचे भले झाले. असे बोलुन दाखवित असतो. नि:स्वार्थ भावनेने किंवा स्वत:च्या मनावरील ओझे कमी करण्यासाठी किंवा स्वत:ला नि:स्वार्थ आनंद मिळावा म्हणून ईतरांना मार्गदर्शन करणा-यांची संख्या कमी आहे. ही संख्या वाढली तर समाजात अनेक ज्ञानी लोक निर्माण होतील. अनेकांना योग्य मार्ग मिळून लोक सुखी होतील. माऊली, श्रीकृष्णांचे व आपण माऊलींचे भक्त असल्याने, आपणाला नि:स्वार्थ आनंद व स्वसंतोष मिळण्यासाठी ईतरांना मार्गदर्शन, सहकार्य करावे लागेल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | महाराज संजीवन समाधी सोहळा, शिवरात्री, चांगला दिवस |
| दि. २ ऑगस्ट २०२४ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०, | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३ ते ४.३० |
| मास - आषाढ | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. त्रयोदशी (१५.२६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र- आर्द्रा (१०.५८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - हर्षण (११.४४) | |
| करण - विष्टि (२७.३४) | |
| दिनविशेष - संत नामदेव | |

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे.

**कुंभ** : अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल.

# 'रोल मॉडेल युनिव्हर्सिटी' म्हणून विद्यापीठाचा नावलौकिक व्हावा

**कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या सदिच्छा**

**डी. राम रेड्डी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ ऑगस्ट-**

संपूर्ण देशात केवळ एका जिल्ह्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. गेल्या वीस वर्षात या विद्यापीठाने चांगली भरारी घेतली आहे, आता येथील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून नवनवीन कोर्सेस सुरू करून एक 'रोल मॉडेल युनिव्हर्सिटी' म्हणून देशभरात या विद्यापीठाचा नावलौकिक व्हावा, अशा सदिच्छा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी यांनी दिल्या.

विद्यापीठाचा विसावा वर्धापन दिन गुरुवारी सकाळी आठ वाजता कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सकाळी दहा वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. त्यावेळी डॉ. फुलारी बोलत होते. यावेळी विद्यापीठाचा मानाचा व प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार उद्योजक डी. राम रेड्डी यांना प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा यांनी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. कुलसचिव योगिनी घारे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. प्रभारी वित्त व लेखाधिकारी प्रा. विकास घुटे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी जीवनगौरव पुरस्कार मानपत्राचे वाचन केले.

कुलगुरू प्रा. फुलारी म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात चांगल्या गोष्टींचा समाविष्ट झाल्याने विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख तसेच आंतरविद्याशाखीय पद्धतीने शिक्षण घेण्याची संधी आहे. त्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने देखील कृषी आणि उद्योगावर आधारित काही नवीन कोर्सेस सुरू करावेत. जेणेकरून येथील विद्यार्थ्यांना आवश्यक ते अभ्यासक्रम शिकता येईल. त्याचबरोबर फॉरेन लँग्वेज डिपार्टमेंट देखील या विद्यापीठाने सुरू करावा, जेणेकरून यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्यास व प्रगती करण्यास मदत होईल. पंतप्रधान उच्चस्तर शिक्षा अभियानातून शंभर कोटी अनुदान या विद्यापीठास प्राप्त झाल्याने चांगल्या पायाभूत सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील. त्यामुळे विद्यापीठाचा विकास होईल.

या कार्यक्रमात ३८ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कर्नल विक्रम जाधव आणि एस. एम. अरुणकुमार ठाकूर, सुलतान पठाण यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे, ममता बोल्ली, श्रुती देवळे यांनी केले. कुलसचिव योगिनी घारे यांनी आभार मानले.

### ज्ञानाच्या सरस्वतीकडून हा पुरस्कार : राम रेड्डी

श्री राम रेड्डी म्हणाले की, शिक्षणतज्ञांनी निवड करून दिलेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार हा माझ्यासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. ज्ञानाच्या सरस्वतीकडून हा पुरस्कार प्राप्त झाल्याने जीवन कृतार्थ झाले आहे. आमची बालाजी अमाईन्स ही भारतीय तंत्रज्ञानावर आधारित तयार झालेली कंपनी असून देशाच्या उद्योग, व्यवसायात आपल्यापरीने योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहे. सोलापूर व परिसरातील तरुणांना यामुळे रोजगार मिळाले. त्यांच्यामुळेच आज कंपनीची यशस्वी वाटचाल सुरू असून हा पुरस्कार त्यांच्यामुळेच मिळाला, याचा आनंद आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ।। विद्यया संपन्नता ।।














### आंतरराष्ट्रीय वारकरी भवनाचा प्रस्ताव : कुलगुरू

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, विद्यापीठाकडून आज विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक संस्थांशी सामंजस्य करार करण्यात आले असून यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी फायदा होणार आहे. जागतिक पातळीवर विद्यापीठाचे नावलौकिक होण्यासाठी विद्यापीठाकडून आंतरराष्ट्रीय वारकरी भवन, दिव्यांग सेंटर, सेंटर फॉर ट्रान्सजेंडर आदींचा समावेश आहे. यासाठी सध्या विद्यापीठाकडून प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे. पदवी व पदव्युत्तर विविध अभ्यासक्रम देखील विद्यापीठाकडून सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

१)शैक्षणिक संस्था: सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर, ता. सांगोला. २)महाविद्यालय: बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय अनगर, ता. मोहोळ ३)प्राचार्य : प्राचार्य डॉ. चंद्रकांत श्रीपती सूर्यवंशी, बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय अनगर. ४) शिक्षक (विद्यापीठ): डॉ. बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे, संचालक, पदार्थविज्ञान संकुल डॉ. गौतम सुभाना कांबळे, संचालक, सामाजिकशास्त्रे संकुल ५) शिक्षक (महाविद्यालय): डॉ. वीरभद्र चनबस दंडे , डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर डॉ. आयेशा रंगरेज, कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर ६) शिक्षकेत्तर अधिकारी (वर्ग एक व दोन विद्यापीठ): आनंदराव बहिरू पवार, सहाय्यक कुलसचिव ७)शिक्षकेत्तर कर्मचारी (वर्ग तीन विद्यापीठ): रूपाली विजयकुमार हुंडेकरी, वरिष्ठ लिपिक ८) शिक्षकेत्तर कर्मचारी (वर्ग चार विद्यापीठ): नामदेव यशवंत सोनकांबळे, वाहनचालक ९) शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (लिपिक संवर्गीय महाविद्यालय): कैलास भागवत सातव, मुख्य लिपिक भारत महाविद्यालय, जेऊर १०) शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार (चतुर्थश्रेणी कर्मचारी महाविद्यालय): अभिजीत बाळासाहेब जाधव, ग्रंथालय परिचर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर

### नंतर आलेल्या निमंत्रितांची तारांबळ

पावसाचे वातावरण असल्यामुळे हा कार्यक्रम विद्यापीठाच्या सभागृहात झाला. हॉल खचाखच भरल्यामुळे नंतर आलेल्या निमंत्रितांना तात्पुरत्या खुर्च्या आणून व एनसीसीच्या विद्यार्थ्यांना उठवून खुर्च्या द्याव्या लागल्या. त्यामुळे काहीजण बाहेरच ताटकळत उभे होते, काहींना परत जावे लागले.

# हा देह म्हणजे मी नव्हे : साध्वी प्राचीश्रीजी

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

आपण स्वत:ला विसरलो आहोत. स्व ची आठवण आपणास होत नाही. स्वत्व विसरून हा देह म्हणजेच मी असे आपण समजतो. हा सुंदर असा नरदेह देवाच्या प्राप्तीसाठी, आत्म्याचा शोध आणि बोध घ्यायचा आहे हेच आपण विसरलो आहोत, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका परमपूज्य साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

संत साक्षात ईश्वराची वाणी आपल्याला सांगत असतात. ज्ञानरूपी गंगा जिनवाणीची धारा आपणापर्यंत पोहोचवण्याचे काम संत करत असतात. या जिनवाणी रुपी भक्तिरसाचा आनंद आपण किती घेतो हे आपल्यावर अवलंबून आहे. उत्तम श्रावक बना, श्रोता बना. जे ऐकता ते जीवनात कृतीत उतरवा. श्रद्धेने, निष्ठेने, आस्थेने आपण ईश्वराची वाणी श्रवण केलात तर निश्चितच जीवनात परिवर्तन घडेल. मुलांना फक्त शिक्षित बनविण्यापेक्षा सुशिक्षित बनवा. पालक लर्निंग पेक्षा अर्निंगकडे लक्ष देतात. लर्निंग म्हणजे शिक्षण हे फक्त अर्निंगसाठी म्हणजे पॅकेजेससाठी, नोकरीसाठीच घेता का? पूर्वी गुरुकल पद्धतीत वेगवेगळ्या कलांमध्ये शिष्य निपुण होत असत. आज एकाच डिग्रीवर समाधान मानतो. शिक्षणाबरोबर पाल्यास व्यावहारिक ज्ञानदेखील हवे. आज छोट्या छोट्या गोष्टींसाठी पालक आपल्या मुलांच्या शाळेत जातात. मुलांना सुसंस्कारित करा. संस्काराचे क्लासेस लावून मुलांवर संस्कार होत नसतात. लहानपणापासूनच धार्मिक शिक्षणही द्या. धर्म शिक्षण दिले, धर्माचे संस्कार घडले तर जीवनातील प्रत्येक क्षेत्रात ते उत्तम नागरिक म्हणून उभे राहतील. तुम्ही कितीही मोठे व्हा, धर्माला विसरू नका.




# इतिहासप्रेमींकडून कुलगुरुंचा अभिनंदनाचा ठराव

**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील २५ अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्यामध्ये इतिहास विभागाचा समावेश केल्याबद्दल सोलापूर इतिहास प्रेमी मंडळींकडून कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्र कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव डॉ योगिनी घारे यांचा अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

विद्यापीठात इतिहास विभाग कार्यान्वित होऊन तीन वर्षे पूर्ण होत आहेत. या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती नसल्यामुळे मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी संख्येची समस्या येत होती. परंतु कुलगुरू, प्र कुलगुरू यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाकडे पाठपुरावा करून विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची समस्या सोडविली. त्यामुळे इतिहास प्रेमी मंडळींनी आयोजित केलेल्या बैठकीत अध्यक्ष प्रा एम. एम. मस्के यांनी अभिनंदनचा ठराव मांडला. प्रा. डॉ. नभा काकडे यांनी अनुमोदन दिले. यावेळी प्रा. नामदेवराव गरड, प्राचार्य एम. ए. शेख, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे इतिहास अभ्यासक नितीन अनवेकर, डॉ. दशरथ रसाळ, प्रा. संतोष मारकवाड, सोमनाथ लामकाने, अर्जुन बनसोडे, सोनाली माने, नागेश बिजापुरे, नवनाथ देशमुख, प्रकाश वाघमारे आदी उपस्थित होते

# अलौकिक सामर्थ्याचा ठेवा : सि.ना. आलुरे गुरुजी

**आज गुरुजींचं तृतीय पुण्यस्मरण,**
**गुरुजी तुमचं असणं सर्व काही होतं,**
**आयुष्यातील एक ते सुंदर पर्व होतं,**
**आज सर्व काही असल्याची जाणीव आहे,**

पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे. विचारांचे ऐश्वर्य, वाणीचे माधुर्य, वृत्तीचे गांभीर्य, मनाचे औदार्य लाभलेल्या मानवतेच्या सेवकास पुण्यस्मरण दिनानिमित्त मनपूर्वक अभिवादन.

ग्रामीण भागातील विद्यार्थी विशेषतः मुली शिक्षणापासून अनेक अडचणीमुळे वंचित राहत होते हे गुरुजींना जाणवत होतं. ग्रामीण भागातील मुली शिकल्या पाहिजेत ही गुरुजींची तळमळ होती म्हणून गुरुजींनी ग्रामीण भागामध्ये शाळा काढल्या. ही सर्व विद्यालये गुरुजींनी घालून दिलेल्या आदर्शाच्या वाटेने वाटचाल करताना दिसत आहेत. शुभ्र वस्त्र परिधान करणाऱ्या चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्त्वाकडे पाहिलं की मन आनंदित होतं, शुभ्र कपडे हे त्याग व स्वच्छ विचाराचे प्रतीक असणारे, विशाल ज्ञानाचा तिसरा डोळाही असणारे आदरणीय गुरुजी यांचे जीवन ज्ञानसंपन्न आणि चरित्र संपन्न होते. अनुकरणीय होते. विद्येसारखे धन नाही, सेवेसारखे व्रत नाही, उद्योगासारखा मित्र नाही, माणुसकी सारखा धर्म नाही, आत्मविश्वासा सारखा मंत्र नाही हे आपल्या स्वतःच्या आचरणातून दाखवणारे आलुरे गुरुजी यांचे प्रत्येक क्षेत्रातील कार्य खरोखरच दैदिप्यमान आहे. गुरुजी नेहमी सांगायचे शिक्षकांचे चांगले आचार-विचार पाहून विद्यार्थी गुरुजींच्या पावलावर पाऊल ठेवतात. जीवनाच्या वाटेवर कुठेही भेटले तरी नतमस्तक होतात. मान देतात, खरे तर हाच शिक्षकांचा खरा पुरस्कार होय.



आज संस्काराच्या रांगोळ्या पुसल्या जात आहेत. त्याला जबाबदार कोण? शिक्षक, समाज की शासन याचा आपण सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. आणि असा विचार करण्यासाठी आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. गुरुजींनी आपणावर केलेले संस्कार, दिलेली नितीमूल्ये या बाबींचा विचार करून कार्य करत गेल्यास खऱ्या अर्थाने गुरुजींचे पुण्यस्मरण साजरा केल्यासारखं होणार आहे. साऱ्या समाजामध्ये सदैव गुरुजींच्या कार्याबद्दल, त्यांच्याबद्दल कर्तज्ञतेची भावना आहे. कारण त्यांचं नाव घेऊन कुठलेही काम सुरू केले की ते काम यशस्वी होतं याची प्रचिती मला आलेली आहे. आणि हीच प्रचिती अनेकांना आलेली असणार आहे याची जाणीव ही मला आहे. ११ सप्टेंबर १९९१ ला हंगरगा नळ येथे राजीव गांधी विद्यालययाची स्थापना झाली. आदरणीय गुरुजींनी लावलेले हे शिक्षणाचं छोटेसे रोपट त्याचं वृक्षामध्ये रूपांतर होताना ग्रामस्थ पहात होते. विद्यार्थी संख्या वाढत होती, वर्गामध्ये बसण्यासाठी जागा अपुरी पडत होती. मी व माझे सहकारी काही प्रमुख व्यक्तीशी संपर्क साधून विद्यालयाच्या इमारतीबाबत चर्चा केली तेव्हा ग्रामस्थांचे एकमत होऊन आलूरे गुरुजींची शाळा आहे आणि ती आपल्याला बांधायची आहे असा विचार झाला. केवळ आदरणीय गुरुजी मुळे सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन हे काम वर्षभरामध्ये सुसज्ज इमारत उभी केली. केवळ गुरुजींमुळेच होऊ शकले हे पुन्हा एकदा नमूद करावे असे वाटते. विद्यालयाच्या इमारत बांधकामामध्ये विद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी- विद्यार्थिनी , विद्यालयातील आजी-माजी शिक्षक, मुख्याध्यापक, पुणे स्थित असणारे मित्र मंडळ, गावचे सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत चे सर्व सदस्य कर्मचारी, सहकारी सोसायटीचे सर्व पदाधिकारी व सदस्य , शालेय बांधकाम समिती पदाधिकारी व सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीतील पदाधिकारी व सदस्य, विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी अशा सर्वांच्या बहुमोल सहकार्याने ही सुसज्ज असे इमारत उभी राहिली आहे. यामध्ये हंगरगावाशी यांचा सिंहाचा वाटा आहे. ते केवळ आदरणीय आलुरे गुरुजींच्या मुळेच. एका माजी विद्यार्थ्यांचा किस्सा याप्रसंगी सांगावसं वाटतो. त्याची परिस्थिती अत्यंत गरिबीची, स्वतः दररोज मोल मुजरी करून जीवन जगतोय. केवळ आणि केवळ आलुरे गुरुजींची शाळा म्हणून नाव न सांगायच्या अटीवर पाचशे रुपये द्यायची सुद्धा परिस्थिती नसताना त्यांनी विद्यालयाच्या बांधकामासाठी पाच हजारांची देणगी दिली. नाव सांगितलं तर घरी आई-वडिलांना कळेल, परिस्थिती नसताना एवढे पैसे का दिलेस म्हणून ते रागावतील त्यासाठी त्यांनी नाव सांगू नका असं मला म्हणाला. गुरुजींबद्दल अशा लोकांच्या भावना आहेत. हा प्रसंग मी माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यामध्ये व्यक्त केला. व्यक्त करताना माझ्या डोळ्यातून ही अश्रू कधी ओघळले हेही मला कळले नाही. गुरुजींवर प्रेम करणारी अशी माणसं गावागावांमध्ये आहेत याची पावला पावलावर प्रचिती येताना दिसते. हजारो विद्यार्थ्यांच्या हाती सरस्वतीची विणा देणारे, अनाथ बालकाला वात्सल्याचे छत्र देणारे ,समाजातील दैन्य पाहून ओघळणारे, अन्याय पाहून पेटून उठणारे, मायेची शाल होऊन ऊब देणारे, आदरणीय सि.ना. आलुरे गुरुजी २ ऑगस्ट २०२१ रोजी पंचतत्वात विलीन झाले. त्यांच्या कार्याचा नंदादीप सतत तेवत ठेवणे हेच आपलं कर्तव्य.





**-मनोहर घोडक**
**प्र.मु.अ. राजीव गांधी विद्यालय, हंगरगा नळ.**

## संक्षिप्त वृत्त



### आ. संजयमामांच्या वाढदिवसानिमित्त तहसीलला संगणक, प्रिंटर, खुर्च्या भेट

**करमाळा, दि. १ ऑगस्ट-**

करमाळा विधानसभा मतदारसंघाचे आ. संजयमामा शिंदे यांचा ३१ जुलै हा वाढदिवस झाला. निमित्त कार्यकर्त्यांकडून तहसील कार्यालयाला संगणक, प्रिंटर, खुर्च्या भेट दिल्या. यापूर्वी अंगणवाडी सेविका, मदतनीस, आरोग्य सेविकांचा सन्मान करून त्यांना गणवेशाची साडी भेट देणे, वृक्षारोपण कार्यक्रम घेणे, रक्तदान शिबीर, मुलांना वह्या वाटप करणे आदी उपक्रम यापूर्वीच राबविले आहेत. तहसील कार्यालयासाठी २५ खुर्च्या तसेच २ संगणक व प्रिंटर भेट देण्यात आले. एसटी महामंडळाच्या परिसरामध्ये वृक्षरोपण करणे, झाडांना ट्री गार्ड लावणे, परमवीर चक्र प्राप्त सैनिकांचा इतिहास फ्लेक्सच्या माध्यमातून मांडणे असे उपक्रम राबविण्यात आले. तहसीलदार शिल्पा ठोकडे, प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर यांच्यासह संजयमामा शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जनसेवा हिच ईश्वर सेवा संघटनेकडून तीनशे विद्यार्थ्यांना भोजन व्यवस्था

**मंद्रुप, दि. १ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथील जनसेवा हिच ईश्वरसेवा या सामाजिक संस्थेने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित समुदाय उपक्रमात सहभाग घेऊन ३०० विद्यार्थ्यांना भोजनाची व्यवस्था केले. शासनाच्यावतीने आयोजित शिक्षण सप्ताह उपक्रमांतर्गत शाळांमध्ये तिथी भोजन, स्नेहभोजन उपक्रम राबविण्यात आला. जनसेवा हिच ईश्वरसेवा सोशल फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ३०० विद्यार्थ्यांसमवेत खीर, भात व सांबर जेवण केले. विद्यार्थी आनंदाने जेवणाचा आस्वाद घेतला. यासाठी फाऊंडेशनचे अध्यक्ष राघवेंद्र पाटील, चंद्रकांत पावटे, सिद्धाराम पाटील, श्रीकांत भरले, तानाजी अवताडे, परमेश्वर कुलकर्णी, संतोष कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले. मुख्याध्यापक सिध्दाराम गुरव यांनी आभार मानले.



### मंडल अधिकारी संजय सोनटक्के यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

महसूल विभागातील कर्मचारी तथा कष्ट्राईब कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष मंडळ अधिकारी संजय सोनटक्के प्रदीर्घ २७ वर्षांच्या अखंड सेवेनंतर निवृत्त झाले. यानिमित्त त्यांचा काष्ट्राईब संघटनतर्फे सत्कार करण्यात आला. संघटनेचे ते जिल्हा उपाध्यक्ष म्हणून जवाबदारी सांभाळली आहे. यावेळी आरपीआय (आठवले) गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांब, शिवराज जमगे, गणेश कांदे, सनी सोनटक्के, गणेश सोनटक्के, स्वामीनाथ बेंद्रे आदी उपस्थित होते. सेवेचा शेवटचा दिवस म्हणून अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर स्वतःच्या शासकीय गाडीने त्यांना घरी सोडून त्यांचा यातोचित्त सन्मान केला.

### पिलीव येथे आज २१ विरांचा कार्यक्रम

**पिलीव, दि. १ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे नाईक समाजाच्यावतीने खंडोबा दैवतांच्या २१ विरांचा खेळ व गझी ढोल कार्यक्रम शुक्रवारी २ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजल्यापासून ते शनिवारी सकाळी ९ वाजता खंडोबा देवाच्या २१ विरांचा व गझी ढोल कार्यक्रम होणार आहे. यासाठी जंगी तयारी सुरु आहे. वीरांच्या कार्यक्रमाला फार जुनी व ऐतिहासिक परंपरा आहे. यावेळी बचेरी, सुळेवाडी, जरगवस्ती, काळामळा, ढोकमोड, काळमवाडी, लेंगरेवस्ती, मदने, बोरगाव या ठिकाणीची गझी ढोल मंडळी पारंपरिक पध्दतीने गझीढोल कार्यक्रमात सहभागी होतात. नरवीर उमाजी नाईक मंडळाचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

### जेऊरमध्ये सोन्या-चांदीच्या दागिन्याची चोरी

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

जेऊर येथील बंद घराचा दरवाजा तोडून २९ जुलै रोजी सकाळी दहा ते साडेसहा वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने रोख रक्कम, सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह ७० हजार ८०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. फिर्याद तुळसाबाई कृष्णात सातपुते (वय ६४, रा. बसवनगर, जेऊर) यांनी दिली आहे. फिर्यादी सकाळी दहा वाजता दरवाज्याला कडी, कुलूप लावून नेहमीप्रमाणे कामाला गेल्या. काम करून सायंकाळी साडेसहा वाजता परत आल्यावर चोरी झाल्याचे उघडकीस आले. अज्ञात चोरट्याने घराचे दार, कुलूप तोडून १० हजार ८०० रूपये रोख, ४० हजार रूपये किंमतीचे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकिट, २० हजार रूपयांचे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे अंगठी असे एकूण ७० हजार ८०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. अज्ञात चोरट्याविरोधात बुधवारी गुन्हा दाखल झाला.

# मुख्यमंत्री लाडकी बहिणीनंतर आता ‘अन्नपूर्णा’ योजना

## स्वयंपाकासाठी तीन सिलिंडर मोफत; पंतप्रधान उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिवर्ष मोफत तीन सिलिंडर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

विधीमंडळात अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना जाहीर करण्यात आली होती. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील कुटुंब आणि पंतप्रधान उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थ्यांना प्रतिवर्ष तीन मोफत स्वयंपाकाचा सिलिंडर देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्वला योजनेतील ५२ लाख १६ हजार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तसंच लाडकी बहिण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबांना वार्षिक ३ गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहे.

राज्यातील उज्वला योजनेतील ५२ लाख १६ हजार ४१२ पात्र लाभार्थ्यांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत मिळणार आहे. या योजनेसाठी एका कुटुंबात एक लाभार्थी पात्र असेल. हा लाभ १४.२ किलो ग्रॅम वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत द्यायच्या ३ मोफत सिलेंडरचे वितरण तेल कंपन्यांमार्फत करण्यात येणार आहे.



**काय आहेत अटी**

-महिलांच्या नावे गॅस जोडणी असणाऱ्या महिलांनाच या योजनेचा लाभ मिळणार

-एका कुटुंबात केवळ एकच लाभार्थी योजनेस पात्र असणार.

-एका महिन्यात एकापेक्षा अधिक गॅस सिलेंडर मिळणार नाहीत

-१ जुलै २०२४ नंतर विभक्त केलेल्या शिधापत्रिका या योजनेस पात्र ठरणार नाहीत.

**बँक खात्यात रक्कम येणार**

उज्वला गॅस योजनेतंर्गत सध्या केंद्र सरकार पात्र महिला लाभार्थ्यांना ३०० रुपयांचे अनुदान देते. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतंर्गत राज्य सरकार त्यांच्या खात्यात आणखी ५३० रुपये जमा करेल. तर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार असल्याने त्यांच्या बँक खात्यात प्रतिसिलिंडर ८३० रुपये जमा करणार आहे.

# पंढरपूर, माळशिरसमध्ये महसूल पंधरवडा सुरु

## तहसीलदार सुरेश शेजुळ : १५ ऑगस्टपर्यत कालावधी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, सदाशिवनगर, दि. १ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांच्याकडील शासन निर्णयान्वये महसूल विभागाने जिल्हास्तरीय महसुली कामे वेळच्या वेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यायवत करणे, वसुलीच्या नोटीस पाठविणे, मोजणी करणे, अपिल प्रकरणांची चौकशी करणे इ. कामे वेळच्यावेळी व वेळापत्रकानुसार करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आणि महसुली वसुलीचे उद्दिष्ट पार करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याकरीता आणि महसूल विभागाने केलेल्या कामकाजाच्या आढावा जनतेसमोर ठेवण्याकरीता १ ऑगष्ट हा महसूल दिन म्हणून राज्यभर साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, यावर्षी महसूल दिनापासून १ ते १५ ऑगष्टदरम्यान राज्यभरात महसूल पंधरवडा राबविण्यात येणार आहे.

१ ऑगष्ट रोजी महसूल दिनी महसूल पंधरवडा शुभारंभ मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेने करण्यात आला. २ ऑगष्ट मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, ३ ऑगष्ट मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगष्ट स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, ५ ऑगष्ट कृषी मार्गदर्शन कार्यक्रम, ६ ऑगष्ट शेती, पाऊस आणि दाखले, ७ ऑगष्ट युवा संवाद, ८ ऑगष्ट महसूल जनसंवाद, ९ ऑगष्ट महसूल ई-प्रणाली, १० ऑगष्ट सैनिक हो तुमच्यासाठी, ११ ऑगष्ट आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन, १२ ऑगष्ट एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, १३ ऑगष्ट महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, १४ ऑगष्ट महसूल पंधरवडा वार्तालाप, १५ ऑगष्ट महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल पंधरवडा सांगता समारंभ असे कार्यक्रम होणार आहेत.

**जागरुकतेबरोबरच विश्वास वृद्धिंगत व्हावा**

पंढरपूर उपविभागात महसूल विभागाचा महसूल पंधरवडा सुरु झाला आहे. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा आणि विभागांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा, तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा, यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने 'महसूल पंधरवडा' साजरा करण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.

# हिवरेचे बापुराव फरतडे यांचा बागल गटात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १ ऑगस्ट-**



हिवरे येथील माजी सरपंच बापूराव फरतडे, निमगाव ह. येथील युवा उद्योजक नागनाथ भोसले नारायण पाटील गटातून तर विठ्ठल रोकडे यांनी संजयमामा शिंदे गटातून मकाईचे चेअरमन दिग्विजय बागल यांच्या उपस्थितीत निमगाव येथील कार्यकर्ता मेळाव्यात जाहीर प्रवेश केला.

युवा नेते दिग्विजय बागल सर्वमतभेद विसरुन करमाळा तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी दुरावलेल्या सर्व सहकाऱ्यांना विधानसभा निवडणुकीपर्यंत सोबत घेणार असल्याचा निर्धार या मेळाव्याप्रसंगी करत आहेत.

यापूर्वी वीट येथील मेळाव्यात पोंधवडी गावचे युवा नेते अमोल गाडे यांनी तर सालसे येथील तानाजी लोकरे यांनी केत्तूर येथील मेळाव्यात जाहीर प्रवेश केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कैलास पाखरे यांनी वाशिंबे येथील मेळाव्यात जाहीर प्रवेश केला आहे तर शेटफळ येथील मेळाव्यात रामवाडीचेसरपंच संतोष वारगड, जिंतीचे अंकुश महाराज खराडे, सिकंदर शेख यांनी जाहीर प्रवेश केला आहे.

यावेळी भाजप नेते दिग्विजय बागल, कृषि उत्पन्न बाजार समिती उपसभापती चिंतामणी जगताप, रामवाडीचे सरपंच रयत क्रांती संघटनेचे संतोष वारगड, सतिश नीळ, औदुंबरराजे पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, उपसभापती चिंतामणी जगताप, नवनाथ बागल, सतिश नीळ, अजित झांजुर्णे, गणेश झोळ, रेवन्नाथ निकत, अशिष गायकवाड, राजेंद्र मोहोळकर गणेश तळेकर, पै. अनिल शिंदे, महेश तळेकर, विलास काटे, डॉ. विजय रोकडे, युवराज रोकडे, ॲड.सोनवणे, ॲड. जयदीप देवकर, सचिन पिसाळ, स्वप्निल गोडगे, युवराज मगर, अशोक पाटील, अशोक हणपुडे, शकील तांबोळी, तात्या फरतडे, रवी शेळके, राजेंद्र जगताप भारत जगताप, विठ्ठल रोकडे, संजय रोकडे, जगन्नाथ ननवरे, अजिनाथ जगताप, शिवाजी भुई, शिवाजी बरडे, उत्रेश्ववर जगदाळे, महादेव रोकडे, जोतीराम घाडगे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक आश्राब जगदाळे होते. रणजित शिंदे यांनी आभार मानले.

# तोळणूरचा अंध गायक रेवणसिद्ध फुलारी करणार प्लेबॅक सिंगिंग

## प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते सोनू सूद यांनी केले कौतुक; संधी देण्याची दिली ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**मैंदर्गी, दि. १ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर येथील दिव्यांग बालगायक झी कन्नड सारेगमप लिट्ल चॅम्प सीजन १९ चे फायनालिस्ट रेवणसिध्द फुलारी यांच्या गायनाची प्रशंसा करून लवकरच हिंदी सिनेसृष्टीत प्लेबॅक सिंगिंगसाठी संधी देणार असल्याचे आश्वासन प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेते सोनू सूद यांनी दिले.



मुंबई येथील वर्सोवा शक्तीसागर फिल्म प्रोडक्शन ऑफिस, अंधेरी वेस्ट, मुंबई परिसरात ख्यातनाम अभिनेते सोनू सूद यांच्या वाढदिवसानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलाकार विफुल मिरजकर यांच्या सोनू सूद चॅरिटी क्लबच्या सहकार्याने भेट घेऊन त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन त्यांच्या समोर त्यांच्याच चित्रपटातील गाणी आणि कन्नड भाषेतील वाढदिवसाचे शुभेच्छा गीत गायन करून रेवणसिद्ध फुलारी यांनी शुभेच्छा दिल्या. रेवणसिद्ध फुलारीचे कन्नड फिल्म इंडस्ट्रीमधील दिग्गज कलाकारांच्या चित्रपट प्रिरीलिज इव्हेंटमध्ये सहभागी होऊन दिग्गज कलाकार स्टार सिंगर के. एस चित्रा, मंगली, डॉ. हंसलेखा, विजय प्रकाश, अर्जुन जन्या, राजेश कृष्णन, मनोहर, नागेंद्र प्रसाद, व्ही. हरिकृष्णा तसेच उदयोन्मुख गायक-गायिका यांच्याकडून शाबासकी मिळविली आहे. आता येणाऱ्या दिवसात रेवणसिद्ध फुलारी इंडीयन आयडलसारख्या नॅशनल लेव्हलच्या स्पर्धेत सहभागी होऊन जिल्हा आणि अक्कलकोट तालुक्याचे नाव गाजविणार आहे.

यावेळी विफुल मिरजकर, शरणप्पा फुलारी, रोहित फुलारी उपस्थित होते.

# काकासाहेबांच्या स्वप्नातील सांगोला शहाजीबापूंच्या साथीने साकार करणार

## माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील

## स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना ड्रोन सर्व्हेक्षण शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ ऑगस्ट-**

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्यासाठी शेवटच्या श्वासापर्यंत झगडणाऱ्या आणि पाणी प्रश्नाचा पाठपुरावा करणाऱ्या स्व. आ. काकासाहेब साळुंखे-पाटील यांच्या स्वप्नातील सुजलाम् सुफलाम् सांगोला तालुका आपण आ. शहाजीबापू पाटील यांच्या साथीने साकार करणार असल्याचा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी व्यक्त केला.

स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना ड्रोन सर्व्हेक्षण शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आ. शहाजीबापू पाटील उपस्थित होते. दीपकआबा साळुंखे-पाटील म्हणाले, नैसर्गिकरित्या सांगोला हा दुष्काळी तालुका आहे. त्यातच प्रत्येक सिंचन योजनेच्या टेलला हा तालुका असल्याने पिण्याचे आणि शेतीचे पाणी आणणे हे मोठे आव्हान आहे. परंतु, तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात क्रांतिकारी बदल करण्याचे स्वप्न स्व. आ. काकासाहेब साळुंखे-पाटील यांनी सर्वात प्रथम पाहिले आणि शेतकऱ्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी स्वतःच्या जीवाची बाजी लावून शेतकऱ्यांची सेवा केली. त्यांच्याच परिवर्तनवादी विचारांचा वारसा घेऊन आणि गत विधानसभा निवडणुकीत सांगोला तालुक्यातील जनतेला आ. शहाजीबापू पाटील आणि मी एकत्रित दिलेल्या आश्वासनाला स्मरून सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्यात सोन्याचा दिवस उजडावा या हेतूने आम्ही दोघेही गेली ३०-३५ वर्षे आहोरात्र प्रयत्न करत आहोत.



### श्री शंकर साखर कारखान्याच्या गळीत हंगामासाठी रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १ ऑगस्ट-**

श्री शंकर सहकारी साखर कारखान्याच्या २०२४-२०२५ च्या हंगामाच्या रोलरचे पूजन कारखाना स्थळावर कारखान्याचे चेअरमन आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.



यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवामृतचे संचालक सचिन रणनवरे, जगन्नाथ जाधव, भास्कर तुपे, भगवान मिसाळ, दत्ता चव्हाण, नंदन दाते, पांडुरंग सांळुखे, प्रताप सालगुडे, भैयासाहेब देशमुख, सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच देवीदास ढोपे, उदय धाईजे, शिवराज निबाळकर, संतोष शिंदे, दादा पालवे, लालखान पठान, माऊली निबाळकर, दादा पाटील, कारखान्याचे व्हाईस चेअरमन मिलिंद कुलकर्णी, संचालक मालोजीराव देशमुख, सुरेश पाटील, महादेव शिंदे, बाळासाहेब माने, सुधाकर पोळ, शिवाजी गोरे, सुनिल माने, प्रफुल्ल कुलकर्णी, सदाशिव वाघमोडे-पाटील, रणजित पाटील, बलभिम पाटील, दत्तात्रय मिसाळ, सचिन लोकरे, लिलावती देवकर, कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर स्वरूप देशमुख, कार्यकारी संचालक अभिजित डुबल, जनरल मॅनेजर रविराज जगताप, चिफ इंजिनिअर समाधान कागदे, प्रोडक्शन मॅनेजर महेश थोरात, चीप केमिस्ट दत्ता देशमुख, चिपअकौंटंट साधू शेंडगे, शेतकरी अधिकारी आनंदराव गायकवाड, आतुल नाईकनवरे,डिस्टलरी मॅनेंजर संजय मोरे, लेबर ऑफिसर कैलास कदम, सिव्हिल इंजिनिअर राहुल मगर, सुरक्षा अधिकारी ज्ञानदेव पवार, संगणक प्रमुख आनंद देवकर, परचेस ऑफिसर उत्तम सपकाळ उपस्थित होते.

# कल्याणराव काळे यांना राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेवर घ्या

## कार्यकर्त्यांची लोकप्रतिनिधींकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

सध्या राज्यापाल नियुक्त १२ जागांकरीता वरिष्ठ पातळीवर मोठ्या प्रमाणात हालचाली सुरु झालेल्या आहेत. पंढरपूरचे कल्याणराव काळे यांना पक्ष पातळीवर संधी मिळण्याबाबत चर्चा चालू असतानाच त्यांचे समर्थक हे चारही विधानसभा सदस्यांना प्रत्यक्ष भेटून आपण काळे यांची वरिष्ठांकडे राज्यपाल नियुक्त विधानपरिषदेवर सदस्य म्हणून निवड होण्याबाबत आ. बबनदादा शिंदे, आ. शहाजीबापू पाटील, आ. समाधान आवताडे, आ. यशवंत माने, आ. संजयमामा शिंदे, माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी शिफारस करावी, यासाठी असंख्य कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ भेटीसाठी गेले होते.

कल्याणराव काळे हे पंढरपूर तालुक्याच्या राजकारणात गेली २० ते २२ वर्षे कार्यरत असून कारखान्याच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आरोग्य, साहित्य, कला, क्रीडा व आर्थिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनिय कार्य चालू आहे. यापूर्वी विधानपरिषद व विधानसभा निवडणूक लढविलेली आहे, त्यामुळे त्यांचा संपर्क दांडगा असून समाजातील सर्व घटकांपर्यंत त्यांची नाळ जोडलेली आहे. पंढरपूर तालुका हा चार विधानसभा मतदारसंघामध्ये विभागला गेल्याने चारही लोकप्रतिनिधी त्यात्या मतदारसंघातील आहेत. दक्षिणकाशि अशी ओळख असलेल्या तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे देशभरातून दररोज हजारो तर वर्षभरात एक कोटीहून आधिक भाविक येत असतात. अशा ठिकाचे स्थानिकचे प्रश्न सभागृहात मांडण्यासाठी स्थानिक भुमिपुत्र म्हणून लोकप्रतिनिधीची उणीव भासत असून त्यातूनच कल्याणराव काळे यांच्या रुपाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपला या ठिकाणचा हक्काचा सदस्य विधानपरिषदेत पाठवावा, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे.



**लोकप्रतिनिधींचे आश्वासन**

पंढरपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी पंढरपूर-मंगळवेढा, सांगोला, माढा व मोहोळ मतदारसंघातील लोकप्रतिनिधींच्या भेटीनंतर कल्याणराव काळे यांच्याप्रती लोकप्रतिनिधींनी सकारात्मक भूमिका घेत आम्ही लवकरच वरिष्ठ नेते मंडळींना शिफारस करु, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोट बाजार समितीत थेट काटा...चाळणीला फाटा

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरुवारपासून शेत मालाची चाळणी पध्दत बंद झाली असून आता या पुढे शेतकऱ्याचा मालाचा थेट वजन काटा होणार आहे. हा निर्णय शेतकरी हितासाठीच घेण्यात आल्याची माहिती अडत असोसिएशनचे अध्यक्ष बसवराज घिवारे यांनी दिली आहे. यापुढे सर्व शेतकऱ्यांनी आपला माल स्वच्छ व वाळवून आणण्याचे आवाहन उपाध्यक्ष संतोष भंडारे, सचिव मुसा बागवान, सहसचिव सोमनाथ हळगोदे, खजिनदार रोहित खोबरे यांनी केले आहे. याप्रसंगी सर्व अडत दुकानदार व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निर्णयामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.





## संक्षिप्त वृत्त...



### सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयाची निसर्गसंवर्धन यात्रा उत्साहात

**सांगोला, दि. १ ऑगस्ट-**

उत्कर्ष माध्यमिक विद्यालयातील पाचवी ते दहावीच्या निसर्ग कुलातील ८४ विद्यार्थ्यांनी सायकल रॅली काढून वाढेगाव येथील त्रिवेणी संगमाला भेट देऊन निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेतला. सायकल रॅलीचे उद्घाटन माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कुलकर्णी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मागाडे, उपमुख्याध्यापिका कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी जे सीड्स बॉल तयार केलेले होते ते रस्त्याच्या कडेने असलेल्या मातीच्या चाऱ्यांमधून टाकून एक प्रकारचा वृक्षारोपणाचा आनंद घेतला. वाढेगाव येथील त्रिवेणी संगमावर रॅली पोहोचल्यानंतर शंभू महादेवाचे दर्शन घेऊन विद्यार्थ्यांना माण नदीची सखोल माहिती माणनदी परिक्रमा अध्यक्ष वैजीनाथ घोंगडे यांनी दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी सर्पमित्र ऐवळे यांनी वेगवेगळ्या प्रकारांच्या सापांबद्दलची माहिती दिली. नदीच्या काठी असलेल्या मोठ्या मोठ्या झाडांच्या पारंब्याचा मुलांनी खेळून मुक्त आनंद घेतला व आपल्या लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. सदर रॅलीचे आयोजन संस्थाध्यक्ष डॉ. संजीवनी केळकर यांच्या संकल्पनेतून निसर्ग कुलाचे शिक्षक मिसाळ, कुंभार, भिंगार्डे, गोतसूर्य, शिक्षिका कडव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

### अक्कलकोटचे शिक्षक धानय्या कौटगीमठ यांचे ७७ व्या परीक्षेत घवघवीत यश

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

केएलई संचलित मंगरुळे प्रशालेतील शिक्षक धानय्या कौटगीमठ यांनी आज केंद्रीय शिक्षक पात्रता सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले. ही



त्यांची ७७ वी परीक्षा आहे. ७ जुलै २०२४ रोजी सीटीईटी परीक्षा घेण्यात घेण्यात आली होती. याचा निकाल ३१ जुलै रोजी म्हणजे अवघ्या २४ दिवसात जाहीर करण्यात आला. धानय्या कौटगीमठ यांनी या परीक्षेत १५० पैकी ९९ गुण घेऊन ६६ टक्के टक्के आणि पेपर २ सामाजिक शास्त्र विषयात १५० पैकी ९१ गुण घेऊन ६० टक्क्यांनी उत्तीर्ण होत सलगपणे ७७ परीक्षा उत्तीर्ण ते झाले आहेत. देशातील विविध राज्यातील सेट, नेट, टीईटी परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वतः ला मिळालेल्या ज्ञानाचा, अनुभवाचा इतर विद्यार्थ्यांना फायदा होण्यासाठी यु-ट्यूबमार्फत धानय्या कौटगीमठ मोफत मार्गदर्शन करीत आहेत. आतापर्यंत ७०२ विद्यार्थी सेट, नेट, टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

### स्वेरीतील मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या तीन विद्यार्थिनींची 'वर्ले' कंपनीत निवड

**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

'वर्ले' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल



इंजिनिअरिंग विभागातील आकांक्षा शेळके, आकांक्षा जाधव व अस्मिता सरवदे या तीन विद्यार्थिनींची कॅम्पस ड्राईव्हमधून निवड करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली. 'वर्ले' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील आकांक्षा बिभीषण शेळके, आकांक्षा सौदागर जाधव व अस्मिता धनाजी सरवदे या तीन विद्यार्थिनींची निवड केली असून त्यांना प्रत्येकी वार्षिक ५.१५ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. संस्थापक सचिव प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थाध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवारकंपनीत निवड झालेल्या आकांक्षा शेळके, आकांक्षा जाधव व अस्मिता सरवदे यांचे अभिनंदन केले.



### भारत विकास परिषदेतर्फे पंढरपूर येथील प्राथमिक शाळेत मोफत हिमोग्लोबिन तपासणी

**करकंब, दि. १ ऑगस्ट-**

महिला मंडळ प्राथमिक शाळा पंढरपूर येथील मुलींची मोफत हिमोग्लोबिन तपासणी भारत विकास परिषद यांच्यातर्फे करण्यात आली.ज्या मुलींची हिमोग्लोबिनची पातळी कमी आहे अशा मुलींवर भारत विकास परिषदेतर्फे मोफत औषधोपचार करण्यात आले. ज्या मुलींचे हिमोग्लोबिनचे प्रमाण सर्वात अधिक आहे अशा ५ मुलींना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर आधारित पुस्तके भेट देण्यात आली.प्रास्ताविक मुख्याध्यापिका लोखंडे यांनी केले. डॉ. वर्षा काणे, अध्यक्ष डॉ. अनिल पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी भारत विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेंद्र काणे, मंदार लोहकरे, कोषाध्यक्ष अजित कुलकर्णी, महिला मंडळ शाळेच्या अध्यक्षा प्रा. मेदा दाते उपस्थित होते.

# जिल्ह्यात एक लाख बेघरांना मिळणार हक्काचा पक्का निवारा

## प्रधानमंत्री आवास अन् मोदी आवास योजना; जिल्ह्यातील ७७ हजार ४१७ बेघर लाभार्थ्यांना घरकूल मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यातील एक लाख बारा हजार लाभार्थींना राहायला स्वतःच्या हक्काचा पक्का निवारा नाही हे वास्तव असून केंद्र सरकारने आता सर्वच बेघरांसाठी प्रधानमंत्री आवास योजना पुन्हा सुरू केली आहे, तर राज्य सरकारने ओबीसी-एसबीसी घटकांसाठी मोदी आवास योजना सुरू केली आहे. यासह रमाई, शबरी आवास योजनाही सुरू आहेत. त्याअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील बेघर कुटुंबातील लाभार्थींना आगामी काळात त्यांच्या स्वप्नातील घर म्हणजेच हवकाचा पक्का निवारा मिळणार आहे.



प्रधानमंत्री आवास योजना, रमाई व शबरी आवास योजना आणि आता मोदी आवास योजना, यातून आतापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील ७७ हजार ४१७ बेघर लाभार्थ्क्षांना घरकूल मंजूर झाले. त्यातील ५८ हजार ९४४ कुटुंबांना आवास योजनांमधून स्वतःच्या हक्काचा निवारा मिळाला आहे. यापैकी चार हजार ३१९ लाभार्थींना त्यांची घरकुलासाठी स्वतःची जागा देखील नव्हती. त्यांना प्रशासनाच्या माध्यमातून जागा देखील मिळाली आहे. दरम्यान, ज्या बेघर लाभार्थींना घरकूल बांधकामासाठी स्वतःची जागा नाही, त्या लाभार्थीस ४६.७५ चौरसमीटर (५०० चौरस फूट) जागा घेण्यासाठी एक लाखांपर्यंत अनुदान मिळते. पूर्वी हे अनुदान ५० हजार रुपये होते. आता उर्वरित बेघर लाभार्थींनाही घरकुलांचा लाभ मिळणार असून त्याच्या उद्दिष्टाचा सध्या जिल्ह्याच्या ग्रामीण विकास यंत्रणेला प्रतीक्षा आहे.

### घरकुलासाठी आवश्यक कागदपत्रे

● ग्रामसभेचा ठराव तथा प्रस्ताव ● जागेचा उतारा (जागा नसलेल्यांना ग्रामपंचायतीने गावठाण जागा उपलब्ध असल्याचा उतारा द्यावा) ● बेघर असल्याचा ग्रामपंचायतीचा दाखला ● जातीचा (जात प्रवर्गातील लाभार्थी असेल तर) व उत्पन्नाचा दाखला ● अधिवास प्रमाणपत्र (रहिवासी दाखला)जास्तीत जास्त १.२० लाख वार्षिक उत्पन्न)

### जिल्ह्यातील आवास योजनांची स्थिती

- प्रधानमंत्री आवास योजनेतून मंजुरी -४४,४०६
- आतापर्यंत घरकूल पूर्ण-३८,४४२
- रमाई आवास योजनेतून मंजुरी-२१,३०६
- आतापर्यंत घरे पूर्ण-१५७०६
- शबरी आवास योजनेचे लाभार्थी-६८६
- घरकुलांचा लाभ मिळालेले- ५९६
- मोदी आवास योजनेतून मंजुरी
- ११,०१९ पूर्ण व प्रगतीपथावरील घरकूल ४,२००

### घरकुलासाठी मिळते १.५४ लाखांचे अनुदान

ग्रामीण भागातील बेघर लाभार्थींना घरकूल मंजूर झाल्यानंतर पहिला हप्ता १५ हजार रुपयांचा दिला जातो. त्यानंतर टप्प्याटप्प्याने अनुदानाचे हप्ते वितरित होतात. प्रत्येक लाभार्थीला एक लाख २० हजार रुपयांचे घरकुलासाठी अनुदान तर 'मनरेगा'तून बांधकामाच्या मजुरीपोटी ९० दिवसांचे प्रतिदिन २५३ रूपयांप्रमाणे एकूण २२ हजार ७७० रुपये दिले जातात. याशिवाय स्वच्छ भारत मिशनमधून शौचालयासाठी १२ हजार रुपयांचे अनुदान मिळते.असे एकुण १.५४ लाखांचे अनुदान मिळते.

## सोजर मास्टरशेफ-२०२४ स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

सोजर इंग्लिश स्कूल माध्यमिक विभागाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देण्यासाठी प्रशालेत सोजर मास्टरशेफ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी या दोन गटात स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे 'फुड विदाऊट फायर' या संकल्पनेचा वापर. स्पर्धेत पाककलेतील कौशल्य, विविध चवीच्या वापरातून आरोग्यवर्धक, नाविन्यपूर्ण पदार्थांची निर्मिती व



सौंदर्यपूर्ण मांडणी यांना स्पर्धेत प्राधान्यक्रम देण्यात आला. चाट, ड्रायफ्रुट वापरून बनवलेले चिक्की, लाडू, सँडवीच, फ्रँकी, रोल्स, फ्रुट सॅलड, कॉर्न चाट, भेळ, अशा अनेक पदार्थांचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी कल्पना बारबोले, ब्रम्हदेव मोरे उपस्थित होते. स्पर्धेचे मूल्यमापन बार्शीतील मोहन केटरर्सचे संचालक सतीश देशपांडे यांनी केले. दोन्ही गटातून अनुक्रमे तीन क्रमांक काढण्यात आले. कल्पना बारबोले, सतीश देशपांडे यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा मास्टर शेफच्या कॅप देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन गायकवाड यांनी केले.

## सांगोल्यात विकासकामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ ऑगस्ट-**

तालुक्यातील जुनोनी ते तिप्पेहळ्ळी आणि किडबिसरी ते नागज या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन तसेच शहरातील कोपटे वस्ती येथे गणपती मंदिराजवळ बहुउद्देशीय सभागृह बांधकामाचे लोकार्पण आणि जुना सावे रोड मणेरी मळा येथील पठाण बाबा दर्गा येथे सभामंडप बांधकामाचे भूमिपूजन आ. शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील होते. यावेळी माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ, मुख्याधिकारी डॉ.सुधीर



गवळी, माजी नगराध्यक्षा राणी माने, माजी नगराध्यक्ष अनिल खडतरे, माजी नगरसेवक सचिन लोखंडे, माजी नगरसेविका छाया मेटकरी, अप्सरा ठोकळे, शिवसेना शहरप्रमुख समीर पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. जुनोनी रा. मा. ३८७ ते तिप्पेहळ्ळी आणि किडबिसरी ते नागज (जिल्हा हद्दीपर्यंत) प्रजिमा-१६४ या कामासाठी ३ कोटी ३० लाख ५८ हजार रुपये खर्च अपेक्षित आहे. तसेच कोपटे वस्ती येथील गणपती मंदिराजवळ २५ लाख रुपये खर्चाच्या बहुउद्देशीय सभागृह बांधकामाचे लोकार्पण करण्यात आले.

तसेच जुना सावे रोड मणेरी मळा येथील २५ लाख रुपये खर्चाच्या पठाण बाबा दर्गा येथे सभा मंडप बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले.

### माळशिरस तालुक्यातील
## शेतकरी अद्यापही दुष्काळी अनुदानपासून वंचितच

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १ ऑगस्ट-**

शासनाने गतवर्षी खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेल्यामुळे शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान जाहीर केले होते. यापैकी माळशिरस तालुक्यातील बऱ्यापैकी शेतकऱ्यांना अनुदान मिळाले खरे. पण तालुक्यातील १० हजार २०० शेतकरी अद्यापही दुष्काळी अनुदानापासून वंचितच आहेत.

बहुतांश शेतकऱ्यांनी केवायसी करुन जवळपास दोन महिने झाले. पण अद्यापही त्या शेतकऱ्यांना अनुदान मिळालेच नाही. शेतकरी वारंवार याबाबत तहसील प्रशासनाकडे विचारणा करीत आहेत. पण प्रशासन तो प्रश्न आमच्या पातळीवरील नाही, अशा प्रकारची उत्तरे देत आहेत तर अनेक शेतकऱ्यांना अनुदान मिळाले आहे तर केवायसी करुनही दोन महिने होऊन गेले तरीही आपल्याला अनुदान मिळेना. यामुळे आम्हाला अनुदान मिळेल का नाही याची खात्री नाही असे शेतकरी बोलू लागले आहेत. बऱ्याच शेतकऱ्यांची अभावी केवायसी होतच नाही तर बऱ्याच मयत शेतकऱ्यांची नावे यादीत आली आहेत. मग अशा शेतकऱ्यांची केवायसी करायची कशी? अशा अडचणी निर्माण झाल्या आहेत. पण दुष्काळी अनुदानाबाबत शेतकऱ्यांना सरकारी काम आणि सहा महिने थांब असा अनुभव आला आहे. सध्या दुसरा खरीप हंगाम सुरु झाला आहे. पण तरीही गेल्या खरीप हंगामातील शेतकऱ्यांना मदत मिळेना. प्रशासन शेतकऱ्यांच्या प्रश्नावर उदासीन आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### अल्पवयीन मुलीची छेडछाड; आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. १ ऑगस्ट-**

चिखर्डे (ता. बार्शी) येथील अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याच्या आरोपावरुन पोक्सो गुन्ह्यातील आरोपी काका सुभाष धस याची येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्या. व्ही. के. मांडे यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

मुलीच्या आईने पांगरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणी सरकारतर्फे ३ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपी काका सुभाष धस याच्यातर्फे ॲड. महेश जगताप यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. महेश जगताप, ॲड. राहुल कसबे, ॲड. दैवशाला जाधवर, ॲड. केदार पाटील, ॲड. आदित्य काकडे यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप बोचरे यांनी काम पाहिले.

## शिवसेनेच्यावतीने सांगवी अपघातप्रकरणी निवेदन

**अक्कलकोट, दि. १ ऑगस्ट-**

शिवसेनेच्या वतीने जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना सांगवी येथील धोकादायक वळणामुळे वारंवार अपघात होऊन अनेकांचे याच ठिकाणी अपघात होत असल्याने वळण रस्ता सरळ करण्या बाबत निवेदन देण्यात आले.

सांगवी बुद्रुक येथे वळणामुळे सिमेंट टँकर पलटी होऊन अपघात घडला. त्यात एक महिलेचा मृत्यू झाला व इतर गंभीर स्वरूपाचे जखमी झाले. जखमी रुग्णांना मदत द्यावी, मयत झालेल्या शेतकरी महिलेच्या वारसांना शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, सांगवी बुद्रुक येथील वळणाचा मार्ग सरळ करावा, यापूर्वी ङ्गाच वळणावर अनेक अपघात घडले आहेत. त्यात निष्पाप लोक दगावले आहेत. सदर



वळणावर अपघात टाळण्यासाठी डिजिटल बोर्ड बसावेत, सदर रस्त्यावर कर्नाटक व इतर राज्यातील जडवाहतूक होत असल्याने हजारो वाहन ये-जा करतात. अपघात टाळण्यासाठी संबंधितांनी तात्काळ लक्ष घालावे अन्यथा शिवसेनेच्या वतीने शिवसेनेच्या मार्गाने अपघाताच्या ठिकाणावर रस्ता रोको, उपोषण, आंदोल छोडण्याचा इशारादेण्यात आला आहे. निवेदन नायब तहसीलदार संजय भंडारी यांना देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनील कटारे, तालुकाप्रमुख आनंद बुक्कानवरे, पंचायत समिती माजी सभापती आनंदराव सोनकांबळे, महिला आघाडी तालुका संघटिका अनुराधा शिवगुंडे, जयश्री ढेपे, इब्रामपूरचे माजी सरपंच शिवलिंगप्पा दिंडोरे, आयाज जमादार, महिला आघाडीच्या रेहाना शेख, किशोरी होटकर, सुमन वेदपाठक उपस्थित होते.

# जिल्ह्यात ३ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना मिळणार मोफत वीज

## संकटामध्ये दिलासा; शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण, एप्रिलपासूनच योजनेची अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ ऑगस्ट-**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या घोषणेनुसार सरकारने अध्यादेश काढला आहे. त्यानुसार पुढील पाच वर्षांसाठी साडेसात अश्वशक्तीपेक्षा कमी अश्वशक्ती असलेल्या पंपाला मोफत वीज पुरवली जाणार आहे. त्याचे बिल सरकार चुकते करणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.सोलापूर जिल्ह्यातील ३ लाख ४५ हजार ४०९ शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने अधिवेशनात मोफत वीज देण्याची घोषणा केली होती. त्याचा अध्यादेश कधी निघणार? मोफत वीज कधीपासून लागू होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले होते. अध्यादेशानुसार १ एप्रिल २०२४ पर्यंत पुढे पाच वर्षांसाठी ही मोफत वीज असणार आहे. भरपाईपोटी सरकार १४ हजार ७६० कोटी रुपये महावितरणला देणार आहे. या योजनेचा तीन वर्षांनी आढावा घेऊन निधीची तरतूद केली जाणार आहे. त्यामुळे दुष्काळ, अतिवृष्टी, वादळ अशा वेगवेगळ्या संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील आर्थिक भार कमी होणार आहे.

### तीन महिन्यांचे बील भरावे लागणार

या योजनेच्या शासननिर्णयानुसार ही घोषणा जून महिन्यात झालेली असली तरी याची अंमलबजावणी मात्र एप्रिल २०२४ पासूनच केली जाणार आहे. त्यामुळे मागच्या तीन महिन्यांचे वीजबिल पात्र शेतकऱ्यांना भरावे लागणार नाही. पुढील पाच वर्षांसाठी या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. एप्रिल २०२४ ते मार्च २०२९पर्यंत बळीराजा मोफत वीज योजना सुरु असणार आहे. ही योजना सुरु झाल्यानंतर तीन वर्षांनी योजनेचा कालावधी वाढवण्याबाबत विचार होणार आहे.

### १४ हजार ७६० कोटी रुपयांचा खर्च

या योजनेसाठी लागणाऱ्या आर्थिक तरतुदींबाबतही या आदेशात उल्लेख करण्यात आला आहे त्यानुसार, राज्यातील पात्र शेतकऱ्यांना मोफत वीज देण्यासाठी १४ हजार ७६० कोटी रुपयांचा खर्च शासनाला येणार आहे. पण या संपूर्ण रकमेचा भार आताच सरकार येणार नाही. कारण सरकार आधीच कृषीला सवलतीच्या दरात वीज देत होते. त्यासाठी सरकार जवळपास ७ हजार कोटी रुपये अनुदान देत होते. त्यात आता जवळपास एवढीच रक्कम सरकारला आणखी टाकावी लागेल.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



(छाया - राहुल कोरे)

**धाराशिव :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे चौकात प्रतिमापूजन आमदार कैलास घाडगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुकेश देडे, महेश देडे, प्रतापसिंह पाटील, नंदू राजेनिंबाळकर, राजसिंह राजेनिंबाळकर, आदी.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### लोहाऱ्यात डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन

**लोहारा, दि.१ ऑगस्ट -**

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्ताने प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पुजन प्रा. प्रभाकर गायकवाड व मधुकर रोडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोहारा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित चिंतळे, अभिमान खराडे, अविनाश माळी, दिपक मुळे, विजयकुमार ढगे, प्रशांत काळे, हाजी बाबा शेख, अमोल बिराजदार, दिपक रोडगे, अरुण रोडगे, प्रताप घोडके, श्रीकांत भरारे, लक्ष्मण रोडगे, इकबाल मुल्ला, दगडु तिगाडे, दिपक प्रकाश रोडगे, पत्रकार गणेश खबोले, आब्बास शेख, हरी लोखंडे, रघुवीर घोडके, विक्रांत संगशेट्टी, प्रमोद पोतदर, शिवा थोरात आदि उपस्थित होते.



### तेर ग्रामपंचायतीमध्ये अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**तेर, दि.१ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच दिदी काळे, विठ्ठल कोकरे, वैभव डीगे, बाळासाहेब रसाळ, अविनाश खांडेकर, अशपाक शेख, अभिमान रसाळ, सोमनाथ फासे, नामदेव कांबळे, बापू नाईकवाडी, धनंजय आंधळे, अमोल कसबे, लखन रसाळ आदी उपस्थित होते.



### मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, खाऊ वाटप

**जळकोट, दि.१ ऑगस्ट -**

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलनाचे रान पेटवणाऱ्या संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे विकास चूंगे मित्रमंडळाच्यावतीने जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त या दोन महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध मान्यवरांनी अभिष्टचिंतन केले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांना वाढदिवसानिमित्त खाऊ वाटप करण्यात आले. शाळेच्या मैदानावर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विकास चूंगे, रोहित शिंदे, नागराज कदम, गणेश सावंत, मंडळाचे कार्यकर्ते, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व सहशिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



### विकास खारगे यांचा आ. चौगुले यांच्या हस्ते सत्कार

**लोहारा, दि.१ ऑगस्ट -**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रधान सचिव विकास खारगे यांची अप्पर मुख्य सचिवपदी पदोन्नती झाल्याबद्दल यांची उमरगा, लोहारा तालुक्याचे आ. ज्ञानराज चौगुले यांनी सदिच्छा भेट घेऊन सत्कार करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी धाराशिव शिवसेना तालुका प्रमुख अजित लाकाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त शाखा अभियंता राजेंद्र माळी, उपस्थित होते.

### तेर-वाणेवाडी रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी

**तेर, दि.१ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर-वाणेवाडी रस्त्यावर खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. धाराशिव तालुक्यातील तेर वाणेवाडी रस्त्यावर विविध ठिकाणी खड्डे पडल्यामुळे त्या खड्ड्यात पाऊस पडल्यावर पाणी साठल्यावर वाहनधारकांना तेर-वाणेवाडी रस्त्यावरून जाताना पाण्यात असलेला खड्डा दिसत नसल्यामुळे वाहनधारक पडता पडता वाचले. त्यामुळे मानसिक त्रास होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तेर वाणेवाडी रस्त्यावरील खड्ड्याची दखल घेऊन बुजवावेत अशी मागणी वाहनधारकातून होत आहे.

# माझी लाडकी बहीण योजनेत ३० जुलैपर्यंत १ लाख १४ हजार महिलांचे अर्ज

## समित्यांची १ लाख ११ हजार अर्जांना मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट -**

धाराशिव जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनेत ३० जुलैपर्यंत जिल्ह्यातील १ लक्ष ९४ हजार ८१४ महिलांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केले आहे. प्राप्त अर्जापैकी तालुका समित्यांनी १ लक्ष ११ हजार ४०२ महिलांच्या अर्जांना मान्यता दिली आहे.



३० जुलै रोजी या एका दिवशी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील २२०६ महिलांनी आणि नागरी भागातील १२८६ महिलांनी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे अर्ज करण्यास सुरुवात झाली. त्या दिवसापासून ३० जुलैपर्यंत ग्रामीण भागातील ५२ हजार ८३८ महिलांचे आणि शहरी भागातील ४५४२ महिलांचे असे एकूण ५७ हजार ३८० अर्ज ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झाले. १ लाख ३० हजार ४३७ ग्रामीण महिलांचे आणि ६९९७ शहरी भागातील महिलांचे अशा एकूण १ लक्ष ३७ हजार ४३४ महिलांचे अर्ज ऑफलाइन पद्धतीने प्राप्त झाले. त्यापैकी ग्रामीण भागातील १ लक्ष ७ हजार ७१७ महिलांचे तर ग्रामीण भागातील ४२८५ महिलांचे अर्ज असे एकूण १ लक्ष ११ हजार ४०२ महिलांच्या अर्जांना तालुका समित्यांनी लाभासाठी पात्र ठरवले आहे.

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज करण्याची १५ ऑगस्ट २०२४ ही अंतिम मुदत असून जिल्ह्यातील पात्र ठरणाऱ्या महिलांनी योजनेच्या लाभासाठी अर्ज करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

## मनोज जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री तुळजाभवानी मातेस दुग्धाभिषेक



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ ऑगस्ट -**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दि.१ ऑगस्ट रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने श्री तुळजाभवानी मातेस सकाळी सकल मराठा समाजाचा वतीने तुळजाभवानी मातेस दुग्धअभिषेक करुन महाआरती करण्यात आली.

यावेळी मराठायोध्दा मनोज जरांगे. पाटील यांना मराठा आरक्षणासाठी लढण्यास बळे दे उत्तम आरोग्य लाभू दे अशी देवीचरणी मंदीरात प्रार्थना करुन साकडे घालण्यात आले. यावेळी मराठा समाज बांधवांनी मंदीर परिसर जय भवानी, जय शिवराय!, जरांगे पाटील तुम्ह आगे बडो हम तुम्हारे साथ!, एक मराठा लाख मराठा या घोषणांनी दणाणुन सोडला होता.

यावेळी तुळजापूर, धाराशिव येथील सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## दुचाकीस्वाराची एस.टी.ला धडक; एकजण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१ ऑगस्ट -**

भूम ते धाराशिव रोडवर वंजारवाडी फाट्याजवळ एस.टी. आणि दुचाकींचा अपघात झाला. या अपघातात मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला आहे. ही घटना गुरुवार दि.१ रोजी सकाळी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. तुळजापूर-लासलगाव ही बस भूमकडे येत होती. बस वंजारवाडी फाट्यानजीक आली असता हा अपघात झाला. यामध्ये मोटारसायकलस्वार विलास मारुती चव्हाण (वय ३०, रा, वाशी) हा गंभीर जखमी झाला आहे.

## बलसुर येथे भूकंप पुनर्वसनानंतर तब्बल तीस वर्षांनी मिळाले घरकुल धारकांना कबाले

### आ. ज्ञानराज चौगुले, प्रा. सुरेश बिराजदार यांच्या वाटप...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ ऑगस्ट -**

भूकंप पुनर्वसनानंतर तब्बल ३० वर्षांनी बलसुर येथील १३५ घरकुल धारकांपैकी ५८ जणांना कबाल्याचे वाटप दि.२९ रोजी आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादीचे नेते प्रा. सुरेश बिराजदार, नायब तहसीलदार किशोर कुलकर्णी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

१९९३ साली झालेल्या महाप्रलयंकारी भूकंपानंतर बलसुर येथे कासा कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून दहा एकर जागेमध्ये १३५ कुटुंबांना घरकुल बांधून दिले होते. पण सदरील जमीन ही महाराष्ट्र शासनाच्या नावेच असल्याने येथील लाभार्थींना मालकी हक्क मिळत नव्हता.



यासाठी मागील अनेक वर्षापासून येथील घरकुलधारकांना त्यांच्या मालकीचे कबाले मिळण्यासाठी शासन स्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार व विद्यमान आ. ज्ञानराज चौगुले सातत्याने पाठपुरावा करीत होते. या मागणीला यश आले असून १३५ पैकी ५८ जणांना जागेचे कबाले वाटप करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे यांनी सदर काबाले वाटपासाठी प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली.

यावेळी सरपंच जयश्री नांगरे, सुशांत गाजुलवर, जगदीश लांडगे, मंडळ अधिकारी हांगर्गे, ग्रामविकास अधिकारी पांढरे व लाभार्थी हजर होते.

## आर्य चाणक्य विद्यालयात लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट -**

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य विद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने प्रशालेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी या दोन महापुरुषांच्या आयुष्यातील काही प्रसंग आणि आठवणी सांगून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.

स्वराज्य माझा स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच अशी प्रतिज्ञा करून त्यासाठी आयुष्यभर वेगवेगळ्या माध्यमातून ब्रिटिशांशी संघर्ष करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली असल्यामुळे ब्रिटिश राजवटी विरुद्ध जनमत संघटित झाले. त्यामुळे त्यांचे कार्य हे स्वातंत्र्य लढ्यात खूप महत्त्वाचे असल्याची माहिती यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत फकिरासारखी कादंबरी लिहून सर्वसामान्य कामगारांच्या व्यथा आणि त्यांचं जगणं लिहून ठेवलं. सामान्यांसाठी झटणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावरही यावेळी सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला प्रशालेतील मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते.

## मुख्याध्यापकपदी जयप्रकाश कोळगे यांची नेमणूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नवनियुक्त मुख्याध्यापकपदी जयप्रकाश कोळगे यांची नेमणूक तर श्रीमती शिवकन्या साळुंके यांची विद्यालयाच्या प्रशासकपदी नेमणूक करण्यात आली.



या दोन्ही नवनियुक्तांचे स्वागत डॉफ आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते पुष्पहार व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना नेते राजनारायण कोळगे, बालाजी कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक के.ए. डोंगरे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपास्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश शेटे यांनी तर आभार सचिन कांबळे यांनी मानले.

## सातलिंग स्वामी यांना राज्यस्तरीय डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ ऑगस्ट -**

सातलिंग स्वामी यांना राज्यस्तरीय डॉ. कलाम राष्ट्रउभारणी प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त ड्रिम फाऊंडेशन व डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र आणि स्वयंम शिक्षण एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार-२०२४ हा सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, राजकिय क्षेत्रातील विषेश उल्लेखनिय कार्यासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे अध्यक्ष (कॅबिनेटमंत्री दर्जा) ना. ओमप्रकाश उर्फ बच्चू (भाऊ) कडू यांचे स्वीय सहाय्यक सातलिंग स्वामी यांना दि.३१ जुलै रोजी सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहामध्ये हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर-सहअध्यक्ष विठ्ठल रुक्मिणी मंदिर, पंढरपूर यांच्या हस्ते देण्यात आला.

याप्रसंगी शिवचरित्रकार शिवरत्न शेटे, ड्रीम फाऊंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ भातगुणकी, नरेंद्र गंभीरे-चेअरमन सिध्देश्वर सहकारी बँक सोलापूर, अरुणकुमार तळीखेडे- वरिष्ठ उपाध्यक्ष, भारतीय माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य, शिवाजी चालुक्य जिल्हाध्यक्ष माजी सैनिक संघटना, धाराशिव आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील विचारवंत, सोलापूर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कदेर ग्रा.पं. कार्यालयात अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कदेर गावातील ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व तसेच लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी सरपंच सतीश जाधव, पोलीस पाटील सुनील पाटील, गोविंद भोसले, दयानंद जाधव, विश्वनाथ शिंदे, सचिन शिंदे, शाम चौधरी, महादेव साखरे, अविनाश पाटोळे, कलेश्वर पाटोळे, शरद चौधरी, आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

## येडोळयाच्या २५१ महिलांचे लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१ ऑगस्ट -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथे तब्बल २५१ महिला लाभार्थींचे अर्ज ऑन लाईन अर्ज दाखल झाले असल्याची माहिती सरपंच झिमाबाई जाधव यांनी दिली.



ग्रामीण भागात सतत सर्वर डॉऊनची समस्या निर्माण होत असताना देखील येडोळा ग्राम पंचायतीच्या ग्रामसेविका एस.एन. गोरे, संगणक परिचारक अमित लोंढे, अंगणवाडी कार्यकर्ती शितल लोंढे, सुवर्णा लोंढे, सुमन राठोड, ग्रा.प. शिपाई माणिक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते नागेश लोंढे, तानाजी चव्हाण, आशा कार्यकर्ती नैना कांबळे, कविता जाधव आदींच्या प्रयत्नातून येडोळा ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या तांड्यातील मिळून २५१ महिला लाभार्थी यांचे ऑनलाईन अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

## नळदुर्गच्या किल्ल्याचा पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घेतला ताबा

### युनिटी मल्टीकॉन्स कंपनीचा करार संपुष्टात...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ ऑगस्ट -**

युनिटी मल्टीकॉन्स कंपनीबरोबरचा १० वर्षाचा करार संपुष्ठात आल्यानंतर दि.३१ जुलै रोजी पुरातत्त्व विभाग संभाजीनगरच्या सहाय्यक संचालक जया वाहने यांच्या मार्गदर्शनाखाली संभाजीनगर येथील पुरातत्त्व विभागाचे पर्यवेक्षक व्ही.पी. राठोड यांच्यासह त्यांच्या सहकार्याने नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडुन पुरातत्व विभागाच्या ताब्यात घेतला आहे.

किल्ला पुरातत्व विभागाच्या ताब्यात आल्यानंतर आता पर्यटकांना हा किल्ला विनामुल्य पाहता येणार आहे.



नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला महाराष्ट्र शासन व पुरातत्व विभागाने दहा वर्षांपुर्वी म्हणजे सन २०१४ साली महाराष्ट्र राज्य संरक्षित स्मारक संवर्धन योजनेंतर्गत सोलापुर येथील युनिटी मल्टीकॉन्स कंपनीला हा किल्ला संगोपणासाठी दिला होता. ऐतिहासिक किल्ला खाजगी कंपनीला संगोपणासाठी देण्याची राज्यातील ही पहिलीच घटना होती.

आता किल्लूयाचा ताबा पुन्हा एकदा पुरातत्व विभागाकडे गेल्याने किल्लूयात युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने पर्यटकांसाठी केलेल्या या सर्व सुविधा आता बंद झाल्या आहेत.

त्याचबरोबर गोल्फ कार व घोडेस्वारही आता बंद करण्यात आले आहे. त्यामुळे किल्ला पाहण्यासाठी येणारे पर्यटक आता या सुविधा मिळणार नसल्याने नाराज होणार आहेत.

दि.३१ जुलै रोजी नळदुर्गचे पुरातत्व विभागाचे किल्ला इन्चार्ज नागनाथ गवळी, पहारेकरी आकाश बोकडे, रीतेश कांबळे, राहुल पल्ले व शिपाई दिलीप साळवे यांनी हा किल्ला युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडुन पुरातत्व विभागाच्या ताब्यात घेतला आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### १ ऑगस्टपासून ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी

**धाराशिव, दि.१ ऑगस्ट -**

भारत निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व जिल्ह्यात १ ऑगस्टपासून ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीनची प्रथमस्तरीय तपासणी सुरू करण्याचे निर्देश दिले आहे. बंगलोर येथील बेल या उत्पादक कंपनीकडून ही तपासणी करण्यात येणार आहे. बंगलोर येथील भारत इलेक्ट्रॉनिक कंपनीच्या सहा अभियंत्यांची नियुक्ती तपासणीसाठी भारत निवडणूक आयोगाने केली आहे. धाराशिव तालुक्यातील मौजे पिंपरी येथील शासकीय ईव्हीएम व्हीव्हीपॅट गोदामात १ ऑगस्टपासून या मशीनची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात येणार आहे.या कामासाठी आवश्यक अधिकारी,मास्टर ट्रेनर/ मदतनीस यांची नियुक्ती करण्यात आली आहे.हे तपासणीचे कामकाज एक महिना सुरू राहणार आहे. हे काम सकाळी ९ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत पोलीस बंदोबस्तात होणार आहे. जिल्ह्यातील मान्यताप्राप्त व नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी/प्रतिनिधी यांनी ईव्हीएम व्हीव्हीपॅट मशीनची प्रथमस्तरीय तपासणीच्या वेळी उपस्थित राहून ईव्हीएम मशीनविषयी माहिती जाणून घ्यावी. याबाबत काही शंका,प्रश्न असतील तर त्याचे निराकरण भारत इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या अभियंत्यांकडून करून घ्यावे, असे जिल्हा निवडणूक अधिकारी शिरसाधव यांनी कळविले आहे.

### निर्देशक प्रा.नितीन अष्टेकर सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार

**लोहारा, दि.१ ऑगस्ट -**

शंकरराव जावळे पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय लोहारा येथील शारिरीक शिक्षण निर्देशक प्रा.नितीन अष्टेकर हे नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रमेशराव पाटील होते. तर प्रमुख म्हणुन प्राचार्य डॉ.शेषेराव जावळे पाटील, संस्थेचे संचालक जनार्दन पाटील, उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने प्रा.नितीन अष्टेकर यांचा शाल श्रीफळ बुफे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. व तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय यांच्या वतीने अंकुश शिंदे आणि काकासाहेब आनंदगावकर यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या निरोप समारंभ प्रसंगी प्राचार्य शेषेराव जावळे पाटील यांनी प्रा.नितीन अष्टेकर यांच्याबद्धल गौरव उद्‌गार काढून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारमुर्ती प्रा.नितीन अष्टेकर यांनी आपल्या सेवाकाळातील अनुभव सांगुन संस्थेबद्दल ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शिवाजी कदम यांनी केले तर आभार डॉ.प्रभाकर गायकवाड यांनी मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी, अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**उमरगा, दि.१ ऑगस्ट -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरमध्ये लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या तर गोपाळ आष्ट गोविंद जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती याप्रसंगी टिळकांच्या व अण्णाभाऊंच्या जीवनावर अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### दिव्यांग बांधवांसाठी आज दिव्यांग तपासणी कॅम्पचे आयोजन

**परंडा, दि.१ ऑगस्ट -**

परंडा तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी २ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेमध्ये दिव्यांग प्रमाणपत्र शिबिराचे आयोजन केले आहे तरी तालुक्यातील जे दिव्यांग बांधव यु डी आय डी कार्ड प्रमाणपत्र काढायचे राहिले असतील अशा दिव्यांग बांधवांनी आपली कागदपत्रे व ऑनलाईन पावती घेऊन तपासणी करण्यासाठी यावे, असे आवाहन आपणास दिव्यांग उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तानाजी घोडके व जिल्हाशल्यचिकित्सक अधिकारी धाराशिव व उपजिल्हा ग्रामीण रुणालय परांडा डॉ.विश्वेश कुलकर्णी यांच्या वतीने कळविण्यात येत आहे.

# भाजपा कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती भारतीय जनता पार्टी कार्यालय प्रतिष्ठान भवन धाराशिव येथे साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे मा. जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा आपल्या लेखणीतून रशियापर्यंत पोहोचवणारे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे हे विज्ञानवादी दृष्टिकोनातून पृथ्वी ही शेषनागाच्या डोक्यावर तरलेली नसून ती कामगार व कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे असे ठामपणे सांगत होते.

अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी कथा, कादंबऱ्या, वगनाट्य, प्रवासवर्णने, लोकगीते, पोवाडे इत्यादी साहित्यांची निर्मिती केली. त्यांच्या सबंध साहित्यात महाराष्ट्र प्रेमाची आस दिसून येते.

अण्णाभाऊंच्या साहित्यामध्ये मुंबई बरोबरच कृष्णा कोयना वारणेचा सजीव देखावा रेखाटलेला असून निसर्ग प्रेमाची आस्था अण्णाभाऊंच्या साहित्यातून दिसून येते. त्यांचे एकूण सामाजिक कार्य व साहित्य हे ग्रामीण जीवनाची व्यथा व कथा सांगणारे असून त्यांचे जीवन समाजासाठी सामाजिक न्याय आणि हक्कांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत नितीन काळे यांनी यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष अभय इंगळे, निहाल काझी, बाळासाहेब खांडेकर, उद्धव पाटील, नामदेव नायकल, अमोल पाटील, शिवाजी गव्हाणे, अमर बाकले, सागर दंडनाईक यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण : उत्पन्नासाठी स्वघोषणापत्र सादर करता येणार १५ ऑगस्टपर्यंत ग्राह्य धरणार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट-**

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री-म‌झी लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आहे.

जिल्ह्यात लाभास पात्र असलेल्या जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे नियोजन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यातील कोणतीही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेवून यंत्रणा काम करीत आहे. जिल्ह्यात ग्रामीण आणि शहरी भागातील लाभार्थ्यांकडून या योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरु आहे.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा जे लाभार्थी लाभ घेवू इच्छितात परंतू अशा लाभार्थ्यांकडे पिवळे/केशरी शिधापत्रिका (रेशनकार्ड) नाही,अशा लाभार्थ्यांनी त्यांना २ लक्ष ५० हजार रुपयांचे उत्पन्न प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज केला असेल परंतू ते उत्पन्नाचे प्रमाणपत्र ऑनलाईन मिळविण्यासाठी सर्व्हरची अडचण येत असेल. त्यामुळे त्या लाभार्थ्याला उत्पन्नाचे प्रमाणपत्र मिळण्यास लागणारा विलंब लक्षात घेता अशा अर्जदारांकडून त्यांचे कुटूंबातील एकूण उत्पन्न २ लक्ष ५० हजार रुपये असल्याचे संबंधित अर्जदाराकडून स्वघोषणापत्र भरुन घ्यावे. संबंधित अर्जदार यांचेकडून स्वघोषणापत्र भरुन घेण्याची जबाबदारी संबंधित गावाच्या तलाठ्याची राहील.हे स्वघोषणापत्र फक्त मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेसाठी १५ ऑगस्ट २०२४ पर्यंतच ग्राह्य धरण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील या योजनेच्या लाभासाठी पात्र असलेल्या महिलांनी योजनेसाठी अर्ज करावे.असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आळणी येथे प्रतिमा पुजन व रक्तदान शिबिर, शालेय साहीत्याचे वाटप वृक्षारोपण हे सर्व उपक्रम राबविण्यात आले. गावचे सरपंच प्रमोद वीर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी धर्मराज सूर्यवंशी, पवन पौळ,संतोष चौगुले, बाबासाहेब घाटे, कृष्णा गाडे दादासाहेब गायकवाड, युवराज पौळ, दीपक कदम, अमर कोळी, बाबासाहेब कांबळे, हनुमंत कांबळे आदी दिसत आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त आज १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव उपजिल्हाधिकारी सर्वश्री संतोष भोर, शिरीष यादव, श्रीमती गायकवाड, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, तहसीलदार प्रवीण पांडे, महसूल सहाय्यक नाना मुंडे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाल वारकऱ्यांच्या मृदंग वादनाने दुमदुमतोय परीसर

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१ ऑगस्ट-**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील श्री संत गोरोबा काका यांच्या पवित्र पावण भूमीमध्ये हभप रघुनंदन महाराज पुजारी यांनी स्थापन केलेल्या वैराग्य महामेरू वारकरी शिक्षण संस्थेच्या बाल वारकऱ्यांच्या मृदंग वादनाने दुमदुमतोय तेर परीसर.त्यामुळे चैतन्यमय वातावरण पहावयास मिळते.



धाराशिव तालुक्यातील तेर येथे हभप रघुनंदन महाराज पुजारी यांनी २००८ वैराग्य महामेरू वारकरी शिक्षण संस्थेची स्थापना केली. या शिक्षण संस्थेत पहिली ते बारावी पर्यंत ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.दररोज विद्यार्थ्यांकडून पहाटे चार ते सहा पर्यंत मृदंग (पकवाज) वाजविण्याची शिकवण दिली जाते.सकाळी सात ते नऊ पर्यंत गितेचा पाठ व पंचीकरण करून घेतले जाते. नऊ ते दहा पर्यंत भोजन दिले जाते. दहा ते साडेचार पर्यंत प्रशालेतील वर्ग दुपारी पाच ते सहा विद्यार्थ्यांसाठी गणित विषयाचा जादा तास त्यांच्या अध्यापनात वाढ व्हावी म्हणून घेतला जातो. तसेच सायंकाळी साडेसहा ते आठ पर्यंत इंग्रजी विषयाचे ज्ञान व्हावे म्हणून जादा तास घेतले जातात. सायंकाळी आठ ते नऊ या वेळात भोजनासाठी वेळ दिला जातो तर नऊ ते दहा पर्यंत अभ्यासासाठी विद्यार्थी यांना दिला जातो. या शिक्षण संस्थेत शालेय शिक्षणाबरोबरच हरीपाठ, किर्तन, प्रवचनाबरोबर हार्मोनियमचे धडे दिले जातात. त्याच बरोबर मृदंग वादनही शिकवले जाते. आळंदी येथून वारकरी सांप्रदायाचे शिक्षण घेऊन आलेले हभप रघुनंदन म हाराज पुजारी हे विद्यार्थी यांना प्रशिक्षण देतात. वैराग्य महामेरू वारकरी शिक्षण संस्थेतील बाल वारकऱ्यांचे मृदंग वादन थक्क करणारे आहे.मृदंग वादनाबरोबर कार्तन, प्रवचन, भजन यामध्ये तरबेज झालेले आहेत.दररोज पहाटे दररोज बाल वारकऱ्यांच्या मृदंगानी तेर परीसर प्रतिदिन घुमतोय आणि चैतन्यमय वातावरण निर्माण होऊन उपस्थितांची मने आनंदून जातात.

# नळदुर्ग अप्पर तहसीलची मागणी अद्यापही प्रलंबितच

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ ऑगस्ट-**

नळदुर्ग शहर हे परीसरातील ५० ते ६० गावांसाठी माध्यवर्ती ठिकाण आहे त्यामुळे नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय व्हावे अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासुन नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीक शासनाकडे करीत आहेत मात्र नेहमीच या मागणीला शासनाकडुन केवळ आश्वासनच मिळत आहे. कांही दिवसांपुर्वी राज्यसरकारने राज्यात अनेक ठिकाणी नविन अप्पर तहसिल कार्यालय सुरु केले आहे मात्र नळदुर्ग येथे अजुनही अप्पर तहसिल कार्यालय मंजुर झाले नाही त्यामुळे भविष्यात नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु होणार की नाही याबद्दल संशय व्यक्त केला जात आहे.

नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी नळदुर्ग शहर व परीसरातील नागरीक गेल्या अनेक वर्षांपासुन शासनाकडे मागणी करीत आहेत मात्र प्रत्येक वेळी शासनाकडुन आश्वासनाशिवाय दुसरं कांही मिळालेच नाही. आजही नळदुर्ग तालुका होईल ही आशा नळदुर्ग शहरातील नागरीक बाळगुन आहेत. सन १९९९ साली राज्यात महायुतीचे सरकार असताना राज्यात अनेक ठिकाणी नविन तालुक्यांची निर्मिती करण्यात आली मात्र त्यावेळीही नळदुर्ग शहर तालुक्यापासुन वंचितच राहिले. ऐकेकाळी नळदुर्ग शहर हे विभागाचे, जिल्ह्याचे व तालुक्याचे ठिकाण होते. मात्र निजाम राजवटीत नळदुर्ग शहराची मोठी अधोगती झाली तेंव्हापासुन ही अधोगती सुरूच आहे. आज नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा द्यावा यासाठी अनेक वर्षे शासन दरबारी प्रयत्न सुरु असताना आजही नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळाला नाही ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. नळदुर्ग शहराला केवळ राजकीय अभावामुळे आजपर्यंत तालुक्याचा दर्जा मिळु शकला नाही हे निर्विवाद सत्य आहे. कारण नळदुर्ग शहरात असे राजकीय नेतृत्व नाही की ज्याची शासन दरबारी किमत आहे. अनेकांनी नळदुर्गकरांना तालुक्याच्या प्रश्नाबाबत आजपर्यंत झुलवत ठेवले आहे.

नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळेपर्यंत नळदुर्ग शहरात अप्पर तहसिल कार्यालय सुरु करावे ही मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे मात्र या मागणीचीही राज्यसरकरने दखल घेतली नाही. नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु झाले तर याचा फायदा नळदुर्ग शहर व परीसरातील ७० ते ८० हजार नागरीकांना होणार आहे. आज सिंदगाव, कुन्सावळी, बोळेगाव यासाह अनेक गावातील नागरीकांना लहान सहान कामासाठी ६० किलोमिटर अंतरावर असलेल्या तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत आहे. याचा नागरीकांना मोठा त्रास होत आहे.अप्पर तहसिल कार्यालय नळदुर्ग येथे सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाकडे दाखल करण्यात आला आहे मात्र प्रत्येक वेळेस शासनाकडुन नळदुर्गवर अन्यायच झाला आहे.

गेल्या कांही दिवसांपुर्वी राज्यसरकारने राज्यात अनेक ठिकाणी अप्पर तहसील कार्यालय सुरु केले आहेत मात्र याहीवेळी नळदुर्ग शहराला राज्यसरकारकडुन ठेंगाच मिळाला आहे.

वास्तविक पाहता यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्यामुळे नळदुर्ग येथे अप्पर तहसिल कार्यालय सुरु होईल अशी शक्यता वर्तविली जात होती मात्र तीही आज सपशेल फोल ठरली आहे.त्यामुळे येणाऱ्या काळातही नळदुर्ग शहरात अप्पर तहसिल कार्यालय सुरु होणार की नाही याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. नळदुर्ग शहरात अप्पर तहसिल कार्यालय सुरु झाले तर शहर व परीसरातील नागरीकांची यामुळे मोठी सोय होणार आहे त्याचबरोबर शहराच्या विकासाला गती येण्याबरोबरच शहरातील बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे त्यामुळे नळदुर्ग येथे तात्काळ अप्पर तहसिल कार्यालय सुरु होणे गरजेचे आहे.

## उप-निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)

**मराठवाडा अर्बन बॅक्स् को-ऑप.असोसिएशन लि., छत्रपती संभाजी नगर**
**अर्बन बँक भवन, प्लॉट नं. २७, विकासपुरी, चिनार गार्डन जवळ, पडेगांव, छत्रपती संभाजी नगर, ४३१००२**

**जाहिर नोटीस**

अर्जदार बँक : जनकल्याण अर्बन को ऑफ बैंक लि.कळंब
मुख्य कार्यालय : कळंब
जा.क्रं. जा.नो.१०१/६३/२०२४-२५

**विरूध्द**
**जाब देणार**

| अ.क्रं. | दावा क्रं. | कर्जदाराचे नाव | जामीनदाराचे नाव | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३४१/२०२४-२५ | मयुर मधुकर वट्टमवार रा.गणेश टेक्सटाईल्स शिवाजी चौक, मोढा रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर | सौ. कृष्णाबाई अनिल वट्टमवार रा.खाणगा गल्ली, रावीकर निवास उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ८६८९७१/- |
| २ | ३४२/२०२४-२५ | मयुर मधुकर वट्टमवार रा.गणेश टेक्सटाईल्स शिवाजी चौक, मोढा रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर | सौ. कृष्णाबाई अनिल वट्टमवार रा.खाणगा गल्ली, रावीकर निवास उदगीर ता.उदगीर जि.लातूर | ३४५३१६/- |
| ३ | ३४३/२०२४-२५ | प्रदिप विठ्ठलराव जाधव, मु.पो. तोंडचिर ता.उदगीर जि. लातूर | ज्ञानोबा विपीन जाधव मु.पो. तोंडचिर उदगीर जि.लातूर संतोष प्रेमचंद बोदनकर मु.पो. तोंडचिर उदगीर जि.लातूर | ७६१५०/- |
| ४ | ३४४/२०२४-२५ | राहुल भगवंत कवडे , मु.पो.कन्हेरवाडी ता.कळंब जि. धाराशिव | सुरेंद्र बळीराम तांबारे राजेंद्र बळीराम तांबारे मु.पो.आंदोरा ता.कळंब | ४७००७५/- |
| ५ | ३४५/२०२४-२५ | महेश महादेव धायगुडे स्वराज ट्रेडर्स शारदा नगर, परळी वै. ता.परळी जि.बीड | महादेव रंगनाथ धायगुडे मिलींद विद्यालय, गणेश पार रोड परळी वै. ता.परळी जि.बीड ज्ञानेश्वर अकुंश राऊत, पटाईत गल्ली अंबाजोगाई | ७०७४३६/- |
| ६ | ३४६/२०२४-२५ | महादेव रंगनाथ धायगुडे मिलींद विद्यालय, गणेश पार रोड परळी वै. ता.परळी जि.बीड | -- | १४४७७०/- |
| ७ | ३४७/२०२४-२५ | धनराज व्यंकट सोनवणे रा. बोधी घाट, आंबेडकर चौक अंबाजोगाई | अंतिम सुर्यकांत बनसोडे रा. बोधी घाट, आंबेडकर चौक अंबाजोगाई | ११६१६९/- |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या प्रतिवादीना अर्जातील रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादींना समन्स रूजू न झाल्याने व त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहिर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यांसाठी स्वतः जातीने दिनांक २१/०८/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यांसंबंधी कागदपत्रासह आपण या न्यायालयात हजर राहवे. या नोटीसीद्वारे प्रतिवादींना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक ३१/०७/२०२४ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहिर समन्स दिला आहे.

**सुनावणीचे ठिकाण**

**उपनिबंधक सहकारी संस्था ( परसेवा ) मराठवाडा अर्बन बॅक्स् को.ऑपरेटीव्ह असोसिएशन लि.अर्बन बँक भवन, प्लॉट क्र २७ विकासपुरी चिनार गार्डन जवळ, पडेगांव, छत्रपती संभाजी नगर उपनिबंधक सहकारी संस्था (परसेवा) मराठवाडा अर्बन बॅक्स को. ऑप. असो. लि., छत्रपती संभाजी नगर**

# शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त धाराशिव येथे नाट्य जागर

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडून आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ ऑगस्ट-**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या शंभराव्या नाट्य संमेलनानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. याच अनुषंगाने धाराशिव येथे १५ ते १८ ऑगस्ट या कालावधीत नाट्यप्रेमी, कलाकार व रसिकांसाठी नाट्य जागर होणार आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील नाट्य कलावंत, रसिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नियामक मंडळ, मुंबईचे सदस्य तथा धाराशिव शाखेचे अध्यक्ष विशाल शिंगाडे यांनी केले आहे.



शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात १५ ते १८ ऑगस्ट असे चार दिवस नाट्य जागर कार्यक्रमात सुगम गायन, झाडीपट्टी व्यवसायिक नाटक तसेच सिने कलाकारांचे व्यावसायिक नाटक व लावणी महोत्सव व अनेक नाटकांची मेजवानी सादर करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र लोककला संचालनालयाचे प्रमुख तथा संचालक डॉ. गणेश चंदनशिवे हे तमाशाच्या इतिहास कार्यक्रम सादर करणार आहेत. कार्यक्रमास पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत, खासदार ओम प्रकाश राजेनिंबाळकर, आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील, आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांच्यासह नाट्य व सिने अभिनेते तथा नाट्य परिषदेचे केंद्रीय शाखेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मराठी नाट्यसृष्टीतील विविध कलावंत हजेरी लावणार आहेत. तरी नाट्यप्रेमी, कलाकार व रसिकांसाठी नाट्य जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील नाट्य कलावंत, रसिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन नाट्य परिषदेच्या धाराशिव शाखेच्यवतीने करण्यात आले आहे. धाराशिव तालुक्यातील विद्यार्थी गटासाठी व खुल्या गटासाठी नाट्य व नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यशस्वी प्रथम तीन विजेत्यांना भरघोस बक्षिसे दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या असून खुला गट इयत्ता अकरावीपासूनचा असणार आहे. नाट्य सादरीकरणासाठी एक तासाचा वेळ आहे. नृत्य सादरीकरणासाठी १० मिनिटे वेळ असणार आहे.

सादरीकरणासाठी लागणारे सर्व साहित्य संबंधितांनी स्वतः आणावयाचे आहे. या कार्यक्रमात तालुक्यातील लोककलावंताचा मेळावा होणार आहे. त्यांना सादरीकरणही करण्याची संधी दिली जाईल. त्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. सादरीकरण करणार्या लोककलावंतांना एस. टी. प्रवासभाडे खर्च दिला जाणार आहे. इच्छूकांनी नाट्यपरिषदेच्या पदाधिकारी शशिकांत माने मो. ९४२१३६१५०१, सतिश ओव्हाळ मो. ९६२३६६५८१७, योगेश वाघमारे मो. ९८८१९९९६९९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

## जाहीरनामा

**उमरगा येथील श्रीमती जी. पी. बनकर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर..उमरगा**

**दिवाणी किरकोळ अर्ज क. १९४/२०२४ नि.क्र.**

**अर्जदार - लक्ष्मी तुकाराम कानडे वय ४८ वर्ष रा. कार्ला,ता.औसा जिल्हा लातूर**

ज्यापेक्षा मयत के. भारताबाई विठ्ठल जमादार मृत्यु समयी ठिकाण मौजे तुरोरी, ता. उमरगा जि. धाराशिव येथे दिनांक ०४/०७/२०१० रोजी मयत झाले असुन अर्जदार १. नंदा विरेंद्र गोसूल, वय-५४ वर्षे, २. पदमीनी बाबु शिरसे, वय-४२ वर्षे, हे वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यकता आहे म्हणुन वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची मयत के. भारताबाई विठ्ठल जमादार यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**पुढील नेमलेली तारीख २८.०६.२०२४**
**आज दि.०१.०६.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.**

**स्वाक्षरित/-** **कनिष्ठ लिपीक** | **स्वाक्षरित/-** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, उमरगा**

# रंग रंगोटीच्या कामापासून विष्णुपुरी प्रकल्पावर चढला 'गुत्तेदारीचा रंग'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १ ऑगस्ट -**

येथील कै. डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाचे स्टॉप लॉग गेट वाहून जाणे, मधल्या बाजूचे गेट वाहून जाणे. असे प्रकार मागील काळात घडले असले तरी पाटबंधारे विभागाला याचे गांभीर्य नसून पुन्हा प्रकल्पाचा कारभार गुत्तेदारांच्या हातात देण्यात आला आहे. पूर्वी सर्व कामे यांत्रिकी, विद्युत कर्मचाऱ्यांनीच केली. परंतु रंग रंगोटीच्या कामापासून प्रकल्पावर गुत्तेदारीचा रंग चढला असून शासनाने कायमस्वरूपी या प्रकल्पावर तांत्रिक कर्मचारी नेमण्याची गरज असल्याचे मत सेवानिवृत्त अभियंते तथा कर्मचारी व्यक्त करत आहेत.



कै. डॉ. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प यांत्रिकी कर्मचाऱ्यांनी विद्युत कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने उभा केला. अनेक वेळा पंपाची देखभाल, पाईपलाईनची दुरुस्ती अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय कर्मचाऱ्यांनी केली. कालांतराने कर्मचारी सेवानिवृत्त झाले. परिणामी कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास शून्यावर आली आहे. शून्य कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या टप्प्यात अधिकाऱ्यांनी देखील गलथालपणा केला. उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेण्याऐवजी गुत्तेदारांकडून कामे करून घेण्यात आली. ही कामे देण्याची पद्धत रंगरंगोटी पासून सुरू झाली. जुलै २०१५ मध्ये प्रकल्प, पाईपलाईन रंग रंगोटी आदिसह अन्य कामासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. याच कामापासून प्रकल्पावर गुत्तेदारी सुरू झाली. रंग रंगोटी पासून सुरू झालेली गुत्तेदारीची कामे अगदी गळती बंद करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोणी टाकण्याच्या व्यवस्थेपर्यंत गेली आहेत. यात शासकीय अधिकाऱ्यांना माल आणि गुत्तेदारांना काम मिळत गेले. त्यामुळे उपलब्ध असलेले कर्मचारी सोकावून गेले आणि अखेर सेवानिवृत्त झाले. आता प्रकल्पाची सर्व जबाबदारी गुत्तेदारावर असल्याचे दिसून येत आहे.

**४० कायम तांत्रिक कर्मचारी असणे गरजेचे**

गुत्तेदारांच्या माध्यमातून काम करताना स्टॉप लॉग गेट वाहून जाणे, मधल्या बाजूचे मोठे गेट वाहून जाणे, लोखंडाची चोरी होणे असे अनेक प्रकार घडले आहेत. कमिशनच्या नादात प्रकल्प वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नवीन पंप आणि पाईपलाईन कामासाठी १६० कोटी मंजूर करण्याबरोबरच अत्यंत महत्त्वाचे असलेल्या या विष्णुपुरी प्रकल्पवर अभियंत्याबरोबरच किमान ४० कायम तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# आ. राजेश पवार घेणार शेतकऱ्यांच्या हितांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, १ ऑगस्ट -**

नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश पवार हे आता आपल्या मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या हितासाठी एक मोठा निर्णय घेण्याची शक्यता असून अगदी तंतोतंत सहकार तत्त्वावर चालणारा व शेतकऱ्यांना जास्तीत जास्त फायदा मिळवून देणारा मोठा साखर कारखाना सुरू करण्यासाठी जागा पाहणी चालू केल्याचे विश्वसनीय वृत्त असून त्या पार्श्वभूमीवर मात्र तथाकथित मंडळींमध्ये एकच खळबळ उडाली आहे.



आमदार राजेश पवार हे धाडसी निर्णय घेऊन त्या निर्णयाची पूर्तता करणारच अशी ख्याती अख्या नायगाव मतदारसंघात पसरली आहे. नायगाव मतदार संघातील तिन्ही तालुक्यातील भौगोलिक क्षेत्र, गोदावरी नदीच्या दोन्ही बाजूने पसरलेले सुपीक खोरे, भारतभर जोडणारी दळणवळण यंत्रणा, वीज, पाणी, रस्ते, आदी कारखानदारीसाठी असलेल्या अनुकूल गोष्टी आमदार राजेश पवार यांच्या नजरेतून सुटल्या नाहीत!

## मतदार संघात साखर कारखानासाठी जागेची पाहणी सुरू!

पश्चिम महाराष्ट्र हा सहकार तत्वावर साखर कारखान्यासहित वेगवेगळे उपक्रम अगदी प्रामाणिकपणे राबवून अग्रेसर राहिला आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वांनीच सहकार तत्वे प्रामाणिकपणे अमलात आणल्यामुळे भरभराट झाली. पण मराठवाड्यात जे काही साखर कारखाने चालू आहेत आणि बंद पडलेले आहेत ते निव्वळ तथाकथित मंडळींना चरण्यांचे कुरण बनले आहे. त्यातच शेतकऱ्यांची भयंकर लूट होत असते. मनाजोगा ऊसाला भाव मिळत नसतो, भाव मिळाला तर वजनामध्ये काटा मारणे,त्यांच्या बिलांचे पैसे वेळेवर न मिळणे अशा गोष्टी घडत असतानाच या साखर कारखान्यामध्ये राजकारण पण घुसल्या गेले आहे. आम्हाला मतदान केले तरच तुमचा ऊस कारखान्यावर नेवू नाहीतर तो तसाच सडून जाईल अशा धमक्याही जे आज घडीला साखर कारखाने चालू आहेत त्या परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना आलेल्या असल्याच्या बातम्याही प्रकाशित झालेल्या आहेत.

नायगाव मतदारसंघातील तीनही तालुक्यातील भौगोलिक क्षेत्र हे कारखान्यासाठी अनुकूल असून सुजलाम सुफलाम आहे आणि या भागातील गोदावरी मनार सारखा साखर कारखाना बंद झाला.त्यामुळे शेतकऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. एकंदरीतच उपरोक्त सर्व पार्श्वभूमीवर आमदार राजेश पवार हे साखर कारखाना काढण्यासाठी जागा पाहणी करत असल्याच्या प्रतिक्रिया गेल्या दोन महिन्यापासून येत आहेत.

आज दैनिक देशोन्नतीने थेट त्यांच्याशी याबाबत चर्चा केली. आपण खरोखरच साखर कारखाना काढणार का? असा प्रश्न विचारला असता होकार किंवा नकार न देता पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणे सहकार तत्वावरील साखर कारखानेच नव्हे तर अनेक उपक्रम आपण प्रामाणिकपणे आपल्या मतदार संघात राबवू, त्यामध्ये शेतकऱ्यांनाही भागीदारी देऊ आणि सहकार तत्वावरील साखर कारखाना कसा असतो, त्यामुळे आपल्या भागाचा विकास कसा होतो, प्रत्येक शेतकऱ्यांचे जीवनमान दिवसागणिक कसे उंचावते हे आपण दाखवणारच आहोत अशा प्रतिक्रिया देत अनुकूल जागा मिळताच आपण कुठलीही हयगय न करता साखर कारखाना बांधणी चालू करणार असल्याच्या प्रतिक्रिया त्यांनी दिल्या.

आमदार राजेश पवार हे खरोखरच असे धाडसी निर्णय घेतात व ते सत्यात उतरतात हे मतदारसंघाले पाहिले असल्यामुळे त्यांच्या उपरोक्त निर्णयामुळे तथाकथितां मध्ये एकच खळबळ उडाली असून मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये मात्र एक आश्वासक विश्वासक वातावरण निर्माण होत आहे. नायगाव मतदार संघ परिक्षेत्रात नवीन साखर कारखाना टाकण्यासाठी मार्गदर्शन व जागा अवलोकन करण्यासाठी साखर कारखाना उभारणीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या कंपनी ची एक टीम आमदार राजेश पवार यांनी मतदार संघात सर्वे साठी नेमली असून गेल्या दोन महिन्यापासून त्या तज्ञ टीमचे सर्वे चालू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

## संक्षिप्त वृत्त



### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने माधव गोटमवाड सन्मानित

**कंधार-** पुणे येथे मराठा चेबर हॉल मध्ये आयोजित दैनिक चालु वार्ता चा तृतीय वर्धापन दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये पत्रकार क्षेत्रातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा वृतसंकलन व लिखाणाबद्दल उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार २८ जुलै रोजी पुणे येथील मराठा चेंबर्स सभागृहात पुणे महानगरपालिकेच्या प्रथम महिला तथा पुणे शहर काँग्रेसच्या ज्येष्ठ महिला नेत्या कमल व्यवहारे , प्रशांत गांधी ( सरचिटणीस राष्ट्रवादी) पुणे शहर, दै.चालु वार्ता चे मुख्य संपादक डी. एस.लोखंडे पाटील,बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले,माजी महापौर प्रशांत जगताप, इस्कॉस टेम्पल चे अध्यक्ष प्रभुजी, आम आदमी पक्षाचेचे नेते अनेक राजकीय, सामाजिक नेते या मान्यवरांच्या उपस्थितीत स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, शाल देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले.दै.चालु वार्ता च्या ३ ऱ्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून पुरस्कार वितरण व सत्कार सोहळाचे आयोजन या वेळी करण्यात आले होते. दै. चालु वार्ताचे संपादक डी एस लोखंडे पाटील ,कमल व्यवहारे, अभिजीत बिचुकले, प्रशांत जगताप, प्रभु, प्रशांत गांधी यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्याचे संस्थापक जाणते राजे तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले , पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करुन शाल, पुष्पहार श्रीफळ सदर महापुरुषांच्या आदर्शवत अशा कार्यप्रणालीवर प्रकाश टाकला गेला. दैनिक'चालु वार्ता' या मराठी दैनिकाचे कंधार तालुका प्रतिनीधी माधव गोटमवाड यांचा प्रशांत गांधी ( सरचिटणीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर ) यांच्या हस्ते दि. २८ जुलै २०२४ रोजी 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला . कागने कोचिंग क्लासेस कंधार येथे मिळालेल्या पुरस्कारा बद्दल सत्कार करण्यात आला.यावेळी उपस्थित संचालक परमेश्वर कागने, अंतेश्र्वर कागने, विकास चव्हाण , गावंडे सर उपस्थित होते.. माधव गोटमवाड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल सामाजिक , राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.यावेळी उत्कृष्ट पत्रकारितेमध्ये अनेक पत्रकारांचा यथोचित मान-सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित मान्यवर आणि समस्त पत्रकारांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

### उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे मोफत आरोग्य शिबीर

**देगलूर**-शहरातील भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते दिगंबर कौरवार आणि मित्र परिवार यांच्या वतीने सलग पाच वर्षापासून महाराष्ट्र राज्याचे प्रभावी आणि कर्तृत्ववान उपमुख्यमंत्री सन्माननीय देवेन्द्रजी फडणवीस आणि माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी भाजपा मा. जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पा गोजेगावकर, उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर, मा नगराध्यक्ष नंदु आण्णा दाशेटवार शिवाजी मामा कनकंटे,उपसभापती रवींद्र पाटील,रमेश पाटील हाळीकर, शिवकुमार देवाडे, मारोती पुलुचवाड, प्रशांत पाटील आचेगावकर अशोक गंदपवार ,भावना दाशेटवार सतिश जोशी , डॉ मलशेटवार, डॉ तम्मेवार, डॉ सुरनर, डॉ पियूष तम्मेवार, डॉ चिलवरवार, डॉ तहाडे, डॉ थडके, डॉ लाडके हे उपस्थित होते.याप्रसंगी एकूण १०७३ रुग्णांची तपासणी करण्यात आली यात डोळ्याचे ७५ रुग्ण तपासण्यात आले, सर्जरी २४२ रुग्ण तपासण्यात आले, दाताचे ७२ रुग्ण, त्वचारोग तपासणी ५८, हृदय रोग , दमा, शुगर यांचे ३५२ रुग्ण तपासण्यात आले, ई. सी. जी.२५, १७ सिटीस्कन,आणि २५ लोकांनी रक्तदान केले. या आरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी दिगंबर कौरवार यांनी व संतोष आगलावे, विकास मोरे, योगेश मैलागिरे, किरण उल्लेवार, राहुल पेंडकर, अमित पेंडकर, मनोहर देगावकर,गंगाधर दाउलवार ,धनाजी जोशी, शंकर बाबरे ,अन्सारी आजीम, सचिन कांबळे ,अशोक कांबळे, भास्कर कांबळे, सौरभ मधुरवार, नितीन धूप्पेवार, आदींनी परिश्रम घेतले आणि आरोग्य शिबीर यशस्वी करण्यात आले.

# ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या जंगी स्वागतासाठी ओबीसी बांधवांनी उपस्थित रहावे : सुर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, १ ऑगस्ट -**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षण बचाव यात्रा. दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी माळेगाव - माळाकोळी लोहा मार्ग नांदेड येथे जात आहेत सर्व समाज बांधवांनी क्रांतिसूर्य बुद्धविहार समोर



सुर्यवंशी कॉम्पलेक्स येथे आरक्षण यात्रेचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या वतीने वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ऑड. प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचे जोरदार आतिषबाजी करून जंगी स्वागत करण्यात येणार आहे. तालुक्यातील ओ बी सी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गजानन सावकार सुर्यवंशी यांनी केले आहे.

# सिडको येथे डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, १ ऑगस्ट -**

डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे सकाळी १० वाजता सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले.



हाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासातील एक साहित्यिक म्हणून ओळखले जाणारे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दि. १ ऑगस्ट रोजी सिडको येथील अण्णाभाऊ साठे सभागृह येथे सकाळी १० वाजता सिडको प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहन करून. डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी सुख परिसरातील माजी नगरसेविका बेबीताई गोपीले, जनार्दन गुपीले, राघोबा वाघमारे, नारायण कोलंबीकर, माधव डोम्पले, शंकर धिरडीकर, नितीन वाघमारे, केशव कांबळे, माधव आंबटवार, आनंदा गायकवाड, पप्पू गायकवाड, विठ्ठल घाटे,राजू लांडगे, डि.के.कांबळे, संदिप गायकवाड, प्रदिप हानवते, मरीबा बसवंते, विलास गजभारे, विठ्ठल गायकवाड, अमृत नरंगलकर, साहेबराव भंडारे,श्यामराव कांबळे, राजू जमदाडे, भि.ना. गायकवाड, किशन रावणगावकर, करूणा जमदाडे, बालाजी पाटोळे,एस. कुंभारे, आनंदा वाघमारे, नरसिंग दरबार, सुदर्शन कांचनगिरे, आर.जे.वाघमारे, ज्ञानेश्वर ढाकणीकर, प्रमोद मेड, संजय निळेकर, नागेश वाघमारे, विशाल गडंबे, नवनाथ कांबळे, गजानन कहाळेकर यांच्यासह सिडको परिसरातील समाज बांधवांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# ऋतिक बंडेवार यांना बोक्सिंग मध्ये सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, १ ऑगस्ट -**

ऋतिक बंडेवार या खेळाडूने गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेमध्ये ऋतिक श्रीनिवास बंडेवार याने सुवर्ण पदक पटकावले.



बॅकिंग क्षेत्रामध्ये शैक्षणिक पदवी पूर्ण करून खेळावर पण लक्ष केंद्रित केले गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये तामिळनाडूच्या खेळाडूला हरवत महाराष्ट्राचे नेतृत्व करत ऋतिक श्रीनिवास बंडेवार यांनी सुवर्णपदक पटकाविले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्य कौशल्याबद्दल सोनखेड परिसरात सर्वत्र कौतुक करत शुभेच्छांच्या वर्षाव करण्यात येत आहे.

# कंधारमध्ये आज ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे यांचे कीर्तन

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, १ ऑगस्ट -**

कंधार - लोहा विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते , लोकनेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त आज दिनांक दोन ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता युवकवीर ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे नगरकर यांचा भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कीर्तन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी कंधार लोहा विधानसभेच्या करण्यात आले आहे.



नांदेड सह मराठवाड्यातील राजकारणातील संघर्षमय नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे लोकनेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात येणार आहे. वाढदिवसानिमित्त भुईकोट किल्ला परिसरातील पांचली मंगल कार्यालय बहादरपुरा येथे दुपारी एक वाजता ज्ञानेश्वर महाराज माऊली पठाडे नगरकर यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कीर्तन सोहळ्याला भारतीय जनता पार्टीचे अनेक लोकप्रतिनिधी , आजी-माजी पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत . दुपारी तीन वाजल्यानंतर लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर हे कार्यकर्ते, पदाधिकारी ,आप्तेष्ट, मित्र मंडळ आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी घेतील. संवाद साधतील. अभिष्टचिंतन स्वीकारतील अशी माहिती संयोजकाच्या वतीने देण्यात आली आहे . आयोजित कीर्तन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.



नांदेड- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

# महिलांनी मुख्यमंत्री माझी बहीण योजनेचा लाभ घ्यावा : उमेश मुदखेडे

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, १ ऑगस्ट -**

महाराष्ट्र शासनाच्या संकल्पनेतुन जिल्हाधिकारी डॉ. अभीजीत राऊत नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासक मिनल करनवाल, महिला व बालकल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम कदम यांच्या आदेशानुसार महसूल दिनानिमित्त हदगांव तालुका एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाचे बालविकास विकास अधिकारी उमेश मुदखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार १ ऑगस्ट २०२४ रोजी पळसा ग्रामपंचायत कार्यालय प्रांगणात अण्णा भाऊ साठे यांची जंयती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन करून महसूल दिनानिमित्त मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण शिबीर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित महिलांना सिडीपीओ उमेश मुदखेडे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने विषयी सखोल मार्गदर्शन केले. महिलाच्या अडी अडचणीचे निरासण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच आशाताई धाडेराव उपसरपंच संजय भाऊ काला होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसिलदार तामसकर होते.यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी उमेश मुदखेडे मंडळ अधिकारी गोडबोले, पर्यवेक्षिका वानखेड, तलाठी प्रदिप कुलकर्णी ग्रामसेवक एम.एम. सोनटक्के, आरोग्य सहाय्यक संतोष स्वामी, शंकरराव कदम,माजी सरपंच रणजित कांबळे, कुबेरराव राठोड किन्हाळकर, सामाजिक कार्यकर्त्या सविताताई निमडगे, ग्रामपंचायत सदस्य, सदस्या, गावातील प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बांधव अंगणवाडी सेविका मदतनीस महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन आभार गजानन मस्के पळसेकर यांनी केले.

# राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून १० हजार ३२३ प्रकरणे समोपचाराने निकाली

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, १ ऑगस्ट -**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशान्वये नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांच्या उपस्थितीत नांदेड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात शनिवार २७ जुलै २०२४ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड जिल्हयामध्ये एकुण १० हजार ३२३ प्रकरणे सामोपचाराने निकाली निघाली असून रक्कम २३ कोटी २८ हजार ८२९ इतक्या रकमेबाबत विविध प्रकरणांत तडजोड झाली.

यामध्ये दिवाणी, फौजदारी, धनादेश अनादरीत झालेली प्रकरणे, बँक प्रकरणे, मोटार वाहन अपघात नुकसानभरपाई, भूसंपादन, ग्रामपंचायतीचे घरपट्टी व पाणीपट्टीचे प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय व ग्राहक तक्रार मंच येथील प्रलंबीत प्रकरणांचा व नांदेड वाघाळा महानगर पालिका, पंचायत समिती व ग्रामपंचायतींचे वसुली प्रकरणे, विविध बँकांचे तसेच विद्युत प्रकरणे, दुरसंचार विभागाची टेलिफोन, मोबाईल यांचे दाखलपुर्व प्रकरणे इत्यादींचा समावेश होता. तसेच पाच दिवस घेण्यात आलेल्या विशष मोहीमेअतंर्गत ८९७ प्रकरणे निकाली काढण्यात आले आहे.

विशेष म्हणजे या लोकअदालतीमध्ये नांदेड जिल्ह्यातील पती-पत्नीचे कौटुंबिक वादाची एकूण ४५ प्रकरणे आपसात तडजोडीने मिटविण्यात आली असून त्यापैकी १६ वैवाहिक दांपत्यांनी आपसातील वाद संपवून पुन्हा एकत्र येवून संसाराची सुरुवात करण्याचा निर्णय लोकअदालतीच्या माध्यमातून घेतला.

नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुका न्यायालयात तसेच कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. ही लोकअदालत यशस्वी होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, तसेच पॅनलवरील न्यायाधीश व पॅनल सदस्य आणि सर्व सन्माननिय विधिज्ञ यांनी जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रयत्न केले.

या लोक अदालतीच्या निमित्ताने स्टेट बँक ऑफ इंडिया, नांदेड विभागीय अधिकारी कालीदास व जगताप यांनी त्यांचे विभागातर्फे नांदेड जिल्हा न्यायालयाच्या ठिकाणी भव्य पेंडालची व्यवस्था करुन मोलाचे सहकार्य केले. जिल्हा सरकारी वकिल तसेच जिल्हयातील सर्व सन्माननिय विधिज्ञ आणि भूसंपादन अधिकारी, आयुक्त नांदेड वा.मनपा, महसुल विभाग अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड व प्रबंधक, जिल्हा न्यायालय नांदेड व सर्व न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढून लोकअदालत यशस्वी करण्याकरिता सुरेखा कोसमकर, अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीष साहेब, नांदेड, श्रीमती दलजीत कौर जज, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड, मुख्यालयातील व तालुका स्तरावरील सर्व सन्माननीय जिल्हा न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीष यांनी विषेष प्रयत्न केले. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांनी लोकअदालत उद्घाटन समारंभासाठी उपस्थित पक्षकारांना लोकअदालतीचे महत्व समजावून आपली प्रकरणे तडजोडीने मिटवून घेण्याचे आवाहन केले. नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव श्रीमती दलजीत कौर जज यांनी उपस्थित असलेल्या सर्व पक्षकार तसेच सर्व न्यायाधीश, विधीज्ञ, सर्व न्यायालयीन कर्मचारी वृंद यांनी परीश्रम घेतले. सदरील लोकअदालत यशस्वी करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानुन यापुढेही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

लातूर
# दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



## लोकमान्य टिळक, अण्णा भाऊ साठे यांना उदयगिरी महाविद्यालयात अभिवादन



**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १ ऑगस्ट-**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष डॉ.रेखा रेड्डी, सदस्य प्रशांत पेन्सलवार, उपप्राचार्य (व.म.)डॉ. एस.जी. पाटील, उपप्राचार्य(क.म.) एस.जी.कोडचे, कार्यालय प्रमुख दयानंद स्वामी, स्टाफ सेक्रेटरी तथा ग्रंथपाल डॉ.एल.बी.पेन्सलवार, दिनविशेष समितीचे प्रा.डॉ.एस.आर. सोमवंशी, प्रा.डॉ.बी. एस.भुक्तरे, प्रा.डॉ.जी.जी.जेवळीकर, प्रा.प्रवीण जाहूरे यांच्यासह प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### निलंगा येथे जरांगे-पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**निलंगा, दि. १ ऑगस्ट -**

मराठा आरक्षण चळवळीतील प्रमुख नेते मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस निलंगा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने निलंगा तालुक्यात व निलंगा शहरात विविध सामाजिक धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. सर्वप्रथम ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिरात सकाळी अभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले,साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बसस्थानक, कोर्ट, तहसील, पंचायत समिती, नगर पालिका, दादापीर दर्गा येथे वृक्षारोपण करण्यात आले व छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक हजार एक (१००१) वृक्ष वाटप करण्यात आले. त्यानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने उपस्थितांना अल्पोपहार म्हणून खिचडी वाटप करण्यात आली. जरांगे-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सकल मराठा समाजाच्या वतीने तालुक्यातील प्रत्येक गावात वाढदिवसाच्या निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात आले.



### शिरूर अनंतपाळ येथे साहित्यरत्न आण्णा भाऊ साठे जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.१ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ शहरात साहित्यरत्न, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंतीनिमित्त शिरूर अनंतपाळचे पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, नगरपंचायतचे गटनेते संतोष शेटे, सामाजिक कार्यकर्ते विशाल गायकवाड, नियोजन सभापती संतोष शिवणे, बांधकाम सभापती संदीप बिराजदार, पोलिस जमादार येडले पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे, समता नायक महात्मा बस्वेश्वर, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, वस्ताद लहूजी साळवे, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी शिरूर अनंतपाळ शहरातील सर्व धर्मीय नागरिकांनी सर्व समाज सुधारक यांच्या जयंती एकत्र येऊन साजरी करण्याच्या संकल्पनेचे कौतुक केले व सर्वांनी कायद्याचे पालन करण्याचे आवाहन केले, तसेच या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी करण कांबळे, अविनाश शिंदे, मारोती शिंदे, दत्ता शिंदे, हरी शिंदे, प्रल्हाद सूर्यवंशी, अमर शिंदे, व्यंकट तुरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष शेटे यांनी तर आभार करण कांबळे यांनी मानले.

### लाडकी बहीण योजनेचे अर्ज मराठी मधूनही स्विकारणार : पाटील-निलंगेकर

**निलंगा, दि.१ ऑगस्ट-**

बहूचर्चित मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज इंग्रजीमध्येच भरण्याचे बंधनकारक होते मात्र बहुतांश अंगणवाडी कार्यकर्तीना याबाबतची अडचण येत असल्याची बाबा शिरूरअनंतपाळ तालुक्यातील अंगणवाडी कार्यकर्तीच्या शिस्टमंडळाने भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांच्या लक्षात आणून देताच त्यांनी थेट मुख्यमंत्र्यानाच फोनद्वारे ग्रामीण भागातील अडचण लक्षात आणून दिली. लागलीच आज सकाळी याबाबतचे बदल केल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने त्यांना कळवल्याने आता मराठीतही अर्ज स्विकारले जाणार असून याचा लाभ सत्तर टक्के मराठीत अर्ज भरलेल्या महीलांना होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर या निर्णयाचा फायदा होणार आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज मोठ्या प्रमाणात भरण्यात येत असून निलंगा विधानसभा मतदार संघातून विशेष शिबिराचे आयोजण प्रशासकडून केले आहे. निलंगा तालुक्यातील तसेच लातूर जिल्ह्यातील बऱ्याच महिलांनी मुख्यमंत्री लडकी बहीण योजनेचे अर्ज मराठी मध्ये भरले होते. मात्र शासनाच्या सूचनेनुसार ते अर्ज इंग्रजीमध्ये असल्याशिवाय स्वीकारले जाणार नव्हते. ही बाब अरविंद पाटील निलंगेकर यांना समजल्याबरोबर त्यानी लगेच प्रशासनाची चर्च करून मा.ना. मुख्यमंत्री महोदयांना फोनवर संपर्क साधून मराठीमध्येच अर्ज मंजूर करण्याच्या सूचना सर्व अधिकाऱ्यांना द्याव्यात अशी विनंती केली होती. मुख्यमंत्री कार्यालयातील कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी ही अडचण लक्षात घेत मुख्यमंत्री कार्यालयाकडून तत्काळ दखखल घेऊन मराठीमध्ये अर्ज भरण्याबात सूचना संबंधितांना दिल्या व केलेले बदलही निलंगेकर यांना कळवल्याने जवळपास ७० टक्के महिलांचे रिजेक्ट होणारे अर्ज पहिल्या टप्प्यात मंजूर होऊन लवकरात लवकर त्यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिणार आहे.



# महादेव कोळी समाजाचे जलसमाधी आंदोलन

## दोन जण गंभीर जखमी; दादगीतील तेरणा नदीच्या पात्रात आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १ ऑगस्ट-**

निलंगा तालुक्यातील निलंगा कासार सिरसी महामार्गावर असलेल्या दादगी येथील तेरणा नदीच्या पात्रात कोळी समाजाच्या विविध मागण्या संदर्भात मराठवाड्यातील आदिवासीं कोळी सम ाजाच्या वतीने आठ तास जल समाधी आंदोलन गुरूवारी ता. एक रोजी करण्यात येणार आले. तब्बल आठ तास हे जलसम ाधी आंदोलन सुरू होते. यामध्ये दोघे गंभीर जखमी झाले असून उपचारासाठी निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.

आदिवासी कोळी समाजातील टोकरे कोळी, ढोर कोळी, महादेव कोळी, म ल्हार कोळी जातीचे दाखले कोळी नोंदी वरून सरसकट मिळावेत. ज्या आदिवासी कोळी समाज बांधवांना जात वैधता प्रम ाणपत्र मिळाले आहे. त्यांच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तीना कोणतेही कागदपत्र न मागता जात वैधता प्रमाणपत्र मिळावे, विनाअट आदिवासी कोळी समाजातील टोकरे कोळी, ढोर कोळी, महादेव कोळी, मल्हार कोळी चे जातीचे दाखले कोळी नोंदी वरून सरसकट मिळावेत. ज्या आदिवासी महादेव कोळी समाज बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले आहे. त्यांच्या रक्ताच्या नात्यातील व्यक्तीना कोणतेही कागदपत्र न मागता जात वैधता प्रमाणपत्र मिळावे. आदिवासीं संचालक कै. गोविंद गारे व मधुकर पिचड यांच्या निकशानुसार समान न्यायाने विस्तारित क्षेत्रातील कोळी महादेव कोळी मल्हार जम ातीला जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे. जात पडताळणी समितीच्या वतीने सुरू असलेली पुर्न तपासणी तात्काळ थांबवावी. शालेय विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी वैधताबाबत काढलेले शासन परिपत्रक रद्द करण्यात यावे. तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी यानी निर्गम उतारा व पालकांची जात प्रमाणपत्र या पुराव्यावरून जातीचे प्रम ाणपत्र देण्यात यावे. अशा विविध म ागण्यांसह आदिवासी कोळी समाजाच्या विरोधात असलेल्या सरकारचा धिक्कार असो अशा विविध घोषणाबाजी करत दादगी येथील तेरणा नदीच्या पात्रात तालुक्यातील हजारोंच्या संख्येने महिला पुरुष आदिवासी कोळी समाज बांधव या जलसमाधी आंदोलनात सहभागी झाले होते.

> **प्रश्न नाही सुटल्यास पुन्हा आंदोलन तीव्र करणार : नलमले**
>
> आम्हाला जातीचे दाखले तत्काळ देवू म्हणून उपजिल्हाधिकारी यांनी लेखी अश्वासन दिले आहे. त्यामुळे तात्पुरते आंदोलन स्थगित केले असून जातपडताळणीसाठी मुख्यमंत्र्यानी आदीवासी विभागाची बैठक लावून रक्त नात्याचा शासन परिपत्रक काढावे, कोळी हेच महादेव कोळी, मल्हार कोळी आहेत हे मान्य करावे अन्यथा आणखी तिव्र आंदोलन करू असा ईशारा सकल आदिवासी कोळी महादेव , कोळी मल्हार समाजाचे नेते यांनी सांगितले

यावेळी जोपर्यंत आम्हाला लेखी अश्वासन मिळत नाही तोपर्यंत आम्ही मगे हटणार नाही असा पवित्रा आंदोलन कर्त्यांनी घेतला होता. अखेर उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसिलदार प्रसाद कुलकर्णी, उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन कटेकर यांनी आंदोलन मागे घेण्याबाबत विनंती केली मात्र लेखी अश्वासन दिल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नाही असा पवित्रा घेतला होता.

या आंदोलन स्थळी भाजपा युवा नेते अरविंद पाटील-निलंगेकर यांनी उपस्थित राहून कोळी समाजाच्या मागण्या शासन दरबारी मांडू उपविभागीय अधिकारी यांना जातीचे प्रमाणपत्र तत्काळ देण्यात यावे अन्यथा मीषया समाजासोबत आहे. कोणत्या पक्षाचा नेता म्हणून नव्हे तर एक नागरीक म्हणून तुमच्या सोबत असेन शिवाय मराठवाड्यातील जातीचे प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्राबाबता लवकरच मुख्यमंत्र्याना बोलून लवकरच तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू असे अश्वासन त्यांनी यावेळी दिले. काँग्रेसचे सचिव अभय सोळूंके यांनीही या आंदोलनाला भेट देवून पाठींबा दिला. उपविभागीय अधिकारी शरद झाडके, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, नायबतहसीलदार प्रविण आळंदकर यांनी निवेदन स्विकारून लेखी अश्वासन दिले. यावेळी पोलीसांनी मोठा पोलिस बंदोबस्त लावला होता. आमच्या समाजाला न्याय द्या अनेक वर्षापासून हा प्रश्न आदिवासी आमदाराच्या दबापोटी सुरू असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आजित पवार, देवेंद्र फडणवीस यांचे फोटोचे बनर पाण्यात बुडवून निषेध व्यक्त केला.



**दोघांची प्रकृती चिंतजनक**

या आंदोलना दरम्यान चार ते पाच समाज बांधव बुडत होते त्यांना समाजाचे पोहणारे व एनडीआरएफच्या टिमने बाहेर काढले त्यातील दोघांना निलंगा येथील उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले आसून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न द्या

### ना. संजय बनसोडे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि.१ ऑगस्ट-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना दलित साहित्याचे उद्गाते म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांच्या साहित्याचे योगदान आहे. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी शोषिंताच्या व्यथा साहित्यातुन मांडल्या व त्यांना न्याय दिला असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या सार्वजनिक जयंती महोत्सव समिती उदगीरच्या वतीने आयोजीत कार्यक्रमात बोलत होते. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी माजी आ.गोविंदराव केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, बन्सीलाल कांबळे, देविदास कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिणीस समीर शेख, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, भाजपाचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, सुधीर भोसले, कार्याध्यक्ष वसंत पाटील, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, मुख्याधिकारी सुंदर बोंदर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, सेवानिवृत्त न्यायाधीश भाले, महिला जिल्हाध्यक्षा मीनाक्षी शिंगाडे, दिपाली औटे, शहराध्यक्षा मधुमती कनशेट्टे, ॲड. वर्षा कांबळे, प्रा.शिवाजी देवनाळे, जवाहरलाल कांबळे, रवींद्र बेंद्रे, प्रा.बिभीषण मद्देवाड, प्रल्हाद येवरीकर, प्रा.गोविंद भालेराव, शिवाजी सुर्यवंशी, प्रा.सुशिलकुमार चिमोरे, नजीर हाशमी, सुशिलाबाई लांडगे, सुनिल कांबळे, राजकुमार चव्हाण, फय्याज शेख, ॲड. दत्ता पाटील, गणेश गायकवाड, इब्राहिम नाना पटेल, प्रदीप जोंधळे, काजल मिरजगावे, वैशाली कांबळे, आशा रेड्डी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रल्हाद येवरीकर यांनी केले तर आभार प्रा.बिभीषण मद्देवाड यांनी मानले.





### मुख्याध्यापक संजय शिंदे-पाटील यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि. १ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे-पाटील यांचा सेवानिवृत्तीनिमित्त संभाजी शिक्षण प्रसारक मंडळ थेरगावच्या प्रेमनाथ विद्यालयाचे संचालक नारायण पाटील, नंदकुमार पाटील, शंकर पाटील, बापूराव हंगरगे यांच्यावतीने संस्थेचे सचिव तथा माजी मुख्याध्यापक बि.डी. पेठे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रभाकर कुलकर्णी अनंतपाळ नुतन शिक्षण समिती सचिव शिरूर अनंतपाळ, प्रमुख पाहुणे शामगीर शिक्षण संस्था शिवणी कोतलचे कार्याध्यक्ष वसंतराव पाटील, प्रा.आरुण धालगुडे प्राचार्य, डॉ. प्रा.एस.के.शिंदे, बालाजी जाधव, मुख्याध्यापक प्रभाकर बंडगर, जयेश माने संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लातूर, ॲड. सुतेज माने, पाणी पुरवठा सभापती उमाकांत देवंगरे, ओबीसी नेते शिवाजीराव पेठे, डॉ. अरविंद भातांब्रे, धनराज पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन बिराजदार यांनी केले. आभार चिमणशेट्टे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तांदळे,मलवाडे ,पवार, कसपटे, बेल्लेवाड,चिमणशेट्टे, सदांनंदे, नाब्दे, कांबळे, जाधव, सुडे, माडे, मडुळे, जोगी, अक्षय पाटील, अविनाश पाटील,शुभम पाटील, सुधीर पाटील, विवेकानंद पाटील, विशाल बुरगे, राजेंद्र सूर्यवंशी, अनंत पाटील, सुदर्शन पाटील, विष्णू पेटे, ज्ञानेश्वर पाटील, बाळू चामले, गोवर्धन सुर्यवंशी यांनी परिश्रम घेतले

## येरोळ परिसरात वन्य प्राण्यांकडून पिकांची नासाडी

**तभा वृत्तसेवा,**
**येरोळ, दि. १ ऑगस्ट-**

येरोळ (ता. शिरुर अनंतपाळ) येथील शेती शिवारात वन्य प्राणी हरिण यांच्या कडून मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घालून भर फुलोरा अवस्थेतील सोयाबीन पिकांची नासधूस करून फस्त केल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

मागील अनेक वर्षात यंदा मग नक्षत्रात सुरुवातीला चांगला पाऊस पडला त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर खरीप पेरणी उरकली पेरणी पासून सततचा चांगला पाऊस पडत राहिला तर त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप पिके जोमदार येण्यासाठी मोठा पैसा खर्च करून कोळपणी, खुरपणी,खते, किटकनाशके फवारणी वेळोवेळी केली त्यामुळे पिकांची जोरदार वाढ होत सर्व खरीप पिके जोमदार आली असून सध्या सोयाबीन भर फूल अवस्थेत आहे तर मुगाला शेंगा लगडल्या आहेत मात्र शिवारात दिवसरात्र वन्य प्राणी हरिण यांच्याकडून शेकडोच्या संख्येने कळपाने एकाच वेळी शेतीत धुडगूस घालत थैमान घातले आहे त्यामुळे सर्व खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात असल्याने शेतकरी मेटाकुटीला येऊन सरकार व प्रशासन यांच्या बद्दल तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

यंदा सर्व खरीप पिकांची अवस्था चांगली आहे मग नक्षत्रात खरीप पेरणी झाल्याने व सतततचा पाऊस यामुळे रोग राई प्रादुर्भाव पण कमी प्रमाणात आहे यामुळे यंदा सोयाबीन या प्रमुख पिकातून मोठे उत्पन्न मिळेल चांगले पैसे मिळतील त्यामुळे आपले सावकारी व बॅंकेचे देणे फिटेल अशी शेतकऱ्यांना मोठी अपेक्षा होती मात्र या आशेवर आता हरिण वन्य प्राणी या नवीन संकटामुळे पाणी फिरणार असून यासाठी आम्ही कोणाकडे विचारणा करावे आमचे



> अनेक वर्षात यंदाच सोयाबीन चांगले आले आहे यातून चार पैसे मिळतील आशी शेतकऱ्यांना मोठी अपेक्षा होती मात्र या वर्षे हरिण वन्य प्राणी यांनी शेतकऱ्यांना चक्क फाशी घ्याची वाईट वेळ आनली आहे, शेतकऱ्यांनी कोणाकडे न्याय म ागावे तेच कळेना. आम्हाला न्याय कोण मिळवून देईल असे म्हणता म्हणता शेतकरी डोळ्यात पाणी आणून दैनिक तरुण भारतशी बोलतांना धनराज चावरे, दिलीप वाघमारे, धोंडीबा लोंढे, बाबुराव वाघमारे, बालाजी जळकोटचे, मारुती टाकळगावे, ज्ञानोबा बालवाड, शंकर बिरादार, शेतकरी माधव तुकाराम गुडे, प्रकाश गुडे यांनी मत व्यक्त केले.

हातातोंडाशी आलेल सोयाबीन हरिण वन्य प्राणी यांनी खाऊन उध्वस्त केले कोणाकडे नुकसान भरपाई मागावे.

## संत सद्‌गुरु चुडामणी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त हरिनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १ ऑगस्ट-**

अहमदपूर पंचक्रोशीतील करूणा वत्सल श्री सद्गुरू चूडाम णी महाराजांच्या असिम कृपेने आणि सद्भक्तांच्या सहकार्याने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी संत श्री सद्गुरू चूडामणी बालादास महाराज यांचा ४४ वी पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताह चे विविध धार्मिक कार्यक्रम १ ते ८ ऑगस्ट २४ गुरुवार या कालावधीत हा सप्ताह साजरा होत आहे

पहाटे काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजन, प्रवचन, हरिपाठ, श्रीचे चरित्र वाचन, हरि किर्तन, हरि जागर असे भरगच्च कार्यक्रम असणार आहे.

शनिवार ७ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते १० श्रीची नगर शोभायात्रा होऊन १२.३५ वा.गुलालाचा कार्यक्रम व त्यानंतर आरती महाप्रसाद व काल्याचे किर्तन असून

हभप गजानन लाटकर प्रवचन, एच.एस. भा.पं भरत शिरूरकर व हभप व्यंकट महाराज टाकलगवकर कीर्तनकार म्हणून हभप पांचाळ, हभप दिपक महाराज पांगरीकर, हभप पप्पूदेव महाराज हडोळतीकर, हभप श्याम महाराज साताळकर, हभप गुरुवर्य कालिदास महाराज पाळेकर, हभप माधव महाराज भाग्यदाळकर तर कार्यक्रमाचे प्रमुख हभप गुरुवर्य विजयानंद महाराज सुपेकर, हभप उध्दव महाराज

रमजानपुरकर. हभप बापुदेव महाराज बेळगावकर (गुलालांचे कीर्तन) हभप कैलास महाराज लिंगडाळकर, हभप भागवताचार्य अमोल महाराज नाळेगावकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. मंगळवार दि. ६ रोजी सायं ६.३० वा. दीपोत्सव व रविवार दि ४ ला रक्तदान शिबिर चे नियोजन करण्यात येणार आहे. सुरेश फुलारी, हनुमान जगताप, अंबादास सूर्यवंशी, अनिकेत काशीकर हभप माधव महाराज भाग्यदाळकर, रामराव शिंदे, गोविंद सारोळे, संतोष सोलुरे भजनी मंडळ श्री संत चुडामणी मंडळ, हनुमान मंडळ, रोकडेश्वर मंडळ, श्री संत चूडामणी मंडळ आदी भजनी मंडळे यात असणार आहे.

नाष्टा व अन्नदान सेवा देण्यासाठी व्यंकटराव भगनुरे ,गोविंद सारोळे ,विलास डांगे, भरत इगे, भरत शिरूरकर श्रीमती श्यामाबाई पंतोजी, श्याम भगत, प्रविण डांगे ,राजकुमार डांगे , विकास पं. बोबडे, राम जाधव, हभप शिवाजी चावला, सुरेश फ ुलारी, श्व्यंकटराव नलवाड नाष्टा व अन्नदान सेवा करणार तर महाप्रसाद साठी उमाबाई पाटोळ, किरण ठाकूर, व्यंकटराव गुणाळे, अनुराधा बिराजदार, अनंतराव काशीकर, वसंत शिंदे माळी, बापूराव शिरुरकर, राजेसाहेब माने हे सेवा देणार आहेत. रायगड मित्र परिवार व संत श्री चूडामणी महाराज विश्वस्त मंडळ, सेवेकरी मंडळ प्रकाशक हभप शसंयोजकरद किशनराव जोशी हे याचे आयोजक आहेत. धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष विजयराव पागे, उपाध्यक्ष डॉ. मेजर मधुसूदन घेरेकर, चिटणीस दिलीप शास्त्री, सहसचिव दयानंद घाटोळ व समस्त विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.



# सुरम्य सूर्यनारायण दर्शन....

**नाही पाहिला, नाही देखीला, सूर्यनारायण माझा हृदयी राहिला ।**

**महाराष्ट्रात केवळ एकमेव असणारे असे प्रख्यात सूर्यनारायण देवाने पावन झालेले असे सुंदर, रमणीय, पवित्र, पुण्यक्षेत्र, श्रीक्षेत्र नारायण चिंचोली... श्री सूर्यनारायण देवाचे हे स्थान, त्याच्या दर्शनाने चित्यवृत्ती बहरते, भक्तिला उधाण येते. अंतःकरण प्रसन्न होते. प्रापंचिक चिंता, दुःख यांचा परिहार होतो. श्री सूर्यनारायण देव श्रीक्षेत्र 'नारायण चिंचोली' या क्षेत्री प्रवेश करताच सारा निसर्ग जणू सुस्वागतम् सुस्वागतम् म्हणत असल्याचा भास होतो. ग्रामीण वातावरण असल्यामुळे, विशाल असे वृक्ष, हिरवी वनराई आपले बाहू पसरुन अभ्यागतांचे, भाविकांचे स्वागत करतात. पक्षीगण मंजुळ स्वरांनी स्वागत गीते गात असतात. अशा या निसर्गरम्य गांवी व मंदिराच्या दिशेने चालू लागल्यावर भगवान सूर्यनाराणाच्या भेटीची आस लागून राहिलेली, ती पूर्ण होणार म्हणून मनस्वी आनंद होत असतो.**

मंदिराच्या छायेत क्षणभर स्थिरावले की पूर्व बाजूस दिसतो तो मंदिर परिसर. मंदिराच्या सभा मंडपातून पुढे गेले की साक्षात भगवान सूर्यनारायाणाची विशाल अशी नयनरम्य मूर्ती हेच नारायण चिंचोलीचे मुख्य स्थान.... त्यांचे दर्शनाने भाविकांना संतोष लाभतो भेटणाऱ्यांना भेटीचा आनंद गगनात मावेना असा होतो. अनेक सश्रध्द भक्तांचे हेच ते श्रध्दा स्थान ! प्रदक्षिणा संपून सूर्यनाराणाचे तीर्थ, प्रसाद, अंगारा घ्यावा. घटकाभर मंडपात स्थिर व्हावे. देहभान विसरून जाते. वृत्ती स्थिरावते.

।। विकार नव्हते, विचार नव्हते, नव्हती वृत्ती कुठल्याही ठायी ।। अशी स्थिती होते. मंदिरातून बाहेर पडताना आपल्याला भव्य मंदिर परिसर, भक्त निवास, मंगल कार्यालय. पुढे देवीचे मंदिर, दत्त मंदिर, परिसर. अशीच एक वाट पुढे जाते तेथे हनुमान मंदिर, जिल्हा परिषद शाळा, ग्रामपंचायत.चिंचोली ग्रामी आले की दिसतात ती छोटी छोटी पण सुबक अशी ग्रामस्थांची घरे, पुजाऱ्यांचे घर ही याच परिसरात आहे. असे हे छोटे पण सुबक नारायण चिंचोली. श्रीक्षेत्रांचे मनोहर दर्शन !

**नारायण चिंचोलीचे ऐतिहासिक महत्त्व**

पंढरपूर ही आध्यात्मिक नगरी आहे. महाराष्ट्रातील एक सांस्कृतिक व समस्त वारकरी सांप्रदायाचे आध्यात्मिक व्यासपीठ म्हणून पंढरीचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील सर्वात महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर हे शतकानुशतके गाजत आलेले आहे. भागयत धर्माची पताका खांद्यावर घेवून त्याचा प्रचार करणारा वारकरी श्री संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अमोघ वाणीमधून प्रकटलेले ज्ञानामृत यातून होत असलेला भागवत धर्माचा प्रसार यामुळे पंढरी आणि पंढरीचा पांडुरंग यांना महाराष्ट्रातच नव्हे तर देशात देखील जिव्हाळ्याचे व श्रध्देचे स्थान प्राप्म झाले आहे.

इसवी सन १३ व्या शतकापासून पंढरपूरच्या श्री विठ्ठल मंदिराविषयी तसेच स्कंद व इतर पुराणांच्या आधारे श्री विठ्ठलाची माहिती शिलालेखातून मिळते. रामचंद्र देव यादवांच्या काळात लोकवर्गणीतून या मंदिराची उभारणी झाली होती हे लक्ष चौऱ्याऐंशी च्या लेखातून समजते मात्र त्यावेळी दुर्दैवाने यादवांचा पाडाव झाला य महाराष्ट्रात यवनी सत्तेचा अंमल सुरु झाला. मंदिरे, दैवते, पाडली गेली. भ्रष्ट झाली. पंढरपूर ज्यावेळी भागवत धर्माचे केंद्र म्हणून भरभराटीस आले होते त्याकाळात म्हणजे चालुक्य आणि यादव काळात पंढरपूरच्या परिसराचे (ग्रामदेवता) याचे महत्त्व वाढले होते. त्यामध्ये चिंचोली, तारापूर, पखालपूर, कोर्टी येथील मंदिरे व तेथील ग्रामदैवतं जरी भ्रष्ट झाली तरी केवळ एकदाच हल्ला झाला असल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप, वैभव शिल्पाकृती या विषयी माहितीचे ते साक्षीदार आहेत. यातील बहुतेक ग्राम दैवते जीर्ण व भग्न अवस्थेत असले तरी येथील शिल्पकला, रेखीवकाम मूर्ती हे अतिशय उल्लेखनीय आहे. याच इतिहासाची साक्ष देणारे पंढरपूर तालुक्यातील पंढरपूर-मोहोळ रोडवरील पंढरपूर पासून सुमारे ११ कि. मी. अंतरावर असणारे नारायण देवाचे ग्राम दैवत असलेले नारायण चिंचोली हे गांव...

नारायण चिंचोली हे छोटे खेडे गांव, गांव तस छोटं पण अध्यात्माची अपार महती सांगणारं हे पंढरीच्यां सीमेवरील गांव आहे. हे गाव ईश्वर वठार या नावाने देखील ओळखले जाते. गावाच्या पूर्वेस एक मोठे मंदिर आहे याच मंदिराचा उल्लेख सूर्यनारायण मंदिर असा करतात. पूर्वाभिमुख असलेले हे प्राचीन मंदिर गावाबाहेर आहे. पंढरीचा पांडुरंग जसा सर्वश्रुत आहे तशी त्यांची महती सांगणारे देवालये देखील या पंक्रोशीत आहेत त्यातील हे मंदिर म्हणजे सूर्यनारायण मंदिर आहे.

**मंदिराची माहिती**

मंदिर म्हणजे मानव व ईश्वराला जोडणारा दुया होय. मानवाला कृतार्थ करण्यासाठी देवाने (ईश्वराने) पृथ्ववर निवास करण्यासाठी निवडलेले पवित्र स्थळ. मंदिराची माहिती ही दंतकथा नुसार ऐकविली जाते. कारण यास काही ठिकाणी शास्त्रीय आधार देणारे पुरावे साधारणपणे ११ व्या शतकापासून यांची माहिती उपलब्ध होते. यानुसार म्हणजे चालुक्य आणि यादव यांच्या काळात पंढरीच्या अगदी नजीक असणारे ग्रामदैवत होते याशिवाय पुराण शाखात देखील याचे महत्त्व सांगितले जाते.

पुरातत्व खात्याच्या सर्वेक्षणानुसार हे मंदिर प्राचीन हेमाडपंथी आहे. मंदिरात गर्भगृह, सभामंडप, दगडी खांब आहेत. मंदिराचा आकार आदी चौकोनी पूर्वाभिमुख असा आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर दगडी सभामंडप हा अंतराळ असा सभामंडप आहे. यात मोठे मोठे दगडी खांब आहेत खांबावर सुंदर असे नक्षीकाम कोरीव आहे. या दगडी स्तंभावर संपूर्ण सभामंडप आधारलेला दिसून येतो. यावरील दगड हे दगडावर दगड असे ठेवलेली आहेत यातूनच या मंदिराच्या संपूर्ण सभा मंडपाची रचना केली आहे. आधुनिक पध्दतीचा या ठिकाणी कोठेही सिमेंट अथवा चुना यांचा वापर केला नसल्याची दिसून येते. यातच शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमूना पाहवयास मिळतो. अनेक इतिहास संशोधकांनी पंढरीच्या पांडुरंगाचा उल्लेख अनेक लेखांनमधुन केला आहे तसाच श्रीक्षेत्र नारायण चिंचोली या देवस्थानचा उल्लेख केला गेला आहे. असे करताना म्हटले आहे की, पुंडलिकाने श्री विठ्ठलाच्या बाबतीत म्हणताना संत कवी श्रीधर म्हणतात..

**पुंडलिकापुढे सर्वेश्वर । उभा करी ठेवूनी कर ।**
**रुक्मिणीस समजावया आला। तो पंढरीतच राहिला ।।**

आणि त्यानंतर तो पंढरीस्थित झाला पण भक्ताच्या काळजीसाठी त्याला सतत भटकावे लागले. मग नामदेवासाठी राजस्थान, नाथांसाठी पैठण, दामाजीसाठी महार होऊन मंगळवेढ्याला असो किंवा सावतामाळीसाठी अरण भेंडला असो तो पंढरीचा राजा प्रवास करीत राहिला हा यवनांच्या आक्रमणा मध्ये म्हणजेआदिलशहाच्या सेनापती अफजलखानने पंढरपूरवर आक्रमण केले अशी दंतकथा सांगितली जाते.

वरील संदर्भ लक्षात घेता ज्यावेळी तुळजापूर, पंढरपूर पासून हिंदूची तीर्थक्षेत्र नेस्तनाबूत करत अफजलखान पंढरपूरकडे येताना पंढरपूरच्या पंचक्रोशीत असणाऱ्या हेमाडपंती मंदिराची त्याच्या कडून मोड तोड झाली होती.




शिवाजी हळणवर

मो. ९८६००४००१३


तेव्हा हा नारायण मार्गशीर्ष महिन्यातच महिनाभर विष्णूपदावर जाऊन भक्तांसह सहभोजनाचा आस्वाद घेणारा देव भक्तच्या घरी महाजन बडव्यांच्या घरी नित्य ताक-पिठ खायला जाणारा देव, अशा पांडुरंगाची वेगवेगळी रूपे आपल्याला पहावयास मिळतात. सद्यस्थित नारायण चिंचोली येथे सूर्यनारायण मंदिर उभे असलेले दिसते.

**सूर्य नारायण मंदिर रचना व स्वरूप**

समाजाचे अधिष्ठान, विश्वास-निष्ठा श्रध्देचे प्रतीक म्हणजे मंदिर. धर्माचे मूर्त स्वरुप म्हणजे मंदिर. या सूर्यनारायण मंदिराच्या सभामंडपातून थोडे पुढे गेल्यावर गर्भगृह लागते हे गर्भगृह देखील दगडी व पुरातन आहे. यांच्या भिंती दगडी आहेत. गर्भगृहात वेदिका स्थित असून या वेदिकेवरती नारायणाची मुख्य मूर्ती मोठ्या दिमाखात उभी आहे. त्यालाच श्रध्दाळू सूर्यनारायण असे म्हणतात मूर्तीच्या वरील भागात दगडी घुमटाकार भाग नक्षीदारपणे दिसतो त्याला शिखर असे म्हणतात.

**मंदिर बाह्यपरिसर**

मंदिर बाह्य परिसर हा शांत व निसर्गरम्य अशा प्रकारचा आहे. या परिसरात मंदिरा बाहेर काही मूर्ती विखरुन पडल्या आहेत. त्यात गजलक्ष्मी, मनुष्यकृती नागयुगल आहेत. बाहेरील बाजूस आणखी दोन मंदिरे आहेत. जवळच ११ व्या शतकातील दोन ओळीचा शिलालेख आहे. आजूबाजूस ३ ते ४ शिवलिंग देखील आहेत. शिवाय एक मोठा नंदी ही दिसतो यावरुन येथे प्राचीन शिवमंदिर आसावे असा कयास बांधला जातो.

**सूर्यनारायण : नारायण मूर्तींचे वर्णन**

नाही पाहिले नाही देखिले,
सृष्टीवरचे रूप तुझे डोळा पाहिले.

नारायण चिंचोली येथील मूर्ती वर्णन व सकल संत मंडळीनी केलेले वर्णन व पंढरपूर जवळ असलेले चिंचोली हे गाव सर्वांनी अवलोकन करता मतीच्या हातात संतांनी वर्णन केलेली सर्व आयुधे आहेत. शिवाय सर्वात महत्वाचे म्हाण् बाजूस असलेल्या दोन उभ्या स्त्री मूर्ती आहेत त्याम्हणजे लक्ष्मी आणि पद्मावती

मात्र प्रत्यक्ष ही मूर्ती विलोभनीय व पाहताच आणि डोळ्यात भरणारी आहे. पुढे गाभाऱ्यात गेल्यावर स्वयंभू असे सुमारे तीन ते साडेतीन फूट उंचीच्या महादेवाच्या पिंडीच्या आकाराच्या सिंहासनावर स्वयंभू उभी आहे. साडे सहा फूट उंच सुंदर अशी भगवान सूर्यनारायणाची अत्यंत विलोभनीय व डोळ्यात न मावणारी तसेच जीवनाचे सार्थक करणारी श्रीची मूर्ती उभी आहे.

सूर्यनारायणाच्या उजव्या बाजूस लक्ष्मी तर डाव्या बाजूला पद्मावती आहे. त्यामुळे त्यासी लक्ष्मीनारायण म्हणतात तर उजव्या हाताजवळ शेषाचे प्रतीक आहे त्यामुळे शेषनारायण ही म्हणतात. श्रीच्या हातात शंख, चक्र, गदा आहे म्हणून त्यास व्यास नारायण म्हणतात. श्रीच्या प्रभावळीवर दशावतार कोरले आहेत. म्हणून त्यास व्यासनारायण म्हणतात. सूर्यनारायणच्या मूर्तीवर पायापासून ते डोक्यापर्यंत सूर्यकिरणे पडतात म्हणून त्यास सूर्य नारायण म्हणतात अशी भाविकांची श्रध्दा आहे. हे सर्व मूर्ती वर्णन प्रत्यक्ष मूर्तीवर असलेल्या खुणा मधून केले असल्याचे आढळते. मूर्ती हि चित्ताकर्षक असल्याने आणखी बारकाईने निरीक्षण केल्यास आपणास मूर्तीच्या मस्तकावर कलाकुसरयुक्त मुकुट, गळ्यात कौस्तुभ मणी व हातामध्ये गदा, शंख, चक्र आहे, कमरेस करदोडा आहे, मकराकार कुंडल गळ्यात कौस्तुभ मणी आहे. पायात वाळे आहेत. हि वर्णने श्रीपांडुरंगाचे देखील आहेत. त्यामुळे ते पाहण्याची अनुभूती श्रीकृष्णाच्या मूर्तीचे लावण्य पाहताना येते. व्यंकटेश स्तोत्रात जे व्यंकटेशाचे वर्णन केले आहे ते सर्व आपणास या मूर्तीत दिसते. त्यामुळे काही भक्त ही देवमूर्ती पाहताना व्यंकटरमण म्हणजे बालाजी देखील म्हणतात.

**पौष महिन्यातील सूर्यनारायणाचे महत्व**

वैदिक काळापासून भगवना सूर्यनारायणाच्या उपासनेचा उल्लेख असल्याचा आपल्याला आढळतो, वैदिक युगापासून ते आत्तापर्यंत सूर्यनारायणाला जीवनस्वास्था तसेच शक्ती देवता असे म्हणाले गेले आहे. छान्दोग्य उपनिषतामध्ये सूर्याला ब्रह्म माणाव गाने आहे. पुराणामध्ये सूर्यनारायणाच्या आराधनेच्या अनेक कथा प्रसिध्द आहेत. ज्यामध्ये या देवाचे स्थान व माहात्य वर्णन केले गेले आहे. सूर्यनारायणाच्या संबंधी नुसत्या कथा जरी ऐकल्या तरी पाप किंवा दुर्गतिपासून मुक्ती मिळते. तेत्तिरीय आरण्यक सूर्यपुराणामध्ये उगवत्या सूर्याची उपासना फल देणारी सांगीतली गेली आहे. सूर्य नारायण जगाला प्रकाश, ज्ञान, उर्जा, उष्णता तसेच जीवनशक्ती प्रदान करणारा आहे. तसेच रोग, कीटाणू, भूत, प्रेत आदि गोष्टींचा नाष करणारा असे म्हणले जाते. केवळ बेदांमधेच नाहीतर अधुनिक विज्ञानाचे निष्कर्ष देखील हेच सांगतात. सूर्यनारायणाची उपासना त्वरीत फल देणारी आहे. म्हणूनच या कलियुगामध्ये सत्यनारायण व्रताचे महत्त्व सांगितले आहे. पुराणांमध्ये भगवान रामाचे पूर्वज सूर्यवंशी महाराज यांना सूर्यउपसनेमुळे दिर्घायु प्राप्त झाली आहे. तसेच श्रीकृष्णाचा मुलगा सांब याला सूर्यउपासनेमुळे कुष्टरोगातून मुक्ती मिळल्याचे सांगीतले जाते.

नथाग्रहांमध्ये सर्वप्रथम ग्रह सूर्य हा आहे. जो पितृस्थानी कर्माचा स्वामी मानला गेला आहे. ज्यांना संतान प्राप्ती होत नाही त्यासाठी सूर्यनारायणाच्या उपासनेचा फार लाभ होतो. ॐ सूर्याय नमः । या मंत्राच्या जपामुळे व्यक्ती यशस्वी होते हा मंत्र अका रविवार केला पाहीजे. सूर्य उपासनेमुळे नेत्ररोगदेखील दूर होतात. त्याचबरोबर सूर्यनमस्काराने आरोग्य प्राप्ती होते. मनाच्या शांतीसाठी सूर्यनारायणाची उपासना करावी. एखाद्या व्यक्तिला एखाद्या रोगाचे औषध चालू असेल तर त्यावेळी हा मंत्र पाठ करावा त्यामुळे त्या रोगाचा समुळ नाश होईल. अशा विश्वरुप नारायणाचे पवित्र असे श्री क्षेत्र नारायण चिंचोली हे ठिकाण आपल्या पंढरपूर तालुक्यात असल्याने भाविक भक्तांनी तेथे जावून दर्शन घेवून आपले मनोइच्छित फल सूर्यनारायणाच्या कृपेने पूर्ण करुन घ्यावे व पावन व्हावे.

पंढरपूर तालुक्यात एकाहून अधिक चिंचोली नावाची गावे असल्या कारणाने एकाहून भिन्न असे दर्शविण्यासाठी प्रस्तुतचे चिंचोली हे गांव नारायण चिंचोली म्हणून ओळखले जाते.

या सर्व वरील गोष्टी लक्षात घेता नारायण, विठ्ठल ही फक्त नांवे आहेत रूप एकच आहे. भक्तांनी देवावर भक्ती करणे महत्त्वाचे आहे, त्यात नावाचा कोणताही उल्लेख येवो. सगुणरुपी परब्रह्म एकच ठिकाणी असून तो प्रत्येकाच्या हृदयात स्थित आहे या गोष्टीचे चिंतन करुन सकल संताप्रमाणे तो मनोमन पूजावा हे महत्वाचे आहे. माझे हे अनुमान व निष्कर्ष अखेरचे नाहीत त्यात अवलोकनास व ठाम निर्कषास वाव आहे. शेवटी पंढरीच्या परिसरात एवढ्या सुंदर नारायणदेवाच्या मुर्तीचा आढळ असणे ही सुदैवी बाब आहे. या मध्ययुगीन भागवत धर्माच्या संदर्भात पंढरपूर तालुक्यातील सूर्य नारायण मंदिर हे भाविक भक्तांसाठी भाग्यदायी गोष्ट आहे.

**श्री नारायणाची आयुधे व अलंकार**

शंख, चक्र, गदा, पद्म, धनुष्य, श्रीवत्स, कौस्तुभ, वैजयंती, किरीट, आणि कुंडल ही नारायणाची आयुधे व अलंकार होत. शंख : पंचमहाभूतात्मक शब्द ब्रह्माचे प्रतीक नाव- पांचजन्य चक्र : मनाचे प्रतीक. नाव- सुदर्शन गदा : आदिविद्या नाव- कौमोदकी पद्मः सृष्टीचे प्रतीक श्रीवत्सः (कौस्तुभ युक्त) तेजाचे प्रतीक वैजयंती : आद्या- अजया- शक्ती किरीट :

**कूटस्थ तत्व कुंडले : क्षर आणि अ-क्षर तत्वाची प्रतीके.**

नारायण चिंचोली येथील पौष महिन्यात होणारे दैनिक कार्यक्रम

पंढरपूर पासून ११ कि.मी अंतरावरच असणारे नारायण चिंचोली मंदिर पहाटेचे पाच वाजता काकडा आरती सुरुवात होते मंदिराच्या सभोतालची वृक्षलता, सुगंधित वायू, दिव्य तारका, हासरी उषा, सर्वांनाच ध्यास असतो तो जगत् नारायण श्री सूर्यनारायण निद्रेतून जागृत केव्हा होतील. त्यांच्या चरणांचे विलोभनीय दर्शन केव्हा घडेल? याच ठिकाणी मंदिरात भक्तगण जमतात आणि भूपाळ्या गाऊ लागतात. त्यानंतर भगवान सूर्यनारायणास यथासांग व मंत्रोपच्चारे महापूजा केली जाते.

याच बरोबर पौष महिन्यातील तिसऱ्या रविवारी श्री सूर्यनारायण देवाचा पालखी सोहळा आयोजित केलेला असतो. या पालखी सोहळ्यासाठी दुरहून भाविक श्री सूर्यनारायणाच्या दर्शनास अवर्जुन उपस्थित असतात. ही पालखी गाव प्रदक्षिणा करीत पुन्हा मंदिरामध्ये श्रीच्या दर्शनासाठी ठेवली जाते. पौष महिन्याच्या शेवटच्या रविवारी भंडाऱ्याचे (प्रसादाचे) आयोजन केलेले असते.

**कै. वासुदेव शंकरराव अवताडे (पूर्व सेवाधारी)**

कै. श्री. वासुदेव शंकर अवताडे हे मुर्धनारायण मंदिर नारायण चिंचोलीचे पुजारी होते. त्यांना लोक आदराने मामा असे म्हणत हे अतिषय उदार निस्वार्थी व पुरोपक्रमी होते. देवाचा यांचेवर खरोखरच वरद हस्तच होता. रोजच्या जीवनात ऐणाच्या समस्या से विस्वार्थीपणे सोडवत असत ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीत देखील त्यांची कीर्ती अपार होती त्यामुळे कौटुंचिक गोष्टीपासून ते इतर समस्या लोक त्यांना हक्काने सांगून त्यापासून ते सुटका करून घेत. वयाच्या १०व्या वर्षापासून त्यांना गुर्यनारायणाच्या भक्तीचा छंद रखागला होता. त्यांचे संपूर्ण आयुष्य सूर्यनारायण देवाच्या सेवेत गेले, त्यांनी भगवान सूर्यनारायणाचे नित्योपचार सुरु केले ते आजही अती भावाने सुरु आहे. आजही त्यांची उणीव फार भामत असते. मात्र, हा देह माशवंत आहे. के. वासुदेवराव यांना वयाच्या ८७व्या वर्षी म्हणजे १० डिसेंबर २००९ रोजी देवाज्ञा झाली त्यांच्या नावाचा उल्लेख केला नसला तर एक अनामिक हुर हर मला लागून राहीली असती म्हणून आजही मामा हे नाव उच्चारलेकी सूर्यनारायण नंतर ज्यांचा चेहरा समोर येतो ते म्हणजे अवताडे मामा..

**गणेश काका ( सुर्यनारायणाचे सेवाधारी )**

सूर्यनारायण देवाचे मुख्य पुजारी हे सेवाधारी हे गणेश वा. अवताडे हे आहेत. वडिलांनी सांगितलेल्या पावलावर पाऊल ठेवून त्यांची वाटचाल सुरु आहे. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता फक्त सेवेचा वारसा हे चालवित आहेत. कोणाजवळ झोळी पसरु नको काही मागू नको, देणारा तो आहे, ज्याने जन्म घातला त्याची सेवा कर, असे वडिलांचे व्रत घेऊन त्यांनी आपली नारायणदेवाची सेवा अखंडपणे चालू ठेविली आहे. या सेवेतून मिळणारा आनंद स्वर्गिय सुखापेक्षा देखील परमोच्च आहे. अतिशय भक्तीपूर्ण व सुसंस्कारी असलेल्या या नारायण चिंचोली या ग्रामी नारायणाची पुजा अर्चा करण्याचे भाग्य लाभल्यामुले ते सुदैवी आहेत. गणेश काका यांचेवर सूर्यनारायण देवाचा वरद हस्त असून ते केवळ याच गावात प्रसिध्द नसून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश आदि राज्यात त्यांच्या ज्योतिषाची किर्ती पसरली आहे. त्यांनी आपल्या बऱ्याच लोकांना आपल्या ज्योतिषाच्या माध्यमातून मार्गदर्शन केलेले आहे. भगवान सूर्यनारायण देवाचा आशीर्वाद भाविकांच्या पाठीशी सदैव राहो अशी ते प्रार्थना करीत असतात. त्यांची मुले श्री व प्रसाद ही त्यांना धार्मिक कार्यात सहकार्य करत असतात.



# वेळापूरचे प्राचीन श्री अर्धनारी नटेश्वर मंदिर



**देवगिरीच्या यादवांच्या काळात वेळापूर प्रामुख्याने भरभराटीस आले. वेळापूरची प्राचीनता पहायची झाल्यास एक हजार वर्षे मागे जावे लागते. खूप वर्षापूर्वी वेळापूरचे स्थान जसे बदलत गेले तसे नावही बदलत गेले. यादवांच्या काळापर्यंत वेळापूरचे नांव एकचक्रनगर असे होते. महाभारताचा कालावधी पाच हजार वर्षांपूर्वीचा आहे. त्याकाळी दक्षिणेकडचा भाग हा दंडकारण्य म्हणून प्रसिद्ध होता. यावरूनच वेळापूरचा भागही दंडकारण्यात समाविष्ट होता आणि या दंडकारण्यात अनेक ऋषी-मुनींनी तपश्चर्या केली आहे. म्हणजेच फार प्राचीन काळापासून ही भूमी तपोभूमी, पावनभूमी अशी आहे. शांडिल्य ऋषीसह अनेकांनी येथे तपश्चर्या केली आहे.**

महाभारत ते यादवकाल या कालावधीमध्ये वेळापूरबाबतचे पुरावे उपलब्ध नाहीत. मात्र यादवकालापासून म्हणजे इ.स.१३०० पासूनचे पुरावे येथे आढळतात. देवगिरीची दक्षिण सीमा म्हणजे वेळापूर. वेळ म्हणजे सीमा. पूर म्हणजे भोवती तटबंदी असलेले गांव. यावरून वेळापूर हे नांव या गावास यादवांच्या काळातच मिळाले असावे. माणदेश व इतर भागावर लक्ष ठेवण्यासाठी वेळापूर येथे उपराजधानीप्रमाणे यादवांचे लष्करी ठाणे होते व यादवांच्या वतीने या ठाण्याचा कारभार बाईदेवराणा हे पहात होते. एक मध्यवर्ती लष्करी ठाणे म्हणून वेळापूरला अनन्य साधारण महत्व होते. त्या काळात सर्वच दृष्टीने वेळापूर भरभराटीस आलेले होते.

त्याकाळात पर्यटनस्थळ म्हणा किंवा सांस्कृतिक केंद्र म्हणा, येथील श्री अर्धनारी नटेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार केला गेला. या जिर्णोद्धाराचा संकल्पक बाईदेवराणा होते. स्वतःच्या अधिकारात त्यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला आहे. शिलालेखातील उल्लेख पाहता पूर्वी हे मंदिर होते. पण स्वरूप छोटे म्हणजे मुख्य गाभारा, गाभाऱ्यात पिंड व आतील नंदी, तो ही उघड्यावर एवढेच असावे. नंतर सर्व बाजूंनी जिर्णोद्धार झाल्यानंतर बाहेरच्या नंदीची प्रतिष्ठापना केली असावी. कारण इतरत्र कोणत्याही महादेवाच्या मंदिरासमोर दोन नंदी नाहीत.

या जिर्णोद्धाराचे बांधकाम इ.स.१३०० व इ.स.१३०५ या टप्प्यात झाल्याचा उल्लेख शिलालेखात आढळतो. सध्याची मूर्ती प्रतिष्ठापना सोमवार दि.२२ नोव्हेंबर १३०५ रोजी केल्याचा उल्लेख तीन शिलालेखातून आढळतो. श्री अर्धनारी नटेश्वराच्या मूर्तीची रचना अत्यंत कोरीव असून ही मूर्ती सालंकृत आहे. शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत उच्चप्रतीची शिल्पकृती आहे. मूर्तीकाराने मूर्ती कोरताना वस्त्रांऐवजी अलंकाराचा वापर खुबीने केला आहे. अत्यंत देखणी अशी ही मूर्ती १.१५ मीटर उंचीची आहे. मंदिरात प्रवेश केल्यानंतर आतील नंदी, दक्षिणी भिंतीत ब्रह्मा, मद्विश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी व चामुंडा अशा सात मातृका, वीरभद्र व गणपती आहे. बाजूस उपदेवता, उत्तरेला शेजघर आहे. छतास काही विरगळ वापरले आहेत. मुख्य गाभाऱ्यात शिवलिंगावर सालंकृत शंकर-पार्वतीची मूर्ती उभी आहे. वर किर्तीमुख, किर्तीमुखापासून दोहोबाजूस अष्टगण, ब्रह्मदेव, विष्णू, पायाजवळ नंदी, अस्थिपंजर, उभी सरस्वती, उंदीर, गणपती अशा प्रतिमा कोरल्या आहेत. शंकरमूर्ती ही चतुर्हस्त असून डावा हात पार्वतीच्या कमरेवर आहे. दुसऱ्या हातात पंचफणी नाग असून तो पार्वतीच्या केशसांभारावर धरलेला आहे. उजव्या हातात त्रिशूल असून दुसरा हात आशिर्वादात्मक उभा आहे. अंगठ्यात जपमाळ असून अंगठा, अनामिका, करंगळीचा छेद गेला आहे. पार्वती द्विहस्त असून डाव्या हातात पाश आहेत तर उजवा हात शंकराच्या खांद्यावर ठेवलेला आहे. शंकरमूर्ती दोन्ही पायावर उभी असली तरी तो डाव्या पायावर रेलला आहे व उजवा पाय किंचीत सैल आहे. पार्वती डाव्या पायावर देहुडाचरण मुद्रेत उभी आहे. उजव्या तूळ पायावर चक्र आहे. या चक्रामुळेच या गावास एकचक्रनगर नाव असावे व येथे भिम-बकासुराच्या युद्धात बकासुराचा वध झाला असावा व त्यानंतर या गावाचे नांव वेळापूर झाले असावे असाही समज येथे आहे. हे मंदिर गजलक्ष्मीस अर्पण केले आहे.

या श्री अर्धनारी नटेश्वर ग्रामदैवताची यात्रा चैत्र पौर्णिमेस होते. शुद्ध पंचमीस हळदी, अष्टमीस लग्न व पौर्णिमेस वरात आणि वद्य अष्टमीस सोळावी असा महोत्सव दरवर्षी साजरा केला जातो. या कालावधीत विविध स्पर्धेचे आयोजन केले जाते.

पुरातन खात्याने १९७० साली मूर्ती संग्रहालय बांधले आहे. या संग्रहालयामध्ये वेळापूर व महाळूंग परिसरातील अनेक विरगळ एकत्र केले आहेत. या विरगळा पर्यटकांच्या व वेळापूरच्या दृष्टीने ऐतिहासिक अनमोल ठेवा आहे. या विरगळा अशा पद्धतीने ठेवण्यात आल्या आहेत की त्या विरगळातून सारेगमपधनीसा या सप्तसुरांची निर्मिती होते. वेळापूर येथे दोन प्रशस्त ऐतिहासिक वाडे आहेत. त्यापैकी एक पार्वतीच्या वाड्यात सध्या शाळा बांधण्यात आली आहे. ह्या वाड्यात यादवांचा खजिना होता. येथे मंदिरासाठी देणगी स्विकारली जाई. तसा उल्लेख तेथे सापडलेल्या शिलालेखात आहे. याची नोंद इतिहासकारांनी आपल्या संशोधनात नमूद केली आहे. वि.का.राजवाडे, गो.स.सरदेसाई, सेतू माधवराव पगडी, डॉ.तुळपुळे यांच्यासह अनेक संशोधकांनी वेळापूरला भेट देवून येथील इतिहास वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या ग्रंथामध्ये वेळापूरचे बरेच प्राचीन उल्लेख आढळून आले आहेत.

यादवकालीन या मंदिरामुळे वेळापूरला अनन्य साधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटनदृष्ट्या, सोईसुविधांच्यादृष्टीने वेळापूर दुर्लक्षित राहिले होते. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री खा.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत येथे भक्तनिवास बांधले आहे. येणाऱ्या पर्यटकांसाठी त्याचा चांगला उपयोग होत आहे. याबरोबरच मल्लसेठीचे स्मारक, अंबाबाई मंदिर, कांचन महाल, नाथ मंदिर, खंडोबा मंदिर, काळा मारूती आदि प्राचिन मंदिरे येथे पहायला मिळतात. केंद्रीय पुरातत्व विभागाच्यावतीने कोट्यावधी रूपये खर्च करून या मंदिराभोवती उंच जाळीसह संरक्षक भिंत, जमिनीवर दगडी फरशी बसवून तेथील परिसर स्वच्छ केला आहे.

वेळापूर हे आळंदी-पंढरपूर या श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी मार्गावर वसलेले एक ऐतिहासिक गांव आहे. या गावापासून श्री क्षेत्र पंढरपूर हे केवळ ३२ कि.मी., श्री क्षेत्र सिद्धरामेश्वर (सोलापूर) १०० कि.मी., श्री क्षेत्र तुळजापूर १५० कि.मी., श्री क्षेत्र अक्कलकोट १५० कि.मी., शिखर शिंगणापूर (मोठा महादेव) ५० कि.मी., श्री क्षेत्र गोंदवले ६० कि.मी., निरा-भिमा या पवित्र नद्यांच्या संगमावरील श्री क्षेत्र निरा-नरसिंहपूर २५ कि.मी., जैन धर्मियांचे अतिशय क्षेत्र दहिगांव हे ५० कि.मी. अंतरावर आहे तर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत झालेले अकलूज हे केवळ १० कि.मी. अंतरावर आहे.

अकलूजमध्ये श्री अकलाई, आनंदी गणेश, शिवपार्वती मंदिर, श्रीराम मंदिर, श्री साईबाबा मंदिर, यांच्यासह शिवसृष्टी, सयाजीराजे वॉटर पार्क, शिवामृत गार्डन, विद्युत कारंजे अशी पर्यटनस्थळेही आहेत.

### अन्नदान सेवा

प.पू.डॉ.भाईनाथ महाराज कारखानीस यांच्या प्रेरणेने गतवर्षी श्रावणामासाच्या निमित्ताने सोमवार दि.२ सप्टेंबर २०१३ पासून प्रत्येक सोमवारी सायंकाळी ७ वा. आरतीनंतर अन्नदान सेवेचा संकल्प केला. तो संकल्प आज सद्गुरूंच्या कृपेने येथे पूर्णत्वास आला आहे. आता दर सोमवारी सायंकाळी ७ वाजता श्री अर्धनारी नटेश्वर अन्नछत्र मंडळाच्यावतीने मोठ्या प्रमाणात अन्नदान सेवा सुरू आहे.



चंद्रकांत कुंभार

मो. ९८२२३०१११५

---



**पक्ष्यांच्या अधिवासाबद्दल सोलापूर जिल्ह्यातील इतर तालुक्यांच्या तुलनेने अग्रेसर असलेले माळशिरस तालुका पक्षी वैविध्य व अन्य वन्यजीवांबाबतीत समृद्ध आहे. माळशिरस तालुक्याचा शिरोभाग माळरान, दगड- खडकाळ भागाने व्यापलेला असल्यामुळे या तालुक्याला माळशिरस असे समर्पक नाव दिले आहे. सोलापूर जिल्ह्यातील हा तालुका जिल्ह्याच्या पश्चिमेकडे, सांगली व सातारा व उत्तरेकडे पुणे जिल्ह्यांना जोडून आहे. तालुक्यात वीर-भाटघर व उजनी धरणातून खळाळणाऱ्या पाण्यामुळे तालुक्याचा पश्चिम भाग वगळता बहुतांश क्षेत्र बारमाही बागायती पिकांनी बहरून असतो. दरवर्षी बरसणाऱ्या बेताच्या पावसामुळे तालुका अवर्षणप्रवण भागात मोडत असला तरी खूप वर्षांपूर्वी सहकार चळवळीच्या माध्यमातून तालुक्यात पाण्याची पाटांचे जाळे पसरलेले आहे. त्यामुळे तालुक्याचा बराच भूभाग हिरव्या पिकांनी व वनसंपदेनी झाकोळलेला आहे. तालुक्यात घनदाट जंगल नसले तरी बहुतांशी क्षेत्र ऊसाने आच्छादित झालेले आहे. फळबागांची शेती फुलली आहेत; परिणामी विविध कीटक, पक्षी व वन्यजीवांना पोषक वातावरण तालुक्याला लाभले आहे. त्यामुळे तालुक्याला पक्षी तसेच वन्यप्राण्यांना समृद्ध प्रदेश म्हणून ओळखले जाते.**

# माळशिरसचे पक्षी व वन्यजीव वैभव

तालुक्यात चार साखर कारखाने असून कारखाना परिसरात लावलेले विविध भारतीय मूळ वृक्षराजी पक्ष्यांसाठी सारंगगार ठरले आहेत. माळीनगर व सदाशिवनगर येथील साखर कारखाना परिसरातील वृक्षसंपदेच्या गर्दीत दाटीवाटीने वर्षानुवर्षे स्थानिक व स्थलांतरित पक्षी वर्षभर रात्रीच्या विसाव्याला असतात. सदाशिवनगर येथील शंकर सहकारी साखर कारखाना परिसरातही गेली कित्येक वर्षांपासून विविध पक्ष्यांची किलबिल ऐकायला मिळते. माळीनगरच्या साखर कारखाना परिसरात सुमारे सत्तर वर्षांपूर्वी लावलेले मोठाले वृक्ष आजमितीला मोठ्या दिमाखाने हजारोंच्या संख्येच्या पक्ष्यांसाठी वसतीस्थान बनले आहेत. गायबगळे, राखीबगळे, पाणकावळे, पोपट, भारतीय साळुंकी, चमचे चोच इत्यादी पक्षी शेकडोंच्या कळपाने दिवसभरातील उदरनिर्वाह करून मुक्कामाला या ठिकाणी झाडांवर स्थान निश्चिती करून रात्रभर झोपी जातात. हिवाळ्यात युरोपमधून स्थलांतर करून येणारे भोरड्या (गुलाबी मैना) हे पक्षी लक्षावधी संख्येने या ठिकाणी मुक्काम करतात.

तालुक्याला पुणे जिल्ह्या अलग करणारे सुमारे ५० किलोमीटर नीरा नदी काठ व माढा तालुक्याला विलग करणारे सुमारे ३० किलोमीटर भीमा नदीकाठ लाभलेली आहे. या दोन्ही नदी पात्रात व काठावर अनेक स्थानिक व स्थलांतरित जलपक्षी वर्षभर नजरेस पडतात. तसेच नदीच्या काठावरील गचपणीत सायाळ (साळिंदर) व खवले मांजर असे वैशिष्ट्यपूर्ण वन्यजीव दिसून येतात. तालुक्यातील लवंग गावाच्या शिवारातील ऐतिहासिक वज्राई मंदिराजवळच्या नीरा नदीच्या खडकाळ पात्रात नैसर्गिकरित्या तयार झालेल्या दगडाच्या कपारीत शेकडो पाकोळी पक्ष्यांनी चिखल वापरून गोवऱ्या सारखे घरटी लिंपून नवीन पिढीला जन्म घालतानाचे काम वर्षानुवर्षे चालत आहे.




प्राचार्य अरविंद कुंभार

मो. ९८२२१२४१९१

तालुक्याचा पश्चिमभाग डोंगराळ असून बहुतांश क्षेत्रा गवताळ कुरणाने व्यापला आहे. या भागातील जिल्ह्यातील अती उंच शिखर म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुळकाई मंदिर परिसर विविध शिकारी पक्षी व वन्यजीवांना नंदनवन ठरले आहे. माळरानाचे वैभवाचे प्रतीक असलेले घारींपैकी कापशी घार, काळी घार (चचाण), ब्राह्मणी घार, गरुडांपैकी काळा गरूड, पिंगट गरुड व पांगूळ गरुड, ससाण्यातील बहिरी ससाणा व नारझिनट ससाणे, सरडा बाज, शिक्रा व खाटिक हे शिकारी पक्षी पावसाळा व हिवाळ्यात सावज टिपण्यासाठी आकाशात घिरट्या घालताना आढळतात. या भागातील माळावरील विशाल गवताळ प्रदेशात व कपारीत विविध साप, घोरपड, सरडे, साळिंदर, मुंगूस, खवले मांजर, कोल्हे, खोकड, लांडगे, तरस हे अनेक वन्यप्राणी वावरत पर्यावरणातील अन्नसाखळी शाबूत ठेवले आहेत. अन्नसाखळीत मुख्य घटक असलेले वटवाघळे तालुक्यातील रस्त्यांच्या कडेला जुन्या वृक्षांवर मोठ्या समूहाने उलटे टांगून लोंबकळतानाचे दृश्य सर्रास पाहायला मिळत असे; परंतू विकासाच्या सबबीखाली या झाडांची कत्तल केल्यामुळे या निशाचर वटवाघळांची संख्या घटली आहे.

तालुक्यातील निमगाव (म), फोंडशिरस, उघडेवाडी, फडतरी, पानीव- गिरझणी, कुसमोड या गावांच्या शिवारात मानवनिर्मित जुने तलाव आहेत. या सर्वच जलस्थानांवर वर्षभर स्थानिक पक्ष्यांबरोबर स्थलांतरित पक्षी गर्दी करून वावरत असतात. तालुक्यात २०० हून अधिक प्रकारचे पक्ष्यांची नोंद डॉ. निनाद शहा, डॉ. अरविंद कुंभार या ज्येष्ठ पक्षी अभ्यासकांच्या मदतीने, ऋतुराज कुंभार, दिग्विजय देशमुख, डॉ. विधिन कांबळे, निरंजन मोरे,अश्विनी हेगडे, वृषाली कुंभार अश्विनी बाबर, अतुल जोशी, प्रकाश धाईंजे, अभय जोशी आदी पक्षी निरीक्षकांनी नोंद केली आहे. २००७ नंतर पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरलेले सयाजीराजे पार्क नव्याने पक्षी धाम म्हणून नावारूपाला आले आहे.



गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी मानव निर्मित तलावाकाठी उभे असलेल्या मोठ्या वृक्षांवर चित्रबलाक (रंगीत करकोचे) हे शेकडोंच्या जोडीने आपल्या पिल्लावळांना जन्म घालण्यासाठी 'मेटॅर्निटी होम' साकारत आहेत.

मुबलक पाणी व खाद्य, पक्ष्यांच्या अधिवासासाठी सुरक्षित ठिकाणं व झाडाझुडुपांचे अस्तित्व या कारणांमुळे पार्कला भेटी देणाऱ्या पर्यटकांना वर्षभर या ठिकाणी विविध पक्षी आपल्या मनमोहक छबीने भुरळ घालतात.

अकलूज येथील कै. शंकरराव मोहिते- पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील वखार व मोठ्या झाडांवर शेकडो भारतीय पोपट गेली कित्येक वर्षे वावरताना आढळतात. तालुक्यातील जैववैविध्य टिकून ठेवण्यासाठी त्यांच्या अधिवासातील मानवी शिरकाव, वृक्षतोड, शिकारी इत्यादी अहितकारक गोष्टींना आळा घातला पाहिजे. **फोटो - प्राचार्य अरविंद कुंभार १**



दै. तरुण भारतच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

जिल्हा परिषद सोलापूर जनसेवा हीच ईश्वरसेवा

# जिल्हा परिषद, सोलापूर

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष

स्वच्छ भारत एक पाऊल स्वच्छतेकडे...

कालावधी : दि. ०८ जुलै २०२४ ते दि. ०७ ऑगस्ट २०२४

जिल्हा परिषद सोलापूर
ODF PLUS
विशेष स्वच्छता अभियान

ODF PLUS साठी
विशेष स्वच्छता अभियान
उपक्रम - "स्वच्छतेचे दोन रंग"

दोन रंग स्वच्छतेचे
#हिरवाओलासुकानिळा

ओला कचरा
स्वयंपाक घरातला कचरा, चहाचा गाळ, फळे, मासे, मांस, भाजीपाला सुकलेली पान, फळे.

सुका कचरा
धातूचे तुकडे, तुटलेली भांडी, प्लास्टिक, धातूची, पृष्ठ, कागद, नखे, केस.

घातक कचरा
काच, रक्त लागलेले कापूस, इंजेक्शनचे सुई, सॅनटरी पॅड

सॅनिटरी कचरा कागदामध्ये पॅक करुन त्याला लाल निशाण लावतो.

कार्यक्रमाची रुपरेषा -
गावामध्ये एकत्रित करण्यात येणाऱ्या कचरा कुंडीबाबत कुटुंब स्तर व सामुदायिक स्तरावर जनजागृती घरात दोन कुंड्या बनवूया... एक हिरव्या रंगाची, दुसरी निळ्या रंगाची...



IEC for ODF Plus
नागरिकांच्या वर्तणूक बदलासाठी...

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा - २

दै. तरुण भारतच्या वर्धादन दिनास हार्दिक शुभेच्छा!

सोलापूर तरुण भारत



शुभेच्छूक
# एक शुभचिंतक

दै. तरुण भारतच्या
४० व्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा!

SDLTA

राजेश दमाणी
अध्यक्ष

राजीव देसाई
मा. सचिव

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटना



समर्थ रामदासस्वामी स्थापित नवसाला पावणारा दक्षिणमुखी

# श्री जागृत मारुती



सोलापूर
तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!



श्रीकांत खानापुरे
अध्यक्ष

सिद्राम वाघमोडे
कार्याध्यक्ष

प्रकाश मेंथे
सचिव

* बिरप्पा पुजारी * परमेश्वर सुतार * शांतय्या स्वामी
* चौंडप्पा सोलापुरे * ज्ञानेश्वर फुलारी (पुजारी)

समस्त भाविक व ग्रामस्थ गौडगाव (बु.)

## गौडगांव बु॥(ट्रस्ट) ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

संपर्क : 9422458898 / 8698778651 / 9420261881 / 9422307010

Website : www.jagrutmaruti.com

श्री स्वामी समर्थ मंदिरापासून
11 किमी
अंतरावर

सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..

धनुर्धर अकॅडमी सोलापूर

प्रशिक्षक : दिपक चिकणे
मो. ८६४६००९७९८

**धनुर्धर ॲकॅडमी सोलापूर**

धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्र,
जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर
प्रशिक्षण वेळ : सकाळी ७ ते ११,
दुपारी ११ ते १, सायं.४ ते ७



सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

**श्री. लक्ष्मी महिला गृहउद्योग**

**प्रो.प्रा. सौ.मनोरंजना मोरे**

मो.नं. ७७४१०४२५२६ / ९३२२९०९८२२

४९८/१११, शिवशंभु निवास, जॉगिंग पार्क शेजारी, वसंत बिहार, जुना पुना नाका, सोलापूर.
Shreelaxmi0707@gmail.com



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**कराटे सेल्फडिफेन्स क्लास**

संपर्क : कर्णिक नगर हॉल, पावन गणपती जवळ, सोलापूर
वेळ : सकाळी व संध्याकाळी ६.३० ते ८
मो. ९८२२२०६४३०

मुख्य प्रशिक्षिका व आंतरराष्ट्रीय पंच

**शिहान अनुराधा महादेव थोरात**

ब्लॅक बेल्ट फिफ्थ डिग्री



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

**अरुणकुमार बा.धुमाळ**

आणि परिवार, सोलापूर. मो. ९८९०९०२९२३



सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

**मा. संतोष फुलचंद पाटील**

* क्रीडा शिक्षक : व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मेडियम स्कूल, सोलापूर
* थ्रोबॉल, राष्ट्रीय खेळाडू व राज्य पंच
* संचालक, सोलापूर जिल्हा थ्रो बॉल असोसिएशन
* भारतात द्वितीय, सुंदर व हरित शब्द या विषयावर आणप्पा काडादी हायस्कूलकडून २०११-१२ मध्ये निबंध स्पर्धेत यश
* सन्मान, माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारले



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

**ज्ञानेश्वर रामचंद्र काळे**

जिल्हा अध्यक्ष : राष्ट्रीय नाभिक संघटना, सोलापूर
शहर उपाध्यक्ष : क्रीडा शिक्षक संघटना, सोलापूर
संस्थापक अध्यक्ष : हिरकणी ट्रेकिंग असोसिएशन, सोलापूर
चेअरमन : सेवासदन संस्था सेवक सहकारी पतपेढी नियमित



Best Compliments From **Rohit Shankar Jadhav**

OPENED at our JULE SOLAPUR

**R MINIPLEX**

A Project By- Saived Group of Industries

- A BRAND OF MINI PLEX WITH 2 SCREENS
- BEST AMBIENCE & INFRASTRUCTURES FOR YOUR SERVICE & ENTERTAINMENT
- COME & ENJOY THE TRUE CINEMA EXPERIENCE AT JULE SOLAPUR

MINIPLEX R

"SAIVED DEVINE", New Survey No - 128, Plot No 44, Vishal Nagar, Infront of Shivdare College, Jule Solapur.



सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

K P
ESTABLISHED - 1996

शुभेच्छुक

**के.पी.क्रिकेट अकादमी**

स्थळ : हरिभाई देवकरण प्रशाला क्रीडांगण, सोलापूर
वेळ : सकाळी ६.३० ते ९ व दुपारी ४ ते ७

**मुख्य प्रशिक्षक : प्रकाश कंपली**

मो. ९६७३१५०९०९

सहाय्यक प्रशिक्षक : समीर वजीरकर, चंद्रकांत जाधव, सुरज गायकवाड, ऐश्वर्या गिरे



Best Compliments From

**raj INTERIORS**

| Civil & Interior Works | Renovation Works
| Space Planning | Furniture
| Project Management

**Raghavendra Arun Joshi**

Shop no 5 Vikram Plaza Phase II, Opposite to Nedgeri Petrol Pump, Vijapur Road, Solapur - 413004

+91 9850283221 | raghavendrajoshi52@gmail.com



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**शिवलीला स्पोर्टस्**

**कराटे असोसिएशन व अकादमी**

स्व.संरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण काळाची गरज हे ब्रीदवाक्य घेऊन २०१३ पासून गुरुवर्य योगाचार्य सुरेश जाधव यांच्या आर्शीवादाने अत्यंत माफक दरात व गरजूवंत मुलींकरिता मोफत प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे.

प्रशिक्षक : सेनसाई शिवशरण वाणीपरीट    संस्था सचिव : स्मिता वाणीपरीट

प्रशिक्षण : योगाधारित कराटे व किक बॉक्सिंग, लाठीकाठी व कलरीपयत पध्दतीचे प्रशिक्षण

मुख्य शाखा : दमाणी नगर येथील सदगुरु बाजी आण्णा महाराज मठ,
प्रतिक्षा बंगलोज, जानकर नगर, सोलापूर
शाखा १ : इंद्रधनू टेनिस कोर्ट, मरिआई चौक, सोलापूर
शाखा २ : मनोहर सांस्कृतिक भवन, अवंती नगर, सोलापूर

प्रशिक्षण वेळ : दररोज सायं. ६.३० ते ७.३० संपर्क ९८२२९३३१०५/८०८७७७३८११



सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

N.P TAEKWONDO ACADEMY SOLAPUR

**एन.पी.तायक्वांदो अकॅडमी**

शरदचंद्र पवार प्रशाला, अवंती नगर, सोलापूर
वेळ : सायं.६ ते ७.३०

शुभेच्छुक

**नेताजी पवार**

राष्ट्रीय पंच, ब्लॅक बेल्ट २ दान
सहसचिव तायक्वांदो असोसिएशन ऑफ सोलापूर
मो. ८८८८३२७४२



ब्र.पं.पद्मश्री सुमतीबाई शहा
संस्थापिका

सोलापूर तरुण भारत
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

विद्युलता शहा
अध्यक्षा

**पद्मश्री सुमतीबाई शहा विद्यापीठ ट्रस्ट**

**श्राविका संस्था नगर, सोलापूर**



**ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन**
**तथा सोलापूर शहर जिल्हा लाठी असोसिएशन**
लाठीकाठी व दांडपट्टा शिवकालीन शस्त्रविद्या सराव केंद्र, सोलापूर
तर्फे

दैनिक तरुण भारत यांच्या
४० व्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा....

**श्री. शिवराम भोसले**
(अध्यक्ष-ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र तथा उपाध्यक्ष-लाठी ऑर्गनायझेशन इंडिया)

**श्री. अश्विन कडलासकर**
(सचिव व प्रशिक्षक-ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसियन महाराष्ट्र तथा एशियन निर्णायक पंच-लाठी असोसिएशन)

**सौ. अंजना कडलासकर**
(खजिनदार व महिला प्रशिक्षिका-ट्रॅडिशनल दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र तथा राष्ट्रीय निर्णायक पंच-लाठी असोसिएशन)

**क्लासेस ची वैशिष्ठ्ये**

१) आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय खेळाडू प्रशिक्षकांकडून सराव....
२) महिलांसाठी महिला प्रशिक्षिका...
३) दांडपट्टा लाठीकाठी या मर्दानी मैदानी शिवकालीन खेळासाठी व्यासपीठ...
४) राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय - दाडपट्टा,लाठीकाठी. या मर्दानी मैदानी खेळात सहभागी होण्याची संधी....
५) प्रवेश वयोमर्यादा मुले मुली वय वर्ष ५ ते ३०.....
६) खेळा सोबतच सर्वांगीण करिअर फोकस..मन, मेंदू, मनगट... बळकट बुध्दी वर्धक विकास....मर्दानी खेळ.....

अधिक माहितीसाठी संपर्क
शिवराम भोसले सर- 9370143348
अश्विन कडलासकर सर - 7558457177

सलग ३ वेळेस विजेतेपद - राज्यस्तरीय, राष्ट्रीय, एशियन स्पर्धेत.



सोलापूर 'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!

**परमेश्वर सिध्दाप्पा व्हसुरे**

अध्यक्ष : अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, तालुका शाखा : अक्कलकोट
माजी उपाध्यक्ष : सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित बाळे, सोलापूर
अध्यक्ष : अक्कलकोट तालुका क्रीडा शिक्षक संघटना



**सोलापूर तरुण भारतच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..**

मुख्याध्यापिका
**मा. उज्वला पाटील**
महावीर हायस्कूल

मुख्याध्यापिका
**मा.रुपाली चेंडके**
चतुरबाई श्राविका विद्यालय

**पहिली ते दहावीसाठी प्रवेश सुरु आहेत**

संपर्क : द्वारा व्यंकटेश हौसिंग सोसायटी, विकास नगर जवळ, सोलापूर
मो. ७३८७८६४८७० / ९५४५४४४९३०











श्रीक्षेत्र शिखर शिंगणापूर आणि महाराष्ट्राचे दैवत विठ्ठल रुक्मिणीच्या पंढरपूरच्या वाटेवर असलेला माळशिरस तालुका आहे. आषाढी वारीसाठी संत श्रेष्ठ तुकाराम महाराज व संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या,संतांच्या पालख्या मार्गस्थ होत असतात. हा तालुका संतांच्या पायदळीने पवित्र झाला आहे. चैत्र महिन्यात शिखर शिंगणापूरच्या यात्रेसाठी मराठवाडा आंध्र प्रदेशाबरोबरच महाराष्ट्रातील अनेक भाविक मानाच्या कावडी घेऊन याच माळशिरस तालुक्यातून मार्गस्थ होत असतात.त्याचबरोबर सहकार नगरी म्हणूनही माळशिरस तालुका प्रसिद्ध आहे. स्वातंत्र्यपूर्वी भाटघर धरणाचे पाणी माळशिरस तालुक्यात आले.त्याचबरोबर माळीनगर येथे सासवड माळी शुगर फॅक्टरी, श्रीपुर येथे बृहन महाराष्ट्र शुगर फॅक्टरी, सदाशिवनगर येथे चितळे शुगर फॅक्टरी तालुक्यात उभारल्या गेल्या,त्यामुळे येथील नागरिकांना काम मिळाले. पुढे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी सहकारी साखर कारखाना उभारून सहकाराची मुहूर्तमेढ रोवली आणि याच माध्यमातून दूध संस्था, कुक्कुटपालन व विविध सहकारी संस्थांची निर्मिती येथे झाली. विजयनगर येथील शिवामृत दूध प्लांट व गार्डन पाहण्यासारखे आहे. येथून दररोज हजारो लीटर दूध शहराकडे जाते. त्यामुळे सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेला माळशिरस तालुका म्हणून ओळखला जाऊ लागला. माळशिरसच्या माळरानाचे नंदनवन झाले. जिल्हामधील आकाराने मोठा असलेला धार्मिक पाश्वभुमी व वैशिष्यूर्ण इतिहास प्राचीन संस्कृती व वारसा मुल्य असलेला निरा व भिमा नदीच्या कुशीत वसलेला माळशिरस तालुका वैशिष्यपूर्ण आहे.












# सहकार नगरी अकलूजचा चौफेर विकास



तालुक्यातील खालील वैशिष्ट्य पूर्ण धार्मिक व पर्यटन स्थळे यांची माहिती खालील प्रमाणे.

**अकलुज** - अकलाई देवी देवस्थान वरून नाव पडलेले अति प्राचीन इतिहास असलेले निरानदी काठावरील गाव आहे. या गावात प्राचीन जागृत नवसाला पवणारे ग्रामदेवत अकलाई देवस्थान असून ते निरा नदी काठी आहे. या मंदिराचा जिर्णोद्धार विश्वस्त जयसिंह मोहिते पाटील यांनी पूर्वीच्या लहानपत्रा शेडमध्ये असलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार करून सुंदर असे दगडी बांधकामाचे मंदिर उभारले आहे. पुढे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी पर्यटन खात्यामार्फत या



मंदिराचा विकास केला. सुंदर असा बगीच्या व यात्री निवास बांधले आहे. याठीकाणी आषाढ महिन्यात मोठी यांत्रा भरते व भंडारा असतो. अकलूज मध्ये यादवकालीन भुईकोट किल्ला असून या किल्ल्याचा जीर्णोद्धार अकलूज ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच जयसिंह मोहिते पाटील यांनी केला तर नंतर विजयसिंह मोहिते पाटील यांनी पर्यटन खाते मार्फत येथे शिवसृष्टी उभारले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील जन्मापासून शिवराज्याभिषेकापर्यंत अनेक प्रसंग येथे शिल्प साकारले आहेत. या किल्ल्यात शिवसृष्टी देखावे ११ते ५ वेळेत सशुल्क



बघण्यासाठी उपलब्ध आहेत. अकलाई मंदिर ते किल्ला नदी हे पाण्यावर जल सेतू मार्ग विलोभनीय आहे. अकलूजचे खास वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी भरणाऱ्या राज्यस्तरीय लावणी स्पर्धा, या स्पर्धेतून अनेक उत्तम कलाकार निर्माण झाले व लोप पावत चाललेली पारंपारिक लावणी जतन करण्याचा प्रयत्न या स्पर्धेमुळे झाला. या स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे महिला प्रेक्षक वर्ग महाराष्ट्रात सर्वप्रथम महिलां प्रेक्षकांसाठी लावणी स्पर्धा जयसिंह मोहिते पाटील यांनी भरवली. तसेच दिवाळी पाडव्यानिमित्त भरणारा घोडेबाजार या बाजारातून विविध राज्यातील घोडे विक्री येतात व खरेदीदारही येतात. त्यामुळे येथील लॉज व हॉटेल व्यवसाय चांगले चालतात अकलूजचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली मेडिकल सेवा अत्यंत आधुनिक सोयी सुविधांनी येथे उपचार केले जातात. पूर्वी पुणे मुंबई शिवाय पर्याय नसायचा, आता अकलूज मध्ये वैद्यकीय सेवा अतिशय तत्पर झाली असून मेडिकल हब म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

**शंकरनगर (यशवंतनगर )** - पूर्वकर्मीचे यशवंतनगर अकलुज येथे प्राचीन शिवपार्वती मंदिर आहे. या मंदिराचा जिर्णोद्धार करून नव्याने भव्य मंदिर उभारण्यात आले असून मंदिरामध्ये भव्य अशी शिवपार्वतीची मूर्ती बसवण्यात आली आहे. सहकार वार्षिक शंकराव मोहिते पाटील यांनी या मंदिराचा जिर्णोद्धार केला व पुढे कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व तत्कालीन पर्यटन मंत्री विजयसिंह मोहिते पाटील परिसर शिवशोभित केला आहे. सध्या जयसिंह मोहिते पाटील यांनी मंदिरात परिसरात भव्य असा हिरवळीचा गालिचा साकारला असून येथे महाशिवरात्री यात्रे निमित्त भव्य कृषी औद्योगिक प्रदर्शन जनावराचा बाजार तसेच कुस्तीचे जंगी मैदान भरते. आत्यधूनिक कारंजे वर विविध रंग व प्रतिकृतीचा नयनरम्य लेझर शो सायंकाळी सशुल्क पाहण्यास उपलब्ध आहे. पर्यटक व धार्मिक भक्तगण राहणेसाठी पर्यटन निवास माफक दरात देवस्थान आवारात उपलब्ध आहे. येथेच सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना, ॲसिटिक ॲसिड, पोल्ट्री फार्म, आदी संस्था आहेत. तर इंजीनियरिंग कॉलेज, द ग्रीन फिंगर्स इंग्लिश मीडियम रेसिडेंट स्कूल, शिवरत्न शिक्षण संस्था आधी संस्था कार्यरत आहेत. त्याचबरोबर श्री साईबाबा मंदिर श्री राम मंदिर किल्ल्यातील भुईकोट बुरुजामध्ये महादेवाचे मंदिर व पुरातन विठ्ठल रुक्मिणी व श्री गणेशाचे मंदिर आहे

आनंदी गणेश स्वर्गीय उदयसिंह मोहिते पाटील यांनी आनंदनगर येथील उंच टेकडीवर विविध फळांच्या बागा फुलवले असून या ठिकाणी आनंदी गणेश मंदिर उभारले आहे. दर चतुर्थीला व दररोजच भाविक मोठ्या संख्येने येथे भेट देतात. येथे उत्खनात महादेवाची पिंड मिळवून आली. त्यास मंदिर बांधून स्वयं सिद्ध महादेव असे नामकरण करण्यात येऊन भव्य अशी मंदिराची निर्मिती केली. येथील आणखीन एक वैशिष्ट म्हणजे येथे सर्व प्रकारच्या औषधी सुंगधी व धार्मिक महत्व असलेल्या वनस्पतीची गार्डन व अंबराई आहे. शंभु महादेव मंदिरामध्ये ग्रथालय व ध्यान धारणा हॉल आहे. मंदीराजवळून नरी नदी प्रवाह नयनरम्य व विलोभनीय आहे. भाविक व पर्यटकसाठी पर्यटक व भक्त निवास उपलब्ध आहे. सयाजी राजे वॉटर पार्क आनंदी गणेशच्या पायथ्याशी सयाजी राजे वॉटर पार्क हा मोहिते पाटील यांचा मालकीचा भव्य असा वॉटर पार्क आहे. महाराष्ट्रातून अनेक पर्यटक उन्हाळी सुट्टीत बुकिंग करून येथे येतात.अतिशय विलोभनीय असे हे वॉटर पार्क असून येथे सर्व सुविधा उपलब्ध आहेत. जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व या पार्कची देखरेख केली जाते. येथे मामाचा गाव तसेच सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पूर्ण कृती पुतळा व खेळण्याच्या विविध प्रकाराने वॉटर पार्क प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी हिवाळ्यामध्ये स्थलांतरित पक्षी विविध प्रदेशातून येतात.



माळीनगर येथे गहिनीनाथ महाराजांचे समाधी असून सद्गुरु शंकर महाराज यांचे येथे वास्तव्य होते. माळीनगर कारखान्याच्या आवारात या समाधी आहेत.




चंद्रकांत कुंभार

मो. ९८२२३०१११५


**गारवाड** - गोरडवाडी गावाच्या शिवेवर सोलापुर जिल्ह्यामधील सर्वाच्य ठिकाणी असलेले १०८० पायऱ्या चढून वर सुळकी टेकडीवर स्थित जागृत प्राचीन नवसाला पावणारे देवस्थान सुळकाई देवी मंदीर आहे.या मंदिर परिसरातून पंचक्रोशीतील शेती डोंगर दऱ्या फळबागा दृष्य एकमेवद्वितीय आहे. जवळच फर्टिली वाईन्सची द्राक्ष बागा विस्तीर्ण क्षेत्रावर असून रेसॉर्ट सर्वसोईनुकत सफारीसह उपलब्ध आहे .

माळशिरस तालुक्याचे ठिकाण संत ज्ञानेश्वर महाराज पालखी येता जाता मुक्काम घोड्याच्या गोल रिंगण स्थळ असलेले ऐतिहासिक प्राचीन धार्मिक स्थळ आहे. भोसले घराचे राजे शिवाजी महाराजांचे जावई निंबाळकर व कन्या यांचे घुमटाकार प्राचीन समाधी जीर्ण आवस्थेत शहराच्या उत्तरेला कचरेवाडी रोडनजीक पाहवयास मिळतात. गावात प्राचीन जागृत नवसाला पावणारे पश्चिमाभीमुख मारुती मंदिर व पूर्वाभीमुख रामलक्ष्मण सिता मंदिर आहे. इंग्रज कालीन भव्य दिव्य रेस्ट हाऊस इरिगेशन कौलनीत मोडकळीस आवस्थेन आज ही उभा आहे.



**खुडूस** - संत माऊली पालखी मार्गावरील गाव. गावाच्या दक्षिन पश्चिमेला स्वयंभू प्राचीन वैशिष्यपूर्ण पिंड असलेले जागृत महालिंगरायाचे शिवमंदीर भक्कम तटबंधीत उभे आहे. या ठिकाणी लग्न कार्यासाठी सर्व सोई उपलब्ध असून इथे लग्न करणे भाग्याचे मानले जाते .

**महाळूंग** - पुरातन विभागाच्या अधिपत्याखाली असलेले गाव येथे माकडांचे मोठे कळप आहेत. चौकोनी बारव वैशिष्ट्य पूर्ण विश्रांतीस्थान असलेले हेमांडपंथी प्राचीन आई यमाई देवी मंदीर होय. नवरात्र, पोर्णीमा व आषाढ महिन्यात भाविक मोठया संख्यने नतमस्तक होतात. नवरात्रीमध्ये नऊ दिवस मोठा उत्सव असतो. माळून गावच्या आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे पुराणतन विठ्ठल मंदिर आहे आणि कुठेही पहावयास मिळत नसलेली विठ्ठलाच्या मूर्ती समोर महादेवाची पिंड शिवलिंग आहे येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी मुक्कामास असते

**गणेशगाव** - निरा नदी काठी वसलेले स्वयंभू प्राचीन जागृत गणेश मंदीर मुळे प्रसिद्ध प्राचीन गाव आहे. या मंदीरा शेजारी प्राचीन स्वयंभू शिवमंदीर आहे. लोक चतूर्थी व गणेश उत्सवात मोठया प्रमाणात दर्शनाचा लाभ घेतात. मंदिराच्या जवळच तांबवे व गणेशगाव हददीत प्राचीन नीरा नदी काठ व मोठया डोहा शेजारी माता वजेश्वरी मंदीर आहे. ह्या मंदिराचे वैशिष्ट म्हणजे समोर मोठे दगडी जेवणाचे ताट असून ७ सुवाहिसीनी एकत्र प्रसाद घेणेची प्रथा आहे.

**वेळापूर** - पांडवकालीन अतिप्राचीन धार्मिक गाव आहे. यागावामध्ये हेमाडपंथी दगडी बांधकाम असलेले शिव व पार्वतीचे अर्थनारी नटेश्वर एकमेव द्वितीय मुर्ती मंदीर आहे. मंदिर सभोवती बऱ्याच उपासक यांची संमाधी स्थाने आहेत. मंदिराचे उभारणी पांडव कालात केली अशी अख्यायीका
आहे. समोर प्राचीन चौकोनी न पाणीअटणारी बारव आहे. आमवस्या,सोमवार, श्रावण महिना, चैत्र महिन्यात भाविक मोठया संख्येने दर्शन घेतात. पालखी मार्गावर गावाच्या उत्तरेला संत ज्ञानेश्वर महाराज परतीचा प्रवास ठिकाण खंडोबा मंदीर अतिशय सुंदर आहे. खंडोबा मंदीर शेजारी जवक चौकोनी बारव असून निस्मी शिवभक्त कळवातणीचा दगडी महाल आहे. बकासुराचा वध येथे जवळच झाला असल्याची आख्यायिका आहे

**पिलिव-** अक्कलकोट संस्थानचा भाग असलेले ऐतिहासिक शहर आहे. या शहारामध्ये मध्यभागी श्री जहागिरदार यांचा राजवाडा व किल्ला व जूनी बाजारपेठ आहे. शहराच्या वैभवात भर टाकणारे इंग्रज कालीन भव्य विस्तीर्ण क्षेत्रातील सुंदर असे रेस्ट हाऊस आजही उभा आहे. गावाच्या पश्चिमेला डोंगरावर प्राचीन जागृत नवसाला पावणारे ग्रामदैवत महालक्ष्मी मंदीर आहे. या ठिकाणी फेब्रुवारी मध्ये गुरांच्या बाजारासह खुप मोठी यात्रा भरते. या साठी पंचकोशीतील लाखो भाविक लाभ घेतात.

**निमगांव (म)** - पिलिव रस्त्यावरील गाव. तलावाचे गाव म्हणून प्रसिद्ध फोंडशिरस नंतर तालुक्यातील मोठा तलाव. जेजूरीचा खंडेराय भक्तांसाठी आलेल्या ठिकाणी विस्तीर्ण क्षेत्रावर तटबंदी व ४ दिपमाळा खांब असलेले घोड्याच्या टाचा, खुना असलेले जागृत प्राचीन खंडोबा देवस्थान आहे. या ठिकाणी सोम वती आमवस्या चंपाषष्टी वेळी देवाची पालखी यात्रा भरते. निमगाव हे पैलवानाचे गाव म्हणूनही ओळखले जात. या गावातून महाराष्ट्र केसरी निर्माण झाले आहेत.

**कोथळे** - कोथलगिरी पर्वतरांग व शंभू महादेव पर्वत रांग शेवटी वसलेले गाव. गावात शिखर शिंगणापूरची हुबेहुब प्रतिकृती असलेले शिवलिंग खांब स्वरूपात असलेले महादेव मंदीर म्हणजे खांबलिग मंदीर. जमिनी पासून १० फुट उंचावर पूर्ण दगडी काम असलेले शिवकालीन मंदीर असून मंदिरात २ पाण्याची कुंड आहेत. एक अमृत कुंड व २ रे अर्जून कुंड होय. मंदीराच्या पाठीमागे डोंगर उतारावर देवाचे अंघोळीचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले कुंड १ २ महिने १८ काळ दृष्काळातही सतत वाहत असते. हे देखील इथले वैशिष्ट आहे. याच गावाच्या प्रचकोशीत मुंगी घाट आहे. या घाटातून एकमेव द्वितीय साहसी पराक्रमी अति अवघड मुंगी घाट आहे.तेल्या भुत्या कावड व इतर मानाच्या कावडी अतितीव्र ३ टप्पे चढून जाऊन दर्शन घेण्याचा मुगी घाट कावड सोळा अतिप्राचीन थरारक आहे. याचा लाभ चैत्त महिन्यात भाविकांना घेता येतो.

**पिपरी** - नातेपुते शिंगणापूर रोडवरील शिखर शिगणापूर अष्ट लिंगापैकी एक आहे. शिंगणापूर सारखेच शिखर व २लिंग पिंड आहे. मंदिराजवळ प्राचीन दगडी बांधकाम बारव आहे. शिवलीला अमृतमध्ये या मंदिराचा उल्लेख असून शिवभकत कळवातीनचे साथीदार १ कुक्कुट व १ मर्कट यांची ही या ठिकाणी समाधी मंदीरे आहेत. या ठिकाणी विवाह करण्याची पुरातन भाग्यशाली परंपरा आहे.

**फोंडशिरस** - शिखर शिंगणापूर अष्ट लिगापैकी एक प्रभ रामचंद्राने मार्गक्रमनाने की पाण्यासाठी बाण मारल्यावर प्रकट झालेले वैशिष्ट पूर्ण शिव लिंग आहे. या लिंगावर बानाचे चिन्ह असलेमुळे बाणलिंग महादेव मंदीर प्रसिद्ध आहे. मंदिराचे बांधकामाला जवळील दगड वापरल्यामुळे छोटा तलाव मंदिरासमोर तयार झाला. हे देखील येथील वैशिष्ट आहे. मंदिर परिसरात अनेक मंदिर असून रामनवमीला मोठी यात्रा या ठिकाणी भरली जाते. या देवाला बैल भेट देण्याची प्रथा असलेमुळे देशी खिलार गाई व बैलाचा १५० चे आसपास संख्या हे मंदिराचे वैशिष्ट आहे.

**नातेपुते** - शिखर शिंगणापूर अष्ट लिंगापैकी एक शिवलिंग मंदीर शिगणापूर मंदीर प्रतिकृती भव्यता व दिव्यता आहे. गावाचे दक्षिणेकडील टेकडीवर बसलेले शंकर पावती मंदिर गौरीहर शंकर मंदीर महणून प्रसिद्ध आहे. मंदीर परिसर दगडी तटबंदी व अनेक मंदिर ने समाविष्ठीत आहे.

**गुप्तलिंग मंदीर** - सोलापूर व सातारा जिल्हा सिमेवर औधच्या पठाराच्या शेवटी दरीत वसलेले प्राचीन शिव मंदीर. शिंगणापूर अष्ट लिगापैकी एक १०८ पायऱ्या उतरून गेल्यावर दरीत सतत पाणी



वाहणाऱ्या झऱ्यात पाच गुपित लिंग व त्यावर शंभु महादेव पिंड आहे. शंकराने जठा आपटलेल्या खुणा व नजीकच्या गोल विहीरीत तरगणारा शालीग्राम इथले वैशिष्ट आहे. याठीकाणी प्राचीन तपश्वी यांचे समाधी ही इथे पाहण्यास मिळतात. पायऱ्या उतरतना अंसंख्य निरुपद्रवी माकडे खाऊ साठी वाट बघत असलेली दिसतात. शिखर शिंगणापूर यांचे मुघल साम्राज्यापासून प्राचीन शिवमंदीराचे संरक्षण करण्यासाठी व मंदीराच्या शिखराच्या खाली अरुंद दरवाजा व्यायामशाळा व मुधलांना वर्ज्य असलेल्या वराहचे प्रथमदर्शनी कलाकृती व समान शिखर बांधणी केलेले ही शिवमंदीर मधील शंभुमहादेव दर्शन घेऊन यात्रा पूर्ण शिंगणापुर यात्रेत क्रमप्राप्त



आहे. अतिक्षय शेत्र दहिगांव नातेपुते पासून सात किलोमीटर अंतरावर जैन धर्माचे श्रद्धास्थान असलेले अतिक्षय क्षेत्र दहिगांव आहे. येथे संपूर्ण भारतातील सर्वात मोठे एकमेव भुयारी मंदिर आहे. परमपूज्य महती सागर महाराज यांच्या पदस्पर्शाने हे गाव पावन झाले आहे. दहिगांव धार्मिक व ऐतिहासिक वारसा परंपरा लाभलेले आहे. अति विशाल व अनोखी भुयारी मंदिर असून बहुदा भारतातील हे एकमेव भुयारी मंदिर आहे. येथे संगमरवरी पद्मासन स्थितीतील जैन तीर्थंकर यांच्या मूर्ती आहेत तर मध्यभागी कला पूर्ण असे संपूर्ण पितळी सहस्त्र चैत्यालय आहे व आदिनाथ भगवंताची काळ्या पाशानातील पद्मासन मूर्ती पाच फूट उंचीची आहे. अतिशय भक्ती भावाने येथे जैन समाज रथोत्सवाच्या वेळेस जमतो. येथील परंपरा रथोत्सवाच्या निमित्ताने विवाह जुळवण्याची पण आहे.

मुस्लिम समाजाचे संत हाजी हाफिज फत्ते मोहम्मद जोधपुरी बाबा यांचा दर्गाह लुमेवाडी अकलूज पासून दोन किलोमीटर अंतरावर निरा नदीच्या पलीकडे पुणे जिल्ह्यामध्ये आहे. येथे मोठा उरूस भरतो. दरगाह मध्ये कोरीव नक्षीकाम पाहण्या सारखे आहे. हिंदू मुस्लिम भाविक येथे दर्शनासाठी येतात. माळशिरस तालुक्यातील प्राचीन जागृत देवस्थान व पर्यटनाच्या दृष्टीने ऐतेहासिक असलेली धार्मिक पर्यटन स्थळांचे एकदा तरी भेट देणे विलोभनीय आहे.

# अक्कलकोट तीर्थक्षेत्राला अन्नछत्र मंडळामुळे मिळाली नवी ओळख

## जन्मेजयराजे भोसलेंच्या दुरदृष्टीमुळे अक्कलकोट पर्यटनास चालना

**तीर्थक्षेत्र अक्कलकोट स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने व लीला कार्याने पावन झालेली श्रीक्षेत्र अक्कलकोटची पावनभूमी खऱ्या अर्थाने धार्मिक पर्यटन वाढीस लावण्यात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांचे योगदान खूप मोठे आहे. स्व.लता मंगेशकरांच्या सुचनेनुसार जन्मेजयराजे भोसले यांनी दूरदृष्टीतुन साकारलेले शिवस्मारक शिवसृष्टी अजरामर धातू शिल्प शिवचरित्र रमणीय बालोद्यान स्वामी चरित्रातील साकारलेले प्रसंग हे पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी भाविकांना निवास व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, सर्व सोयी सुविधा देवून अक्कलकोट नवे उभरते धार्मिक पर्यटनस्थळ बनविण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावित आहेत.**




नंदकुमार जगदाळे

मो. ८८८८७४०७८०


संपूर्ण देशभरात एकमेव मोफत अन्नदान महाप्रसाद सेवा आदर्शवत राबविण्याचा मापदंड जन्मेजयराजे भोसले यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिला. अवघ्या तीन किलो तांदळावर गुरुपोर्णिमा १९८८ साली अंत्यत प्रतिकुल परिस्थितीमध्ये एसटी महामंडळाच्या अनेक कर्मचाऱ्याच्या मदतीने संपूर्ण महाराष्ट्रभर पदरमोड करून फिरून स्वतःच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची थोडीही चिंता न करता अहोरात्र झटून अन्नदानाचा वटवृक्ष उभा केला. अंत्यत दूरदृष्टी असलेले जन्मेजयराजे भोसले यांनी अक्कलकोट तीर्थक्षेत्राला पर्यटनदृष्ट्या मोठा आयाम दिला. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांची आज्ञा शिरोवांदय मानून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक, गडकिल्ले, शिवसृष्टी, अजरामर धातू, शिल्प शिवसृष्टी सोलापूर जिल्हयातील एकमेव बालोद्यान निर्माण केले. यामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राच्या वैभवात सौंदर्यात मोठी भर पडली आहे. यामुळे अक्कलकोट तीर्थ क्षेत्राला पर्यटनास येणाऱ्याची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्र धार्मिक पर्यटन वाढीस मोठया सोयी सुविधा मोफत महाप्रसाद सेवा देऊन नावारूपास आणण्यामध्ये श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांचे योगदान मोठे आहे. यामुळे अक्कलकोट च्या इतिहासात याची नोंद सुवर्ण अक्षरांनी होईल असेच आहे. मोफत महाप्रसाद भोजन सेवेने भाविक तर तृप्त होतातच शिवाय जन्मेजयराजे भोसले यांचे पुत्र मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी यांच्या पुढे जाऊन ऐतिहासिक पाऊल ठेवले आहे. देशभरातून येणाऱ्या भक्तांना मोफत महाप्रसाद सेवा पुरविण्याबरोबर अक्कलकोट तीर्थक्षेत्री जे लोक निराधार अनाथ आहेत त्यांना मोफत घरपोच जेवण देण्याचे महापुण्याचे काम श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाद्वारे देण्याचा निर्णय अमोलराजे भोसले यांनी घेतला. आज अनेक लोकांना घरपोच जेवणाचा डबा देऊन स्वामी समर्थाच्या पावन भूमीत अन्नाविन कोण निराधार भुका राहणार नाही याची दक्षताही श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने घेतली आहे. गुणवंत गरजू विदयार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ दहावी, बारावीमध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक गुणीजणांचा गौरव तसेच खेळाडूंना प्रोत्साहान कुस्तीगिरांना खुराक देऊन राष्ट्र उभारणीत सक्षम युवा पिढी निर्माण करण्यास मोठा हातभार लावण्याचे कार्य श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ करीत आहे. महाराष्ट्रात आलेले लातूर किल्लारी भूकंप असो की राष्ट्रावरील कुठली आपत्ती असो अनछत्र मंडळ मदतीसाठी नेहमी अग्रेसर आहे. १९९३ किल्लारी भूकंपावेळी मंडळाने सर्व प्रथम एक ट्रक भर अन्न रोज एक महिनाभर भूकंपग्रस्तांना पुरविण्याचे कार्य मंडळाने केले आहे. कोरोना महामारीमध्ये मंडळाने कोविड सेंटरला मंडळाची जागा दिली. शहराच्या तीव्र पाणीटंचाई काळात गळोरगी तलावातून विहरीद्वारे पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा करण्याच काम मंडळाने केले आहे. शासकीय कामकाज सेवा निमित्ताने येणारे कर्मचारी यांचे भोजन सेवा पुरविण्याकामी मंडळाने नेहमीच अग्रभागी सेवा पुरवित आहे. स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांचा अजून एक दुरदृष्टीचा उल्लेख आवर्जून करावसे वाटते ते म्हणजे युवा पिढी सुदृढ तर राष्ट्र बलवान हे ओळखून अधुनिक जीम उभे केले.




जीमसाठी प्रशिक्षक नेमला. म्हणजे युवा पिढीला व्यायामाचे महत्व पटवून देण्यात श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांची दुर दृष्टी दिसून येते. श्री स्वामी समर्थ धार्मिक पर्यटनामुळे अक्कलकोट परिसरातील विविध भागात व्यवसायास चालना तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणाऱ्या परगावच्या भाविक भक्तांमुळे अक्कलकोट शहर व परिसरातील विविध भागात विविध व्यवसायांना चालना मिळाली आहे. धार्मिक पर्यटनामुळे रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.



अक्कलकोट शहर व परिसरात धार्मिक पर्यटनामुळे करोडो रुपयांची उलाढाल होत आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीमध्ये अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक भक्त येत असतात. सलग शासकीय सुट्ट्या तसेच वर्षातून विविध धार्मिक सण, श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव, प्रगटदिन उत्सव, श्री गुरुपौर्णिमा, श्री दत्त जयंती उत्सव आदी काळात भाविक हे दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने अक्कलकोट नगरीत येत असतात. भाविकांची वाढती गर्दी ही आता अक्कलकोट शहरातील स्थानिकांना रोजगार देणारी ठरली आहे. अक्कलकोट नगरी ही धार्मिक पर्यटनाचे केंद्रबिंदू ठरले आहे. गाणगापूर, तुळजापूर, पंढरपूर ही प्रसिद्ध तीर्थक्षेत्र जवळ असल्याने परगावचे भाविक हे सर्रासपणे ही चारी तीर्थक्षेत्रे फिरून दर्शनाचा लाभ घेत असतात. या धार्मिक पर्यटनामुळे अक्कलकोट नगरीतील व परिसरातील अनेक छोट्या-मोठ्या व्यवसायांना गती मिळाली आहे. हॉटेल व्यवसाय, लॉजिंग, धार्मिक वस्तू दुकाने, छोटी चहा तसेच नाष्टा विक्री करणारे टिपरी, वडापाव, भजी सेंटर, ढाबे यांची संख्या वाढत आहे. गर्दीच्या वेळी लॉजिंग व्यवसाय तेजीत चालत आहे. भाविकांची एकदम गर्दी वाढली की शहरातील व परिसरातील खाजगी घरेही भाविकांना भाड्याने दिली



जात आहेत. यामुळे अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. गर्दीमध्ये भाविकांना चढ्या दराने निवासी खोल्या देण्याची तक्रार ही वाढली आहे. अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, अक्कलकोट-गाणगापूर महामार्ग, अक्कलकोट-तुळजापूर महामार्ग अशा सर्वच महामार्गावर हॉटेल तसेच ढाबे मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. गर्दीच्या काळात या महामार्गावरील हॉटेल आणि ढाब्यांवर जेवणासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसत आहे. दररोज हजारो रुपयांची उलाढाल हॉटेल आणि ढाब्यांवर होत आहे. महामार्गावर रिसॉर्ट ही वाढले आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील धार्मिक वस्तू विक्री करणारे तसेच प्रसाद विक्री करणारी दुकाने ही मोठ्या प्रमाणात आहेत. या दुकानांमध्ये यात्रा काळात लाखोंची उलाढाल होत आहे. मंदिर परिसरातील धार्मिक वस्तू विक्री करणाऱ्या दुकानांमुळे रोजगार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेक सुशिक्षित बेरोजगार हे आज व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करत आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर तसेच श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळासमोरील परिसर परिसरात छोटे चहा विक्रेते, नाष्टा विक्री करणाऱ्या टपऱ्या, भजी वडापाव विकणारे छोटे व्यवसायिक यांचेही व्यवसाय तेजीत असल्याचे दिसत आहे. परगावच्या भाविकांच्या गर्दीमुळे रिक्षा व्यवसाय ही तेजीत चालत आहे. धार्मिक पर्यटनामुळे भाविकांची संख्या वाढत असून अक्कलकोट नगरीतील व परिसरातील व्यवसाय वाढीसाठी चालना देणारी ठरत आहे. धार्मिक पर्यटनामुळे अनेक व्यवसायांना मोठ्या प्रमाणात चालना मिळत असून हजारो बेरोजगार युवकांना हाताला काम मिळत आहे. धार्मिक पर्यटनामुळे अक्कलकोट शहरातील व परिसरातील छोटे-मोठे व्यवसाय हे वाढत असून आगामी काळात विविध उद्योगधंदे वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. परगावच्या भाविकांमुळे सर्वच व्यावसायांना सुगीचे दिवस आल्याचे दिसत आहे.







---

# व्यवसायाभिमुख उच्च शिक्षण देणारी अकलूजची शिवरत्न शिक्षण संस्था

**शिक्षणक्षेत्रात आधुनिकतेच्या बदलानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण व्यवस्था पुरविण्यात अग्रेसर असलेली शैक्षणिक संस्था म्हणजे शंकरनगर -अकलूज येथील शिवरत्न शिक्षण संस्था होय. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात सहकाराच्या बीज पेरणी बरोबर कै. शंकरराव मोहिते पाटील यांनी शिक्षणाचं रोपटे ही लावले. अकलूज पंचक्रोशीत विविध शिक्षण संस्था क्रियाशील असून तालुक्यातील जनता साक्षर बनली आहे.**




प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार

मो. ९८२२१२४१९१





१९७७ साली शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश मिडीयम स्कूलच्या माध्यमातून शिवरत्न शिक्षण संस्था नावारूपाला आलेली संस्था आज बृहदाकार घेऊन अनेक शाखांमधून कार्यरत आहे. शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, धवलनगर, शिवरत्न सीबीएससी स्कूल, शिवरत्न पॅटर्न, शिवरत्न फ्री विंग्स, शिवरत्न प्री -प्रायमरी स्कूल, शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल, शिवरत्न गर्ल हॉस्टेल, शिवरत्न बॉईज होस्टेल, ताराराणी महिला कुस्ती अॅकॅडमी, शिवरत्न बॉईज रेसलिंग अॅकॅडमी, शिवरत्न क्रिकेट अॅकॅडमी, शिवरत्न बास्केटबॉल अॅकॅडमी, शिवरत्न हॉर्स रायडिंग अॅकॅडमी, मदनसिंह मोहिते -पाटील सायन्स कॉलेज मंगळवेढा, उदयसिंह मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल मंगळवेढा या विविध शाखांबरोबर शिवरत्न नॉलेज सिटी या ठिकाणी विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज हे उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय कार्यान्वित आहेत. समाजातील आरोग्य आणि स्वस्थता संभाळून उत्तम आरोग्यासाठी 'हीलिंग हँड्स' म्हणून उदयास येणाऱ्या युवक युवतींना रोजगार मिळवून देण्यासाठी विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ॅंड रिसर्च इन्स्टिट्यूट या शाखेने आपला ठसा उमटवला आहे. नर्सिंग कॉलेज मध्ये एम.एस्सी नर्सिंग, बी. एस्सी. नर्सिंग, जनरल नर्सिंग मिडवायफरी (जीएनएम) ऑक्झीलरी नर्सिंग, मिडवायफरी (एएनएम) हे अभ्यासक्रम चालवले जातात. एम.एस्सी नर्सिंग अभ्यासक्रमासाठी दहा जागा असून त्यापैकी पाच जागा लहान मुलांचा (पेडियाट्रिक) व पाच जागा सामाजिक (कम्युनिटी) अभ्यासक्रमासाठी आहेत. एम.एस्सी हे पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर नर्सिंग शैक्षणिक क्षेत्रात प्राध्यापक पदावर नोकरीची संधी उपलब्ध आहेत शिवाय संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी करता येते. या कोर्ससाठी बी.एस्सी पदवीधारकांना प्रवेश प्रथम येणाऱ्यांना प्राधान्याने दिले जाते. बी.एस्सी नर्सिंग हा अभ्यासक्रम चार वर्षांचा असून त्यासाठी ऐंशी प्रवेशासाठी क्षमता आहे. या अभ्यासक्रमाला विज्ञान शाखेतील बारावी उत्तीर्ण झाल्याचे विद्यार्थी पात्र आहेत. या अभ्यासक्रमला प्रवेश सीईटी-डीएमआर तर्फे दिली जाते. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आरोग्य संबंधित विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होता येते. जीएनएम हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून यात दरवर्षी साठ विद्यार्थ्यांना (मुले व मुली) प्रवेश दिले जाते. एएनएम अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून एकूण चाळीस मुलींना प्रवेश घेता येते. या दोन्ही अभ्यासक्रमांना थेट प्रवेश देण्याची सुविधा होती मात्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी राज्यस्तरीय सीईटी मार्फत दिलं जाणार आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांना कोणत्याही शाखेतील बारावी व तत्सम वर्गातील विद्यार्थी पात्र ठरतात. जीएनएम व एएनएम हे डिप्लोमा कोर्स असून हे कोर्स पूर्ण केल्यानंतर सरकारी, निमसरकारी (महानगरपालिका व नगरपरिषद), सहकारी, खाजगी रुग्णालयात नर्सिंग ऑफीसर या पदावर काम करता येते. नर्सिंग क्षेत्रातील पदवीपूर्व (डिप्लोमा), पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यावर परदेशासह भारतातील नामांकित ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस / अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नवी दिल्ली (एम्स), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्स (निमान्स)/ राष्ट्रीय मानसिक स्वास्थ आणि स्नायू विज्ञान संस्था सारख्या केंद्र सरकारच्या रुग्णालयात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयातून पदव्या घेऊन अनेक विद्यार्थी सध्या राज्यातील व देशातील विविध भागांमधील आरोग्य सेवेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. बेंगळुरू येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्स येथे नर्सिंग ऑफिसर म्हणून विष्णू डापकर, आंध्र प्रदेशातील मंगलगिरी येथील ऑल इंडिया मेडिकल सायन्सेस येथे क्लिनिकल इन्स्ट्रक्टर विकास मिस्किन आणि नागपूर येथील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (नवी दिल्ली अंतर्गत ) येथे कु. प्राजक्ता पानसकर व कु. मुस्कान मुजावर ह्या दोघी नर्सिंग ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. महाविद्यालयातून नर्सिंग शिक्षण पूर्ण करून बहुतांश विद्यार्थ्यांनी स्थानिक पातळीवर खासगी रुग्णालयात रोजगार मिळविले आहेत.

या महाविद्यालयात शिकवले जाणाऱ्या सर्व नर्सिंग अभ्यासक्रमांतर्गतील प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक बाब म्हणून दरवर्षी पोषण आहार योजना उपक्रम राबविला जातो. या उपक्रमात रुग्णांना आवश्यक असलेले पोषण आहाराचे प्रकार तयार करून त्यातील पौष्टिकांश बद्दल माहिती दिली जाते. मधुमेही, अतिउच्च रक्तदाब, गरोदर महिला, माता महिला, लहान मुलांना, हृदयरोगी इत्यादी रुग्णांना अती वेगाने बरे होण्यासाठी पोषण आहार तयार करण्याची पद्धती अवलंबली जाते. या उपक्रमाला खास करून संस्थेचे अध्यक्षा सौ. शितलदेवी धैर्यशील मोहिते -पाटील स्वतः लक्ष घालून मार्गदर्शन करतात.

शिवरत्न नॉलेज सिटीत व्यवस्थापन क्षेत्रात उच्च शिक्षण देण्याची कटिबद्ध असलेले आणखीन एक महाविद्यालय म्हणजे शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज! या महाविद्यालयात बीबीए अभ्यासक्रमावर शिक्षण दिले जाते. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून दरवर्षी या अभ्यासक्रमाला साठ विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जाते. या अभ्यासक्रमातील बीबीए पदवी मिळवून विद्यार्थी नामवंत कंपनीत व्यवस्थापक पदावर काम करतात तर मोठ्या प्रमाणात स्वतःचे व्यवसाय सुरू करतात. ७० ते ८० करोड वार्षिक उलाढाल असलेले शिवरत्न कन्स्ट्रक्शन फर्मचे उद्योजक शिवतेज -मोहिते पाटील, ७ ते ८ करोड वार्षिक उलाढाल असलेले टेकले एंटरप्रायजेसचे मालक आकाश टेके, ज्वेलरी व्यवसायात सुमारे चार करोड रुपये उलाढाल असलेले नागेश वाले व अकलूज येथील शिवामृत दूध संघात मानव संसाधन विकास अधिकारी पदावर कार्यान्वित असलेल्या तमन्ना शेख हे या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. या महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यास केंद्र असून त्या मार्फत एमबीए व एम. कॉम हे दूरशिक्षणावर आधारित अभ्यासक्रम चालवले जातात. या महाविद्यालयात वर्षभरात संस्थेच्या कार्याध्यक्ष व विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसायांना चालना देण्यासाठी अनेक परिसंवाद, कार्यशाळा आयोजित केले जातात.






सोलापूर
**तरुण भारत**
वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## महिला व बालकल्याण विभाग
## जिल्हा परिषद, सोलापूर

मबाक विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील महिला व मुली यांचे सक्षमीकरण तसेच त्यांच्या आर्थिक उन्तीसाठी व्यवसायभिमुख योजना, खालील प्रमाणे आहेत.

**गट अ**

१. इयत्ता ७ वी ते १२ वी यात मुलींना संगणक प्रशिक्षण
२. मुलींना टॅली प्रशिक्षण देणे
३. मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शाररिक विकासासाठी प्रशिक्षण
४. महिला समुपदेशन केंद्र

**गट DBT योजना**

१. पिठाची गिरणी
२. पिको-फॉल मशीन


*** विशेष घटक योजने अंतर्गत : महिलांना पिठाची गिरणी पुरविणे.**

**वरील प्रमाणे योजना करिता खालील प्रमाणे सर्व साधारण अटी व शर्ती आहेत.**

* लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
* उत्पन्न रु.१,२०,००० आत असलेले तहसीलदाराचा/तलाठी यांचा दाखला असावा.
* टॅली करिता इ.१० वी पास असणे आवश्यक.
* संगणक व टॅली प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांने शाळेचा/महाविद्यालयाचा बोनाफाईड अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुण पत्रक जोडणे आवश्यक राहील.
* लाभार्थ्यांने यापूर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
* लाभार्थ्याने आधारकार्डची नोंदणी कार्डची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल.
* उच्च शिक्षणासाठी १८ वर्षा खालील मुलांना व मुलींना आर्थिक मदतीकरिता मुलांना व मुलींना इ.१० वी व १२ वी मध्ये किमान ७५% गुण प्राप्त करणे आवश्यक व उच्च शिक्षणासाठी कोणत्याही क्षेत्रातील म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी,वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतलेले प्रमाणपत्र.
* वैयक्तिक लाभाच्या योजनामध्ये लाभार्थी हिस्सा १०% भरणे आवश्यक आहे.
* पिठाची गिरणी ही विशेष घटक योजनेतील असल्याने लाभार्थी हा अनु.जातीचा असणे व त्यांचेकडील जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
* महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणेत येत असून कुटूंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तन्हेने त्रासलेल्या व मानसिक दृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक मानशास्त्रीय दृष्ट्या खचलेल्या महिला करिता कायदेशीर दृष्टीने समुपदेशन केले जाते.
* माझी कन्या भाग्यश्री योजना, १ ऑगस्ट २०१७ नंतर जन्म झालेल्या दोन मुलींपर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते.

वरील योजनांच्या अधिक माहितीसाठी गट विकास अधिकारी/ बाल विकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती सर्व यांच्याशी संपर्क करावा.

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (बा.क)**
जि.प.सोलापूर



# आपल्या अस्तित्वाचा कायम ठसा उमटविणारे शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी

अणदूर म्हटलं की आपसूकच ओठावर येते ते आलूरे गुरुजी यांचे नाव आणि डोळ्यासमोर उभी राहते त्यांचे प्रसन्न असे गांधीवादी व्यक्तिमत्व.आपल्या कार्यकर्तुत्वाने मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण राज्याच्या इतिहासात स्मृती कोरून आपल्या अस्तित्वाचा कायम ठसा उमटविणारे, शिक्षण महर्षी सि. ना. आलुरे गुरुजी यांचा आज तृतीय स्मृतिदिन.



त्यांच्या स्मरणार्थ अणदूर येथील जवाहर महाविद्यालयासमोर एक भव्य, दिव्य असे स्मारक आज उभे राहत आहे. गुरुजींचे स्मारक येणाऱ्या प्रत्येक पिढीला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे असणार आहे. आपले संपूर्ण आयुष्य ग्रामीण भागातील गोरगरीब ,वंचित,शेतकरी, कष्टकरी, मजूर इत्यादी घटकांच्या पाल्यासाठी त्यांच्या शिक्षणासाठी, आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे आलुरे गुरुजी यांच्या स्मृती चिरंतन जपून ठेवण्यासाठी या स्मारकाची निर्मिती होत आहे.

आज हे स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी स्मारक समिती जीवाचे रान करीत आहे. यासाठी हजारो लोकांचे योगदान आवश्यक आहे. स्मारक समितीचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण,कार्याध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील, कोषाध्यक्ष वीं लक्ष्मीकांत पाटील यांच्या समर्थ नेतृत्वाखाली स्मारकाचे काम अतिशय वेगाने व व्यवस्थित नियोजनाने चालू असून तांत्रिक मार्गदर्शन प्रा. भालचंद्र बिराजदार, पुणे, आर्किटेक्ट शुभम बादोले, सोलापूर तसेच गुरुजींच्या पुतळ्याचे काम सोलापूर येथील प्रसिद्ध शिल्पकार महेश शहाणे यांच्याकडून पूर्णत्वास येत आहे.

हे स्मारक म्हणजे नुसती इमारत नसून या भागातील हे एक अभ्यास केंद्र व प्रेरणा स्थळ होणार आहे. येणाऱ्या पिढीला गुरुजींचे जीवन समजावे आणि त्यांचा संदेश लोकापर्यंत पोहोचला पाहिजे कारण, त्यांचे जीवन हाच त्यांचा संदेश आहे. त्यांच्या कार्याची ओळख व्हावी व त्यापासून प्रेरणा घेऊन सुसंस्कृत पिढी निर्माण व्हावी यासाठी हेच स्मारक आहे. या स्मारक स्थळाला प्रेरणास्थळ असे नाव देण्यात आले आहे.



या प्रेरणास्थळी गुरुजींची समाधी गुरुजींचा भव्य असा पंधरा फूट उंचीचा पुतळा त्याखाली ध्यानमंदिर आहे ,त्याच्या शेजारी म्युझियम, वाचनालय, अभ्यासिका, विश्रामगृह, सर्व धर्म प्रार्थना स्थळ व बहुउद्देशीय सभागृह असे विविध विभाग असणार आहेत. जेणेकरून या परिसरातील सर्वच नागरिकांना याचा लाभ घेता येईल. म्युझियममध्ये गुरुजींना मिळालेल्या सर्व पुरस्काराची माहिती त्यांचा जीवनपट समजावा यासाठी त्यांची सर्व छायाचित्रे, त्यांनी आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमाचे चित्रदालन, त्यांनी वापरलेल्या सर्व वस्तू या म्युझियममध्ये असणार आहेत. याशिवाय गुरुजींचे दैवत असलेले महात्मा गांधी, संत विनोबा भावे, साने गुरुजी यांचे संपूर्ण वाङ्मय आणि परिसरातील मुलामुलींना स्पर्धात्मक परीक्षेची गोडी निर्माण व्हावी म्हणून स्पर्धा परीक्षेची सर्व पुस्तके येथील वाचनालयात उपलब्ध करावयाची आहेत. तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी भव्य अभ्यासिका, विश्रामगृह, सर्व धर्मीय प्रार्थना स्थळ ,अशा विविध समाज उपयोगी गोष्टी या सुंदर वास्तूमध्ये असणार आहेत. या परिसरातील सुंदर प्रेक्षणीय स्मारक बनविण्याचा संकल्प स्मारक समिती, शिक्षक, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी, ग्रामस्थ यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेतला आहे. या संकल्प सिद्धीसाठी गुरुजींना मानणारे सर्वच क्षेत्रातील व्यक्ती संस्था त्यांचे अनुयायी या स्मारकाच्या पूर्णत्वासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. या संपूर्ण स्मारकाचा खर्च हा जवळपास पाच कोटी रुपयाचा असून हे अवघड काम आपण सर्वांच्या मदतीशिवाय शक्य नाही. गुरुजींना अभिप्रेत असे सगळ्यांचे योगदान या कामी असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकांनी या कामी मदत करणे आवश्यक आहे. हे स्मारक माझं आहे, माझ्या प्रेरणास्त्रोतांचे आहे, अशी भावना त्यांच्या ठाई येणे महत्त्वाचे आहे. सध्या पुतळ्याचे काम प्रगतीपथावर असून जानेवारीत पुतळा स्थापन होईल. पुढील कामेही वेळेत पूर्ण करण्यासाठी समिती प्रयत्नशील आहे. या कार्यात आपली ही मदत अवश्यक असून फुल ना फुलाचे पाकळी देऊन आपण या पवित्र कार्यात योगदान द्यावे. ही आपणास नम्र विनंती आजच्या या स्मृतिदिनी मी आपणास करीत आहे.

जवाहर परिवाराचा इतिहास खूप मोठा आहे. या शाळेतून बाहेर पडलेले अनेक विद्यार्थी आज मोठमोठ्या पदावर देश-विदेशात काम करीत आहेत. त्यांनी एक वेळ या स्मारकास नक्कीच भेट द्यावे. लवकरच हे पवित्र कार्य पूर्णत्वास जावो हीच प्रार्थना.



**प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी,**
सचिव, सि. ना. आलुरे गुरुजी स्मारक समिती,अणदूर.

## स्व. आलूरे गुरुजी व सोलापूर तरुण भारत चे एक अनोखे नाते

आज स्व. गुरुजींचा तृतीय स्मृती दिन या दिनाचे औचित्य साधून सोलापूर तरुण भारत त्यांच्या जीवन कार्यावर आधारित एक सुंदर, दर्जेदार, संग्रही ठेवण्यासारखी पुरवणी प्रकाशित करीत आहे, गुरुजींचे कार्य हे चिरंतन राहावे, येणाऱ्या पिढीसाठी ते प्रेरणादायी असावे आजच्या दिनी त्यांच्या आठवणींना उजाळा मिळावा त्यांच्या पवित्र स्मृतील विनम्र अभिवादन करावे हाच उद्देश मनी बाळगून आम्ही ही दर्जेदार पुरवणी अणदूर परिसरातील जनतेला देण्याचा प्रयत्न करीत आहोत,मराठवाड्याचे प्रति साने गुरुजी, ज्यांनी तुळजापूर तालुक्यात शिक्षणाची गंगा गोरगरीब, सामान्य जनतेच्या दरवाज्यापर्यंत नेली व त्या कुटुंबातील सदस्य शिकून मोठमोठ्या नोकऱ्यात लागली, अशा या तपस्वी, शिक्षण महर्षी, ऋषितुल्य व्यक्तिमत्वाचे स्व. आलूरे गुरुजी यांचे व दैनिक सोलापूर तरुण भारत चे एक आगळे वेगळे नाते गुरुजी तरुण भारत मोठ्या आवडीने वाचत आपल्या प्रतिक्रिया देत तरुण भारत तत्कालीन सर्व संपादकांसोबत त्यांचा संवाद असायचा तरुण भारत च्या वर्धापन दिनाला त्यांच्या शुभेच्छा असायच्या तरुण भारत ने पण गुरुजींच्या पवित्र शैक्षणिक कार्याला सतत पाठिंबा दिला त्यांच्या ७५ च्या कार्यक्रमाला सप्तरंगी पुरवणी तरुण भारत नेच काढली होती, गुरुजी हे शिक्षण महर्षी होते त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना घडवले त्या काळात मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवत नसत पण गुरुजी स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते त्यांनी मुलींचे अनेक हॉस्टेल काढली त्या मध्ये हजारो मुली चांगले, दर्जेदार शिक्षण घ्यायच्या स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या त्या काळी शेतकऱ्याकडे पैसे नसायचे तेव्हा गुरुजींनी ज्वारी, गहू घेऊन हॉस्टेल मध्ये मुलींना, मुलांना प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण पूर्ण केले, अणदूर गाव हे शिक्षणाची राजधानी असून येथील गुरुजींचे जवाहर विद्यालय हे शिक्षणाचे फार मोठे हब आहे अणदूर हे दोन गोष्टीने ओळखले जाते एक ग्रामदैवत श्री खंडोबाचे मंदिर व गुरुजींची शाळा जवाहर विद्यालय त्या मुळे अणदूर ला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे .गुरुजींच्या आठवणी जागृत, चिरंतन राहण्यासाठी गुरुजींचे भव्य, दिव्य स्मारक जवाहर कॉलेज च्या प्रांगणात उभे रहात आहे त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण होवो, या पवित्र कार्यासाठी लोकांनी पुढे येण्याची गरज आहे अनेक दानशूर, कर्मचारी यांनी या कामी मोठ्या प्रमाणात मदत दिली आहे पण हे काम खूप मोठे आहे त्या मुळे गुरुजी मुळे आपल्या आयुष्याचे कल्याण झालेल्या सर्व घटकातील, सर्व क्षेत्रातील नागरिक बंधू भगिनींना नम्र विनंती की त्यांनी पुढे येऊन या कार्यास मदत करावी.

आलूरे गुरुजींची तरुण भारत शी असलेले हे ऋणानुबंध त्यांच्या पुढच्या पिढीने पण जपले आहेत, त्यांचे पुतणे अणदूर चे सरपंच रामचंद्र आलूरे हे सध्या आलूरे गुरुजींचा शैक्षणिक वसा वारसा पुढे नेत आहेत त्यांचेही तरुण भारत वर विशेष प्रेम आहे, तरुण भारत च्या वाढीमध्ये आलूरे कुटुंबाचा सिंहाचा वाटा असून तरुण भारत च्या प्रत्येक कार्यक्रमाचे निमंत्रण आलूरे कुटुंबाला असतेच तसेच शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर च्या सर्व शाखांच्या सकारात्मक बातम्या या तरुण भारत मध्ये हमखास छापून येत असत तीच परंपरा पुढेही चालू असून, अणदूर परिसरात तरुण भारत एक चांगली सकारात्मक विचार घेऊन विकासात्मक बातम्या छापून लोकांच्या अडीअडचणी सोडवण्यावर भर देतोय अणदूर परिसरातील३५ गावामध्ये तरुण भारत ची क्रेझ असून सकारात्मक, संवेदनशील पत्रकारिता करून जनतेची सेवा करण्याचं कर्तव्य तरुण भारत सातत्याने करतोय या मध्ये स्व आलूरे गुरुजींचे महान विचारांची जोपासना करून ते सामान्यांपर्यंत पोचवण्याच काम तरुण भारत सातत्याने करतोय, आज सोलापूर तरुण भारत चा वर्धापन दिन पण साजरा होत आहे, या प्रसंगी स्व गुरुजींची आठवण होणे स्वाभाविक होते, त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी तरुण भारत सदैव तयार असल्याची खात्री या प्रसंगी देऊन, आगामी काळात तुमच्या शैक्षणिक दिंडीत तरुण भारत आपला रोल नक्कीच निभावेल, यात काही शंकाच नाही गुरुजींचे शैक्षणिक कार्य असेच बहरत राहो तसेच सोलापूर तरुण भारत ची वाटचाल अशीच यशस्वी होवो एवढीच अपेक्षा या प्रसंगी



**श्रीकांत अणदूरकर**
प्रतिनिधी, दै तरुण भारत अणदूर












# सन्मानाने जगण्याची दीक्षा देणारे संस्काराचे विद्यापीठ...



एका ग्रंथात थोर साहित्यिक वि.वा. शिरवाडकर यांनी लिहून ठेवले आहे,

' नद्या सुंदर आहेत. डोंगर सुंदर आहेत. पण याहून सुंदर आहे तो माणूस. म्हणून माथ्यावर आभाळ आणि पायाखाली रस्ता असला तरी माणसासाठी जगावेसे वाटते.' माणसासाठी जगणारे आलुरे गुरुजी हे देवमाणूस होते.त्यांचे देवत्व सेवा, समर्पण आणि सदभावात सामावलेले होते.

ते कार्यक्षम असे लोकप्रिय आमदार होते.

एका साखर कारखान्याचे संस्थापक होते..

सुखाने जगण्याची संधी असताना त्यांनी स्वतःला समाजाच्या सुखदुःखांशी घट्ट बांधून घेतले होते.

ते संवेदनाशील मनाचे निष्ठावंत समाजसेवक होते.

संकल्प आणि साधना,सौजन्यशीलता आणि उपक्रमशीलता यांच्या एकरुपतेत त्यांचे मोठेपण दडले होते.सामाजिक न्यायासाठी संघर्ष करणे हा त्यांचा पिंड होता.मानवधर्माची उपासना हा त्यांचा स्थायीभाव होता.विनम्रता, विद्वत्ता, प्रेम,करुणा, शांती यांचा ते महासागर होते. अशा विलोभणीय व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यासाठी प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी गुरुजींच्या जीवन कार्याला 'संस्काराचे विद्यापीठ' या नावाने ग्रंथाचे कोंदण दिले आहे.

आज माणसापेक्षा यंत्र प्रभावी झाले आहे.अशा यांत्रिक युगात प्रस्तुत ग्रंथ संस्काराचा मंत्र देतो आहे.ग्रंथाची भाषा ओघवती आहे..लेखन आशयसंपन्न आहे.एकूणच लेखकाची आत्मीयता पुस्तक वाचताना पानोपानी जाणवते..एकापरीने आलुरे गुरुजींना त्यांनी ग्रंथरुपाने समाजमनात पुन्हा प्रतिष्ठित केले आहे..त्यांचा ग्रंथप्रपंच प्रशंसनीय आहेच,शिवाय काळाची गरज म्हणून तो प्रेरणादायी आहे.

माणसाच्या पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही.पण महापुरुषांच्या पुनर्कर्मासाठी माणसे जन्म घेतात,हा विश्वास आलुरे गुरुजींसारखे गांधीवादी नेते दृढ करतात.

साधुत्व आणि साधेपणा ही गुरुजींची वैशिष्ट्ये आजच्या मूल्यहिन राजकारणात उठून दिसतात.दैनंदिन जगण्यात भपकेबाजपणाचे प्रस्थ माजले आहे.

माणसाला प्रचंडपणाच्या वेडाने ग्रासले आहे. गाडी,बंगला,पैसा आडका,शेत शिवार..हे सारे काही त्याला प्रचंडपणात हवे आहे.ह्या प्रचंडपणाच्या हव्यासात माणूस दिवसेंदिवस साधेपणातला उत्कट आनंद हरवत चालला आहे.साधेपणात काय साधुत्व,सौंदर्य आणि सामर्थ्य असते,हे आलुरे गुरुजींच्या सहवासात सुवासित झालेल्या प्रा.डॉ.मल्लीनाथ बिराजदार यांनी 'याची देही,याची डोळा' पाहिले आणि 'संस्काराचे विद्यापीठ' ग्रंथामध्ये ते सोदाहरण दाखवून दिले आहे.

लेखक म्हणून प्रा.बिराजदार यांनी गुरुजींना आवडणाऱ्या प्रार्थनेचे अनेक प्रयोग अनेक ज्ञानमंदिरातून केले. त्यासाठी त्यांना मित्रांची साथ लाभली. गुरुजींचा कौटुंबिक आणि वैचारिक वारसा जपणाऱ्या रामचंद्र दादांचे बहुमोल सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांचे प्रोत्साहन लाभले.

प्रार्थनेचा प्रयोग कौतुकास्पद आहे.तसे पाहिले तर

आजही अनेक ज्ञानमंदिरातून भारताची प्रतिज्ञा रोज म्हंटली जाते..

'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत'

मला प्रश्न एकच पडतो की अशा प्रयोगांचे सामाजिक फलित काय?

प्रयोगांचा हेतू शुद्ध आहे..पण आपण प्रतिज्ञेत म्हणतो,तो बंधुभाव प्रत्यक्षात दिसतो का?

माणसा माणसात द्वेष कोण पेरते? विविध परंपरेने नटलेल्या आमच्या संस्कृतीला सुरुंग कोण लावते?

वाढत्या धर्मद्वेषामुळे समाज जीवन दुभंगते आहे, अतिरेकी चंगळवादाने जीवनसौंदर्याची आणि संस्कृतीची हानी होते आहे,याला जबाबदार कोण?

लोकशाहीत लोकभावना महत्वाची..पण शेती,शिक्षण आणि रोजगार या प्रश्नांपेक्षा नेते स्वकल्याणात आणि सत्ताभिलाषेत गुंतलेले दिसतात, असे का घडते आहे?

अशा कठीण काळात आलुरेगुरुजीसारखी ध्येयवादी आणि स्वच्छा चारित्र्याची माणसे सामाजिक प्रबोधन वा परिवर्तनासाठी आयुष्याची मशाल करतात.क्रांती करतात. अर्थात अशी माणसे अपवादात्मक असतात..पण तीच अज्ञान,अंधश्रध्देचा अंधार चिरण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात..त्यांचे हे पवित्र कार्य काळाच्या उदरात गडप होवू नये म्हणून प्रा.बिराजदार यांच्यासारखे प्रतिभावंत ज्ञानोपासक ते कागदावर उतरवतात,काळजावर कोरतात..त्यातून चिरंतन चैतन्याचे अक्षरलेणे आकाराला येते.

आपली संस्कृती प्रकाशपूजक आहे.ती विकाराकडून विवेकाकडे,असत्यापासून सत्याकडे आणि अंधारापासून प्रकाशाकडे जाण्याचा संदेश देते.

एक अंधार निसर्गनिर्मित असतो,जो सूर्य मावळल्यानंतर होतो.दुसरा अंधार मानवनिर्मित असतो,जो मूल्ये पायदळी तुडवल्यावर होतो.हा मूल्यांचा अंधार अधिकाधिक दाटत गेला तर येणाऱ्या पिढ्या दुबळ्या होतील..

आम्ही शिवाराला पाणी देवू..शिवारे संपन्न करु.धन देवू..ज्ञान देवू.. पण शिवारे आणि घरे संपन्न करताना माणसाचे मन असंस्कृत राहिले तर माणसातूनच पशू निर्माण होतील.असे पशूत्व निर्माण होवू नये म्हणून गुरुजींनी गांधीविचार सोबतीला घेवून समाजमनात मांगल्याचे विवेकदीप प्रज्वलित केले...

आमच्या पिढीने म.गांधी,साने गुरुजी पाहिले नाहीत.पण ते आलुरे गुरुजींच्या काळजात वस्तीला राहिले होते.

आलुरे गुरुजींवर शांतीचा पावा घेवून समतेचा सूर आळवणाऱ्या म.गांधीच्या प्रार्थनेचा प्रभाव होता.त्यांच्या समोर 'खरा तो एकची धर्म,जगाला प्रेम अर्पावे' असे कळवळून सांगणाऱ्या सानेगुरुजींचा आदर्श होता..अक्षरांचा गंध नसला तरी कीर्तनातून शहाणपणाचा सूर आळवणाऱ्या गाडगेबाबांच्या स्वच्छतेचा मंत्र गुरुजींनी उरी जपला होता..

प्रा.बिराजदार यांनी ग्रंथाच्या रुपाने गुरुजींचे चरित्र मंदिर उभे करुन खऱ्या अर्थाने 'संस्काराचे विद्यापीठ' साकारले आहे.या विद्यापीठाचा विद्यार्थी होण्यासाठी वयोगटाचे बंधन नाही..

हे विद्यापीठ पदवीचे प्रमाणपत्र देणार नसले तरी सन्मानाने जगण्याची दीक्षा देईल,याची मला शंभर टक्के खात्री आहे..

त्यासाठीच आपण ग्रंथाचे मनापासून स्वागत करुया




**प्राचार्य डॉ.यशवंत पाटणे**
सातारा.


# पण त्यांची प्रत्येक गोष्ट आज वर्तमानात उभी

**देह चंदनाचा**
**गेला झिजुनी**
**आता उरल्या**
**फक्त आठवणी**

**नव्हते जेव्हा**
**आपुले कुणी**
**आधार दिला तो**
**दिव्य विभुतीनी**

**काळ गेला**
**दिवस सरले**
**रूपात गुरुजीच्या**
**देव गेला मला भेटुनी !**

गुरुजींचे हे तिसरे पुण्यस्मरण आणि पुन्हा सर्व काही आठवणी नजरेसमोर , विसरायचं काय नेमकं ? जसा देव श्वासात सामावलेला असतो, त्याला जाणीवपूर्वक आठवावा लागत नाही अगदी तसं . गुरुजीं आपल्यातून शरीराने निघून गेले खरे पण त्यांची प्रत्येक गोष्ट आज वर्तमानात उभी राहते. त्यांची शिस्त , त्यांचा दरारा, त्यांचा अभ्यास , त्यांची अचाट स्मरणशक्ती , प्रत्येक गोष्टीवर असणारी त्यांची बारीक नजर , आवाजातला तो बाणेदारपणा , कुणाची नजर काय सांगते याचा अचूक अभ्यास , कसं रहावं, कसं जगावं ते माणसातला देवमाणूस कसं बनावं हे शिकविणारं अकल्पित व्यक्तिमत्व म्हणजे गुरुजी.

नोकरीच्या निमित्ताने गुरुजींच्या सानिध्यात आले आणि आपण धन्य झालो याची प्रकृषाने जाणीव झाली . अतिशय सुमार असं आपलं व्यक्तिमत्त्व , जीवनाच्या प्रती फार काही विचार किंवा दृष्टी नसणारे आपण त्यांच्या विक्तिमत्त्वाच्या छायेत स्थिरावलो म्हणून कदाचित जीवन घडलं , आयुष्य सुंदर झालं आणि आपल्याला एक शिस्त लागली असं नेहमी वाटत राहतं.

गुरुजी हे व्यक्तिमत्त्व कोणत्या शब्दांच्या चौकटीत बसणारं व्यक्तिमत्व नव्हे. त्यांचं आयुष्य हेच एक तत्वज्ञान आहे , जो समजून घेईल त्यांना गुरुजी कळतील. अशा अमर्याद असणाऱ्या गुरुजींच्या काय आणि किती आठवणी लिहाव्यात ? आणि कशा मांडव्यात त्या ? सोप्प का असतं हे ? जसं सप्तरंगी इंद्रधनुष्यातील असंख्य दवबिंदुनी मिळून तयार झालेले आणि सूर्यकिरणांनी रंगलेले दवांच अस्तित्व स्वंतत्रपणे शब्दात मांडता येत नसतं अगदी तसं गुरुजींचं अनाकलनीय व्यक्तिमत्त्व !

त्यांचा ६ सप्टेबर २०१७ रोजी पंच्याऐंशीवा वाढदिवस साजरा झाला . माजी गृहमंत्री माननीय शिवराज पाटील चाकुरकर ते राज्यातील विविध पक्षाचे विविध पदावर कार्यरत असणारे अनेक राजकीय , सामाजिक , वैद्यकीय , सहकार क्षेत्रातील दिग्गज उपस्थित होते. त्याचबरोबर त्र्याण्णवव्या आखील भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष माननीय श्रीपाल सबनीस आणि गुरुंजीवर प्रेम करणाऱ्या हजारो लोकांच्या उपस्थितीत परीस ग्रंथाचे प्रकाशन मोठ्या थाटमाटात झाले . त्यांचा अतिशय देखणा अभिष्टचिंतन सोहळा

पाहण्यासाठी प्रचंड जनसमुदाय जमा झाला होता तो पाहिला की वाटलं गुरुजींच्या रुपात विठूमाऊलीच्या दर्शनाला ही मंडळी आलीत. गुरुजी म्हणजे साक्षात पांडुरंग , ना जात , ना धर्म , ना लहान , ना मोठं, सर्वजण समान त्यांच्यासाठी. दिनदुबळ्यांचा कैवारी असणाऱ्या गुरुजींच्या मुखावरील त्यादिवशी दिसलेले समाधान म्हणजे आमच्यासाठी आनंदाची पर्वणी होती.

अनेकांचे आयुष्य घडविणाऱ्या गुरुंजीनी सामन्यातला सामान्य व्यक्तींची केलेली विचारपूस , पुढे केलेला मदतीचा हात , गरीब मुलांच्या शिक्षणासाठी केलेला खर्च, समाजातल्या वाईट रुढी परंपरा मोडीत काढण्यासाठी स्वतःच्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षण कामी आणला याचा हिशोब नाही करता येतं.

गुरुजी जगलेचं लोकांसाठी असं म्हटलं तर कदाचित लोकांना या वाक्यात अतिशयोक्ती वाटू शकेलही कारण स्वार्थाशिवाय माणूस ही संकल्पना कुणाला मान्य होणेचं शक्य नाही. पण जेव्हा आपण आपल्यात डोकावून पाहू तेव्हा निश्चित समजेल , गुरुजीनी केलेला त्याग सोप्पा नव्हता. खिशातला खाली पडलेला एक रुपयाचा बंदा तासनतास शोधणारे आपण कधी कुणासाठी सढळ हाताने मदत करू हे अशक्य आहे. कुणासाठी अन्नदाते होऊ , कुणाच्या पाठीवरती हात ठेऊन त्यांना आपलंस करू , कुणाच्या वेदना पाहून त्यांच्या दुःखात आपण सामील होऊ , या कल्पना आपल्याला शिवणार देखील नाहीत. संस्थाचालक म्हणून त्यानी कधी केवळ अधिकार गाजवीला नाही तर संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्यांशी कौटुंबिक सलखो ठेवला, चुकलो तिथे बोलले पण त्यांचा राग क्षणिक असायचा. वेळप्रसंगी , अडचणीच्या वेळी पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. अगदी चतुर्थ कर्मचाऱ्यांच्या सुख दुःखात देखील ते जातीने हजर असायचे. गुरुजी कार्यक्रमास हजर झाले तरचं कार्यक्रम पूर्ण झाल्यासारख वाटायचं कारण त्यांची उपस्थिती म्हणजे देव्हाऱ्यातील नंदादीपाची पवित्रता, चंदनाचा सुगंध ज्याशिवाय पूर्णत्व नाही. खरं तरी किती नवस ,उपवास केलं तरी देवकृपेची उतराई होऊ शकत नाही अगदी तोचं भाव गुरुजींप्रती दाटतो. अशी व्यक्ती आपल्याला भेटणं, त्यांचा सहवास लाभणं , मार्गदर्शन मिळणं हे पुनर्जन्मीचं पुण्य म्हणावं. गुरुजी तुमच्या ऋणाची उतराई होता येणार नाही पण तुम्ही दाखविलेल्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न निश्चित असणार आहे.


गुरुजींना शतशः वंदन !






**- प्रोफेसर डॉ. अनिता मुदकण्णा**
माजी प्राचार्य इंग्रजी विभागप्रमुख
जवाहर महाविद्यालय अणदूर








# दुरितांचे तिमिर जावो !



दुरितांचे तिमिर जावो
विश्व स्वधर्म सूर्य पाहो श्र
जो जे वांछील तो ते लाहो
प्राणिजात श्रश्र

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी अखिल विश्वासाठी पसायदान मागितले. ज्यांना जे जे पाहिजे ते मिळो अशा प्रकारची प्रार्थना करताना म्हटले की, 'दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्य पाहो श्र' ज्यांच्या जीवनामध्ये खरेच अंधार आहे. जे वंचित आहेत, पीडित आहेत त्यांच्या जीवनातील अंधार संपल्यानंतर ज्यांना जे जे हवा आहे ते ते मिळो.जणू काही हाच आदर्श समोर ठेवून शिक्षण महर्षी आलुरे गुरुजींनी तळागाळातील समाजाचा विकास व्हावा म्हणून सर्वांसाठी शिक्षणाचे द्वार खुले केले आणि संस्थेचे ब्रीद ठेवले 'दुरितांचे तिमिर जावो '

गुरुजी अणदूर सारख्या खेड्यात जन्मले, आई वडील शेतकरी, निजामशाही राजवट शिक्षणाची सोय नाही म्हणून नळदुर्गला चालत जाऊन उर्दू माध्यमाच्या शाळेत शिकले. सर्वत्र दहशतीचे वातावरण ७० ते ८० विद्यार्थी एकत्रित जायचे. देश प्रेमाने भारावलेले गुरुजी नेतृत्व करायचे. एका हातात तिरंगा व दुसऱ्या हातात संरक्षणासाठी गोफण असायचे. तुळजापूरला असताना गुरुजी स्वतः स्वयंपाक करून शिकले. सोलापूरला दररोज अनेक किलोमीटर पायपीट करून बीएससी ची पदवी पूर्ण करून पाडोळी रेणापुर येथे एक सामान्य शिक्षक म्हणून सेवा केली.

गुरुजी गणिताचे शिक्षक होते. रेणापूर येथे शिकवत असताना वर्गात एका विद्यार्थ्याचे लक्षच नव्हते. गुरुजींचे लक्ष त्या विद्यार्थ्याकडे गेले. नारायण कांबळे नावाचा हा विद्यार्थी नारायणला गुरुजी उठून उभे राहायला सांगितले. लक्ष नसल्याचे कारण विचारलताच नारायणच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. विश्वासात घेतल्यानंतर कळले की, दोन दिवसापासून नारायणाच्या घरचे चूल पेटले नव्हते, घरचे सर्व उपासी होते. नारायणला गणित कसे कळणार? याची जाणीव गुरुजींना झाली आणि त्याच वेळेस नारायणच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी गुरुजींनी घेतली. नारायण शिकला आणि मोठा साहेब झाला.अशा कितीतरी विद्यार्थ्यांचे जीवन घडविण्यासाठी आपल्या पगारातला एक चतुर्थांश भाग गरीब विद्यार्थ्यांसाठी खर्च करीत राहिले. सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या निवृत्तीवेतनातून पन्ना स टके भाग गोर गरीब विद्यार्थ्यांसाठी खर्च करणारे गुरुजी मातृदय होते.

आई खरंच काय असते याची सुंदर परिभाषा फ.मु. शिंदे यांनी आपल्या आई नावाच्या कवितेत दिलेली आहे. ते म्हणतात,' आई खरंच काय असते?लंगड्याचा पाय असते,वासराची गाय असते, दुधावरची साय असते, लेकराची माय असते. गुरुजी अणदूरला आले. जवाहर विद्यालयात सेवा करीत करीत संपूर्ण जिल्ह्यात सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून व आमदार म्हणून काम करीत असताना अनेक अपंग, अनाथ, वंचित, पिढतांचे मातृत्व स्वीकारून लंगड्याचा पाय आणि लेकराची माय झाले.

गुरुजींमुळे माझ्या आयुष्याचं सोनं झालं या भावना व्यक्त करणारे किलजचे मधुकर माने आपल्या भावना व्यक्त करताना माझ्या शरीरावर रोमांच उभे राहिले.गुरुजी आमदार असताना किलजला गेले. एका ठिकाणी सभा संपल्यानंतर मधुकरला घेऊन मधुकरचे आई वडील गुरुजींना भेटले. मधुकरची चिंता व्यक्त केली, कारण मधुकर दोन्ही पायाने अपंग होता. याच कसं होईल ही आई-वडिलांची चिंता. अपंग मधुकरला पाहिल्यानंतर क्षणभर गहिवरले मधुकरला जणु देव भेटल्याचा आनंद झाला. गुरुजी म्हणाले याला अणदुरला आणून सोडा,याच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी मी घेतो. मधुकर अणदुरच्या जवाहर विद्यालयात शिकला गुरुजींच्या धर्मपत्नी शांता काकी आलुरे यांनी पुत्रवत प्रेम केले. घारातून डबा दिला, शिक्षण पूर्ण झाल्यावर नळदुर्ग येथे महाविद्यालयात कारकून ची नोकरी लावली. लग्न झाले संसार फुलला आणि जीवनाचे नंदनवन झाले ते फक्त आलुरे गुरुजींमुळे.

माणूस आयुष्यभर संघर्ष करतो, लढत राहतो, धावपळ करतो आणि मग असा क्षण येतो की आपण थकून जातो आणि थांबतो.एखाद्या पाखराने दिवसभर धावपळ करून सांजेला निवारा शोधावा आणि एका दाट डेरेदार वृक्षाच्या फांदीवर वस्ती करावी, अगदी तसंच इयत्ता चौथीत शिकणाऱ्या लतिफा मुलानी हुसेन बद्दल घडलं वयाच्या तिसऱ्या वर्षी पोलिओमुळे अपंगत्व आले. गरिबी दारिद्र्य त्यात अपंगत्व यामुळे आई वडील हातबल झाले काय करावे काहीच कळत नव्हते. समस्याचे डोंगर तीन बहिणी एक भाऊ आई-वडील असा मोठा परिवार संसार म्हणजे जसा तवा चुल्यावर चटके सोसल्याशिवाय भाकरी मिळत नाही. धडपडत राहिले की 'भगवान के घर मे देर है लेकिन अंधेर नही' याची जाणीव झाली. लतिफा म्हणते एका निबंध स्पर्धेत मी भाग घेतलेली, स्पर्धेत मला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले संयोजकांनी माझे नाव पुकारले आलुरे गुरुजींच्या शुभहस्ते बक्षीस मिळणार होते. पण माझे दुर्भाग्य मी अपंग होते, संयोजकांना गुरुजीनी विचारले असता अपंग असल्याचे समजल्यानंतर मातृदयी गुरुजींचे अंतकरण हेलावून गेले. म्हणूनच म्हणतात,'आई लंगड्याचा पाय असते, गुरुजी माझी पाय झाले. स्वतः माझ्याजवळ आले माझ्या डोक्यावर मायेचा हात ठेवून आत्मविश्वासाची जाणीव करून दिली, पालकत्व स्वीकारले. गुरुजींच्या मातोश्री लोकमाता कै.लक्ष्मीबाई नागप्पा आलुरे कन्या वस्तीग्रहात प्रवेश देऊन माझ्या आयुष्याचे सोने केले. पाचवी ते बारावी पर्यंतचे शिक्षणाचा खर्च व नंतर दोन वर्ष टंकलेखन कोर्सची पूर्ण जबाबदारी घेतली. शांता काकी रोज डबा करून द्यायच्या त्यांच्या हृदयाची विशालता, अंतकरणाची अनंतता शब्दात बांधता येत नाही.

टंकलेखन कोर्स पूर्ण झाल्यानंतर गावी गेले.' घार उडे आकाशी चित्त तिचे पिलापाशी' या उक्तीप्रमाणे प्रत्येक दिवाळीला गुरुजी नवीन कपडे व खर्चासाठी पैसे पाठवून द्यायचे.वंचितांच्या दुरि तांच्या जीवनात आनंदाची पेरणी करणारे गुरुजी महान होते. कारण त्यांच्या विचारात आणि कृतीत अंतर नव्हते. त्यांचे बहरणे फुलासारखे आणि पसरणे सुगंधासारखे होते. त्या सुगंधाचा स्पर्श लाभला. सुगंध स्वावलंबनात परिवर्तन झाले. गुरुजींनी मला स्वतः च्या पायावरती उभे राहण्यासाठी जुलै १९९७ ला ज्योतिबा फुले रात्र शाळेत लिपिक पदाची नोकरी देऊन जीवन सार्थक केले. शबदापेक्षा कर्तृत्वाचा सामर्थ्य जास्त असतं म्हणूनच कर्तृत्वाचं खरं समाधान खांद्यावरच्या हातात असतं. कर्तृत्व असे करा जी दिसली नाही तरी चालेल पण जाणवली पाहिजे याची जाणीव गुरुजींनी करून दाखवली. गुरुजी मला भेटले नसते तर? कल्पना सुद्धा मी करू शकत नाही जन्म देणाऱ्या आई-वडिलांपेक्षाही पालन पोषण करून मार्ग दाखविणारे दीपस्तंभ म्हणजे गुरुजी आणि शांता काकी. जीवन जगत असताना आपण पाहतोय आपल्या आयुष्यात येणारी माणसं झाडाच्या अवयवासारखी असतात काही फांद्यासारखी जास्त जोर दिली की तुटणारी, काही पानासारखी अर्ध्यावर साथ सोडणारी,काही काट्यासारखी सोबत असून टोचत राहणारी आणि काही मुळासारखी न दिसता ही सुरुवातीपासून शेवटपर्यंत साथ देणारी. जीवन घडवणारी अशा व्यक्तिमत्वसमोर नतमस्तक झाल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. अनेकांना दिशा दाखवणाऱ्या दीपस्तंभास विनम्र अभिवादन! विद्यार्थी हेच गुरुजींसाठी दैवत होते.प्रत्येक कार्यक्रमाला गुरुजी आवर्जून उपस्थित राहायचे. वेगवेगळे उपक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीवरती शाबासकीची थाप द्यायचे. शिक्षकांचे, श्रीमंतांचे विद्यार्थीच भाग घेतात का सर्वसामान्य विद्यार्थी प्रवाहात आहेत की नाही याकडे लक्ष देऊन शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचे मार्गदर्शन गुरुजी करत करीत असत. विद्यालयात नाममात्र शुल्क आकारणी हे विद्यालयाचे वैशिष्ट्य. गरीब होतकर विद्यार्थ्यांसाठी वस्तीग्रह, वंचितांचे आधारस्तंभ बनून गुरुजी अश्रू पुसले.अनेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे केले. अनाथांच्या माऊली सिंधुताई सपकाळ यांना शांताई जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करून अनाथ मुलांसाठी मदत केली. आनंदवन येथील अनाथ, अपंग विद्यार्थ्यांच्या 'स्वरानंदवन' कार्यक्रम ाचे आयोजन करून त्यांच्या पाठीमागे उभे राहिले. समाजात काम करीत असताना अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती जाती प्रथा मोडीत काढण्याचे अनमोल कार्य केले.' तोरण आणि सरण 'हा व्रत गुरुजींनी अंगीकारला होता. गरीब,श्रीमंत सर्वांच्या सुखदुःखात सहभागी व्हायचे.अंधश्रद्धेच्या, असत्याच्या, अज्ञानाच्या तिमिरात चाचपडत पडलेल्या जनसमुदायासाठी गुरुजींनी ज्ञानाची ज्योत पेटवली. 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्य पाहो हा ध्यास घेतला. 'ध्यास लागली टिटवीला समुद्र तिने अठवीला' या व्यक्तीप्रमाणे शिक्षण महर्षी सि.ना. आलुरे गुरुजींनी 'दुरितांचे तिमिरजावो' हा ब्रीद सार्थक ठरवून सर्वसामान्यांच्या जीवनात नंदनवन फुलविले. गुरुजींच्या कार्यात जनकल्याण, माणुसकी व सऱ्ह दयता याचे प्रतिबिंब दिसते. माणसाच्या मनातील माणुसकीचा झरा जिवंत असेल तरच दुरितांचे तिमिर जाणे शक्य आहे.

तृतीय स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन!



**डॉ.मल्लिनाथ बिराजदार**
जवाहर महाविद्यालय, अणदूर

# आमचे दैवत - शिक्षण महर्षी सि.ना. आलूरे गुरुजी

मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागात शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोच चावी म्हणून अव्याहतपणे कार्यरत राहणारे आदरणीय गुरुजी दिनांक २ ऑगस्ट २०२१ रोजी पहाटे स्वर्गवासी झाले आणि खऱ्या अर्थाने आम्ही पोरके झालो. गुरुजींचा आधार, मार्गदर्शन खूप मौलाचे होते. गुरुजी परोपकारी, त्यागीवृत्ती मनाने स्थितप्रज्ञ आणि विशाल मनाचे होते. त्यांची साधी राहणे आणि उच्च विचार श्रेणी ही सर्वांची प्रेरणा होती.

माझ्या कैशेगावातल्या आम्हा साखरे परिवारावर गुरुजींनी प्रचंड माया केली, प्रेम दिल, आधारही दिला, माझे काका स्व. शंकरराव बसवंतप्पा साखरे हे गुरुजींचे जीवस्य कंठस्य मित्र होते. राजकारण, समाजकारण अशा क्षेत्रात माझे काका गुरुजींचे कट्टर समर्थक होते. आम्हाला कळत्या वयात काकांनी गुरुजी बद्दल त्यांच्या अलौकिक कार्याबद्दल माहिती सांगायला सुरुवात केली तेव्हा आम्हाला गुरुजींची थोरवी कळाली.

माझे शिक्षण पूर्ण झाल्यावर माझ्या नोकरीसाठी काकांनी गुरुजी जवळ शब्द टाकला आणि दिवसातच दिल्या शब्दाप्रमाणे मला लिपिक म्हणून त्यांच्या सेवेत नोकरी मिळाली. सोयरीक ही गुरुजींच्या जवळच्या नात्यातच झाली. त्यामुळे मी स्थिरावलो. माझ्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी मी नोकरीमुळेच पार पाडू शकलो.

आमचे धोरले बंधू अशोक साखरे गुरुजी आदरणीय गुरुजींच्या कार्याने भरवलेले दिसले की गुरुर्जीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अधिक जाणून घ्यायचो. त्यामुळे गुरुजींच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्याची जाण आम्हा भावंडांना होत गेली. जीवनात येणाऱ्या अनंत अडचणींना धैर्याने तोंड देण्याचे असते हे आम्ही गुरुजी कडून शिकलो. आत्मविश्वास, संयम, शिस्त, शिक्षणाबद्दल असता आणि तळमळ गुरुजींकडे पाहूनच शिकलो. गुरुजी म्हणजे चालते बोलते विद्यापीठ होते.

कै. आलुरे गुरुजींनी शिक्षकांच्या नोकरीपासूनच सुरुवात करून आमदार पदापर्यंत केलेली जीवनाची वाटचाल थक करणारी आहे. एक महान आदर्श शिक्षक, एक आदर्श प्रशासनकुशल मुख्याध्यापक, कर्मयोगी आलुरे गुरुजी हजारो विद्यार्थ्यांचे आदर्श व्यक्तिमत्व ठरले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जवाहर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात आदर्श आचारण प्रामाणिक कामकाज करून एक वेगळा ठसा उमटविला आहे. आलुरे गुरुजींचे संपूर्ण जीवन पाहण्यासारखे निर्मळ आणि पवित्र आहे. राजकारण सुद्धा गुरुजींनी आदर्शवतच केले. राजकारणात मिळवलेल्या प्रत्येक संधीचा उपयोग गुरुजींनी जनतेच्या भल्यासाठी अनेक कल्याणासाठीच केला. आज हे गुरुजींनी आदर्श मानून राजकारणात व समाजकारणात कार्यरत असणारे अनेक क्रियाशील कार्यकर्ते आपण पाहतो.

जी माणसं कोणत्या ना कोणत्या उदात्त ध्येयासाठी आपला आयुष्य वेचतात त्याचा जनमानसात कायम गौरव होत असतो. उत्कृष्ट वक्ते गांधीवादी विचारवंत म्हणूनही गुरुर्जीची ओळख आहे. साधी सोपी ग्रामीण भागातल्या लोकांना समजेल अशी भाषा त्यांच्या भाषणात असे. गुरुजी म्हणजे सर्व काही आहेत. गुरुजी या शब्दात साऱ्या श्रृती स्मृती आहेत. सारे महाकाव्ये आहेत. या अक्षरात माधुर्याचा याचा सहारा महासागर आहे. पावित्र्याचा आगार आहे. फुलांची कोमलता आहे गंगा मातेची निर्मळता आहे. चंद्राची शिलता आहे. सागराची अधांगता आहे पृथ्वीच्या क्षमाशीलता आहे. गुरुजी जन्मभर निस्वार्थी निष्काम भावनेने फक्त कर्म करत राहिले. विचारांचे ऐश्वर्य वाणीचे मधुर्य व वृत्तीचे गांभीर्य गुरुजींच्या व्यक्तिमत्वात होते इतक्या विशाल मनाच्या आणि हृदयाच्या बाबत मायेची प्रेमाची ओलावा व जिव्हाळा होता. याचा मला अभिमान वाटतो. गुरुजींची कृपादृष्टी मला लाभली. याला मी माझे परमभाग्य लाभले असे मानतो.मानवता, सहानभूती, परोपकारीवृत्ती सहकाराची भावना, आदरातीर्थ्यांची भावना हे त्यांच्याच व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे पैलू आहेत. नैतिक मूल्याचे कास धरून केवळ समाजाच्या कल्याणासाठी, भल्यांसाठी जगणारी माणसं फार कमी असतात, सेवाभाव व त्याग हा त्यांचा स्थायीभाव होता. जे जे उत्तम, उदात्त, उन्नत महन्मधुर ते ते साध्य करण्याचा ध्यास त्यांना लागला होता. इतरांच्या सुख दुःखात आपले सुखदुःख पाहणारे गुरुजी म्हणूनच एक समाजाच्या आधारवड ठरतात.



**श्री धनराज यशवंत साखरे**
(लिपिक)




०२ ऑगस्ट शिक्षण महर्षी सि.ना. आलुरे गुरुजी यांचा तृतीय स्मृतिदिन. या स्मृतिदिनानिमित्त गुरुजींना विनम्र अभिवादन करण्यासाठी आजच्या आभासी जगात दिशाहीन झालेल्या तरुणाईला,समाजाला योग्य दिशा दाखवण्यासाठी हरवत चाललेल्या समाजात मूल्य रुजविण्यासाठी प्रा. डॉ.मल्लिनाथ बिराजदार लिखित 'संस्काराचे विद्यापीठ ' शिक्षण महर्षी सि.ना. आलुरे गुरुजी यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे स्मृतिदिनाचे औचित्य साधून प्रकाशित होत आहे. त्या निमित्ताने साताऱ्याचे प्रसिद्ध साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांची प्रस्तावना.